**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे सामाजिक शास्त्र विद्याशाखा अंतर्गत राज्यशास्त्र या विषयात पीएच.डी पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध**

# बीड जिल्ह्याच्या विकासात राजकिय नेतृत्वांचे योगदान- विशेष संदर्भ : गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा (सन-१९९०-२०१०)


## संशोधक

**जोगदंड संजय पांडुरंग**

## मार्गदर्शक

**डॉ. शंकर चव्हाण**


**एप्रिल– २०१४**

# प्रमाणपत्र

*प्रमाणित करण्यात येते की, प्रा.जोगदंड संजय पांडूरंग यांनी बीड जिल्हयाच्या विकासात राजकिय नेतृत्वांचे योगदान विशेष संदर्भ : गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा (सन १९९०-२१०) या विषयावरील प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र या विषयात पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला आहे. प्रा. जोगदंड संजय पांडूरंग यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली सदर प्रबंध सादर केला असुन तो इतर कोणत्याही विद्यापीठातील कुठल्याही अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही*

*ठिकाण :*

*दिनांक : / /*

**मार्गदर्शक**

**डॉ. शंकर चव्हाण**

**बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी**

**जि.अहमदनगर**

# प्रतिज्ञा पत्र

*मी प्रा. जोगदंड संजय पांडूरंग प्रतिज्ञापूर्वक असे नमुद करतो की, ''बीड जिल्हयाच्या विकासात राजकीय नेतृत्वांचे योगदान- विशेष संदर्भः गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा (सन १९९०-२०१०) या विषयावरील प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र या विषयात पीएच.डी. पदवीसाठी सादर केला आहे.*

*मी हा प्रबंध डॉ. शंकर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पुर्वक लिहिललेला आहे. यातील सर्व मजकुर माझ्या अभ्यासावर व संधोधनावर आधारला आहे. मी हा प्रबंध या व्यतिरिक्त इतर कोणत्याही विद्यापीठातील, कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.*

*ठिकाण :*

*दिनांक :   /  /*

**संशोधक**

**जोगदंड संजय पांडूरंग**

# ऋणनिर्देश

''बीड जिल्हयाच्या विकासात राजकीय नेतृत्वांचे योगदान -विशेष संदर्भः गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा (सन १९९०-२०१०) ''या विषयावर शोध प्रबंध सादर करताना आज मला अत्यानंद होत आहे. राज्यशास्त्राचा एक प्राध्यापक म्हणून समाजातील अनेक बाबींकडे लक्ष केंद्रीत होते. बीड जिल्हयाच्या विकासात अनेक राजकीय नेतृत्वांनी प्रयत्न केलेले आहेत. मात्र विशेषतः जिल्हयातील वरील तिन्ही नेतृत्वांनी गेली अनेक वर्षे विकासाचा मुद्दा घेऊन राजकारण केले आहे. त्या मुळे हा विषय घेण्याचे ठरविले.

एखादे उदिष्ठ समोर ठेवुन चालताना असंख्य अडचणी समोर येतात . त्या मलाही आल्या पण माझे मार्गदर्शक डॉ.शंकर चव्हाण सरांनी वारंवार दाखविलेली दिशा माझे धैर्य वाढविण्यास सहाय्यभुत ठरले. या कार्यासाठी महत्वपुर्ण व अनमोल मार्गदर्शन सरांनी केल्याबद्दल प्रथम आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो.

कृष्णाई शिक्षण संस्थेचे सचिव व माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे साहेब, उपाध्यक्ष मा.श्री. युवराजजी गोरे (दादा) यांनी वेळोवळी केलेल्या मार्गदर्शनामुळे मी आज हे कार्य पुर्ण करु शकलो. त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

जनविकास महाविद्यालय बनसारोळा येथील प्राचार्य डॉ. कल्पना र्‍हसाले तसेच माझे सहकारी मित्र प्रा.डॉ. हरीदास पिसाळ, प्रा.डॉ.गोपाळ भोसले, प्रा. सतिश कदम, प्रा.डॉ.मुरलीधर लहाडे, प्रा. प्रकर्ष काकडे, प्रा. राजेश गायकवाड, प्रा. मोहन कांबळे, प्रा. केशव तिडके, प्रा. जयंत मोरे, प्रा. नंदकिशोर, चिताडे, प्रा. अविनाश माने, प्रा.डॉ. गितांजली मोटे, प्रा. संगिता मोरे, प्रा. बाळसाहेब गोरे, प्रा. विजय विनकर, प्रा. विनायक कदम, प्रा. संदिप हंडीबाग, प्रा. उमाकांत गोरे, श्री.संतोष कणसे, श्री. सुधाकर गोडसे, श्री. श्रीकांत गोरे यांनी मला शोध प्रबंधासाठी सहकार्य व प्रोत्साहन दिले. त्याबद्दल मी त्यांचा अभारी आहे.

माझ्या आई-वडिलांनी मला सातत्याने प्रोत्साहन व माझ्यावरील विश्वास माझ्यासाठी नेहमीच संजीवनी ठरला आहे. माझे काका माणिक जोगदंड, आत्माराम जोगदंड, काकु सुमिता जोगदंड, अलका जोगदंड तसेच माझे मोठे भाऊ तानाजी जोगदंड(बप्पा), ॲड सुधीर जोगदंड, बहिणबाई निर्मलाताई, उर्मिला (आबई), वर्षाताई, अस्मिताताई, मिनाक्षी वहिनी, रेश्मा वहिनी माझे मोठे मेव्हणे दत्तात्रय पाटोळे सर, काशिनाथ वाघोलकर , मुकुंद गालफाडे सर, दिपक चांदणे यांनी मला शिक्षणाची सतत प्रेरणा देऊन पुढे आणले त्यांचा मी ऋणी आहे.

मा.श्री अंकुश चव्हाण, पूनम चव्हाण, पद्माकर चांदणे, प्रियंका चांदणे, धनंजय जोगदंड, अजित थोरात, प्रदिप पाटोळे, प्रशांत पाटोळे, ऋषीकेश वाघोलीकर , आदित्य गालफाडे, तसेच माझे मित्र डॉ. मिलिंद आव्हाड, डॉ. मुकूंद राजपंखे, प्रा. संजय गायकवाड, श्री. उध्दव काकडे यांनी संशोधन कार्यात सहकार्य केल्याबद्दल त्यांचेही आभार मानतो.

माझी पत्नी सौ. शितल जोगदंड हिने मला सहकार्य केल्यामुळेच हे संशोधनाचे कार्य पुर्ण करु शकलो. माझी मुलगी क्षितीजा, सानिया यांचाही उल्लेख करणे आवश्यक आहे.

तसेच शोध प्रबंध कमी कालावधीत डी.टी.पी. करुन दिल्या बद्दल दिपक सरवदे यांचेही मी आभार मानतो. प्रस्तुत शोध प्रबंधासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मला अनेकांनी संशोधन कार्यात सहकार्य केले. त्याबद्दल मी त्या सर्वांचे मनःपुर्वक आभार मानतो.

- जोगदंड संजय पांडूरंग

# अनुक्रमणिका


| अ.क्र | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना आणि संशोधन पध्दती | १ ते २२ |
| २ | बीड जिल्हा-एक दृष्टिक्षेप | २३ ते ७० |
| ३ | बीड जिल्हयातील राजकीय नेतृत्वांचे योगदान | ७१ ते १९६ |
| | अ)गोपीनाथ मुंडे- बीड जिल्हयाच्या विकासात योगदान | |
| | ब) जयदत्त क्षीरसागर-बीड जिल्हयाच्या विकासात योगदान | |
| | क) विमलताई मुंदडा- बीड जिल्हयाच्या विकासात- योगदान | |
| ४ | बीड जिल्हयाच्या विकासाच्या मर्यादा | १९७ ते २०८ |
| ५ | सारांश, निष्कर्ष, शिफारशी | २०९ ते २२४ |
| ६ | परिशिष्टे | २२५ ते २४४ |
| | अ) मुलाखती | |
| | ब) छायाचित्रे | |
| | क) नकाशा | |
| ८ | संदर्भग्रंथ सूची | २४५ ते २५४ |

# प्रकरण १ ले

## प्रस्तावना आणि संशोधन पध्दती

## प्रकरण पहिले

## प्रस्तावना आणि संशोधन पध्दती

१.१ प्रस्तावना

१.२ नेतृत्व

१.३ समस्या सुत्रण

१.४ संशोधनाचे उदिष्ट्ये

१.५ संशोधनाच्या मर्यादा

१.६ संशोधनाचे महत्व

१.७ पुर्व अभ्यासकांचा आढावा

१.८ सैध्दांतीक पार्श्वभुमी

१.९ संशोधनाचे गृहितके

१.१० संशोधन पध्दती

१.११ नमुना निवड

१.१२ संशोधन क्षेत्र व्याप्ती

१.१३ संशोधन आराखडा

संदर्भ

## प्रकरण १ ले

## प्रस्तावना

### १.१ प्रस्तावनाः-

कोणत्याही समाजव्यवस्थेत आदर्श कल्पना, विचारसरणी, सुसंस्कृतता आणि आदर्श मुल्य अमुर्त स्वरुपात असतात ही मुर्त स्वरुपात साकार करण्यासाठी आणि मुल्यांना समाजामध्ये हस्तांतरीत करण्यासाठी समाजातुन नेतृत्व पुढे येते. ॲरिस्टॉलसारख्या ग्रीक विचारवंताने मानवी प्राण्यांचे वर्णन करताना असे म्हटले आहे. की तो समाजाशिवाय जीवन जगुच शकत नाही. तथदतच तो राजकीय मानव देखील आहे. म्हणुनच मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रास प्रभावित करणारा घटक म्हणजे राजकीय वातावरण होय. या राजकीय पर्यावरणास प्रभावित करणारे अनेक घटक आहेत. त्यातील महत्वाचा घटक म्हणजे नेतृत्व होय हे नेतृत्व मानवी जीवनात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक इत्यादी विभिन्न पातळ्यांवर कार्यरत असते. ज्यावेळी हे कार्य राजकीय अंगाला स्पर्श करुन जाते त्यावेळी ते  राजकीय नेतृत्व म्हणुन उदयास येते.

व्यक्ती, व्यक्तिमत्व व मानवी संबंधाच्या अभ्यासासाठी अनेक सामाजिक शास्त्रे व मानवंशशास्त्रे निर्माण झाली. विशेषतः मानसशास्त्राच्या विकासाबरोबर नेतृत्व संकल्पनेचा विकास झाला यातुनच पुढे राजकीय नेतृत्वाचे अध्ययन सुरु झाले. सामान्यतः नेतृत्व हा शब्द समाजस्तरातील सर्व स्तरांना परिचित आहे. प्राचीन काळापासुनच आतापर्यंत अनेक नेतृत्व निर्माण झाले. त्यांच्या जीवनकार्याची व नेतृत्व गुणांची चर्चा अनेक वेळा वेगवेगळ्या माध्यमातुन शास्त्रीय दृष्टीने विचार केल्यास नेतृत्व या संकल्पनेचे सैध्दांतीक दृष्टिने अध्ययन झालेले नाही. सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनामध्ये २० व्या शतकाच्या माध्यमापर्यंत नेतृत्व या संकलपनेकडे सामाजिक शास्त्राचे पुरेसे लक्ष नव्हते. न्युमार्क सारख्या विशाल ग्रंथालयामध्ये ४० वर्षापुर्वी  या शिर्षकाखाली एकच पुस्तक आढळुन आले. या पुस्तकातील लेखातुन सैध्दांतिक बाबींचे विवेचन न करता  फॅसिस्ट पुढारी अमेरिकेतील नेतृत्व असे ऐतिहासिक व वर्णनात्मक लेखन केलेले आढळुन आले. म्हणुन सेलिगमन यांच्या  ग्रंथात तो म्हणतो की, नेतृत्वाव्दारे राजकारण  हे २० व्या शतकाचे ठळक वैशिष्टये आहे. २० व्या शतकापुर्वी नेतृत्वाच्या कार्याच्या गुणांचे वर्णन केले जात होते. परंतु सामाजिक संशोधन अध्ययनामध्ये जसा जसा विकास होत गेला तसे

राजकीय नेतृत्व या संकल्पनेच्या सैध्दांतिक अभ्यास करीत असताना आपणाला या संकल्पनेचे अर्थ व स्वरुप पाहणे क्रमप्राप्त ठरते.

**राजकीय म्हणजे काय ?**

प्रागौतिहासिक काळ आदिमानवाच्या विकासाचा तर ऐतिहासिक काळ मानवी विकासाचा आहे. एकुण मानवाच्या विकासाचा इतिहास उत्क्रांतवाद गतीने होत गेला आहे. मानवाच्या संस्कृतीचा विकास होत असताना तो नदीकाठी स्थिरावला हळुहळु अग्नीचा शोध, चाकाचा शोध शेतीचा शोध लागला. नदी. तलावच्या काठावर मानवी संस्कृती स्थापन झाली व उत्तरोत्तर विकास होऊ लागला. प्राचीन काळी जो मनुष्य एकटा राहत होता आता तो घर बाधुन समुदायाने जीवन जगु लागला हळुहळु टाळ्या निर्माण झाल्या. प्राचीन ग्रीक काळातील आर्यांच्या व आनार्यांच्या टोळ्या असो यांच्यात संघर्ष अपारिहार्य झाला होता. भुमीच्या अस्तित्वासाठी सर्व मानवी, संस्कृतीतील टोळ्या लढु लागल्या.त्यातुन पुढे राज्य आकारास येऊ लागले. राज्य उत्पत्तीच्या सिध्दांताविषयी अथवा विकासासंबधी अनेक विचारवंताचे अनेक मते आहेत प्रर्कषाने राज्य उत्पत्तीचा देवी सिध्दांत उत्क्रांतवादी सिध्दांत ऐतिहासिक सिध्दांत सामाजिक कराराचा सिध्दांत उद्यास येऊन राज्य उत्पत्तीसंबधी अध्ययन होऊ लागले. परंतु हे अध्ययन संदिग्ध आहे. काही प्रमाणात राज्यनिर्माण होऊन त्यास राजकीय आशय निर्माण पुढील राजकीय आशयासंबंधी पुढील बाबींचे विवेचन करावेसे वाटते[१].

प्राचीन काळी कौटिल्याने राज्यशास्त्रावर व्यापक प्रकाश टाकणारा 'अर्थशास्त्र' नावाचा आगळा वेगळा ग्रंथ लिहिला प्राचीन ग्रीक राजकीय विचारवंत प्लेटो, ऑरिस्टॉटल यांच्या पुर्वीपासुनच भारतात राज्यशास्त्रासंबंधी सर्वांगिन विचार वृध्दींगत होत गेले होते. पाश्चात्य विदवानांनी देखील कौटंल्याच्या विचारांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे अर्थशास्त्रांची व्याख्या करताना चाणक्य म्हणतो, मानवाने युक्त भुमी म्हणजे अर्थ होय. अशा भुमीचे (राज्याचे) संपादन व संरक्षण करण्याचे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय. एकुण राज्य कसे मिळवावे टिकवावे आणि चालवावे यासंबंधीचे मार्गदर्शन कौटिल्याने अर्थशास्त्रात केल्यामुळे राज्याच्या घटकातील भिन्न स्तरातील व्यक्तीच्या वर्तनाची चिकित्सा व मार्गदर्शन चाणक्याने केले आहे. अशा प्रकारे वर्तनवादी क्रांतीच्या हजारो वर्ष अगोदर त्याने राजकीय शत्रुची चिकित्सा केल्याचे दिसुन येते.

कौटिल्याने राजविद्येचे महत्व सांगतांना अन्विसिकी, वेदत्रयी, वार्ता ह्या तिन्ही विद्यांचा उहापोह केला. या तिन्ही विद्यांना संरक्षण व शाश्वती प्राप्त होते ती दंडनीतीने यालाच राजविद्या म्हटले आहे. भौतिक जगाचा संपुर्ण व्यवहार याच विद्येवर अवलंबुन असतो. दंडनीतीचा वापर शासक जेव्हा विचारपुर्वक करतो तेव्हा प्रजेला पुरुषार्थाची प्राप्ती होते. अशा प्रकारे राजकीय तथा राजकीय व्यवहार यांची व्यापक व शास्त्रीय मिमांसा कौटिल्याने केली. राजकीय शब्दाची व्याप्ती लक्षात घेऊन भिष्माचार्यांनी राजधर्माला हत्तीच्या पायाची उपमा दिली आहे. ॲरिस्टॉटलने देखील राज्यशास्त्राला प्रमुख शास्त्र म्हटले आहे. प्लेटोने आपल्या जगप्रसिध्द रिपब्लीक या ग्रंथामध्ये आदर्श राज्य व आदर्श राजा या संबंधी विचार मांडले तत्वश राज्यकर्ता लोकसेवेसाठी समर्पित जीवन जगणारा असतो. सुख दुःखाचा विचार करत नाही. स्वयंनियंत्रित प्रशासकीय क्षेत्रातील तज्ञ असणारा राज्यशास्त्राचा जनक ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्रावरील आपल्या पुस्तकाचे नाव politics असे ठेवले कारण ग्रीक भाषेत polic म्हणजे नगरराज्य होय. यावरुन राज्याचा अभ्यास करणारे ते पॉलिटिक्स होय. ऑरिस्टॉटलने म्हणुनच राज्यशास्त्राला master science म्हटले आहे. आधुनिक राज्यशास्त्राचा जनक मॅकिव्हली या इटालियन विचारवंताने आपल्या सुप्रासिध्द The prince ग्रंथामध्ये राजा व राज्य राजकीय शब्दाचे विस्तृत विवेचन केले आहे. राजाने कोल्हयासारखे धुर्त सिंहासारखे शुर असावे. राज्य टिकवणे, वाढविणे हा उद्देश समोर ठेवुन राज्यकारभार करावा आधुनिक विचारवंतापैकी डाल्ह लॉस्वेल कप्लान यांनी शक्तीच्या दृष्टिकोनातुन राज्यशास्त्राची मिमांसा केली आहे. डाल्ह म्हणतोा की, शक्ती शासनक्रिया व सत्ता यांच्याशी संबंधीत विश्लेषण राज्यशास्त्रात होते, तर लॉस्वेल म्हणतो कुणाला केव्हा व कसे मिळते यांचा शोध राज्यशास्त्रात होतो. थोडक्यात सत्तेसंबंधी माणसाचे व्यवहार म्हणजे राजकीय होय यावरुन राजकीय संकल्पना बहुआयामी व व्यापक आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे आर्थिक सामाजिक, धार्मिक, राजकीय अशा भिन्न शब्दामधुन राजकीय असे विभाजन करता येत नाही. कित्येक धार्मिक व आर्थिक घटकाचे परिमाण आर्थिक किंवा धार्मिक होऊ शकतात. एकुण राजकीय ही संकल्पना प्राचीन काळापासुन आस्तित्वात आहे हे सदरील राजकीय विचारवंताच्या मतांनी स्पष्ट होताना दिसत[२].

## १.२ नेतृत्व :-

जेव्हा काही व्यक्ती एकत्र येतात, विशिष्ट उदिष्टये दृष्टीसमोर ठेवतात व हे उदिष्ट गाठण्याकरिता योजनाबध्द प्रयत्न करु लागतात तेव्हा तेथे नेतृत्वाचा प्रश्न उदभवतो आणि नेतृत्वाची आवश्यकता जाणवते. व्यक्तिंच्या या समुहाला योग्य नेतृत्व प्राप्त झाल्यास समुहाला दिशा मिळते, सर्व शक्ती त्या दिशेने वळविली जाऊ शकते, साधनांचा उत्कृष्ट उपयोग संभवतो, पुर्व निर्धारित धोरणे व्यवस्थितपणे राबविली जातात. योजनांची कार्यक्षमपणे अंमलबजावणी घडुन येऊ शकते, व्यक्तिंनी केलेल्या प्रयत्नांची कार्यक्षमपणे अंमलबजावणी घडुन येऊ शकते, व्यक्तिंनी केलेल्या प्रयत्नांची परिणाम कारकता वाढते व या सर्व गोष्टींचा परिणाम होऊन पर्यायाने उपक्रमांची उदिष्टये गाठली जाऊ शकतात. प्रत्येक समुहामध्ये नेतृत्वाचे कार्य एखादी व्यक्ती जाणीवपुर्वक करीत असते. नेतृत्वाशिवाय समुहाची कल्पना करता येईल, परंतू हा आपली उदिष्टये गाठण्यामध्ये कधीही यशस्वी होत नाही.

लोकशाही प्रणालीमध्ये नेता आणि नेतृत्व यास अनन्यसाधारण महत्व आहे. विशेषतः पंचायत राज संस्थांमध्ये नेत्यास अधिक महत्व आहे कारण या संस्थांतील नेता हा ग्रामिण विकासाचा केंद्रबिंदू आहे. समाजामध्ये राजकीय, सामाजिक व तांत्रिक बदल घडवुन आणण्यात नेत्यांचा सिंहाचा वाटा आहे. शासकीय किंवा निमशासकीय योजना गावपातळीवर राबविणे, याविषयी लोकांना जागृत करुन प्रोत्साहित करणे व विकास प्रक्रियेत भाग घेण्यास उद्युक्त करणे हे त्याचे प्रमुख कार्य आहे, या दृष्टीकोनातून नेता कोणास म्हणावे, नेत्याचे प्रकार कोणते व त्याची गुणवैशिष्टये आणि कार्य इत्यादींचा सैध्दांतिक विचार करणे आवश्यक ठरते[३].

### नेतृत्वाची व्याख्या :-

नेतृत्वाची संकल्पना फार जुनी आहे. मानवी जीवनाच्या निर्मितीबरोबरच नेतृत्वाच्या कार्याची गरज भासु लागली. अनेक फुलांना दोऱ्यामध्ये ओवल्यानंतर हार तयार होतो. बाहेरुन पाहणाऱ्या व्यक्तिला दोर दिसत नाही. परंतु दोऱ्याची प्रक्रिया दिसत नाही. अनेकदा तर ती जाणवतही नाही. पण नेतृत्वाशिवाय कोणताही व्यक्ती समुह सक्रिय होऊ शकत नाही. नेतृत्व म्हणजे व्यक्ती व समुहांमधील संबंध होय. त्यानुसार अर्थ किंवा व्याख्या पुढीलप्रमाणे सांगितल्या जातात.

१) हेपल :- या शास्त्रज्ञाने नेतृत्वाची व्याख्या अशी केली आहे की, 'नेतृत्व म्हणजे एका व्यक्तिचे

अथवा अनेक व्यक्तिंचे गट रचनेतील व कार्यातील स्थान, जे गटाचे हेतु व गरजा भागविण्याकरिता कामी येते, हे कार्य गटातील सदस्यांच्या सहकार्यानेच पुर्ण होते.

२) हॉकर व गिब्सन :- यांच्या मते नेतृत्व म्हणजे असे संबंध जे गटात अस्तित्वात आहेत व ज्यांच्या प्रभावाने एक व्यक्ति इतर व्यक्तिंवर एखादा सामान्य हेतु साध्य करण्याकरिता परिणाम घडविते.

३) समाजशास्त्राच्या ज्ञानकोषामध्ये नेतृत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट.केली आहे. 'एखाद्या सामान्य हितसंबंधाच्या भोवती व्यक्ति आणि समुहामध्ये प्रस्थापित झालेला संबंध म्हणजे नेतृत्व होय. त्यामुळे समुहामध्ये सहभागी झालेल्या व्यक्ति नेत्याच्या निर्देशानुसार कार्य करु लागतात.

४) चेस्टर बर्नार्ड :- यांच्या मते ''.नेतृत्व म्हणजे व्यक्तिंच्या वागणुकीचा असा गुण होय ज्यामुळे हि व्यक्ति इतर व्यक्तिंना त्यांच्या संघटित प्रयत्नांमध्ये मार्गदर्शन करते.''

५) जॉर्ज टेरी :- यांनी नेतृत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''नेतृत्व म्हणजे लोकांना प्रभावित करुन पारस्पारिक उद्यिष्टये गाठता यावीत याकरिता प्रयत्न करण्यासाठी प्रवृत्त करण्याची क्षमता होय.''

६) हॉज आणि जॉन्सन :- यांच्या मते ''औपचारिक किंवा अनौपचारिक परिस्थितीमध्ये इतरांच्या प्रवृत्तीला व वागणुकीला आकार देण्याची योग्यता म्हणजे नेतृत्व होय.

**७) फ्रँकलिन मूरः-** यांनी नेतृत्वाची सुटसुटित व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''नेत्याच्या इच्छेनुसार लोकांना वागण्याकरिता प्रवृत्त करण्याची क्षमता म्हणजे नेतृत्व होय.''

८) लिव्हिंगस्टन यांनीही याच आशयाची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते, ''सामान्य उदिष्ट अनुसरण्याची इच्छा इतरांमध्ये उत्पन्न करण्याच्या क्षमतेला नेतृत्व म्हणता येईल.''

९) कून्टज आणि ओ'डोनला.या ग्रंथकारांनी नेतृत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''उदिष्टांच्या प्राप्तीसाठी संदेशवहनाच्या माध्यमातून संबंधितांवर प्रभाव पाडण्याची क्षमता म्हणजे नेतृत्व होय. व्यवस्थापकाचा संबंध इतरांकडून काम करवून घेण्याशी येत असल्याचे त्याचे यश हे नेतृत्व देण्याच्या क्षमतेवर बरेच अवलंबुन असते.''

१०) ऑवर्ड टीड यांचा अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे. ''नेतृत्व म्हणजे व्यक्तिजवळ असणारा असा गुणसमुचय होय की ज्यामुळे इमरांकडुन कार्य करवून घेणे शक्य होते. नेत्याच्या प्रभावामुळे काम करण्यास ते स्वेच्छेने तयार होतात.

११) पीटर ड्रकर यांनी नेतृत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. ''मित्र निर्माण करणे आणि इतरांवर प्रभाव पाडणे म्हणजे नेतृत्व नव्हे, त्याला विक्री कला म्हणता येईल. नेतृत्व म्हणजे व्यक्तिी दूरदृष्टी वरच्या पातळीवर उंचावणे, व्यक्तिंच्या कार्यनिष्पादनाचा दर्जा सुधारणे व सामान्य मर्यादेपलिकडे व्यक्तिंच्या व्यक्तिमत्वाचा विकास घडवुन आणणे होय.

सारांश रुपाने नेतृत्व म्हणजे विशिष्ट प्रकारची योग्यता, पात्रता किंवा विभिन्न गुणांचा समुचय असा अर्थ होतो. आधुनिक काळात नेतृत्व हे एक व्यवस्थापनाचे कार्य होय. व्यवस्थापकाने हे कार्य केल्याशिवाय व्यवस्थापनाच्या प्रक्रियेला अपेक्षित वेग प्राप्त होत नाही. नेतृत्वाचा संबंध जसा व्यक्तिंशी येतो तसाच तो परिस्थितीशीसुध्दा असतो. नेतृत्वामुळे समुहाला दिशा कळते, समुह कार्यप्रवण होतो व समुहाने केलेल्या प्रयत्नांची परिणती संघटनेची उदिष्टये साध्य होण्यात घडुन येते. या दृष्टिकोनातून विचार केल्यास क्रिबिन यांनी व्यक्त केलेल्या पुढील अभिप्रायावरुन नेतृत्वाच्या संकल्पनेची विभिन्न परिमाणे स्पष्ट होतात.

**१२) क्रिबिन :-** ''नेतृत्व ही समुहाला प्रभावित करणारी प्रक्रिया होय. या प्रक्रियेला विशिष्ट प्रकारची स्थिती, काम आणि परिस्थितीचा संदर्भ असतो. नेतृत्वामुळे समुहाचे अभिप्रेरणा घडुन येते. या अभिप्रेरणाचा परिणामात म्हणून संघटनेची उदिष्टे गाठण्याकरिता लोक स्वतःहून प्रयत्न करु लागतात. नेतृत्वाच्या प्रक्रियेमुळे समुहाचे घटक असलेल्या व्यक्तिंना सामान्य उदिष्टये गाठण्याच्या कार्यामध्ये सहभागी होण्याचा अनुभव आणि त्यांना प्राप्त होणाऱ्या नेतृत्वाबद्दल समाधानाची अनुभुती प्राप्त होते.''

थोडक्यात नेतृत्व म्हणजे समुहाला प्रभावित करण्याची प्रक्रिया होय. या प्रक्रियेला विशिष्ट प्रकारची स्थिती, काम आणि परिस्थितीचा संदर्भ असतो. यामुळे समुहाचे अभिप्रेरण घडुन येते, या अभिप्रेरणाचा परिणाम म्हणून संघटनेची उदिष्टे गाठण्याकरिता लोक स्वतःहून प्रयत्न करु लागतात. नेतृत्वाच्या प्रक्रियेमुळे समुहाचे घटक असलेल्या व्यक्तिंना सामान्य उदिष्टये गाठण्याच्या कार्यामध्ये सहभागी होण्याचा अनुभव आणि त्यांना प्राप्त होणाऱ्या नेतृत्वाबद्दल समाधानाची अनुभुती प्राप्त होते[४].

## नेतृत्वाची वैशिष्टये :-

नेतृत्वाची संकल्पना अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने नेतृत्वाची काही प्रमुख वैशिष्टये लक्षात घेणे आवश्यक ठरते.

**१) अनुयायांचे अस्तित्व :-** नेतृत्वशिवाय समुहाची कल्पना करता येत नाही. त्याचबरोबर समुहाशिवाय नेतृत्वाची कल्पना करता येत नाही. नेता म्हणजे, नेता आणि त्याच्या आदेशानुसार तत्परतेने कार्य करण्यासाठी उत्सुक असलेल्या व्यक्तिंचा समुह यामधील संबंध होय.

**२) परिस्थितीचा संदर्भ :-** नेतृत्वास वेळ, स्थिती तसेच परिस्थितीचा संदर्भ असतो. सामान्य परिस्थिती दीर्घकाळपर्यंत तशीच कायम राहिल्यास नेतृत्वाची गरज जाणवत नाही. परिस्थिती जेव्हा असाधारण बनते, नवीन समस्या जेव्हा उदभवतात, नवीन आव्हाने निर्माण होतात तेव्हा नेतृत्वाची गरज तीव्रतेने जाणवते. एवढेच नव्हे तर अशा प्रसंगी नेतृत्वाच्या गुणांचे प्रकटीकरण होण्यासाठीही पुरेसा वाव मिळतो.

**३) नेता आणि अनुयायी यामधील संबंध :-** नेता आणि अनुयायी यामधील संबंध हाच नेतृत्वाचा आधार असतो. नेता आणि अनुयायी यामध्ये परस्पर संबंध स्नेहपुर्ण व सक्रिय असायला हवे. हे संबंध औपचारिक व अनौपचारिक अशा दोन्ही प्रकारचे असतात. तसेच हे संबंध नेता आणि अनुयायी या अनुषंगानेदेखील असतात.

**४) सामान्य उदिष्टये :-** नेतृत्वाच्या ज्या व्याख्यांचा यापुर्वी उल्लेख केला आहे. त्यापैकी बहुतेक व्याख्यांमध्ये सामान्य उदिष्टांबद्दलचा उल्लेख समान असल्याशिवाय नेतृत्वाची गरज उत्पन्न होत नाही. एखाद्या व्यक्तिने नेतृत्व प्रदान करण्याचे कार्य केले तरी ते परिणामकारक ठरत नाही. म्हणजेच नेतृत्वाच्या संकल्पनेमध्ये सर्वांपुढे एकच उदिष्ट असणे, ते सर्वमान्य असणे व त्याबद्दल सर्वांना पुर्ण जाणीव असणे व ते उदिष्ट साध्य करुन घेण्यासाठी सर्वांनी स्वयंस्फुर्तीने व जिद्दीने प्रयत्न करणे या बाबी आवश्यक ठरतात. या बाबतीत जॉन टेरी असे म्हणतात की,''ऩेतृत्व म्हणजे लोकांना प्रभावित करुन पारस्परिक उदिष्टे गाठण्यासाठी स्वयंस्फुर्त प्रयत्न करायला प्रवृत्त करण्याची क्रिया होय.''

**५) नमुनेदार वागणूक:-** नेतृत्व म्हणजे समुहापुढे आदर्श प्रस्थापित करणे, काम करण्याच्या बाबतीत पुढाकार घेणे आणि आपल्या नमुनेदार किंवा आदर्श वागणूकिने इतरांना प्रभावित करुन त्यांना विशिष्ट रितीने कार्य करण्यासाठी अभिप्रेत करण्याची क्रिया होय. प्रत्येक प्रकारच्या परिस्थितीमध्ये नेत्यांनी पुढाकार घ्यायला हवा. त्यांनी असे न केल्यास त्याच्या नेतृत्वाची परिणामकारकता झपाट्याने घटत जाईल. या बाबतीत लिडॉल उर्विक असे म्हणतात की, नेता.काय बोलतो, तो काय लिहितो याचा अनुयायावर परिणाम होत नाही. तो कसा आहे हीच महत्वाची बाब ठरते. नेता काम करतो आणि तो

कसा वागतो यावरुनच अनुयायी नेत्याचे मुल्यमापन करीत असतात.

**६) गतिशील प्रक्रिया :–** प्रत्येक क्षेत्रामध्ये नेतृत्वाची आवश्यकता असते. नेतृत्वाची गरज नाही अशी कोणतीच अवस्था नसते. नेतृत्व ही एक गतिशील प्रक्रिया असुन सामान्य परिस्थितीपेक्षा असाधारण परिस्थिती निर्माण झाली असता नेतृतवाचे महत्व अनेक पटीने वाढते.

**७) सहाय्यकांच्या व्यक्तिमत्वाचा विकास :–** प्रभावी नेतृत्वाचे निकष कोणते या प्रश्नाच्या बाबतीत मतभेद संभवतात. निर्धारित उदिष्टे गाठण्याच्या दृष्टीने नेतृत्वाने प्रयत्न केल्यास ते नेतृत्व अधिक परिणामकारक आहे, असे मानले जाते. सहाय्यकांच्या व्यक्तिमत्वाला नवीन पैलु पाडणे व त्यांना प्रगतीची संधी प्राप्त करुन देणे हे नेतृत्वाचे एक प्रमुख कार्य मानले जाते. अशा प्रकारे नेतृत्व हि एक सामाजिक प्रक्रिया असुन जी एखाद्या कार्याला व करणाऱ्यांना चालना देते.

## नेतृत्वाचे प्रकार :–

नेतृत्व निर्मितीच्या प्रक्रियेचे स्वरुप, नेतृत्वाचा आधार, नेतृत्वाची गणुवैशिष्टये, नेता व सहाय्यक यामधील परस्पर संबंध, नेत्याची सहाय्यकाकडुन काम करुन घेण्याची पध्दती इत्यादी गोष्टिंचा विचार करता नेतृत्वाचे अनेक प्रकार आढळतात. जसे– कृतिशील पुढारी, संकल्पित प्रतिनिधी पुढारी, लोकप्रतिनिधी, व्यावसायिक नेतृत्व, लोकशाही नेतृत्व, हुकूमशाही नेतृत्व, अनियंत्रित नेतृत्व इत्यादी प्रकार सांगितले जातात.

## नेत्याचे गुण :–

नेता म्हणून काम करताना त्यांच्या अंगी नेमके कोणते गुण असावेत, हे पाहणे महत्वाचे ठरते व त्यानुसारच पुढील प्रमाणे नेत्याचे गुण सांगितले जातात. नेता हा शारिरिक व मानसिकदृष्या सुद्दढ असावा, तो चाणाक्ष असावा, तो धेय्यवादी असावा त्यास सामाजिक जाणीव असावी, त्याच्या मध्ये लोकांविषयी सहानुभुती असावी, तो अनेक बाबींचा प्रवर्तक असावा. तो उत्साही असावा, त्याच्यामध्ये निर्णयक्षमता असावी, तो प्रामाणिक व सचोटीने कार्य करणारा असावा, तो एक उत्तम शिक्षक असावा, तो लोकसंग्राहक असावा आणि अभिनय, भुमिका बजावणारा असावा. इत्यादी गुणांवरच नेत्याचे प्रभावीपण अवलंबुन असल्याचे दिसुन येते, असे असले तरी वरील सर्व गुण नेत्यामध्ये जन्मजात असतीलच असे नाही. म्हणुनच विशेषतः लोकशाहीमधील विविध राजकीय संस्थांमध्ये निवडुन येणाऱ्या

प्रतिनिधींमध्ये वरील प्रकारचे काही गुण निर्माण होण्यास मदत होत असते[५].

## १.३ समस्या सुत्रण :-

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १९६० रोजी झाली आणि खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांच्या विकासाला सुरुवात झाली असे दिसून येते. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा.यशवंतराव चव्हाण यांनी राज्याच्या विकासासाठी सर्व स्तरावरुन प्रयत्न केले. त्यात प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात भरीव प्रयत्न झाल्याचे दिसुन येतात. परंतु राज्यातील सर्व जिल्हयांचा विकास समान पध्दतीने झालेला दिसुन येत नाही. पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हयांचा विकास हा मराठवाड्यातील जिल्हयांपेक्षा जास्त झाल्याचा दिसुन येतो असे दिसते[६].

बीड जिल्हा हा विकासीत जिल्हा आहे. असे दिसुन येत नाही तर तो ऊसतोड कामगारांचा जिल्हा आहे. असेच दिसुन येते. कारण जवळपास ६ लाख ऊसतोड कामगार या जिल्ह्यात आहेत असे आढळुन येते म्हणुन खऱ्या अर्थाने या जिल्हयाच्या विकसासाठी येथिल प्रमुख नेतृत्वांनी काय कोमे केले आहेत? व काय कामे राबवयाला पाहिजेत ही एक समस्या आहे.

१) बीड जिल्हयाचा विकास इतर जिल्हयाच्या तुलनेत कमी झालेला दिसुन येतो.

२) विचार, कार्यक्रम आणि कृतीच्या बाबतीत राजकिय नेतृत्वांचे योगदान कमी पडलेले आहे.

३) बहुजन समाजासाठी विविध योजना राबविल्या गेल्या नाहीत.

४) राजकीय नेतृत्वांनी राबविलेल्या योजनेतुन जिल्हयाचा वेगळा ठसा निर्माण झालेला नाही.

५) बीड जिल्याचा सामाजिक, शैक्षणिक, सहकार, औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणात झालेला नाही.

## १.४ संधोधनाचे उदिष्टे :-

प्रत्येक संशोधनाचे उदिष्टये अथवा हेतु हा मानवाची वृध्दी करणे हा असतो. संशोधन हे मानववृध्दीचे साधन आहे. ’बीड जिल्हयाच्या विकासात राजकीय नेतृत्वांचे योगदान विशेष संदर्भ गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा (सन १९९० ते सन २०१०) या अभ्यास विषयाचे संशोधन करण्यासाठी काही उदिष्ठांची निश्चिती करण्यात आली आहे. कारण उदिष्ठांशिवाय कोणत्याही संशोधन कार्याची पुर्तता होऊ शकत नाही. प्रस्तुत संशोधनासाठी खालील उदिष्टे समोर

ठेवण्यात आली होती.

१) राजकीय नेतृत्व ही मुळ संकल्पना सैध्दांती स्वरुपात जाणून घेणे.

२) बीड जिल्ह्याचा राजकीय सामाजिक, भौगोलिक, आर्थिक क्षेत्राचा अभ्यास करणे.

३) राजकीय नेतृत्वांने केलेल्या सामाजिक विकासाचा अभ्यास करणे.

४) शैक्षणिक, सहकार, शेतीविषयक इत्यादी विकास कामात राजकीय नेतृत्वांचे योगदानांचा अभ्यास करणे.

५) जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वांनी राबविलेल्या योजनांचा अभ्यास करणे.

## १.६ संशोधनाच्या मर्यादा :-

१) संशोधन अभ्यासाची कालमर्यादा लक्षात घेता प्रस्तूत विषयाचा कालखंड हा महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती नंतरचा मुख्यत्वेकरुन सन १९९० ते सन २०१० पर्यंतचा आहे.

२) संशोधनासाठी बीड जिल्ह्यतील सगळ्याच नेतृत्वांचा अभ्यास न करता फक्त  गोपीनाथ मुंडे, जयत्तद क्षीरसागर व  विमलताई मुंदडा या प्रमुख नेतृत्वांच्या योगदानांचा अभ्यास केला आहे.

३)जिल्हयाच्या विकासा ऐवजी आपल्या मतदार संघाचा अगोदर विचार राजकीय नेतृत्वांनी केला.

४) पक्षाच्या व गटातटाच्या पलिकडे जाऊन जिल्हयाच्या विकासाचे राजकारण केले नाही.

५) जिल्हयाच्या विकासात आपल्या पक्षाचे विचार व तत्वे आणली गेली[८].

## १.६ संशोधनाचे महत्व :-

बीड जिल्हयाच्या विकासात राजकीय नेतृत्वांचे योगदान- विशेष संदर्भ गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा (१९९०-२०१०) या संशोधनातून बीड जिल्ह्याच्या विकासासाठी या प्रमुख राजकीय नेतृत्वांनी महत्वपूर्ण योगदान देण्याचे कामे केलेल आहेत. व त्यामुळेच विकसनशील जिल्हा म्हणून ओळखला जात आहे. यामुळे या संशोधनाला वेगळे महत्व प्राप्त होते.

१) गटातटाच्या राजकारणापलीकडे जाऊन विकासात्मक राजकारणावर भर दिला जाईल.

२) सामाजिक समता निर्माण होण्यास मदत होणार आहे.

३) शैक्षणिक विकासाकडे लक्ष दिले जाणार आहे.

४) औद्योगिक विकासावर भर दिला जाईल.

५) सहकार क्षेत्रात चळवळ निर्माण होणार आहे.

## १.७ पुर्व अभ्याकांचा आढावा :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने वेगवेगळ्या संशोधकांनी केलेल्या संशोधनाचा आढावा घेण्यात आला आहे.

**१) कैलास बन्सोडे :-** इंदिरा गांधी चे भारतीय राजकारणातील योगदान पीएच.डी. प्रबंध (अप्रकाशित) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद-२००२

या संशोधनातुन इंदिरा गांधीच्या पंतप्रधान पदाच्या कालखंडात त्यांनी भारतीय राजकारणात दिलेले योगदान त्यांची कार्यशैली, निर्णयक्षमता, नेतृत्वगुण तसेच विरोधी पक्षांबरोबरची त्यांची राजकीय निती व एकाधिकारशाही प्रवृत्ती मंत्रिमंडळावरील त्यांचा दबाव इत्यादी प्रकर्षाने जाणवलेल्या बाबींचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधातुन करण्यात आला आहे.

**२) देशमुख बाबासाहेब :-** महाराष्ट्राच्या राजकारणात विरोधी पक्षाची भुमिका (१९९०-२००३) पीएच.डी. प्रबंध पक्षाची आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद-२००४

प्रस्तुत संशोधनपर प्रबंधनातून महाराष्ट्राला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासून ते १९० च्या दशकापर्यंत काँग्रेस हा एकमेव प्रभावी व प्रबळ पक्ष होता. त्यांना प्रभावीपणे विरोध करणारा दुसरा पक्ष महाराष्ट्रच्या राजकारणात प्रथमतः शिवसेना- भाजपा युतीच्या रुपाने निर्माण झाला. तेव्हापासून विधिमंडळात विरोधी पक्षांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले. याचा परिणाम म्हणुन सत्ताधारी पक्षावर वेळोवळी अंकुश ठेवण्याचे काम विरोधी पक्षांनी केलेले दिसते या बाबींचा अभ्यास या प्रबंधातुन करण्यात आला होता.

**३) अमोल गंगणे :-** विमलताई मुंदडा व्यक्तिमत्व व राजकारण एम.फिल.प्रबंध( अप्रकाशित) यशवंतराव चव्हाण विद्यापीठ नाशिक-२००८

प्रस्तुत लघुशोध प्रबंधातुन डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांनी आपल्या केज विधानसभा मतदासंघातुन केलेल्या कार्याचा आढावा व एकुणच बीड जिल्हयाच्या विकासासंदर्भात त्यांची कशा प्रकारची भुमिका होती ते संशोधन करुन समोर आणलेल्या आहेत. त्यांची झालेली जडण-घडण व त्यातुन माहिला नेतृत्व ग्रामीण भागातुन कशा प्रकारे समोर आले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत आपल्या भागाचा कसा जास्तीत जास्त विकास करता येईल याचाच प्रामुख्याने त्यांनी विचार केला आहे. हे संशोधनातुन समोर

येते. त्यातुनच डॉक्टर ते कॅबीनेट मंत्री इथपर्यंतचा त्यांचा प्रवास झाल्याचा दिसुन येतो. विमलताई मुंदडा यांचे व्यक्तिमत्व कसे घडत गेले व राजकारणातुन त्यांनी समाजपयोगी कसे कामे केली अशा सर्व बाबींचा अभ्यास या लघुशोध प्रबंधातुन अभ्यासल्या आहेत. असे दिसुन येते.

**४) रविंद्र काळे :–** महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाचे बदलते स्वरुप पीएच.डी. प्रबंध (अप्रकाशित) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद–२०१०

प्रस्तुत शोधप्रबंधातुन महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाचे बदलते स्वरुप यातुन हे स्पष्ट होते की, राजकीय परिस्थिती बदलली की, राजकीय नेतृत्वांच्या स्वरुपात बदल घडतो. फरक केवळ इतकाच आहे की, तो बदलाचा प्रवाह सकारात्मकतेकडुन नकारात्मकता किंवा याच्या उलटही असु शकतो. कारण नेतृत्वाचे स्वरुप हे बदलत गेलेले आहे. राजकीय नेतृत्वामध्ये असणारी देशसेवा, त्याग, पक्षनिष्ठा, मुल्यनिष्ठता जशी असावी तशी दिसुन येत नाही. ज्या उदान्त हेतुने स्वातंत्र्य संग्रामात नेतृत्वांनी प्राणाची आहुती दिली. हे नेतृत्व १९८० च्या दशकापर्यंत असल्याचे आढळुन येते मात्र त्यानंतर आलेले नेतृत्व हे पक्षनिष्ठा, मुल्य विसरुन जातीवाद, भ्रष्टाचार, पक्षांतरे यांचा पुरस्कार नेतृत्वांनी करुन सत्ता प्राप्त केली आहे. काही राजकीय नेतृत्व अपवाद आहेत. हे संशोधनातुन स्पष्ट झालेले आहे.

**५) प्रा.लाखे एस.के. :–** बीड जिल्हयातील राजकारणावर जातीचा प्रभाव एक चिकित्सक अभ्यास पीएच.डी शोधप्रबंध (अप्रकाशित) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद – २०१०

शोधप्रबंधातुन बीड जिल्हयातील राजकारणावर जातीचा प्रभाव हा किती प्रमाणात पडलेला आहे. त्याचा प्रामुख्याने गावातील ग्रामपंचायतीपासुन ते जिल्हयातील खासदारकिपर्यंत जात समारे ठेवुन आज राजकारण केले जाते. राजकारणात विकासाला बाजु ठेवून सरळ–सरळ जातीला महत्व दिले जाते. आणि सोयीस्करपणे वातावरण सुध्दा त्याच पध्दतीचे निवडणुकीच्या काळात केले जाते. असे स्पष्ट होते. म्हणुन राजकारणात जात एक प्रभावी हत्यार म्हणुन वापरली जाते. म्हणुन वरचेवर जातीचा अंत होण्याऐवजी जातीचा जिल्हयाच्या राजकारणावर प्रचंड प्रभाव पडत आहे. असेच दिसुन येते हेच संशोधना अंती निष्पन्न झालेले हे असे दिसुन येते.

**६) देशमुख बाबासाहेब :–** महाराष्ट्राच्या राजकारणात विरोधी पक्षाची भुमिका –१९९०–२००३

पी.एच.डी. शोधप्रबंध(अप्रकाशित) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद– २००४

प्रस्तुत संशोधनपर प्रबंधातुन महाराष्ट्राला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासून ते १९९० च्या दशकापर्यंत काँग्रेस हा एकमेव प्रभावी व प्रबळ पक्ष होता. त्यांना प्रभावीपणे विरोध करणारा दुसरा पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात प्रथमतः शिवसेना, भाजपा युतीच्या रुपाने निर्माण झाला. तेव्हापासून विधिमंडळात विरोधी पक्षांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले.याचा परिणाम म्हणुन सत्ताधारी पक्षावर वेळोवळी अंकुश ठेवण्याचे काम विरोधी पक्षांनी केलेले दिसते हे या बाबींचा अभ्यासा प्रबंधातुन करण्यात आला आहे.

**७) दिनेश थिटे :–** महाराष्ट्र विधानसभा एक अभ्यास–१९७८–१९९५ एम.फिल. प्रबंध (अप्रकाशित) पुणे–विद्यापीठ पूणे–१९९६

प्रस्तुत लघुशोध प्रबंधातुन महाराष्ट्राच्या कनिष्ट व प्रथम सभागृहात निवडुन येणाऱ्या सदस्यांचा अभ्यास करण्यात आला असुन १९७८ नंतर महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाला आपल्या मतदार संघात निवडणुक लढण्यासाठी जात या घटकाचा आधार घ्यावा लागलेला दिसतो. एवढेच नाही तर जात आणि राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजु असलेल्या या अभ्यासातुन दिसुन येतात. हे स्पष्ट झालेले आहे.

## १.८ सैध्दांतीक पार्श्वभुमी :–

संशोधन विषयाची सैध्दांतीक पार्श्वभुमी स्पष्ट होतांना अनेक बाजू या संशोधनातून समोर येणार आहेत. त्यामुळे निश्चितच बीड जिल्ह्याच्या विकासासाठी त्याचा फायदा होणार आहे.

१) बीड जिल्हयात नवीन निर्माण होणाऱ्या राजकीय नेतृत्वाला मार्गदर्शन मिळणार आहे.

२) ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळख पुसून सहकाराचा जिल्हा उद्यास येईल.

३) सामाजिक, शैक्षणिक, सहकार इत्यादी बाबतीत विकसीत जिल्हा म्हणून ओळखला जाईल.

४) सामाजिक समस्या सोडविल्या जाणार आहेत.

## १.९ संशोधनाची गृहितके :–

संशोधन समस्येचे निर्धारण केल्यानंतर त्या समस्येच्या संदर्भात काही अनुमाने व काही संभाव्य उत्तरे विधानांच्या स्वरुपात मांडली जातात. उपरोक्त उदिष्ठांना अनूषंगूनं संशोधन कार्याला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी काही गृहितकांची मांडणी केली आहे. ती खालील प्रमाणे

१) जिल्हयातील राजकीय, सामाजिक, भौगोलिक क्षेत्राचा आढावा घेणे.

२) जिल्ह्यातील सामाजिक समस्यांची सोडवणूक झालेली आहे.

३) सहकाराचा जिल्हा म्हणून नवीन ओळख निर्माण होत आहे.

४) जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात वाढ झालेली आहे.

५) बीड जिल्हयाच्या विकासावर मर्यादा आलेल्या आहेत.

## १.१० संशोधन पध्दती :-

कोणत्याही घटकांचा अभ्यास करतांना वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करुन नैसर्गिक शास्त्रात अध्यापन केले जाते. त्याच प्रमाणे वैज्ञानिक पध्दतीव्दारे सामाजिक घटनांच्या संदर्भात संशोधन करता येते. जे संशोधन सामाजिक अथवा राजकिय घटनासंदर्भात केले जाते[९]. अशा संशोधनाला सामाजिक संशोधन म्हणतात. संशोधनात एक नित्य व नवा दृष्टिकोन महत्वाचा असतो. कुठल्याही राजकीय समस्या अभ्यासतांना तिच्या अनेकविध पैलु बाबत शास्त्रीय विवेचन करणे अगत्याचे ठरते. सदरील संशोधन विषयही त्यास अपवाद नाही. प्रस्तुत संशोधन विषयाच्या शास्त्रीय अध्ययनासाठी संख्यात्मक आणि गुणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे.यामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक, आगमनात्मक, विवेचनात्मक, विश्लेषणात्मक आणि टिकात्मक पध्दतीचाही वापर करण्यात आला आहे. तसेच या संशोधन कार्याच्या पुर्ततेसाठी ग्रंथालय संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे[१०].

### तथ्य संकलन :-

प्रस्तुत संशोधनात तथ्ये संकलन करण्यासाठी ग्रंथालय संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला असुन तथ्ये संकलनासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे.

### अ) प्राथमिक स्त्रोत :-

१) महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेले अहवाल दस्ताऐवज.

२) पुर्व संशोधकांचे एम.फिल. व पीएच.डी चे प्रकाशित व अप्रकाशित शोध प्रबंध

ब) दुय्यम स्त्रोतः-

१) संदर्भ ग्रंथ

२) शोधपत्रिका व नियतकालिके

३) वर्तमानपत्रे

४) पुस्तिका

५) मासिके

६) भाषणे

७) पुस्तक परिक्षणे

८) विशेषांक

९) इंटरनेट वरिल सर्च इंजिन साईटस

१०) ऑडिओ व्हिडिओ/सिडिज

### १.११ नमुना निवड :-

प्रस्तुत अभ्यासाठी बीड जिल्ह्याची निवड करण्यात आली असून जिल्ह्यातील प्रमुख राजकीय नेतृत्वापैकी गोपीनाथ मुंडे , जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा राकीय नेतृत्वांचा अभ्यास या संशोधनात प्रामुख्याने करण्यात येणार आहे. सन १९९० ते सन २०१० पर्यंत या राजकीय नेतृत्वांनी जिल्ह्याच्या विकासासाठी जे कार्य केलेले आहे व त्यामुळे जिल्ह्याच्या विकासात काय बद्दल झालेला आहे याचे संशोधन केले जाणार आहे.

बीड जिल्ह्यात महाराष्ट्र राज्याच्या निर्मिनीनंतर खऱ्या अर्थाने अनेक राजकीय नेतृत्व कमीजास्त प्रमाणात जिल्ह्यातील प्रत्येक मतदार संघातुन निर्माण झाले आहेत मग खऱ्या अर्थाने जिल्ह्याच्या विकासासाठी प्रामुख्याने सामाजिक कार्याची मुहूर्त मेढ रचणाऱ्या सौ. केशरबाई क्षिरसागर (काकु) ह्या महाराष्ट्रातील महिलांच्या आदर्श ठरल्या.[११]

त्यांच्या काळात जिल्ह्यात शैक्षणिक सामाजिक सुधारणा केल्या जिल्ह्यातील कॉ. गंगाधर अप्पा बुरांडे बापुसाहेब काळदाते, बाबुराव आडसकर, जयसिंगराव गायकवाड बबनराव ढाकणे, सुंदरराव सोळंके, प्रकाश सोळंके बदामराव पंडीत इत्यादी राजकीय नेतृत्व जिल्ह्याला मिळाले असले तरी सन १९९० ते २०१० या काळात खऱ्या अर्थाने गोपीनाथ मुंडे जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा यांनी जिल्ह्यांचा चेहरा-मोहरा बदला असल्याचे चित्र समोर येथे म्हणून या राजकीय नेतृत्वांच्या कार्यातुन जिल्ह्याचा

विकास कितपत झाला याचे संशोधन प्रामुख्याने केले जाणार आहे[१२].

## १.१२ संशाधनाचे क्षेत्र, व्याप्ती :-

संशोधन कार्यात वस्तूनिष्ठता येण्यासाठी व संशोधन वास्तवप्रत जाण्यासाठी संशोधनाचे क्षेत्र व व्याप्ती निश्चित करावी लागते. संशोधनाचे मर्यादित क्षेत्र हे संशोधनास वास्तवप्रत पोहचविले म्हणुन संशोधकाने बीड जिल्ह्याच्या विकासात राजयकीय नेतृत्वांचे योगदान विशेष संदर्भ गोपीनाथ मुंडे जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा (सन. १९९० ते सन २०१०) या विषयाचा अभ्यास करताना जिल्ह्यातील सर्व नेते मंडळीच्या कार्याचा विचार केलेला नाही तर या शोधकार्याचे क्षेत्र प्रामुख्याने बीड जिल्ह्यातील जे प्रमुख नेतृत्व आहेत त्यांचाच अभ्यास या संशोधनात केलेला आहे[१३].

प्रस्तुत संशोधनामध्ये बीड जिल्ह्याच्या विकासात राजकीय नेतृत्वामधून गोपीनाथ मुंडे , जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा यांचे काय योगदान आहे. याचा अभ्यास केलेला आहे. सदरील संशोधनात महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांचा अभ्यास केलेला नाही तर फक्त बीड जिल्हा समोर ठेवून त्याचा कितपत विकास झालेला आहे याचे विश्वलेषण केले आहे[१४].

## १.१३ संशोधन आराखडा :-

कोणत्याही संशोधकापुढे संशोधन करतांना निश्चित स्वरुपाचे उदिष्ठ डोळ्यासमोर ठेवुन संशोधकाला आपल्या संपुर्ण संशोधनाची आखणी किंवा मांडणी करावी लागते. ही मांडणी अतिशय आवश्यक व महत्वाची असते. कारण अशा पुर्व नियोजित मांडणीतुन किंवा निर्णयामुळे संशोधन भरकटत नाही व योग्य त्या निष्कर्षाप्रत संशोधन पोहचण्यासाठी मदत होते.

प्रस्तुत संशोधनाच्या शोधप्रबंधाचा आराखडा किंवा प्रकरण रुपरेषा खालीलप्रमाणे आहे.

**प्रकरण १ लेः- प्रस्तावना आणि संशोधन पध्दती :-**

शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करतांना नेतृत्व या संकल्पनेचा अर्थ व स्वरुप स्पष्ट करण्यात आला आहे. राजकीय नेतृत्वांचा अर्थ व त्याबाबत वेगवेगळ्या विचारवंतानी केलेल्या व्याख्या स्पष्ट करुन नेतृत्वाचे प्रक्रिया कोणकोणत्या टप्यातुन पुर्ण होते. हे स्पष्ट केले आहे विशिष्ट परिस्थितीत नेतृत्वाची निर्णयक्षमता कशी पार पडते आणि नेतृत्व व त्याचे गुण याबाबी जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठीची वेगवेगळी सुचनांची साधने कोणती याचा उल्लेख करुन संसुचनाव्दारे जनसमुहावर नेतृत्वाचा कसा प्रभाव पडतो याचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये बीड जिल्हयाच्या विकासात राजकीय नेतृत्वांचे योगदान विशेष संदर्भ गोपीनाथ मुंड, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा (१९९०-२०१०) या विषयाच्या स्वरुपाची प्रस्तुत संशोधनाची पार्श्वभुमी स्पष्ट करण्यात आली आहे. त्याच बरोबर संशोधन विषयाची प्रस्तावना संशोधन, विषयाचे महत्व, समस्या सुत्रण पुर्व अभ्यासकांचा (संशोधकांचा)आढावा संशोधन क्षेत्र, व्याप्ती व मर्यादा संशोधनाची उदिष्टे,.गृहितके, संशोधन पध्दती, तथ्य(माहिती ) संकलनाचे स्वरुप संशोधन आराखडा आणि प्रकरण निहाय संक्षिप्त सारांश व नियोजन यांचे यथोचित निवेदन केले आहे[१५].

**प्रकरण २ रे :- बीड जिल्हा - एक दृष्टिक्षेप**

संशोधन प्रबंधातील या प्रकरणामध्ये महाराष्ट्र राज्याचा प्राचीन इतिहासाची माहिती दिलेली असुन त्याचा भौगोलीक आढावा घेतलेला आहे. तध्वतच महाराष्ट्र राज्याचा आधुनिक इतिहासाची माहिती सांगितलेली आहे. मराठवाडा विभागातील बीड हा जिल्हा आहे. जिल्हयाचे भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ, लोकसंख्या यांचीही माहिती सांगितलेली असुन प्रशासकीय व राजकीय बीड जिल्हयाची माहिती आकडेवारी नुसार सांगुन स्पष्ट केलेली आहे.

बीड जिल्हा म्हणजे विकसनशील जिल्हा म्हणुन सध्या त्याची ओळख निर्माण होत आहे. अशा या जिल्हयात उद्योगधंद्याचे कशा प्रकारचे विस्तारीकरण झालेले आहे. यापासुन सुविधा नेमक्या काय आहेत. याचाही अभ्यास या प्रकरणामध्ये केल्याचा दिसुन येतो. शैक्षणिक क्षेत्रात जिल्हयाने म्हणावे

तशी प्रगती केलेली नाही. हे दिसुन येते बीड हा एक निजामकालिन ऐतिहासीक जिल्हा आहे. जिल्हयाला अनेक महान संतांचा व नेत्यांचा वारसा लाभला आहे. मात्र दुय्यम प्रतीची जमीन पावसाचे अल्पप्रमाण आणि अल्प औद्योगिक विकास झालेला आहे. या वरिल सर्व बाबींची चर्चा यात केलेली आहे.

**प्रकरण ३ रे :- बीड जिल्हयातील राजकीय नेतृत्वांचे योगदान**

**अ) गोपीनाथ मुंडे- बीड जिल्हयाच्या विकासात योगदान**

प्रस्तुत प्रकरणामध्ये गोपीनाथ मुंडे यांनी बीड जिल्हयाच्या विकासासाठी कोणत्या प्रकारचे प्रयत्न केलेले आहेत. या बाबतची त्यांची भुमिका काय आहे हे स्पष्ट करण्यात आलेले आहे. एकुणच त्यांच्या पुर्वचरित्र व त्यांनी राजकारणास कधी पासुन सुरुवात केली आहे. याचा अभ्यास यात करण्यात आलेला आहे. त्यांचा राजकारणाचा श्रीगणेशा हा रेणापुर मतदार संघातुन झालेला आहे. परंतु त्यांचा संपुर्ण बीड जिल्हयावर प्रभाव असल्याचा दिसुन येतो. रेणापुर मतदार संघाचा तर त्यांनी विकास केलाच परंतु बीड जिल्हयाचा सुध्दा अनेक अंगाने त्यांनी विकास केलेला आहे.याचाही अभ्यास यात केला आहे. सहकाराच्या क्षेत्रात त्यांचे एक वैशिष्टयपुर्ण काम आहे[१२]. त्या दृष्टिकोनातुन कारखाना, सुतगिरणी, बँक इत्यादींच्या माध्यमातुन त्यांनी विकास साधण्याचा प्रयत्न केल्याचा दिसतो. तसेच शिक्षणाच्या बाबतीत महत्वपुर्ण पाऊल त्यांनी उचललेले आहे. म्हणुन शिक्षणाकडे त्यांनी लक्ष केंद्रीत करुन सर्वसामान्य लोकांना ते घेता यावे या दृष्टिने त्यांनी प्रयत्न केलेले आहेत. याबाबींचा या प्रकरणात अभ्यास केलेला आहे.

**ब) जयदत्त क्षीरसागर - बीड जिल्हयाच्या विकासात योगदान**

यात जयदत्त क्षीरसागर यांचे बीड जिल्हयाच्या विकासातील योगदान याबद्दल अभ्यास करण्यात आला आहे. त्यांचे पुर्व व त्यांचे राजकीय नेतृत्वाचा उद्य कसा-कसा होत गेला हे स्पष्ट करण्यात आलेले आहे. बीड जिल्हयाच्या विकासासाठी त्यांनी कोणत्या प्रकारची विकास कामे केलेली आहेत. याचा शोध घेण्यात आलेला आहे. सहकार क्षेत्रातुन त्यांनी बीड जिल्हयाचा विकास करत असताना अनेक सहकार तत्वावर चालणाऱ्या संस्थांची निर्मिती केलेली आहे. श्री गजानन सहकारी बँक, दुध, संघ, शैक्षणिक संस्था इत्यादीच्या माध्यमातुन बीड व बीड जिल्हयाचा विकास करण्याच्या दृष्टिने त्यांनी प्रयत्न केलेले आहेत. हे स्पष्ट होते. या बाबींचा अभ्यास यात केलेला दिसुन येतो.

**क) विमलताई मुंदडा-बीड जिल्हयाच्या विकासात योगदान**

यामध्ये विमलताई मुंदडा यांनी बीड जिल्हयाच्या विकासात काय योगदान आहे याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. विमलताईंचे पुर्व व राजकीय उदयांची कारणमिमांसा इत्यादी गोष्टींचा अभ्यास या प्रकरणात केला गेला आहे. त्यांनी जवळपास २० वर्षे केज विधानसभा मतदार संघाचे विधानसभेचे प्रतिनिधित्व केलेले आहे. त्यांनी मतदार संघाचा व संपुर्ण बीड जिल्हयाचा विकास केलेचा दिसुन येतो. महिला असताना सुध्दा त्यांना बीड जिल्हयाच्या विकासासाठी प्रयत्न केलेला दिसुन येतो. सहकाराच्या माध्यमातुन त्यांनी सामान्य नागरिकांना दिलासा देण्याचे काम केले आहे. सहकारी तत्वावर चालणारी बँक, शिक्षण, सांस्कृतिक क्षेत्राच्या बाबतीत त्यांचे कार्य वैशिष्टयेपुर्ण आहे. याचाही अभ्यास झालेला आहे.

**प्रकरण ४ थे :- बीड जिल्हयाच्या विकासाच्या मर्यादा :-**

यामध्ये बीड जिल्हयाच्या विकासाच्या बाबतीतील अनेक ज्या मर्यादा किंवा अडथळे आलेले आहेत. त्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. बीड जिल्हयाच्या विकासासाठी शेती, वीज, उद्योग, जलसंधारण, पायाभूत समस्या इत्यादी अनेक विकासाच्या बाबतीत मर्यादा आलेल्या आहेत. यात जोपर्यंत अमूलाग्र परिवर्तन होणार नाही तोपर्यंत विकास होणे शक्य नाही. इत्यादी बाबतीत अभ्यास या मध्ये केलेला आहे.

**प्रकरण ५ वे :- सारांश, निष्कर्ष व शिफरशी**

संशोधन प्रबंधाच्या या शेवटच्या प्रकरणामध्ये अनुक्रमानुसार सर्व प्रकरणांचा सारांश व उपसंहार प्रकट केला आहे. संशोधनाच्या अंती हाती आलेले ठळक निष्कर्ष प्रतिपादन करण्यात आले असुन काही मोजक्या शिफारशी सुचविण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**संदर्भ :-**

१) डॉ. खेकाळे ना.रा. राजकीय नेतृत्व मंगेश प्रकाशन, नागपुर, १९९९ (पृ.क्र.०१)

२) कंगले र.प. कौटिलीय अर्थशास्त्र (पृ.क्र. ५९)

३) डॉ. खेकाळे ना.रा.'राजकीय.' नेतृत्व मंगेश प्रकाशन, नागपुर, १९९९ ( पृ.क्र.०४)

४) डॉ. खेकाळे ना.रा.'राजकीय.'नेतृत्व मंगेश प्रकाशन, नागपुर, १९९९ ( पृ.क्र.०५)

५) डॉ. मेहदंळे विश्वास यशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन, पुणे, २००७ (पृ.क्र. १९)

६) भांडारकर पु.ल. - सामाजिक संशोध पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपुर १९८७ (पृ. क्र. २२)

७) संत दु.का.- संशोधन पध्दती, प्रक्रिया व अंतरंग पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे, १९८८ (पृ.क्र. २८)

८) नाडगोंडे गुरुनाथ - सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन (पृ.क्र. ३२)

९) प्रा. घोटाळे रा.ना. - सामाज शास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपुर १९९२ (पृ.क्र. ४०)

१०) डॉ. बोरुडे रा.र - संशोधन पध्दतीशास्त्र पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन -२००५ (पृ.क्र. ४५)

११) डॉ. कुंभोजकर जी.व्ही. - संशोधन पध्दती व संख्याशास्त्र, एम.व्ही. फडके ॲण्ड कं. कोल्हापूर -१९८२ ( पृ.क्र. ५०)

१२) डॉ. कऱ्हाडे बी.एड. - शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळपुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर - २००७ ( पृ.क्र. १९)

१३) डॉ. पाटील वा.भा. - संशोधन पध्दती प्रशांत पब्लिकेशन्स पुणे - २००६ ( पृ.क्र. २०)

१४) आगलावे प्रदिप - संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपुर - २००० ( पृ.क्र. १०)

१५) डॉ. ढगे एस.के. - संशोधन पध्दती के.एस. पब्लिकेशन पुणे- २०११ (पृ.क्र. ३०)

# प्रकरण २ रे

## बीड जिल्हा- एक दृष्टीक्षेप

# प्रकरण दुसरे

## बीड जिल्हा – एक दृष्टिक्षेप

२.१ महाराष्ट्र राज्याचा प्राचीन इतिहास

२.२ महाराष्ट्र राज्याचा आधुनिक इतिहास

२.३ मराठवाडा विभाग

२.४ बीड जिल्हा

२.५ भौगोलिक स्थान व प्राकृतिक रचना

२.६ लोकसंख्या

२.७ स्थानिक स्वराज्य संस्था

२.८ आर्थिक आणि व्यवसायिक बीड

२.९ बीड मधील पायाभुत सुविधा

२.१० शैक्षणिक बीड

संदर्भ

## प्रकरण दुसरे

### बीड जिल्हा - एक दृष्टिक्षेप :-

बीड जिल्हाच्या विकासात राजकीय नेतृत्वांचे योगदानाचा अभ्यास करताना विशिष्ट स्तरावरील सामाजिक, आर्थिक, भौगोलिक व राजकिय स्थितीचा अभ्यास करणे आवश्यक ठरते, कारण त्या स्तरावरील परिस्थितीचा नेतृत्वावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या प्रभाव पडत असतो, प्रस्तुत अभ्यासासाठी बीड जिल्हयातील राजकिय नेतृत्वांत गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा यांची निवड केलेली आहे. या नेतृत्वांनी केलेल्या जिल्हयाच्या विकासा अगोदर वर्तमान महाराष्ट्र बद्दल व अभ्यासासाठी निवडलेल्या बीड जिल्हयाबद्दलची प्राथमिक तोंड ओळख करुन घेणे आवश्यक ठरते.

### २.१ महाराष्ट्र राज्याचा प्राचीन इतिहास :-

वर्तमान महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झालेली असली तरी स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात येण्या अगोदर महाराष्ट्र प्रदेशावर कोणा-कोणाचे राज्य होते. याचा आढावा घेणे आवश्यक ठरते. या आढाव्यामुळे वर्तमान महाराष्ट्र राज्याचा इतिहास किती जुना आहे. या राज्यावर किंवा प्रदेशावर कोणत्या काळात कोणी व कसे राज्य केले याची कल्पना येऊ शकते. प्राचीन काळापासून भारत हा देश अस्तित्वात आहे. पण या देशावर अनेक परकीय सत्तांनी आक्रमण करुन राज्य केले आहे. या परकीय सत्तांमध्ये इ.स.७११ मधील मोहम्मद बिन कासीमच्या अरबी आक्रमणापासून सुरुवात होते. त्यानंतर तुर्क मंगोल, तारतोर इत्यादी सत्तांनी बाराव्या शतकापर्यंत भारतावर राज्य केले. त्यानंतर इ.स.१५२६ मध्ये पानीपतच्या पहिल्या युध्दांने मुघली सत्तेचे भारतात बिजारोपन झाले व मुघलांनी भारतावर जवळपास १५२६ ते १७६१ पर्यंत राज्य केले. त्यानंतर अनेक युरोपीय राज्यांनी राज्य केले. त्यामध्ये सिध्दी, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज होते. ज्याप्रमाणे भारताच्या वेगवेगळ्या भुभागावर वरील वेगवेगळ्या राजांनी राज्य केले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र या प्रदेशावर देखील अनेक राजांनी राज्य केल्याचे दिसून येते[१].

महाराष्ट्र प्रदेश हा भारताच्या पश्चिमेकडील भागाचा दक्षिणोत्तर मध्यवर्ती प्रदेश आहे. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासाची सुरुवात इ.स.पूर्व चौथ्या शतकात स्थापन झालेल्या पहिल्या बलाढ्य मोर्य घराण्यापासून होते. या घराण्याचे साधारणपणे १५० वर्ष राज्य केले. मौर्य घराण्यानंतर महाराष्ट्रावर सुमारे ३०० वर्ष म्हणजे इ.स.पूर्व ७३ ते इ.स.२१८ या काळात सातवाहनांनी राज्य केले. सातवाहनां

नंतर वाकाटकाने इ.स. २५० ते इ.स.५२५ वर्ष विदर्भ या प्रदेशावर राज्य केले. वाकाटका नंतर सहाव्या शतकाच्या प्रारंभी चालुक्य घराण्यांचा उदय झाला. या घराण्याने महाराष्ट्रावर दोनशे वर्ष राज्य केले. चालुक्यानंतर राष्ट्रक्टांनी इ.स. ७५० ते इ.स.११८९ असे सुमारे २०० वर्ष राज्य केले. तसेच कदंब व सीलाहार या राजवंशाच्या राजवटी होऊन गेल्या.

राष्ट्रकुटानंतर महाराष्ट्रावर जवळपास १०७ वर्ष यादवांनी राज्य केले. यादव हे मुळचे उत्तर भारतातील यादवकाळात महाराष्ट्राची सर्वांगीण प्रगती झाली. याच काळात भास्कराचार्या सारखा महान गणिती आणि हेमाद्रीसारखा महान पंडीत होऊन गेला. यादवांच्या नंतर मुसलमानांनी पहिल्यांदा दक्षिण भारतात प्रवेश केला आणि संपूर्ण दक्षिण भारत इस्लाममय झाला. यादवांचा महादेवराय हा राज्य करीत असताना दिल्लीच्या तक्यांवर असलेला खिलजी घराण्याचा जलालुद्दीन याने दवगिरीवर हल्ला करुन ५ फेब्रुवारी १२९५ रोजी रामदेवाचा पराभव केला आणि इस्लामचा महाराष्ट्रात प्रवेश झाला. जवळपास ३०० वर्ष सुलतानांची सत्ता महाराष्ट्रात होती. यादवराज्याचा अंत झाल्यानंतर थोड्याच काळात दिल्लीच्या सुलतानाच्या दक्षिणेतील अधिकाऱ्यांनी बंडाळया सुरु केल्या.आणि लवकरच त्यांनी दक्षिणेत आपली स्वतंत्र राज्ये स्थापन करण्यास प्रभाव पाडणारे राज्य म्हणजे इ.स.१३४७ मध्ये गुलबर्गा येथे हसन गंगु बहामनींने स्थापन केलेल्या राज्याने जवळपास संपूर्ण महाराष्ट्रावर स्थापना होती. १४८५ मध्ये बहामनी खिळखिळ होऊन तिचे पाच तुकडे झाले. अशा प्रकारे शिवपूर्व काळात वरील सर्व राजांनी महाराष्ट्रावर सतत तीन शतके राज्य केले. मुसलमानांनंतर मुघलांनी देखील महाराष्ट्रावर राज्य केले. मुघलानंतर ब्रिटिशांनी महाराष्ट्राच्या काही प्रदेशावर राज्य केले. मुसलमान , मुघल व इंग्रज यांच्याशी संघर्ष करीत मराठा सत्तेचा उदय महाराष्ट्रावर झाला. महाराष्ट्राच्या काही प्रदेशावर हैद्राबादच्या निजमांची सत्ता होती. मराठ्यानंतर महाराष्ट्रात पेशव्यांनी राज्य केले. प्राचीन काळापासून ते स्वातंत्र्यापर्यंत या प्रदेशावर अनेक परकीय व स्वकीय सत्तांनी राज्य केल्यामुळे महाराष्ट्रवर या प्रदेशाचा राजकीय इतिहास हा अधिक संघर्षाचा इतिहास आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासात मराठ्याच्या इतिहासाला महात्वाचे स्थान आहे. १६४२ ते १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त होई पर्यंत भारतीय राजनितिचा केंद्रबिंदु म्हणजे शिवशाही व पेशवाई होय. स्वतंत्र महाराष्ट्र म्हणले की उमाजी नाईक छत्रपती प्रतापसिंह रंगा बापुजी तात्या टोपे झाशीची राणी, रानडे,

लोकमान्य टिळक, गोखले, चाफेकंर ,फडके, सावरकर, कान्हेरे, देशपांडे, पिंगळे, राजगुरु यांची आठवण येते[१]

**प्राचीन महाराष्ट्राचा भौगोलिक आढावा :-**

वर्तमान महाराष्ट्र राज्याचा जो भुप्रदेश आहे त्यापेक्षा कितीतरी मोठा भुप्रदेश या राज्याचा होता. मराठयाचा व मराठी भाषेचा तत्कालीन अनेक प्रदेशावंर प्रभाव होता. मराठी सत्तेच्या निर्मीतील जशी अनेक कारणे कारणीभूत होती तशीच भौगोलिक रचनाही कारणीभूत होती. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्र या नावाने जो प्रदेश ओळखला जात होता त्यांचा विस्तार फार मोठा होता. जसे, मध्य प्रांतातील विदर्भ, दक्षीण महाराष्ट्रतील बेळगांव कारवार, धारवाड, कानडा तर पाश्चिम महाराष्ट्रातील कच्छ, सौराष्ट्र , गुजरात वगैरे भूप्रदेश महारष्ट्र राज्याचे भाग म्हणून ओळखले जात होते.

**महाराष्ट्र नावाची उत्पत्ती :-**

महाराष्ट्र हे नाव कसे व केव्हा मिळाले आणि त्याची उत्पत्ती कशी होत गेली या बद्दल इतिहासकारांत मतभेद आहेत. हा इतिहास जवळपास सव्वादोन हजार वर्षाचा आहे. महाराष्ट्र प्रदेश हा भारताच्या पाश्चिमेकडील भागाचा दक्षिणोत्तर प्रदेश आह. या प्रदेशाला महाराष्ट्र प्रदेश हे नाव केव्हापासून लाभले हे पुराणाच्या आधारे ठरवावयाचे झाल्यास ते फार प्राचीन आहे. महाभारतातील देशांच्या यादीत विदर्भ, रुपवाहिक अश्वमक, पांडूराष्ट्र, गोपराष्ट्र मल्लराष्ट्र अपरान्ज कोकण, इत्यादी देशाचां उल्लेख आहे. रामायणात दण्यडकारज्य म्हणून ज्या भागाचा उल्लेख आहे ते सर्व भाग महाराष्ट्रतच येतात. म्हणजेच आजचा खानदेश, नाशिक नगर जिल्हा म्हणजे अश्मक तर नाशीकच्या भोवतालचा भाग गोपराष्ट्र होय. त्याचा दक्षिणेकडचा भाग म्हणजे मल्लराष्ट्र होय. कुन्तल म्हणजे कृष्णेच्या उगमाजवळचा प्रदेश तर अपरान्त म्हणजे कोकण प्रदेश होय. या सर्व प्रदेशांना मिळूनच कालांतराने महाराष्ट्राचा उल्लेख इसवीसनच्या ५ व्या शतकापूर्वी आढळत नाही. इ. स. ६० या वर्षी हाल नावाच्या सात वाहन राजांनी लिहिलेली गाथा सप्तशनी ज्या प्राकृतात म्हणूजे बोली भाषेत लिहिली तिच प्राकृत भाषा म्हणजेच महाराष्ट्री मराठी आहे.

सातवाहनांचे राज्य महाराष्ट्रात होते म्हणुन त्यांच्या काळाच्या प्राकृत भाषेला महाराष्ट्री हे नाव मिळाल. इ.स. पूर्वी होऊन गेलेल्या वररुचीन आपल्या प्रकृति प्रकाश या व्याकरण ग्रंथात 'महाराष्ट्री या

प्राकृत भाषेचा उल्लेख केला आहे . वररुर्चीत्या प्रकृत प्रकाश चा व्याकरण ग्रंथात पैशाची शौरसेनी, महाराष्ट्र, मागधी इत्यादी प्रकृत भाषांचा उल्लेख आहे. या भाषांना ही नावे पिशाच शूरसेन महाराष्ट्र मगध या प्रदेश नावावरुन किंवा या नावाच्या लोकसमुदाया वरुन पडली असावीत. पिशाच म्हणजे हिंदु स्थानच्या वायलय सरहदीचा प्रदेश शुरसेन हा उत्तर प्रदेशाचा पाश्चिमेला व राजस्थानचा पूर्वोचा भाग मगध म्हणजे हल्लीचा बिहार तसेच महाराष्ट्र हाही एक प्रदेशच असावा आणि तो म्हणजे आर्यांच्या वसाहतींनी व्यापलेल्या दक्षिणेकडील ब्रादिड भाषा भविकांच्या अंध्र व कर्नाटक प्रदेशाच्या उत्तर सीमेपर्यंतचा भाग असावा इ.स.च्या चौथ्या शतकात मध्य पाश्चिम भारतात शक वंशातील राजे राज्य करीत होते. त्यातील एक शक नंदाचा पुण श्रीधर वर्माची शिळा सापडली आहे. त्यामध्ये सत्मनागन महाराष्ट्रेन अया नामोलेख सापडतो. त्यावरुन त्या वेळी श्रीधर वर्माचा एक सत्मनाग नावाचा नागवंशीय सेनापती होता व तो महाराष्ट्रीयन समजत असे[२]. या वरुन महाराष्ट्र हे नाव एखद्या प्रदेशाला चिकटले असल्याचे सिध्द होत नसले तरी महारष्ट्रजन आस्तीत्वात होते हे सिध्द होते. इ.स. च्या सहाव्या लिहिलेल्या पाली भोषेतील महावंस चा ग्रंथात महाराष्ट्र या शब्दाचे महारळ असे रुप आढळते इसवीसनापूर्वी तिसऱ्या शतकात मोगलीपूत तिस्स याने आपल्या शिवयांना धर्मोपदेशकास महीसमंडळ वनवास, अपरान्त, महाराष्ट्र योन सुयननभूमी इत्यादी प्रदेशात पाठविले होते. असा उल्लेख महावस या ग्रंथात आहे. वरील सर्य पुराण्यावरुन खिस्तपूर्व तिसऱ्या शतकात भारतीयांना महाराष्ट्र हे देशनाम माहीत होते. असा अंदासज व्यक्त करण्यास हरकत नाही. त्याचप्रमाणे माकंडेय आणि ब्रम्हापूराणात सूध्दा महाराष्ट्राचा यांनी लिहिलेल्या ग्रंथात महाराष्ट्र हे नाव आढळते[२].

महीसमडंळ म्हणजेच महिश्मनी किंवा हल्लीचे महेश्वर, वनवास म्हणजे उत्तर कर्नाटक, अपरान्तक म्हणजे कोकण व महाराष्ट्र म्हणजे ज्यांच्या उत्तरेस हलेश्वर, पाश्चीमेस कोकण व दशिणेस उत्तर कर्नाटक हे प्रांत आहेत. तो महाराष्ट्र असे मत डॉ. श्री. व्य, केतकरांनी व्यक्त केले आहे. 'दंछकारव्य' आणि 'महाराष्ट्र' ही दोन्ही नावे एकाच प्रदेशाची आहेत.असा उल्लेख सापडतो. इ.स.पूर्व पहिल्या शतकातील शिलालेखात महारथींचा राजा वेदरिरी दक्षिणापथपती होता असा उल्लेख सापडतो.

सम्राट अशोकांच्या शासनात त्याने आपले धर्मप्रसारक रास्टीक (महाराष्ट्र), पेनानिक (पैठण) व अपरान्त(कोकण) प्रांतात पाठविण्याचा उल्लेख आहे. तसेच एक मत असेही आहे की भोजांनी आपल्या

नावापूर्वी महा हे विशेषण लावून स्वतःस महाभोज संबोधले. तसेच रास्ट्रीकांनी आपल्या नावमागे महा हे विशेषण लावून स्वतःला महाराष्ट्रीक म्हणवून घेतले. त्यांच्या सत्तेखालील प्रदेशास महाराष्ट्र हे नामाभिदान प्राप्त झाले व त्या घराण्यातील लोक महाराष्ट्र ठरले. सातवानांच्या काळात ते एकत्र आले व त्यांचे एक मोठे राष्ट्र निर्माण झाले. रठ्ठ पासून रावटीक आणि पुढे मारावट्रीक अशी शाब्दिक रुजवांत झालेली आढळते.

महाराष्ट्र हे नाव प्रचारात महामहोपाश्चाच डॉ. काणे यांनी 'महान'राष्ट्र ते महाराष्ट्र अशी उत्पती सांगितली आहे. तर डॉ.जैन वित्सनच्या मते 'महार राक्ट्र' ते महाराक्ट्र होय. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मते 'मल्ल लोकांचे राक्ट्र ते महाराक्ट्र राजा रामशास्त्री भागवत म्हणतात. 'महाराभिंचेराक्ट्र म्हणजे महाराक्ट्र अशा प्रकारे निरनिराळ्या विध्दानांनी सांगिमलेल्या उत्पतीचा विचार केल्यानंतर महारठ्ठचे संस्कृत रुप 'महाराक्ट्र' ही भांडारकरांची उत्पत्ती जास्त तर्कसंगत वाटते.

लोकभाषेवरुनही महाराक्ट्रास महाराक्ट्र असे नाव मिळाले असल्याचा उल्लेख सापडतो. महाराक्ट्राची लोकभाषा ही महाराक्ट्री आहे. या महाराक्ट्रीला इतर भाषेप्रमाणेच इ.स.पूर्वी बरीच मान्यता होती. असे इ.स.पहिल्या शतकातील प्राकृत भाषेचा व्याकरणकार वररुची याने आपल्या 'प्राकृत प्रकाश या ग्रंथात 'महाराष्ट्रीस' मानाचेस्थान दिले आहे. त्यानंतर विजापूर जिल्हयात शके ६३४ मध्ये कोरलेल्या कवि रवीकीती याचा लेख होय. त्याचप्रमाणे याच काळातील 'वात्सायपाच्याक़ीम सुत्रात महाराक्ट्रातील स्त्रियांच्या चालीरीतींची कल्पना आढळते.तसेच महाराक्ट्राच्या विस्तारीची कल्पना चिनी प्रवाशांच्या प्रवास आपले 'लिलावली' हे खंडकाव्य महाराष्ट्रातील स्त्रियांचे मनोरंजन करण्यासाठी इ.स.८०० मध्ये लिहिले सहाव्या विक्रमादित्याच्या राजवटीतल्या सीताबर्डीच्या लेखात महासामंत माडी भंडक हा महाराष्ट्रकट वंशात जन्मला. असे सांगितले आणि त्यावरुन या सामंतांस आपल्या कुळास 'महा'हे पुर्वपद लावण्यास महाराष्ट्र शब्दांशी आणि आपल्या सत्तेखाली असलेल्या प्रदेशांचा संबंध जोडण्याची इच्छा असावी असा डॉ. केतकरांनी तर्क केला आहे. सहाव्या विक्रमादित्याची राजवट शकसंवत १००८ मध्ये होती. तसेच श्री चक्रधरस्वामी, मुकूंदराज आणि श्री. ज्ञानेश्वरांनी तर स्पष्ट शब्दांत महाराक्ट्र भुमीचा निर्वाळा दिलेला आहे. ७०० वर्षापूर्वी श्रुतीपाठ या ग्रंथात महाराक्ट्र कशाला म्हणावे हे स्पष्ट पणे सांगितले आहे. जेथे महाराक्ट्र भाषा वर्तते ते महाराक्ट मराठी भाषेस यादवांच्या काळात

प्रथमच राजभाषेची प्रतिष्ठा मिळाली व स्पष्ट भाषेच्या प्रतिष्ठेने मराठी संस्कृतीचा पाया घातला. थोडक्यात महाराक्ट्र ही महाराक्ट्रीकांची भाषा ही मराठी भाषेची जननी महारास्ट्रीचे विकसित रुप म्हणजेच मराठी होय.

## २.२ महाराष्ट्र राज्यांचा आधुनिक इतिहास :-

भारताच्या इतिहासात महाराष्ट्राने गौरवशाली कामगिरी पार पाडलेली असून ते भारताचे ह्न्दय आहे. महाराष्ट्र हा कधीच स्वतः पुरता विचार करणारा संस्कृतिक प्रांत नव्हता भारतीय एकात्मतेचा बलिदानाच्या पार्श्वभुमिवर पुरस्कार करणारा प्रांत म्हणून महाराष्ट्राची ख्याती आहे व हीच ख्याती वर्तमान महाराष्ट्रराज्याच्या स्थापनेमध्ये देखिल दिसून येते. कारण वर्तमान महाराष्ट्र राज्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला तेव्हा अ, ब, क अशी तीन प्रकारची राज्ये होती. त्यापैकीच महाराष्ट्र हा एक प्रांत किंवा राज्य होती. त्या पैकीच महाराष्ट्र हा एक प्रांत किंवा राज्य म्हणून ब्रिटीश आमदातील नऊ राज्यांपैकी एक राज्य होते. पण या अ, ब, क राज्यरचनेमध्ये अनेक दोष व उणिवा होत्या त्या दूर करण्यासाठी तत्कालीन भारत सरकारने धार कमिशन जे.व्हि.पी. समिती आणि १९५३ मध्ये राज्य पुर्नरचना आयोग स्थापन केले. या सर्व प्रयत्नांमधुनदेखिल समाधानकारक अशा स्वतंत्र मराठी भाषिक राज्याची निर्मिती होऊ शकली नाही. स्वतंत्र मराठी भाषिक राज्याच्या स्थापनेसाठी अनेक प्रकारचे प्रयत्न करावे लागले या सर्व प्रयत्नांमुळेच शेवटी १ मे १९६० रोजी स्वतंत्र मराठी भाषिक राज्याची स्थापना झाली. या स्थापनेमध्ये अनेक मान्यवर व्यक्तिंचा संस्थांचा विविध प्रकारच्या आयोगांचा समावेश असल्याचे दिसून येते. जसे लोकमान्य टिळक व इतरांचे प्रयत्न महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरु, कमिशन श्री रामराव देशमुख, मराठी साहित्यसंम्मेलने व पत्रकार श्री गजाननराव माडखोलकर बेळगाव साहित्य संम्मेलन श्री. शंकररावदेव यांचे प्रयत्न, धार कमिशन, अकोला करारा, जे.व्हि.पी समिती, ठोण जिल्हयाची मागणी, मुंबई महानगरपालिकेचा ठराव, संयुक्त महाराष्ट्र मंडळाची स्थापना, १९५२ ची सार्वत्रिक निवडणुक, नागपूर करार, उच्चाधिकार समिती, पुजल अली आयोग, प्रदेश काँग्रेस अध्यक्षांची बैठक, गिराज्य योजनेला विरोध, मुंबई प्रदेश शेड्युल कास्ट फ्रेडरेशन, राज्य पुर्नरचना अहवालावर लोकसभेत चर्चा, वकील परिषद, महाव्दिभाषिक राज्याची घोषणा, व्दिभाषिक राज्यातील निवडणुका, श्री जयप्रकाश नारायण यांचे पत्र, व्दिभाषिक मोडित

काढण्याचा ठराव केंद्र सरकारची मान्यता आदी अशा प्रकारे १९५६ मध्ये व्दिभाषिक राज्याची विभागणी करुन १ मे १९६० रोजी स्वतंत्र मराठी भाषिक महाराष्ट्र हे राज्य भारताच्या नकाशावर अस्तिवात आहे.

**भौगोलिक स्थान :-**

१५°, ४४° उत्तर अक्षवृत्त ते २२°.६° उत्तर अक्षवृत्त आणि ७२°, ६६° पूर्व रेखावृत्त ते ८०°, ५४° पूर्व रेखावृत्त या अक्षवृत्त रेखावृत्त महाराष्ट्र राज्य वसलेले आहे . महाराष्ट्राची दक्षिणोत्तर रुंदी ७०० कि.मी. असुन पूर्व पश्चिम लांबी ८०० कि.मी आहे. महाराष्ट्राला ७२० कि.मी एवढा समुद्रकिनारा लाभलेला आहे. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३,०७,७४३ चौ.कि.मी. आहे. भारतीय व्दिपकल्पाचा मोठा भुप्रदेश महाराष्ट्राने व्यापला आहे[३]. महाराष्ट्राच्या वायव्येस गुजरात राज्य आणि दमण, दादरा नगरहवेली हे केंद्रशासित प्रदेश आहेत. उत्तरेस व पूर्वेस मध्यप्रदेश हे राज्य असून अग्नेय दिशेस आंध्रप्रदेश, दक्षिणेस कर्नाटक, पश्चिमेस गोवा ही राज्य आहेत. मुंबई हे राजधानीचे शहर असुन नागपूर ही राज्याची उपराजधानी आहे.

**प्रशासकीय विभाग :-**

संपूर्ण महाराष्ट्र राज्याची पुढील सहा वेगवेगळ्या महसुली विभागांमध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. ते महसुली विभाग तक्ता क्र. २.१ मध्ये दर्शविण्यात आले आहेत.

**तक्ता क्र. २.१**

**महाराष्ट्राचे प्रशासकिय विभाग**

| अ.क्र. | विभाग | मुख्यालय |
|---|---|---|
| १ | कोकण विभाग | मुंबई |
| २ | नाशिक विभाग | नाशिक |
| ३ | पूणे विभाग | पूणे |
| ४ | मराठवाडा | औरंगाबाद |
| ५ | अमरावती | अमरावती |
| ६ | विदर्भ | नागपूर |

**( आधार : महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल - २००१)**

**लोकसंख्या :-**

१ मार्च २००१ रोजी भारताची लोकसंख्या १०१.२ कोटी आहे. (५३१.३ दशलक्ष पुरुष आणि ४९५.७ दशलक्ष स्त्रिया) जगाच्या एकूण लोकसंख्येत भारताचा वाठा १६.७ टक्के एवढा आहे. तर महाराष्ट्राची लोकसंख्या घनता २५७ प्रति चौरस कि.मी. एवढी आहे. तसेच भारतातील एकूण लोकसंख्येच्या ७४.३% लोक ग्रामिण भागात तर २५.७% लोक शहरी भागात राहतात. महाराष्ट्रात हेच प्रमाण अनुक्रमे ६१.३% व ३८.७% एवढे आहे[४]. तर साक्षरतेच्या दृष्टिने विचार करता भारतात ६५.३८% लोक साक्षर आहेत. हेच प्रमाण महाराष्ट्रात ७७.२७% एवढे आहे. त्यामध्ये पुरुषांचे प्रमाण भारतात ७५.८५% तर महिलांचे प्रमाण ५४.१६% आहे तर महाराष्ट्रात हे प्रमाण अनुक्रमे ८६.२७ व ६७.६१ असे आहे.

**घनता :-**

महाराष्ट्रातील लोकसंख्येची घनता २५७ प्रति चौरस कि.मी. एवढी आहे.

**जिल्हे :-**

महाराष्ट्रात एकूण ३५ जिल्हे आहेत. त्यापैकी ३३ ग्रामिण व २ शहरी जिल्हे असून ३२६ तहसिल, ४०,४१२ खेडी आहेत.

**उत्पन्न :-**

राज्याचे वार्षिक सरासरी उत्पन्न २,१३.८६० कोटी रुपये आहे.

**हवामान :-**

महाराष्ट्र प्रदेश उष्ण कटिबंधात येतो. त्याचे तापमान सर्वसाधारणपणे जास्त असले तरी अरबी समुद्र व सह्याद्री पर्वतरांगामुळे या तापमानात बराच फरक पडतो. कोकणपट्टीचे हवामान समशितोल आहे. मात्र ते दमट असते. उंच डोंगरमाथ्यावर हवा थंड असते. पुणे, नाशिक यासारख्या ठिकाणी हिवाळा व उन्हाळा फार कडक नसतो. सोलापूर व नागपूर इत्यादी ठिकाणी हवामान फारच विषम आहे. त्यामुळे महाराष्ट्रात निरनिराळ्या भागात भिन्न प्रकारचे हवामान आढळते.

महाराष्ट्रात पाऊस मुख्यतः ज्येष्ठ ते भाद्रपद ( जुन ते सप्टेंबर) या चार महिन्यात पडतो हिंदी महासागरावरुन ईशान्येकडे वाहणाऱ्या मोसमी (मान्सून) वाऱ्यामुळे हा पाऊस पडत असतो[५]. या पावसाचे

प्रमाण ही निरनिराळ्या भागात निरनिराळे आहे. समुद्रकिनाऱ्यावर कोकणात १०० ते १५० इंच पाऊस पडतो तर घाटमाथ्यावर त्याचे प्रमाण २०० ते २५० इंच एवढे आहे. नाशिक पूर्ण, नगर, खानदेश, सातारा, सोलापूर या जिल्हयांत पावसाचे प्रमाण १५ ते ५० इंच यादरम्यान आहे. मराठवाड्यात ३० ते ४० इंच पाऊस पडतो.

**शेती :-**

महाराष्ट्रातील बहुतांश लोक ग्रामिण भागामध्ये राहतात. त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. भारतीय लोकसंख्येच्या प्रमाणात महाराष्ट्रातील ६१.१४% लोक शेती करतात. महाराष्ट्रातील प्रमुख पीक उत्पादनांमध्ये भात, ज्वारी, बाजरी, गहु, तुर, मुग, उउीद, मोहरी, कापुस, यांचा समावेश आहे. ज्वारी हे महाराष्ट्रतील बहुसंख्य लोंकाचे मुख्य अन्न आहे.

**उद्योग धंदे :-**

उद्योगधंदाच्या दृष्टीने महाराष्ट्र देशात अग्रेसर मानला जातो व त्याशीवाय खेडेगावात शेती व्यतिरिक्त अनेक लहान लहान उद्योग करणारे कारागीर आहेत सुतार, लोहार, महार, मांग, चांभार, कुभांर, बुरुड कासार, तांबट, हे बालुतदार शेतीची अवजारे हत्यारे, दोर, मोटा, गाडगी, मडकी, भांडी वगैरे नित्योपयोगी वस्तु बनवून गावकऱ्यांना पुरवित. याशिवाय यांत्रिक युगात सुरु झालेला मोठा उद्योग म्हणजे कापडाच्या गिरण्या महाराष्ट्रत विशेषतः मुंबईत अशा गिरण्या बऱ्याच आहेत नागपुर, सोलापुर, पुणे सांगली इत्यादी ठिकोणीही अशा गिरण्या आहेत. या व्यतिरिक्त रबर व प्लॉस्टिक, विटा कातडी कामावणे, खते, दारुगोळा तयार करणे माच्दीमाहरी असे विविध व्यवसाय मोठ्या प्रमाणात आहेत.

**पाटबंधारे व ऊर्जा :-**

महाराष्ट्रात जुन २००० अखेर पर्यंत २९ मोठे १५६ मध्यम आणि २१८७ लघु पाटबंधारे प्रकल्प आहेत. इतर ७६ मोठ्या आणि १४३ लघु प्रकल्यांचे काम सुरु आहे. महाराष्ट्रात एकुण ३३.०७ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आहे. ऊर्जा निर्मीतीच्या क्षेत्रात महाराष्ट्राची क्षमता १९९९-२००० साली. १३.८८२. मे व. इतकी होती.

**वाहतुक व दळणवळण :-**

महाराष्ट्रात २.५ लाख कि. मी. लांबीचे रस्ते असून त्यात ३,७३५ कि. मी. राष्ट्रीय

महामार्गांचा समावेश आहे. ३३,१६५ कि. मी. लांबीचे राज्य महामार्ग आहेत. ५३९६ कि.मी लांबीचा रेल्वेमार्ग असून त्यातील ७६.७ टक्के ब्रॉडगेज मार्ग आहे. ९.३% मीटरगेज तर १४% नगरोगेज आहेत राज्यात २४ विमानतळ असून त्यातील १७ राज्य शासनाच्या मालकीची आहेत. चार विमान तळांची देखील आंतरराष्ट्रीच्या विमानतळ प्राधिकराणामार्फत व भारतीय विमानतळ प्राधिकरणामार्फत केली जाते तीन विमानतळ संरक्षण मंगालयाच्या आखत्यारित आहेत. मुंबई हे मोठे बंदर आणि ४८ छोटी बंदरे आहेत.

**पर्यटन स्थळे :-**

आजिंठा, वेरुळ, एलिफंटा, कन्हेरी, कारला लेण्या, महाबळेश्वर, माथेरान आणि पाचगणी ही महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळे आहेत. पंढरपूर, तुळजापूर, औंढा नागनाथ, परळी, त्र्यंबकेश्वर, गणपतीपुळे, भीमानागनाथ, हरीहरेश्वर, शिर्डी आणि शेगांव इत्यादी श्रमिक स्थळे आहेत.

**सामाजिक संरचना :-**

महाराष्ट्रात सामाजिक संरचनेचा विचार करता महाराष्ट्रात सुमारे २५०० जाती आहेत. ब्राह्मण, सुतार, कुंभार, कुणबी, बुरुड, गवंडी, कोठी, गुरव, घिसाडी, तेली, कासार, न्हावी, तांबोळी, भंडारी, भोई, लोहार, परीट, धनगर, वाणी, शिंपी इत्यादी व्यावसायिक जाती आहेत. महार, मांग, चांभार इत्यादी पूर्वास्पृश्य जाती ही अनेक आहेत. शहरातुन जातीभेद व अस्पृश्यता यांची विशेष जाणीव होत नसली तरी खेडेगावात परिस्थिती असुन फारशी बदललेली दिसत नाही. याशिवाय ठाणे, कुलावा या जिल्हयातील आगरी, वारली, कातकरी, ठाकुर धुळे जिल्हयांतील भिन्न आणि विदर्भातील कोरुक व गौंड या जमाती हि आहेत.

**महाराष्ट्रातील प्रभावी जाती :-**

महाराष्ट्रामध्ये वर स्पष्ट केल्याप्रमाणे अनेक जाती व जमाती आहेत. पण त्यामध्ये विशेषतः राजकीयदृष्या काही प्रमुख जातीच अधिक प्रभावी असल्याचे दिसून येते. त्यामध्ये मराठा, ब्राह्मण व महार जाती राजकीय दृष्या अधिक प्रभावी समजल्या जातात.

**प्रमुख भाषा :-**

महाराष्ट्रामध्ये सुमारे ७७% लोकांची मातृभाषा मराठी आहे. उर्वरित लोक उर्दू, हिंदी, गुजराती,

कानडी इत्यादी भाषा बोलतात.

### २.३ मराठवाडा विभाग :-

वर्तमान महाराष्ट्र राज्याच्या वेगवेगळ्या भुभागांपैकी मराठवाडा हा एक भुभाग आहे. हा भुभाग इतिहासाच्या वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या राजवटी खाली होता. वास्तविक पाहता हा भुभाग प्राचिन महाराष्ट्राचाच एक भाग होता सांस्कृतिक इतिहासातही या विभागाचे मोठे योगदान आहे. ऐतिहासिक काळात राष्ट्रकुटाची राजधानी असलेले वेरुळ याच भागात आहे. शिवाय वेरुळ व अजिंठा लेण्या ही प्राचिन पाषाण कोरुन बनविलेले आकर्षक शिल्पे तसेच देवगिरी सारखे ऐतिहासिक किल्ले या भागात आहेत.

धार्मिकदृष्टया मराठवाडयाचे वेगळे महत्व आहे. १२ जोतिर्लिंगापैकी औंढा नागनाथ, परळी वैजनाथ आणि घृष्णेश्वर ही तीन ज्योर्तीलिंगे मराठवाडयात आहेत. अध्यात्माच्या बाबतीतही मराठवाडयाची मोठी महती आहे. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, रामदास स्वामी, एकनाथ असे संत महात्मे याच भुमितले.

यादव काळात मराठवाडयाची सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्या खऱ्या अर्थाने जडण-घडण झाली. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशात मराठवाड्याची वेगळी ख्याती होती. मराठवाड्याची भौगोलिक रचना हे या विभागाचे प्रमुख भांडवल होते[६]. नंतरच्या काळात मराठवाडा, हैद्राबाद संस्थानाचा भाग बनला. उर्दू ही या संस्थानात प्रशासकिय भाषा होती, देशाच्या स्वातंत्र्यानंतर भारतातील विविध संस्थाने भारतीय संघराज्यात ताबडतोब विलिन झाली. पण हैद्राबाद हे संस्थान निजमाच्या ताब्यात होते. ते ताबडतोब संघराज्यात विलिन झाले नाही. या संस्थानाच्या विलिनीकरणासाठी हैद्राबाद मुक्तीसंग्राम झाला. या मुक्तीसंग्रामाचे प्रमुख अग्रगणी नेते स्वामी रामानंदातीर्थ हे होते. त्यांच्याच नेतृत्वाखाली हा मुक्तीसंग्राम लढला गेला या लढयात अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. शेवटी १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजाम शरण आल्यानंतर हे संस्थान भारतीय संघराज्यात विलिन झाले. त्यानंतरहा भाग वर्तमान महाराष्ट्र राज्याशी जोडला गेला कारण या भागातिल बहुतांश लोक हे मराठी भाषिक आहेत. आज हा विभाग वर्तमान महाराष्ट्र राज्याचा अविभाज्य भुभाग म्हणून ओळखला जातो. एवढेच नव्हे तर महाराष्ट्राच्या सहा प्रमुख प्रशासकिय महसुली विभागापैकी एक विभाग म्हणून

ओळखला जातो. या विभागाचे भौगोलिक क्षेत्र ६४.६० लक्ष हेक्टर आहे. पूर्वी हा विभाग एकूण ५ जिल्हयामध्ये विभागलेला होता. आज हा विभाग एकूण ८ जिल्हयांमध्ये विभागलेला आहे. या ८ जिल्हयापैकीच बीड हा एक प्रमुख जिल्हा आहे[५].

## २.४ बीड जिल्हा :-

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागात असलेला बीड हा एक जिल्हा आहे. स्वातंत्र्यपूर्वी बीड जिल्हा हा पूर्वीच्या हैद्राबाद राज्यातील एक मराठी भाषिक जिल्हा होता. इ.स.१९५६ साली व्दिभाषिक राज्याच्या स्थापनेवेळी हा जिल्हा व्दिभाषिक राज्याच्या मराठवाडयात होता. १९६० साली हा जिल्हा मराठी भाषिक राज्यांत म्हणजेच महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात आला. त्यानंतर १९८२ साली लातूर जिल्हयाच्या निर्मिती वेळी या जिल्हयातील अंबाजोगाई तालुक्यातील ४३ गावे व ११ वाडयांचा लातूर जिल्हयात समावेश करण्यात आला.

बीड जिल्हयाचे पूर्वीचे नाव 'भरीर'होते.भरीर म्हणजे पाणी होय. आजही बीड मध्ये विहिरी, आड मोठया प्रमाणात दिसून येतात.

बीड जिल्ह्याला संताचा मोठा वारसा लाभला आहे. यामध्ये मराठीचे आघकवी मुकूंदराज संत पासोडीकर दासोपंत अलिकडच्या काळतील उत्तरेश्वर पिंप्रीचे ज्ञानेश्वर माऊली या सारख्या अनेक साश्रुसंतांची जम्नभूमी व कर्यभूमी म्हणून बीड जिल्ह्याची ओळख संपूर्ण महाराष्ट्राला आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यात १२ ज्योतीर्लिगा पैकी एक परळी येथे असलेले वैद्यनाथ मंदिर रानीचे महत्व असलेले राक्षसभुवन,महानुभव पंथाचे श्रधास्थान असलेले पाचांळश्वर कपिलधार नारायण गड अंबाजोगाई येथील योगेश्वरी देवीचे मंदीर नवगंण राजुरी कक्रंलेश्वर मानुर ही महत्वाची धार्मिक स्थळे आहेत. मराठे आणि निजाम यांच्यातील इतिहास प्रसिध्द लंढाईचे राक्षसमुवन हे ठिकाण बीड जिल्ह्यातील कासार तालुक्यात आहे.

## २.५ भौगोलिक बीड :-

### स्थान व क्षेत्रफळ :-

बीड जिल्हा महाराष्ट्राच्या मराठवाडा विभागात दख्खनचा काळया थराच्या दगडाचा प्रदेशात वसेलेला आहे. बीड जिल्हा औरंगाबाद विभागाच्या पश्चिमेस आहे.

**खनिजे :-**

जिल्ह्याला भाव येण्यजोगे खनिज उत्पादन नाही मात्र वीट भट्ट्यांकरिता माती, बांधकामासाठी वाळू व खडी साठी काळा दगड ही महत्वाची खनिज उत्पादने आहेत.

**२.६ लोकसंख्या :-**

**तक्ता क्र. २.२**

**बीड जिल्ह्यातील लोकसंख्या**

| जनगणना वर्ष | लोकसंख्यचा (लाखात) | झालेली वाढ/घर (लाखात) | प्रतिशात वृध्दीदर | सरासरी वार्षिक वृध्दीदर |
|---|---|---|---|---|
| १९५१ | ८.२६ | - | - | - |
| १९६१ | १०.०१ | १.७५ | २१.१८ | २.११ |
| १९७१ | १२.६६ | २.६५ | २६.४७ | २.६४ |
| १९८१ | १४.१३ | १.४७ | ११.६१ | १.१६ |
| २०९१ | १८.२३ | ४.०९ | २८.९४ | २.८९ |
| २००१ | २१.६१ | ३.३९ | १८.६० | १.८६ |

**स्त्रोत :-**

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००३-२००४ वरिल तक्ता.क्र.१.१ मध्ये बीड जिल्हयातील लोकसंख्येचा कल दर्शिविला आहे. १९५१ च्या जनगणनेनुसार बीड जिल्हयाची लोकसंख्या ४.२६ लाख एवढी होती. २००१ च्या जनगणनेनूसार जिल्हयाची एकूण लोकसंख्या २१,६१,२५० इतकी होती. १९५१ च्या जनगननेच्या तुलनेत सरासरी वार्षिक वृध्दीदर १.८६ इतका होता.

बीड जिल्हयाचे क्षेत्रफळ महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाच्या ३.४५% आहे. तर लोकसंख्या महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या २.२३% आहे[७]. याचाच अर्थ असा की, बीड जिल्हयाची महाराष्ट्राशी तुलना करता लोकसंख्येचे प्रमाण क्षेत्रफळाच्या प्रमाणापेक्षा कमी आहे.

**लोकसंख्येची घनता :-**

दर, चौरस कि.मी क्षेत्रफळात राहणाऱ्या लोकांची संख्या म्हणजे लोकसंख्येची घनता होय. लोकसंख्येच्या घनतेवरुन विशिष्ट प्रदेश लोकसंख्येबाबत विरळ आहे कि दाट हे स्पष्ट होते.

विशिष्ट प्रदेशाची एकूण लोकसंख्या

लोकसंख्येची घनता =

त्या प्रदेशाचे क्षेत्रफळ

**तक्ता क्र.२.३**

**लोकसंख्येची घनता**

| जनगणना वर्ष | लोकसंख्येची घनता |
|---|---|
| १९५१ | ७६ |
| १९६१ | ९२ |
| १९७१ | ११५ |
| १९८१ | १३३ |
| १९९१ | १७२ |
| २००१ | २०३ |

**स्त्रोत :-**

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००३-२००४ वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते की, १९५१ मध्ये बीड जिल्हयाची लोकसंख्या घनता ७६ होती ती ५० वर्षात जिल्हयाच्या लोकसंख्येच्या घनतेत जवळपास तीन पट इतकी वाढ झाली आहे. २००१ मध्ये जिल्हयात बीड तालुक्याची लोकसंख्या घनता सर्वात अधित तर पाटोदा तालुक्याची लोकसंख्या घनता सर्वात कमी होती. एकूणच ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात लोकसंख्येची घनता अधिक आढळून येते. २००१ च्या जनगननेप्रमाणे बीड जिल्हयाची लोकसंख्या घनता महाराष्ट्र राज्य (३२२) आणि भारत (३२४) यांच्याशी तुलना करता

खुपच कमी (२०३) होती. अप्रगत शेती जलसिंचन सोयीचा अभाव-उद्योगधंद्याची कमतरता इ.कारणे यामागे असु शकतात.

### ग्रामीण व नागरी लोकसंख्या :-

लोकसंख्येच्या ग्रामीण व नागरी विभागणीवरुन त्या विशिष्ट विभागांच्या आर्थिक विकासाची कल्पना येऊ शकते.ज्या विभागाचा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे. त्या विभागात नागरी लोकसंख्येचे प्रमाण अधिक असते.कारण अशा विभागात औद्योगिकीकरणामूळे वाहतूक, दळणवळण, बांधकाम व इतर क्षेत्राचा विस्तार होतो. यातून रोजगारात वाढ होऊन परिणामतः नागरी लोकसंख्येची प्रमाण वाढते.

**तक्ता क्र. २.४**

**ग्रामीण व नागरी लोकसंख्या**

| जनगणना वर्ष | लोकसंख्या (लाखात) | | | एकूण लोकसंख्येची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | शहरी |
| १९५१ | ७.४० | ०.८८ | ८.२८ | ८९.३७ | १०.६३ |
| १९६१ | ९.०३ | ९.०३ | १०.०१ | ९०.२० | ९.८० |
| १९७१ | ११.३७ | ११.३७ | १२.८ | ६८८.४१ | ११.५९ |
| १९८१ | ११.८३ | ११.८३ | १४.१३ | ८३.७२ | १६.२८ |
| १९९१ | १४.९६ | १४.९६ | १८.२३ | ८२.०६ | १५.४० |
| २००१ | १७.७४ | १७.७४ | २१.६१ | ८२.०९ | १६.०० |

**स्त्रोत :-**

जिल्हा सामाजिक व आर्थिकसमालोचन २००५-२००६ सन २००१ मध्ये जिल्हयातील २१.६१ लाख लोकसंख्येपैकी १७.७४ लाख लोकसंख्या म्हणजेच ८२.०९% ग्रामीण भागात इतर ३.८७ लक्ष

लोकसंख्या शहरी भागात होती. जिल्हयातील केवळ बीड, परळी, अंबाजोगाई, गेवराई, माजलगाव व धारुर यांचा समावेश नागरीक्षेत्रात होतो.

वरील तक्त्यावरुन हे स्पष्ट होते की, १९६१ पासून जिल्हयात नागरी लोकसंख्येचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. म्हणजेच जिल्हयात शहरीकरणाचा वेग वाढत आहे. २००१ मध्ये भारतात नागरी लोकसंख्येचे प्रमाण २७.७८% व महाराष्ट्रात ३४% पेक्षा अधिक होते[८]. याचा अर्थ असा की, जिल्हयात नागरी लोकसंख्येचे प्रमाण सातत्याने वाढत असते तरी महाराष्ट्र व देशाशी तुलना करता शहरीकरणाचे प्रमाण खुप कमी आहे.

**स्त्री-पुरुष प्रमाण :-**

दर हजार पुरुषामागे स्त्रियांच्या तुलनेत असलेल्या संख्येस स्त्री-पुरुष प्रमाण म्हणतात हे प्रमाण खालील सुत्राच्या साह्याने काढले जाते.

$$\text{स्त्री-पुरुष प्रमाण} = \frac{\text{एकूण स्त्रियांची संख्या}}{\text{एकूण पुरुषांची संख्या}} \times १०००$$

### तक्ता क्र.२.५

### बीड जिल्हयातील स्त्री-पुरुष प्रमाण

| जनगणना वर्ष | जिल्हयातील स्त्री -पुरुष प्रमाण |
|---|---|
| १९५१ | ९५७ |
| १९६१ | ९६९ |
| १९७१ | ९५४ |
| १९८१ | ९६५ |
| १९९१ | ९४४ |
| २००१ | ९०४ |

**स्त्रोत :-**

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००३-२००४

वरिल तक्ता क्र.१.५ वरुन स्पष्ट होते की, जिल्हयात प्रत्येक जनगणनेच्या वेळी स्त्री-पुरुष प्रमाण १९८१ पर्यंत कमी-जास्त होत होते व ते समाधानकारकही होते. परंतू १९९१ मध्ये ९४४ असे असलेले स्त्री-पुरुष प्रमाण २००१ मध्ये ९०४ पर्यंत कमी झाले.२००१ च्या जनगणनेप्रमाणे भारतात व महाराष्ट्रात हेच प्रमाण अनुक्रमे ९३३ व ९२२ इतके होते. भारतीय वातावरणात दर हजार पुरुषामागे ९५० किंवा अधिक स्त्रिया हे प्रमाण अनुक्रमे स्त्री-पुरुष प्रमाण चिंताजनक ठरते. आजही स्त्रीला दिला जाणारा कनिष्ठ दर्जा मुलगा म्हणजे वंशाचा दिवा मुलगी म्हणजे मोक्षप्राप्तीसाठी आवश्यक यासारखी परंपरागत मते ही या मागचे कारणे आहेत.

**साक्षरता :-**

सध्या सात वर्षे किंवा त्यावरील व्यक्तीस कोणत्याही भाषेत लिहिता-वाचता येते अशा व्यक्तीस साक्षर समजण्यास येते. सात वर्षापेक्षा कमी व याच्या व्यक्तींचा समावेश साक्षर किंवा निरक्षर यापैकी कोणत्याच गटात केला जात नाही. २००१ च्या जनगणनेप्रमाणे जिल्हयात साक्षरतेचे प्रमाण ५७.३५%

, महाराष्ट्रात ७६,८८% तर भारतात ६४.८४% इतके होते.

साक्षरतेच्या प्रमाणात ग्रामीण व नागरी भागात फारच तफावत असुन नागरी भागात साक्षरतेचे प्रमाण ६८.२४% तर ग्रामीण भागात ५५.०६% होते.

**कामकऱ्यांची लोकसंख्या :-**

२००१ च्या जनगणनेप्रमाणे जिल्हयात कामकऱ्यांची संख्या ९.५७ लक्ष म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ४४.२४% होते आणि सिमांत कामकरी ९.२६ लक्ष म्हणजेच ५.८६% होते. जिल्हयात शेतकरी व शेतमजुरांचे प्रमाण जास्त होते.

**वयोगटानुसार लोकसंख्या :-**

वयोगटानुसार लोकसंख्येच्या विभागणीवरुन काम करण्यास लायक लोकांची संख्या लक्षात येते व अशीच लोकसंख्या उत्पादक असते. कारण ती उत्पादनात भर घालत असते. १९८१ मध्ये जिल्हयात ०.१४% तर ६० पेक्षा अधिक वयोगटात ७.१७% लोकसंख्या होती. म्हणजेच जिल्हयातील १९८१ मध्ये ५२.१०% लोकसंख्या काम करण्यालायक होती तर उर्वरित ४७.९०% लोकसंख्या काम करण्यास अयोग्य होती.

**अनुसुचित जाती-जमातीची लोकसंख्या :-**

२००१ च्या जनगणनेप्रमाणे बीड जिल्हयात अनुसूचित जातीची लोकसंख्या २.१८ लाख म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या १३.०१% होती. त्याच बरोबर अनुसूचित जमातीची लोकसंख्या २४ हजार म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या १.१२% इतकी होती.

### तक्ता क्र.२.६

### बीड जिल्हयातील लोकसंख्येचे धर्मानुसार विभाजन

| धर्म | लोकसंख्या | एकूण लोकसंख्येचे प्रमाण |
|---|---|---|
| हिंदू | १८२७२९८ | ८४.५४ |
| मुस्लिम | २५६२८२ | ११.८५ |
| बौध्द | ६५१२२ | ३.०१ |
| जैन | ८६२८ | ०.३९ |
| ख्रिश्चन | १३८० | ०,०६९ |
| शिख | ७४६ | ०.०३ |
| इतर | १४९४ | ०.०६९ |
| **एकूण** | **२१६१२५०** | **१००** |

**आधार :- भारताची जनगणना २००१**

२००१ च्या जनगणने प्रमाणे जिल्हयात हिंदू धर्माची सर्वाधिक लोकसंख्या असल्याचे तर शिख धर्माची लोकसंख्या सर्वात कमी असल्याचे वरील तक्ता क्र.१.६ वरुन स्पष्ट होते. जिल्हयात जैन, ख्रिश्चन, शिख, या धर्माची लोकसंख्या अत्यंत नगण्य होती.

**नदीनाले :-**

गोदावरी ही जिल्हयाची महत्वाची नदी असून ती जिल्हयाच्या उत्तरेकडील गेवराई व माजलगाव तालुक्याच्या सीमेवरुन वाहत जाते. सिंदफणा, मांजरा, बिंदूसरा, वाण या जिल्हयातील इतर महत्वाच्या नद्या आहेत. तसेच तलवार, कांबळी, रुटी व मेहकर या जिल्हयातील इतर नद्या आहेत[९]. त्या सर्व नद्यांना सर्वसाधारणपणे मार्च पर्यंत पाणी असते. चांगला पाऊस झाल्यास काही नद्यांना वर्षभर पाणी

असते.

**प्रशासकीय व राजकीय बीड :-**

जिल्हयामध्ये एकूण ११ तालुके असून प्रशासकिय सोयीसाठी जिल्हयाचे दोन महसुली विभाग पाडण्यात आले आहेत. एक उपविभाग बीड येथे असून या अंतर्गत १) बीड २) गेवराई ३) आष्टी ४) पाटोदा ५) शिरुर (कासार) हे तालूके येतात. तर दुसरा उपविभाग अंबाजोगाई येथे असून ह्यात १) केज २) धारुर ३) माजलगाव ४) परळी हे तालुके येतात.

**२.७ स्थानिक स्वराज्य संस्था :-**

वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्याने १ मे १९६० पासून स्थानिक स्वराज्य संस्था अस्तिवात आली. महाराष्ट्रात विस्तारीत पंचायत राज संस्था अस्तिवात आहे.

१) जिल्हा परिषद (जिल्हा स्तर)

२) पंचायत समिती ( तालुका स्तर )

३) ग्रामपंचायत ( ग्राम स्तर )

हे तीन प्रमुख स्तर आहेत.

२००१ च्या जनगणनेप्रमाणे जिल्हयात एकूण १३६५ गावे होती तर एकूण १०१९ ग्रामपंचायती होत्या यापैकी ८३३ स्वतंत्र तर १८६ गट ग्रामपंचायती होत्या जिल्हयात ११ तालुके असून ११ पंचायत समित्या आहेत तर जिल्हयात १२० पंचायत समिती सदस्य होते. सर्व पंचायत समित्यांसाठी बीड येथे जिल्हा परिषद कार्यरत असून तीचे ६० सदस्य आहेत याशिवाय अ,ब, क वर्ग नगर परिषद आहेत.

**२.८ आर्थिक आणि व्यवसायिक बीड :-**

**शेती व्यवसाय :-**

कृषीप्रधान भारताला बीड हा एक कृषीप्रधान जिल्हा आहे. बीड जिल्हयात उद्योग व सेवा क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास झालेला नसल्यामुळे शेती हाच लोकांच्या उपजीविकेचा प्रमुख व्यवसाय

आहे. त्यामुळे शेती व शेतमजुरी करणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त आहे. असे आढळून येते.

**पीक रचना :-**

जिल्हयात खरीप व रब्बी असे दोन पीके घेतली जातात. खरीप हंगामामध्ये ज्वारी, बाजरी, मका, तूर, उडीद, मुग, तीळ, कापूस, सोयाबीन इत्यादी पीके घेतली जातात. तर रब्बी मोसमात हरभरा, सुर्यफुल, ज्वारी, गहू इत्यादी पीके घेतली जातात. दोन्ही

हंगामात जिल्हयात पीके घेतली जातात. तर उन्हाळ्यात सुध्दा काहि पीके घेतली जातात.

**तक्ता क्र.२.७**

**बीड जिल्हयातील पीक रचना**

**१९८६ –८७**

| अ.क्र. | पिकांचे नाव | क्षेत्र | एकूण लागवड क्षेत्राशी प्रमाण | क्षेत्र | एकूण लागवड क्षेत्राशी प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | तांदूळ | ८०७२ | ०.९५ | ३८२० | ०.३९ |
| २ | गहू | १९७८६ | २.३४ | ३८७२५ | ३.९८ |
| ३ | खरीप ज्वारी | १२२०८७ | १४.४४ | ७५२४० | ७.७३ |
| ४ | रब्बी ज्वारी | २४५५९२ | २९.०५ | १६९८५० | ७.४६ |
| ५ | बाजरी | १३४८२४ | १५.९४ | १८१५२० | १८.६६ |
| ६ | मका | ४८३२ | ०.५७ | ६०३० | ०.६१ |
| ७ | एकूण तृणधान्ये | ५५०३७४ | ६५.१० | ५५२८३० | ५६.८३ |
| ८ | तूर | ४१७८९ | ४.९४ | ४७७५० | ४.९१ |
| ९ | मुग | ३५३८४ | ४.१८ | १७१७० | १.७६ |
| १० | हरभरा | २५१८८ | २.९७ | २५१६० | २.५८ |
| ११ | एकूण कडधान्ये | १४७८३२ | १७.४९ | १०४५८७ | १०.७५ |
| १२ | एकूण अन्नधान्य | ६९८२३६ | ८२.५९ | ६५७४१७ | ६७.५९ |
| १३ | तेलबिया | १४५६४५ | १७.२२ | ३५५२५ | ३.६५ |
| १४ | ऊस | १९३१२ | २.२८ | ३५५२५ | ३.६५ |
| १५ | कापूस | ३२४९४ | ३.८४ | १११२१० | ११.४३ |
| एकूण लागवड क्षेत्र | | ८४५३२५ | १००.०० | ९७२६१५ | १००.०० |

**स्त्रोत :–**जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (१९९१–१९९२ व २००५ –२००६)

वरील तक्ता क्र. १.७ मध्ये १९८६–८७ व १९९९–२००० मधील विविध पिकाखालील क्षेत्र व त्याचे एकूण लागवडी खालील क्षेत्राशी प्रमाण दर्शविले आहे. वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते की, १९८६–८७ च्या तुलनेन १९९९–२००० मध्ये गहु, ऊस व कापुस चा पिंकाच्या लागवडी खालील क्षेत्रात वाढ झालेली आहे. या कालखंडात ऊसाखालील क्षेत्राचे एकूण लागवड अंगाशी असलेले प्रमाण २.२८% वरुण ३.६५% गन्हाखालील क्षेत्राचे प्रमाण २.३४% वरुन ३.९८% आणि कापसाखालील क्षेत्राचे प्रमाण सर्वाधिक म्हणजेच ३.८४% वरुन ११.४३% पर्यंत होते .असे आसले तरी आजही जिल्ह्यात ज्वारी खालील क्षेत्र सर्वाधिक आहे[१०]. तसेच एकूण अन्न ध्यान्याखालील क्षेत्राचे एकूण क्षेत्राशी असलेले प्रमाण हाटले तरी त्याचे प्रमाण ६७.५९% होते.

तेलबिया अन्नधान्यखालील क्षेत्र हाटले आहे. एकूण क्षेत्राच्या सर्वाधिक म्हणजे २५% क्षेत्र हे ज्वारी पिकाखाली होते.

**पिकांची उत्पादकता :–**

गव्हाखालील क्षेत्राचे प्रमान २.३४% वरुन ३.१८% आणि कापसाखालील क्षेत्राचे प्रमाण सर्वाधिक म्हणजेच ३.८४% वरुन ११.४३% पर्यंत होते असे असले तरी आजही जिल्ह्यातील ज्वारी खालील क्षेत्र सर्वाधिक आहे. तसेच एकूण अन्नधान्या खालील क्षेत्राचे एकूण क्षेत्रांशी असलेले प्रमाण घटले असले तरी त्याचे प्रमाण ६७–५९% होते तेलबिया अन्नधान्या खालील क्षेत्र घटले आहे. एकूण क्षेत्राच्या सर्वाधिक म्हणजे २५% क्षेत्र हे ज्वारी पिकाखाली होते.

प्रति हेक्टरी मिळणारे उत्पादन म्हणजे जमिनीची उत्पादकता होय. कृषी क्षेत्राचा पुरवठा स्थिर किंवा ताठर असल्यामुळे शेत मालाच्या पुरवठ्यात वाढ करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे दर हेक्टरी शेतीचे उत्पादने वाढवणे म्हणजेच जमिनीची उत्पादकता वाढवणे हा होय. जिल्ह्यात २००५–०६ या वर्षी प्रमुख पिकांची दर हेक्टरी उत्पादकता पुढील प्रमाणे होती.

## (तक्ता क्र. २.८)

जिल्ह्यातील पिकांचे दर हेक्टरी उत्पादन (संदर्भ वर्ष २००५-०६)

| अ.क्र | पीक | प्रति हेक्टरी उत्पादन किलोमध्ये |
|---|---|---|
| १ | गहु | १०५४ |
| २ | ज्वारी | १४०१ |
| ३ | बाजरी | ६७६ |
| ४ | हरभरा | ५३३ |
| ५ | तूर | ९९१ |
| ६ | भुईमुंग(शेंग) | ५८१ |
| ७ | कापूस | १९८ |
| ८ | तांदूळ | ४१४ |
| ९ | ऊस | ६९ |
| १० | मका | ४१७५ |
| ११ | उडीद | ८१२ |

या शिवाय विहिर कुपनलिका हेहि सिंचनाची साधने आहे. २००५-०६ मध्ये जिल्हयात विविध साधनांव्दारे एकूण ३०३.८१ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली होते. एकूण लागवडी खालील क्षेत्राशी हे प्रमाण ३१.२४% एवढे पडते.

**तक्ता क्र. २.९**

**बीड जिल्हयातील तालुकानिहाय सिंचन क्षेत्र (संदर्भ वर्ष- १९९९-२००० क्षेत्र हेक्टर )**

| अ.क्र. | तालुका | सिचंना खालील निव्वळ क्षेत्र | सिंचना खालील एकूण क्षेत्र | लागवडी खालील सिंचना खालील एकूण क्षेत्र | खालील क्षेत्राचे लागवडी खालील क्षेत्राशी प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | आष्टी | १५७९६ | १८०६० | ८२७७७ | २९.६१ |
| २ | पाटोदा | २२९६३ | २७३७५ | ८२३०० | ३३.१३ |
| ३ | शिरुर | १६५८८ | १७६९५ | ७२२०४ | २४.५१ |
| ४ | गेवराई | १९६३४ | २३१८० | ८४३८५ | २७.४७ |
| ५ | माजलगाव | १४५०६ | २०९२० | ९७५४७ | २१.४५ |
| ६ | वडवणी | १८९८८ | १९९०० | ७४६४५ | २६.६६ |
| ७ | बीड | २११११२ | २५३९० | ८५७५८ | २९.६१ |
| ८ | केज | ११९३९ | १८५९५ | ९२२१८ | २०.१६ |
| ९ | धारुर | १५२०६ | १९१९० | ९४४९२ | २०.३७ |
| १० | परळी | २१६६५ | २३१३५ | ९७९०७ | २३.६३ |
| ११ | अंबाजोगाई | १९२८५ | २२७५० | १०८४८२ | २०.९७ |
| | **एकूण** | **१९७६८२** | **२३६१९०** | **९७२६१५** | **२४.२८** |

**स्त्रोत :-** जिल्हा व समाजिक व आर्थिक समालोचन १९९०-२०१० वरील तक्ता क्र. २११ वरुन स्पष्ट होते की, १९९९-२००० मध्ये सर्वाधिक सिंचनाचे प्रमाण पाटोदा तालुक्यात (३३.१९) तर सर्वांत कमी धारुर तालुक्यात (२०.३७) आहे.

## तक्ता क्र. २.१०

## बीड जिल्ह्यातील कृषी अवजारे

| नांगरांची संख्या | | बैलगाड्यांची संख्या | ट्रॅक्टर | सिंचनासाठी | |
|---|---|---|---|---|---|
| लाकडी | लोखंडी | | | विद्यूतपंप | तेलावरीलपंप |
| ८५३० ३ | १७३८ | ४२६६१ | १६९७ | ४२९३० | २१५० |

स्त्रोत – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००५–०६

### संदर्भ वर्ष १९९७ :–

कोणत्याही उत्पादनासाठी साधनांची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे कृषी उत्पादनासाठी सुध्दा अवजारांची आवश्यकता असते. कृषी अवजारावरुन शेतकऱ्यांचा दृष्टिकोन लक्षात येऊ शकतो. अद्ययावत स्वतःच्या मालकीची, आधुनिक अवजारे वेळेची व खर्चाची बचत करुन उत्पादनात वाढ घडवून आणतात परंतु बीड जिल्हयात ६०% पेक्षा अधिक शेतकरी सीमांत व लहान असल्यामुळे त्यांना स्वतःच्या मालकीची अवजारे ठेवणे शक्य होत नाही. वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते की, जिल्हयात आजही पारंपारिक अवजारांचा मोठया प्रमाणात वापर केला जातो तर उत्पादनवाढीसाठी ट्रक्टर सारख्या आधुनिक व अद्यावत अवजारांचा वापर कमी केला जातो[११]. म्हणजे जिल्हयात आजही शेतीकडे पारंपारिक दृष्टिने उपजीविकेचे साधन म्हणून पाहिले जाते असे म्हणता येईल.

### बीडमधील उद्योग :–

आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी उद्योगधंद्याचा विकास होणे आवश्यक आहे. त्याच बरोबर शेतीत आढळणारी अदृष्य बेकारी कमी करुन शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठीही उद्योगधंद्याचा विकास होण आवश्यक आहे.

## तक्ता क्र. २.११

## बीड जिल्हयातील उद्योग

| नोंदणीकृत कारखाने | नोंदणीकृत चालु कारखाने | कामगार |
|---|---|---|
| १२६ | ८३ | ३४९४ |

**स्त्रोत :-**

जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन २००५-०६ (आधार वर्ष - २००४)

तक्ता क्र.२.११वरुन स्पष्ट होते की, जिल्हयात २००४ मध्ये एकूण १२६ नोंदणीकृत कारखान्यांपैकी केवळ ८३ कारखाने चालले होते. तर त्यातील कामगारांची संख्या ३४९४ होती. २००१ च्या जनगणनेप्रमाणे जिल्हयात दर लाख लोकसंख्येमागे औद्योगिक कामगाराचे प्रमाण अत्यल्प म्हणजे १९३ ऐवढेच होते. जिल्यात औद्योगिकीकरण वाढून रोजगार व उत्पादनात वाढ व्हावी म्हणून बीड व परळी येथे महाराष्ट्र उद्योग विकास मंडळाची योजना चालू असून या दोन्ही क्षेत्रात कारखाने झालेले आहेत. बीड येथे चमड्यावर प्रक्रिया करण्याचा कारखाना व परळी वै. येथे विजेचे उत्पादन व उपयोगी साहित्य निर्मितीचे कारखाने आहेत. एकूणच जिल्हयात उद्योगधंद्यांना चालना देण्याची गरज असून त्यामुळे लोकांना रोजगार प्राप्त होऊ शकते.

**साखर कारखाने :-**

बीड जिल्हयात (आष्टी तालुका) जयभवानी (गेवराई तालुका) पदमश्री विखे पाटील(केज तालुका) वैजनाथ (परळी तालुका)अंबासारखर कारखाना( अंबाजोगाई तालुका) असे एकूण सात सहकारी साखर कारखाने आहेत. त्यापैकी कडा व गजानन यांची गाळप क्षमता १२५० मे.टन तर उर्वरित सर्व कारखान्याची गाळप क्षमता २५०० मे.टन आहे. या सर्व कारखान्यात मिळून एकूण २५४१ लोकांना नियमित रोजगार मिळाला. त्या तुलनेत हंगामी रोजगार मिळण्याचे प्रमाण अधिक आहे. परळी

येथील वैद्यानाथ कारखान्यात साखर उत्पादनाबरोबर इथेनॉल आणि मद्यार्क यांचेही उत्पादन घेतले जाते. याशिवाय जिल्यात सहा सहकारी सुतगिरण्या आहेत.

**बीड मधील इतर व्यवसाय :-**

**दुग्ध व्यवसाय :-**

दुग्ध व्यवसाय हा शेतीला पुरक व्यवसाय म्हणून केला जातो. जिल्हात १९८१ पासून शेतकरी व शेत मजुरांना पूरक व्यवसाय मिळावा म्हणून ग्रामीण विकास यंत्रनेमार्फत दुभत्या गायीचे वाटप केले जाते. यामुळे जिल्हा दुग्ध व्यवसायात स्वंयपूर्णच बनला नाही तर इतर जिल्हयाना दुग्ध पुरवठा करणारा जिल्हा बनला आहे.

**तक्ता क्र.२.१२**

**जिल्हयातील दुभत्या जनावरांची संख्या**

| जनांवराचा प्रकार | विदेशी संकरीत गायी | देशी गाय | म्हशी | मेंढ्या | बकऱ्या |
|---|---|---|---|---|---|
| एकूण | ३८६३३ | ६४२९३ | ७५९७९ | १३००४५ | ६११६ |

**स्त्रोत :-** जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००९-१०

तक्ता क्र२.१२ वरुन स्पष्ट होते की, जिल्हयात दुभत्या गायी व म्हशीची एकूण संख्या १७.८९०८ एवढी होती. त्यातही म्हशीची संख्या अधिक होती. शेतकरी शेळ्या दुधाकरीता व मांस मिळवण्याकरीता पाळतात. जिल्हयातील मेंढ्या मध्यम प्रतीच्या असून त्यांच्यापासून मिळणाऱ्या लोकरीचे प्रमाण कमी आहे. शिवाय लोकरीचा दर्जाही फारसा चांगला नाही.

**जिल्हयातील पशुवैद्यकीय संख्या :-**

दुग्ध व्यवसायाच्या विकासासाठी व एकूणच पशुधनाचे जतन करण्यासाठी त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असते. विशेषतः संकरीत गायीच्या आरोग्याची देखभाल करणे अत्यंत आवश्यक असते. त्यासाठी जिल्हयात बीड येथे एक पशुवैद्यकीय चिकित्सालय ४२, पशुवैद्यकीय दवाखाने ८७, पशुवैद्यकीय प्रथमोपचार धारुर तालुक्यात एक फिरता पशुवैद्यकीय  दवाखाना ५८, कृत्रिम रेशीम केंद्र आणि ८७, कृत्रिम रेतन उपकेंद्र आहेत[१२]. शिवाय अंबाजोगाई येथे या वेळी पंधरा केंद्र आहे.

**तक्ता क्र.२.१३**

**पशुवैद्यकीय संस्था**

| अ.क्र. | संस्था | संख्या |
|---|---|---|
| १ | चिकित्सालय | ०१ |
| २ | दवाखाने | ४२ |
| ३ | प्रथमोपचार केंद्र | ८७ |
| ४ | फिरता दवाखाना | ०१ |
| ५ | कृत्रिम रेतन केंद्र | ५८ |
| ६ | कृत्रिम रेतन उपकेंद्र | ८७ |
| ७ | शेळी पैदास केंद्र | ०१ |

**स्त्रोत :-**

जिल्हा सामाजिक वि आर्थिक समालोचन २००९-१०

**आधार :-** जिल्हा पशूसंवर्धन आधिकारी जि.प.बीड

## (तक्ता क्र. २.१४)

## जिल्ह्यात संकलित केलेले दुध

## वर्षभरात संकलित केलेले दुध

| अ.क्र | तालुका | एकूण लिटर | प्रतिपादन (सरासरी ८०००लि) |
|---|---|---|---|
| १ | आष्टी | ३०२९५ | ८० |
| २ | पाटोदा | २०९७५ | ५५ |
| ३ | शिरुर | ४०१५ | ११ |
| ४ | गेवराई | २९२० | ८ |
| ५ | बीड | १९७१० | ५४ |
| ६ | केज | २९२० | ८ |
| ७ | धारुर | ३६५ | १ |
| ८ | परळी | ३६५ | १ |
| ९ | अंबाजोगाई | २२८५ | ६ |
| | एकुण | ८६९५० | २३०.०० |

**स्त्रोत :–** जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००९–१०

**आधारः–** जिल्हा कग्धशाळा विकास आधिकारी जि.प.बीड

वरिल तक्ता क्र. २.४ वरुल असे स्टष्ट असे स्पष्ट होते की,जिल्ह्यात दुध व्यवसाय हापुरक असून तो वाढत आहे. दुध व्यवसाया मुळे पाटोदा व आष्टी सारखे डोंगराळ तालुक्यांचा विकास होत

आसलेला दिसून येतो. दुग्ध व्यवसाया मुळे प्रतिकुल परिस्थितीवर मात करुन आपली प्रगती करत आहेत.

**मत्स्य व्यवसाय :-**

जिल्ह्यात वाहत्या व संचालित व गोड पाण्यात मत्स्य व्यवसाय केला जातो नदी, तळी, विहिरी जलाहाले, ही मत्स्य व्यवसायासाठी अनुंकूल क्षेत्रे आहेत. जिल्ह्यातील नद्या बारामाही वाहणाऱ्या नसल्यामुळे वाहत्या पाण्यातील मत्यस्स व्यवसाय थोडेच दिवस चालतो. जिल्ह्यायात रोहा व कोटला जातीच्या मत्स्याचे संवर्धन करुन विक्री केला जातो.

थोडक्यात मत्स्य व्यवसाय हा हंगामी स्वरुपाचा आहे. कारण जिल्ह्यात बारामाही पाणी असणाऱ्या नद्या नाहीत. आणि मोठे उद्योगही नाहीत केवळ दोनच प्रकल्प आहेत.

**कुक्कुटपालन :-**

जिल्ह्यात कुक्कुटपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जात नाही जिल्ह्यात हा व्यवसाय फारसा लोकप्रिय नाही. शेतकरी घरी अंडी मिळविण्यापूरत्या कोंबड्या पाळतात परंतु व्यावसायिक तत्वावर तथा पाळल्या जात नाहीत. तसेच जिल्ह्यात सुधारीत जातीच्या कोंबड्या पाळण्याचे प्रमाण फार दिसते बीड व इतर शहराला अंडयाचा पुरवठा जिल्ह्यातुनच होतो.

**जिल्हा उत्पन्नाचा अंदाज :-**

आकडेवारीच्या उपलब्धतेचा अभाव, अनूरुप निर्देशांकाचा वापर तसेच पध्दतीतीलअंगभूत उणिवा या सर्वामुळे जिल्हा उत्पन्नाचे अचूक अंदाज बांधण्या मध्ये मर्यादा येतात. परंतु जिल्ह्यातील उत्पन्नाची पातळी आजमिळविण्याकरिता यांचा वापर केला जाऊ शकतो.

**तक्ता क्र.२.१५**

**जिल्हा उत्पन्न व दरडोई जिल्हा उत्पन्न**

| अ. क्र | तपशिल | जिल्हा उत्पन्न | एकूण जिल्हा उत्पन्न | दरडोई जिल्हा उत्पन्न | दरडोई राज्य उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | चालू किंमतीनुसार (एकूण उत्पन्न) | ५००६.१७ | १.६३ | २३३२९ | ३६४२३ |
| २ | निव्वळ उत्पन्न (स्थिर किंमती नुसार) | ४५६३.३७ | १.३९ | २०३५४ | ३२१७० |
| ३ | (१९९३-९४) एकूण स्थुल उत्पन्न | २५३५.५ | १.२१ | ११३०१ | २०३९७ |
| ४ | एकूण निव्वळ उत्पन्न | २३००.७२ | १.२६ | १०२६२ | १७८६४ |

**स्त्रोत :-** जिल्हा व सामाजिक व आर्थिक समालोचन २००९-१० संदर्भ वर्ष-२००८-०९

तक्ता क्र. २.१९ वरुन स्पष्ट होते की, जिल्हा उत्पादनाचे राज्य उत्पादनाशी असणारे प्रमाण अत्यल्प असुन ते १.५ % पेक्षा कमी होते. जिल्हयाचे क्षेत्रफळ राज्य क्षेत्रफळाच्या ३.८८% लोकसंख्या (२००१ प्रमाणे) २.२३% असताना राज्य उत्पन्नाच्या १.५% पेक्षा कमी असणारे उत्पन्न जिल्हयामधील आर्थिक परिस्थितीची कल्पना देते[१३]. त्याचबरोबर दरडोई जिल्हा उत्पन्न सुध्दा दरडोई राज्य उत्पन्नापेक्षा खुपच कमी आढळते. याचाच अर्थ राज्याशी तुलना करता खुपच कमी होती.

## २.९ बीडमधील पायाभुत सुविधा :-

उत्पन्नात वाढ होण्यासाठी कच्चा माल, यंत्रसामुग्री, अवजारे, श्रम, भुमी, यासारखे साधने

पर्याप्त प्रमाणात उपलब्ध असणे आवश्यक असतेच पण, उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यासाठी याशिवाय इतरही काही घटक आवश्यक असतात. यामध्ये वीज, पाणी, वित्तसहाय्य करणाऱ्या संस्थाचे दळणवळणाच्या सोयी यांचा समावेश होतो. या सर्व सुविधा व सेवांना एकत्रितपणे पायाभुत सुविधा किंवा पायाभुत संरचना म्हणतात. पायाभुत सुविधा प्रत्येक्षपणे वस्तुंचे उत्पादन करीत नाहीत. परंतु आर्थिक व्यवहाराची पातळी उंचावण्यासाठी परिस्थितीची अनुकुलता ते निर्माण करतात.

काही प्रमुख पायाभुत सुविधा खालील प्रमाणे आहेत.

१) ऊर्जा /वीज

२) वाहतूक - रेल्वे, रस्ता, जल व हवाई वाहतूक

३) दळणवळण - टपाल, तार, दूरध्वनी

४) अधिकोषण / वित्तसंस्था

५) पाणीपुरवठा - जलसिंचन व पेयजल

६) सामाजिक सुविधा - शिक्षण सार्वजनिक आरोग्य

७) विक्रीव्यवस्था

८) साठवणूक व्यवस्था

**वीज :-**

कृषी उद्योग व व्यवसाय (व्यापार) विकासाच्या दृष्टिने विजेचे महत्व अनन्यसाधारण आहे. कृषी उद्योग, व्यापार त्याच बरोबर घरगुती वापरासाठी ही दिवसेंदिवस विजेची मागणी वाढत आहे. जिल्हयात महाराष्ट्र राज्य महामंडळामार्फत वीज पुरवली जाते. ३१ मार्च २००६ अखेर जिल्हयातील १३४७ गावे व ७ शहरांचे विद्युतीकरण झाले आहे. जिल्हयाचे १००% विद्युतीकरण झालेले होते.

**तक्ता क्र.२.१६**

**बीड जिल्हयातील विजेचा वापर (हजार किलोवॅट तासामध्ये)**

| वर्ष | घरगुती | शेती | व्यापार | उद्योग | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| २००१-०२ | ८०१५९<br>(३१.००) | १२२४०७<br>(४७.३३) | १४७०२<br>(५.६८) | २७३९९<br>(१०.५९) | १३९५०<br>(५.४०) | २५८६१७<br>(१००) |
| २००३-०४ | १४४४६६<br>(५५.०८) | ९३०८४<br>(३५.५०) | १४५९८<br>(५.५७) | ६३७८<br>(२.४३) | ३७५०<br>(१.४२) | २६२२६३<br>(१००) |

**स्त्रोत :-**

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन२००९-१० थोडक्यात जिल्हयात शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्यामुळे व उद्योग आणि व्यापाराचा विकास झाला नसल्यामुळे शेती आणि घरगुती वापरासाठीच विजेची मागणी मोठ्या प्रमाणात केली जाते.

**पाणी पुरवठा :-**

शेतीचा विकास हा प्रामुख्याने पाणी पुरवठ्यावर (सिंचनावर) अवलंबुन असतो शिवाय उद्योगांनाही पाण्याची आवश्यकता असते. मानव पाण्याशिवाय जिवंत राहू शकत नाहि. त्यामुळे पाण्याला जीवन असे म्हटले जाते. जिल्हयात पाणी जलसिंचन व पेयजल यासाठी वापरले जाते. जिल्हयात २००९-२०१० मध्ये सिंचनाखालील एकूण क्षेत्र २३६१९० हेक्टर होते. त्याचे एकूण लागवडी खालील क्षेत्राशी प्रमाण २४.२८% इतके होते. म्हणजेच जिल्हयात १९९१.०० मध्ये सिंचन खालील क्षेत्र २४.२८% होते.

तक्ता क्र. २.१७

पिण्याच्या पाण्याची सोय (संदर्भ वर्ष २००४-०५)

| अ.क्र. | तपशिल | | | |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण संख्या | १२८४ | ९७१ | २२६३ |
| २ | बारा महिने पुरेश्या पाण्याची उपलब्धता | १७ | ०५ | २२ |
| ३ | पाण्याची टंचाई | ७८० | ४०३ | ११८३(५२.२७%) |
| ४ | टँकर व्दारे पाणी पुरवठा | २८४ | ३०२ | ५७६(४८.६९%) |

**स्त्रोत :-**

जिल्हा सामाजिका व आर्थिक समालोचन २००९-२०१० तक्ता क्र.२.१७ वरुन स्पष्ट होते की, जिल्हयात केवळ १७ गावे, आणि ५ वाड्या यांनाच १२ महिने पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध होते. तर २२६३ वाड्या व गावापैकी ११८६ गाव वाड्यांना पाण्याची टंचाई जाणवत होती. म्हणजे एकूण वस्ती असलेल्या गाव वाड्याच्या ५२.२७% गाव व वाडयांना पाण्याची टंचाई जाणवत होती . परंतु त्या पैकी केवळ २७४ गावे व ३०२ वाड्यांनाच टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात आला होता.

**दळणवळण / रेल्वे व रस्ते :-**

कृषी औद्योगिक व एकूणच आर्थिक विकासासाठी सर्व ठिकाणी रेल्वे, रस्ते, वाहतुक, जलवाहतुक, हवाई वाहतुकींनी जोडले जाणे आवश्यक असते. जोपर्यंत खेडी शहरांना रस्ते किंवा रेल्वेने जोडले जात नाहीत तोपर्यंत त्यांचा विकास होऊ शकत नाही. कृषीमालाची विक्री करण्यासाठी खेडी हि शहरांना व प्रमुख रस्त्यांना जोडणे आवश्यक आहे. रेल्वे वाहतुक, रस्ते वाहतुक, जल वाहतुक, हवाई वाहतुक हे दळणवळणाचे मार्ग आहेत[१४]. परंतु बीड जिल्हयात माल वाहतुक व हवाई वाहतुकीची सोय उपलब्ध नाही. तर रेल्वे वाहतुक नसल्यातच जमा आहे व त्यामुळे जिल्हयात खेडी व शहरे

परस्परांना जोडण्याचे रस्ते व एकमेव साधन आहे.

**तक्ता क्र. २.१८**

**बीड जिल्हयातील वाहतुकीच्या सोयी (लांबी कि.मी.मध्ये )**

| अ.क्र. | प्रकार | २००२ | ३१ मार्च २००५ |
|---|---|---|---|
| १ | रेल्वे | ४७.८६ | ४७.८६ |
| २ | राष्ट्रीय महामार्ग | ७९ | १८८ |
| ३ | राज्य महामार्ग | १२५७ | १२०५.३ |
| ४ | प्रमुख जिल्हा रस्ते | १६२७ | १६३८ |
| ५ | इतर जिल्हा रस्ते | १३४९ | १८११.४३ |
| ६ | ग्रामीण रस्ते | ४७१६ | ४८१२ |
| | इतर | ९०३१.०० | ९६५४.७२ |

**स्त्रोत :-**

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००९-१० परळी वै.ते हैद्राबाद व परळी वै. ते परभणी असे दाने रेल्वे मार्ग जातात. मात्र त्यांची लांबी अत्यंत कमी म्हणजेच अनुक्रमे ४०.३८ कि.मी व ७.४८ कि.मी. एवढीच आढळते. थोडक्यात बीड जिल्हयात रेल्वेमार्गाचे प्रमाण अत्यल्प असुन त्यात २००२ पासून कोणतीही वाढ झालेली नाही.

जिल्हयात मार्च २००९ अखेर नगर परिषदेचे रस्ते एकूण रस्त्यांची लांबी १६५५ कि.मी होती. त्यापैकी १२०५.३ कि.मी लांब राज्य महामार्ग केवळ १८८ कि.मी लांब राष्ट्रीय महामार्ग होते. एकूण सर्व रस्ते लक्षात होती जिल्हयात १०४ कि.मी मागे ८६.३४ कि.मी रस्ते येतात. महाराष्ट्रात हेच प्रमाण ७१.१३ कि.मी. आहे आजही जिल्हयातील बरीच खेडी प्रकल्प रस्त्यांनी जोडले गेलेली नाहीत एकूण

रस्त्यांपैकी केवळ ४५२० कि.मी. रस्त्यांचेच डांबरीकरण झालेले होते. म्हणजेच एकूण रस्त्यांच्या (५३.२%) लांबीचे रस्ते कच्चे आहेत किंवा त्यांचे डांबरीकरण झालेली नाही.

**संज्ञापन :-**

टपाल, तार व दूरध्वनी ही संज्ञापनाची माध्यमे आहेत. जिल्हयात ३१ मार्च २००६ अखेर एकूण ३३३० टपाल कार्यालये ८ पोस्ट ऑफिस आणि २० तार कार्यालये होती. जिल्हयातील सर्व खेड्यांना टपाल सेवा उपलब्ध करुन दिली गेली आहे. यासाठी काही फिरती टपाल कार्यालये होती. तर काही ठिकाणी अर्धवेळ टपाल कार्यालये होती. या बरोबरचे ३१ मार्च २०१० अखेर जिल्हयात एकूण व्यक्ति व सार्वजनिक दूरध्वनी संख्या अनुक्रमे ६४१४१ आणि ३९४६ इतकी होती. व्यक्तिशः दूरध्वनी पैकी सर्वाधिक दूरध्वनी १७२५७ बीड तालुक्यात तर सर्वात कमी वडवणी ८८४१ तालुक्यात होते २००१ची लोकसंख्या गृहीत धरल्यास हजार लोकांमागे वैयक्तिक दूरध्वनी संख्या केवळ २९.६७ इतकी अल्प होती.

**अधिकोषण /बँका :-**

बचत क्षमता वाढविणे, उद्योग व्यापाराला प्रोत्साहन देणे भांडवल निर्मिती करणे, व्यापार वृध्दी करणे , पैशाच्या पुरवठ्यात लवचिकता आणने व्यवहार अधिक सुरक्षित व पारदर्शी करणे अशी अनेक महत्वाची कार्ये बँका /अधिकोषण पार पाडत असतात. म्हणून बँकाना अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहिन्या असे म्हटले जाते.

बँका, भांडवल पुरवठा करुन उद्योग, रोजगार व व्यापारामध्ये अप्रत्यक्ष वाढ करत असतात. म्हणून देशात असलेल्या बँकाची स्थिती व संख्या यावरुन त्या देशाच्या विकासाची कल्पना आपणास येऊ शकते.

''जिल्हयात २००४ अखेर एकूण ८ वर्गीकृत बँकेच्या १०१ शाखा कार्यरत होत्या. त्याच्या कडे एकूण ५२२०३ लाख रुपयांच्या ठेवी होत्या त्यांनी ३४२५२ लाख रुपयांचे कर्ज दिले होते. याशिवाय

जिल्हयात सहकारी बँकाच्या ७६ शाखा होत्या जिल्हयात दर लाख लोकसंख्येमागे व्यापारी बँकाची संख्या ५ असून सहकारी बँकाची संख्या ४ होती.

थोडक्यात जिल्हयात बँक प्रणालीचे जाळे समाधानकारक विस्तारले असून त्यात विस्ताराला खुप वाव आहे.''

**विक्रीव्यवस्था व साठवणूक व्यवस्था :-**

विक्री व्यवस्था ही उत्पादनाचा शेवटचा टप्पा आहे. आणि कोणतीही उत्पादन क्रिया उत्पादित मालाची विक्री झाल्याशिवाय पूर्ण होत नाही. उत्पादकाच्या यश-अपयशाचे मापन विक्री व्यवस्थेवरुन करता येते.विक्री व्यवस्थेत साठवणूक सूविधा अतिशय महत्वाची आहे. विशेषत शेती उत्पादनात कापणी हंगामा नंतर चांगला दर मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान व ग्रामस्थाचा फायदा होतो त्यामुळे दर कमी असताना गोदमात माल साठवणूक ठेवल्यास आधिक दरन आल्यास तो विक्रीस काढल्यास उत्पादकांना चांगला फायदा होऊ शकतो. बीड जिल्ह्यात धान्याची साठवण करण्यासासठी वखार महामंडळाची साठवण क्षमता ३६९५० ने टन इतकी होती. याचा उपयोग मुख्यतवे अन्नधान्य,तेलबिया खते, सिमेंट इ, वस्तुंच्या साठवणूकी साठी केला जातो.

जिल्ह्यात एकूण (कृषी उत्पन्न बाजार समिती असून बीड, गेवराई, पाटोदा, कडा, आष्टी, माजलगाव, धारुर, अंबाजोगाई , व परळी वैजनाथ इथे आहेत. या कृषीउत्पन्न बाजार समित्यामार्फत २००९-१० या वर्षात ९८१९८८ टन मालाची उलाठाल करण्यातआली होती. त्याची एकूण किंमत ८५४३.०५ लाख एवढी होती.

## २.१० शैक्षणिक बीड :-

मानवी संसाधन विकासाचा एक भाग म्हणून शिक्षणाला महत्वाचे स्थान आहे. विकासाला वेग देणे, बदल व विकास यांना अनुकूल अशी, मनोभुमिका तयार करणे, चांगलेनागरिक निर्माण करेण, नवे भाग चोखा कण्याची प्रेरणाा निर्माण करणे सानव नवनवीन कौशल्य शिकता येणे इ. दृष्टीने शिक्षणाचे मानवाच्च्यया जीवएात महत्वपूर्ण योगदान आहे. या मुळेच एखाद्या भागाचा किंवा देशाचा हा तेथील शेक्षणिक विकासाच्या दर्जावर अवलंबून असतो.

प्राथमिक शिक्षण :-

**तक्ता क्र. २.१९**

**बीड जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण**

**(आधार वर्ष २००९-१०)**

विद्यार्थी संख्या

| शाळा | मुले | मुली | एकुण | शिक्षक |
|---|---|---|---|---|
| २०८० | १६५२८३<br>(४८.१२) | १५३२४८<br>(४८.१२) | ३१८४९७ | ९३२४ |

**स्त्रोत :-**

बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००९-१० तक्ता क्र. २.९ मध्ये जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाची माहिती दर्शविली आहे.

जिल्ह्यात २००९-१० मध्ये एकूण २०८० प्राथमिक शाळा होत्या त्यात एकूण ३१८४ विद्यार्थी होते. त्यापैकी ४८.१२% होते. प्राथमिक शिक्षणांची संठ्या ९३२४ होती. म्हणजेच प्रती शिक्षक विद्यार्थ्यांची

संख्या उद होती.

**माध्यामिक शिक्षण :-**

**तक्ता क्र.२.२०**

**बीड जिल्ह्यातील माध्यामिक शिक्षण**

**अंधार वर्ष २००९-१०**

| शाळा | विद्यार्थी संख्या | | | |
|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | शिक्षक |
| ५५२ | ९४५६२ (५२.२७) | ८९२४३ (४७.७३) | १८८८०५ | ६८२७ |

**स्त्रोत :-** बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००९-१०

तक्ता क्र. २.१० मध्ये दर्शविल्याप्रमाणे जिल्ह्यात २००९-१० मध्ये ५५२ माध्यमिक शाळा होत्या. त्यातील १८८८०५ विर्थ्यापैंकी ८९२४३ म्हणजे एकूण विद्यार्थ्यांच्या ४७-७३% मुली होत्या. तर एकूण माध्यमीक शिक्षकांची संख्या ६८२७ होती[१५]. म्हणजे प्रती शिक्षक विद्यार्थ्यांची संख्या २८ इतकी होती. जिल्ह्यात अंदाजे दर ४ प्रथामिक शाळे मागे एक माध्यमिक शाळा येते. प्राथमिक शाळामधील विद्यार्थ्यांशी तुलना कसा दर १०० प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे माध्यमिक शाळेतील ६० विद्यार्थी येताता.

**उच्च माध्यामिक शिक्षण :-**

**तक्ता क्र.२.२१**

**बीड जिल्ह्यातील उच्च माध्यामिक विभाग**

(आधार वर्ष : २००९-१०)

| शाळा | विद्यार्थी संख्या | | एकूण | शिक्षक |
|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | ५९२७६ | १२३५ |
| १५३ | ३६४७०<br>(६१.४२) | २२८६६<br>(३८.५८) | | |

**स्त्रोत :-**

बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००९-१० तक्ता क्र.२.२१ नुसार जिल्हयात उच्चमाध्यमिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या १५३ आहे तर विद्यार्थी संख्या ५९२७६ होती. त्यापैकी २२८६६ म्हणजेच एकूण विद्यार्थ्यांच्या ३८.५८% मुलींची संख्या होती. शिक्षकांची संख्या १२३५ म्हणजे प्रती शिक्षक ४८ विद्यार्थी होते.

**महाविद्यालयीन शिक्षण :-**

**तक्ता क्र.२.२२**

**बीड जिल्हयातील महाविद्यालयीन शिक्षण**

(आधार वर्ष २००९-१० )

| महाविद्यालये | विद्यार्थी संख्या | | एकूण | शिक्षक |
|---|---|---|---|---|
| (सर्व ) | मुले | मुली | | |
| ६५(०४) | ३६५३७<br>(७८.७४) | ९८६३<br>(२१.२६) | ४३४०० | १३६१ |

**स्त्रोत :-**

बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००९-१०

जिल्ह्यात २००९-१० मध्ये कला वाणिज्य व विज्ञान शाळेची वैद्यकीय तंत्रनिकेतन, अध्यापक व्यावसायिक असे मिळून एकूण ६५ महाविद्यालये होती. त्यात ४६४०० विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी ९८६३ इतकी होती.

प्राथमिक माध्यामिक उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थी संख्येची तुलना केली असता स्पष्ट लक्षात येते की,प्राथमिक शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी फारच कमी मुले उच्च शिक्षण घेतात. त्यातही मुलींचे प्रमाण फारच कमी होते. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींचे एकूण विद्यार्थ्यांशी असलेले प्रमाण फारच कमी होते.

**तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण :-**

बीड जिल्ह्यात २००९-१० मध्ये एक शासकीच व २ खाजगी असे ३ तंत्रबिकेतने हाती. शासकीय तंत्रनिकेतनात सिव्हिल इंन्निअरिंग व मेकॅनिकल इंजिनिअरिंग तर खाजगी तंत्रनिकेतनात कंस्ट्रक्टान टेक्नॉलॉजी व कम्यूनिकेशन इंजिनिअरिंग या शाखा आहेत. प्रत्येक शाखेत ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. याशिवाय जिल्ह्यात १० शासकीय व ५ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संख्या होत्या त्यांची एकूण विद्यार्थी क्षमता १६४० इतकी होती. त्याचप्रमाणे १०+२ स्नरावरील व्यवसाय अभ्यास क्रमाच्या ४३ प्रशिक्षण संस्था २००९-१० मध्ये होत्या.

त्याच प्रमाणे जिल्ह्यात बी.एड.बी.पी.एड् कृशिपट्राविका डी.एड् अध्यापक एल. एल. बी. या सारखे शिक्षण देणाऱ्या व्यावसायिक शिक्षण संस्थाही उपलब्ध आहेत. शिवाय प्रत्येकी एक बी. एम. एस. आणि एम. बी. बी. एस. वैद्यकीय शिक्षण संस्थाही आहेत.

**मागासवर्गियासाठी वसातिगृहे व आश्रम शाळ :-**

बीड जिल्ह्यात अदिवासी विद्यार्थ्याकरिता सुर्डी व शेउाळा ता. आवटी येथे प्रत्येकी एक अशा एकूण दोन आश्रमशाळा असून त्यात ४४८ विद्यार्थी होते. त्याच प्रमाणे भटक्या व विमुक्त जातींच्या विद्यार्थ्यांसाठी बीड जिल्ह्यात २२ प्राथमिक व ५ माध्यमिक आश्रमशाळा होत्या. ऊसतोड कामगारांच्या मुलामुलीसाठी निवासी शाळा जिल्ह्यात आहेत. जिल्ह्यात मागासर्गियांच्या कल्याणकारी योजने अंतर्गत ६९ वसातिगृह असून त्यात ३५०३ विद्यार्थी राहतात. शिवाय जिल्ह्यात अंबाजोगाई येथे माजी सौनिकांच्या मुलासाठी एक वसतिगृह आहे.

२००९-१० या वर्षात साक्षर नसलेल्या १५ ते ३५ वयोगटातील व प्रोढांना साक्षर करण्यासाठी जिल्ह्यात निंरतर शिक्षण योजने अंतगृत सुरु केलेल्या निरंतर शिक्षण केंद्राची संख्या ५८२ होती.

**बीड जिल्ह्यातील सार्वाजानिक आरोग्य :-**

मानवी संसाधनाचा विकास हे कोणत्याही शासनाचे अंतिम उदिष्ट साध्य करण्यात आरोग्य क्षेत्राचा सहभाग महत्वपूर्ण आहे. कल्याणकारी राज्यात जनतेचे कल्याण हे प्रमुख उद्दिष्ट असते आणि हे कल्याण वैयक्तीक व सार्वजानिक आरोग्यावर प्रामुख्याने अवलंबुन असते. आरोग्य म्हणजे केवळ रोग आणि विकलांगपणा यांचा अभाव नन्हे तर संपूर्ण शारीरिक मानसिक व सामाजिक स्वास्थ ही जागतिक आरोग्य विषयक संकल्पना लक्षात येणे आवश्यक आहे.

बीड जिल्ह्यात शासकीय संस्था, स्धानिक स्वाराज्य संस्था (जिल्हा परिषद,नगरपालिका ई.) सेवा भावी संस्था व खाजगी संस्थामार्फत वैद्यकीय सुविधा पुरवाल्या जातात.

### तक्ता क्र. २.२३

### सार्वजनिक व शासन वैद्यकीय सुविधांची माहिती

### (आधार वर्षः २००९-१०)

| रुग्णालये | दवाखाने | प्राथमिक आरोग्य | प्रा. उ. केंद्र | आरोग्य प्रा.आ. पथके | डॉक्टर | परिचारिका |
|---|---|---|---|---|---|---|
| १४ | २७ | ५० | २७८ | ८२ | २०६ | ५७३ |

**स्त्रोत :** बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००९-१०

जिल्ह्यात एकुन १४ रुग्णालये व १७ दवाखाने होते. अंबाजोगाई येथे वैद्यकीय महाविद्यालयाचे रुग्णालय आहे. शिवाय बीड येथे शासनाचे जिल्हा सामान्य रुग्णालय व क्षयरोग चिकित्सालय आहे. जिल्हा परिषदेची ५० प्राथमिक आरोग्य केंद्रे व २७८ प्राथमिक उपकेंद्रे आणि ८२ प्राथमिक आरोग्य पथके आहेत. जिल्ह्यात १६४३ खाटांची सोय असून २००१ च्या जनगणनेनुसार दर लाख लोकसंख्येमागे खांटाची संख्या ७६ होते.

बीड जिल्ह्यात कुटूंबकल्याण कार्यक्रम राबविण्यासाठी २००९-१० मध्ये नागरी भागात ०७ आणि ग्रामीण भागात ५३ असे एकूण ६० कुटूंबकल्याण शस्त्रक्रिया करण्यात आल्या या पौकी १६५९७ स्त्रियांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

**ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटन स्थळे :-**

बीड जिल्ह्यात मुकूंदराज स्वामी, बंकटस्वामी या सारखे महान संत होऊन गेले. बीड येथे कंकालेश्वराचे यादवकालीन मंदिर, जराशंकराचे देऊळ, खंडेश्वरी कोल्हापुर निवासीनीचे देवालय आणि खंडोबाचे देऊन व दीपमाता ही जुन्या काळातील शिल्पे व यास्तुकलेचे नमुने आहेत. बीड पासून १९ किलो मिटर अंतरावर कपिलधार हे तिर्थक्षेत्र असून त्या स्थानी, कपिल मुनींनी तपश्चर्या केली. असा पुराणात उल्लेख आहे. शिवाय बीडपासून ३० कि.मी अंतरावर चाकरवाडी हे तिर्थक्षेत्र असून त्या स्थानी

श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांची समाधी आहे[१६]. त्याठिकाणी दर अमावस्येला यात्रा भरते. याशिवाय बीडपासून ५ कि.मी. अंतरावर हजरी बाबा मध्ये सलाबन खानने बांधलेली खजाना विहिर आहे. या विहिरीचे वैशिष्टे असे की सतत ठराविक पातळीवरी ५ ते ६ फुट इतकेच पाणी या विहिरीत असते व ते कधीच संपत नाही.

मराठीचे आद्यकवी मुकूंदराज यांची विवेकसिंधू ची रचना याच जिल्हयात केली आहे. त्याचबरोबर संत पासोडीकर दासोपंत यांची जन्मभुमी व कर्मभुमी म्हणूनही अंबाजोगाईची ओळख आहे. योगेश्वरी देवीचे शक्तीपीठ व प्राचीन मंदीरे, खोलेश्वर मंदीर, काशी विश्वनाथाचे मंदिरे, गणपतीच मंदिर, ऐतिहासिक हत्तीखाना ही स्थळे आहेत[१७].

जिल्ह्यात बारा ज्योर्तिलेगांपैकी एक परळी (वैजनाथ) येथे आहे. ज्या प्रमुख गणपती मंदिरांचा उल्लेख केला जातो त्यापैकी चार गणेश मंदिरे लिबागणेश, नवगण राजुरी, गंगामसला हे या जिल्हातआहेत. शनीचे महत्व असलेले राक्षसमुवन हे ठिकाण जिल्ह्यातील शिरुर (कासार) तालुक्यात असून येथेच मराठे व  निजाम यांच्यामध्ये इतिहासाप्रसिध्द लढाई झाली होती.

जिल्ह्यात पाटोदा तालुक्यातील सौताडा येथे रामेश्वराचे प्रेक्षणीय मंदिर खोल दरीत आहे. शिवाय जुलै ते सप्टेबंर या कालावधीत (पावसाळ्यात) येथे निसर्गरम्य  धबधबा पाहाण्यास मिळतो.

जिल्ह्यात एकमेव किल्ला धारुर येथे आहे. माजलगाव तालुक्यातील मंजरथ हे धार्मिक स्थळे गोदावरी काटी आहे[१८].

**संदर्भ :-**


१) महाराष्ट्र शासन आणि राजकारण, प्रा, भिवसनकर, कैलाश पाब्लिकेशन्स औरंगाबाद पृ.२८

२) महाराष्ट्र प्रशासन व्यवस्था,प्रा.डॉ.टी.एन. गायकवाड, स्वप्नाली प्रकाशन- जुन १९९९ पृ.८

३) उपरोक्त, पृ.९

४) मराठ्यांचा इतिहास डॉ. साहेबराव गाठाळ, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद- १९९८, पृ.२१.

५) महाराष्ट्राचा भूगोल-डॉ. पांडूरंग केचे, कैलाश पब्लिकेशन्स औरगांबाद, पृ.६

६) महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल- २००१, पृ १०

७) उपरोक्त, पृ. १०

८) भारतीय संस्कृतिकोश, खंड सातवा, ऑगस्ट १९७२, पृ. १९६- १९८

९) इंडिया २००२ मिनिस्टी ऑफ इन्फॉरमेशन ॲन्ड ब्राडक्रास्टिंग गोव्हर्नमेंट ऑफ इंडिया, पृ७२५-७२६

१०) भारतीय संस्कृतिकोश, खंड सातवा ऑगस्ट १९७२ पृ.२११.

११) डॉ. कठारे/ नगराळे, मराठवाड्याचा इतिहास- प्रांरभ ते ११९६०, कल्पना प्रकाशन, नांदेड १९९९, पृ.क्र. ९

१२) मराठवाड्याचा इतिहास डॉ. सोमनाथ रोडे, विद्या बुक्स पाब्लेशर्स, औरगांबाद१९९९ पृ.३

१३) २००१ ची भारतीय जनगणना

१४) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, बीड जिल्हा -२००५-०६

१५) वार्षिक योजन (१९९९-२०००) महाराष्ट्रराज्य भाग- १

१६) महाराष्ट्रातील जिल्हे- बीड, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय-१९८८, पृ.७

१७) उपरोक्त पृ.८.९

१८) मराठवाडा इतिहास परिषद, निवडणूक, शोधनिबंध खंड-५ वा डिसें.२००० पृ.१४०-१४५

# प्रकरण ३ रे

## बीड जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वांचे योगदान

# प्रकरण ३ रे

## बीड जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वांचे योगदान

**अ) गोपीनाथ मुंडे – बीड जिल्ह्याच्या विकासात योगदान**

३.१ पूर्वचरित्र व राजकीय कारकिर्द

३.२ सहकार क्षेत्रातील योगदान

३.३ वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना पांगरी ता. परळी वै.

३.४ संत जगमित्र नागा सहकारी सूतगिरणी, टोकवाडी

३.५ वैद्यनाथ अर्बन को-ऑफ बँक

३.६ शैक्षणिक विकासात दिलेले योगदान

३.७ गोपीनाथ मुंडे यांनी केलेली विकास कामे

**ब) जयदत्त क्षीरसागर- बीड जिल्हयाच्या विकासात योगदान**

३.८ पूर्व चरित्र व राजकीय नेतृत्वाचा उदय

३.९ जयदत्त क्षीरसागर यांनी केलेली विकास कामे

३.१० सहकार क्षेत्रातील कार्य

३.११ श्री गजानन सहकारी साखर काराखाना लि. राजूरी नवगण

३.१२ श्री गजानन नागरी सहकारी बँक लि.बीड

३.१३ बीड तालूका दुध व्यावसायिक सहकारी संस्थांचा संघ म.बीड

३.१४ शैक्षणिक विकासात दिलेले योगदान

**क) विमलताई मुंडदा बीड जिल्हयाच्या विकासात योगदान**

३.१५ पुर्व चरित्र व राजकीय नेतृत्वाचा उदय

३.१६ विमलताई मुंदडा यांनी केलेली विकास कामे

३.१७ वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक अंबाजोगाई

३.१८ अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याच्या संचालक

३.१९ शिक्षण क्षेत्रातील कार्य

३.२० सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य (ताई महोत्सव) २००३

संदर्भ

**प्रस्तावना**

गेल्या ५० वर्षाच्या बीड जिल्ह्याच्या राजकीय घडामोडीच्या इतिहासावर नजर टाकली तर दोन नावे ताबडतोब समोर येतात. केशरबाई क्षीरसागर व विद्यमान खासदार गोपीनाथ मुंडे, इतर अनेक राजकारणी आले गेले परंतु जिल्हयावरचा यांचा प्रभाव कमी झाला नाही. स्वातंत्र्योत्तर काळात नाना पाटील धर्माधिकारी, रामलिंग स्वामी काशीनाथ जाधव, व्दारकादासजी मंत्री, श्रीपतराव कद्दम, सुंदरराव सोळंके, सयाजीराव पंडीत, लक्ष्मणतात्या जाधव, राजेंद्र जगताप, बाजीराव जगताप, गोविंदराव डक यांनी आपापल्या मतदारसंघातुन प्रतिनधीत्व केले. काहींजन एकदाच निवडुन आले तर काही जण परत परत निवडुन आले. रामराव आवरगावकर एकदाही निवडुन आले नाहित मात्र मागच्या दारातुन त्यांनी बीडच्या राजकारणावर काही काळ प्रभाव पाडला. सफदअली देशमुख, अँड सिराज देशमुख या पितापुत्रांनी बीड मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले. नगर परिषदेतुन राजकारणात प्रवेश केलेले सय्यद सलीमही बीडचे आमदार झाले. शिवसेना भाजपच्या लाटेत गल्लीतल पोरगं म्हणुन प्रा. सुरेश नवलेआमदारकी यांच्या नावावर आहे. अशीच लॉटरी माजलगावातुन बंडखोर शिवसेना उमेदवार बाजीराव जगताप यांची जयदत्त क्षीरसागर त्यावेळी बीडमधुन लढले व चौसाळ्यात तुपेंना गुलाल लागला

बीड जिल्हयात ज्यावेळी सुंदरराव साळुंके यांच्या राजकारणाचा प्रभाव होता.(१९७०) त्यावेळी शिवाजीराव पंडित यांचा जिल्हा परिषदेतुन उदय झाला. त्यावेळी त्यांनी सुंदरराव सोळुंकेना गेवराई मतदारसंघातुन बिनविरोध निवडुन आणले. सुंदरराव साळुंके महराष्ट्राच्या राजकारणातील पहिले उपमुख्यमंत्री होते. १९७२ च्या दुष्काळात गोरगरीबांसाठी परिश्रम करुन बाबुराव आडसकर नावाच 'हाबाडा'.नेतृत्व तयार झालं. बापुसाहेब काळदातेसारख्या माणसाला पाडणारे कोण हे आडसकर म्हणून त्यांना पाहायला विधानभवनात गर्दी व्हायची. तसेच जिल्हयाचा सर्वेसर्वा म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात प्रभावी असलेल्या केशरबाई क्षीरसागर यांच्या मुलास विद्यमान मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना बीडमध्ये पराभुत करणारे म्हणुन प्रा. सुरेश नवले हे ही एक आकर्षण होते. जयदत्त आण्णांना चौसाळ्यातुन केशव आंधळे यांनी पाडले तर क्षीरसागरांचेच उमेदवार सय्यद सलीम यांना बीडमधुन प्रा.सुनिल धांडे यांनी हरवले. बीड जिल्हयाच्या राजकारणात प्रारंभीपासूनचे क्षीरसागरांच्या

विजयाला व पराभवाला वेगवेगळे महत्व असते. मात्र पराभुत होऊनही जिल्हयाच्या राजकारणावर त्यांची पकड असते.

केशरबाई क्षीरसागर यांनी सरपंच, जि.प. सदस्य, पं.स.सभापती, चौसाळा बीडच्या आमदार व चार-पाच वेळा खासदार असा त्यांना प्रवास केला. श्रीपतराव कदम, सुंदरराव सोळुंके, शिवाजीराव पंडित, बाबुराव आडसकर यांच्या प्रचंड फौजेपुढे काकांची फौज किरकोळ असायची. परंतु कधी भावना, कधी सामर्थ, कधी, विनयता, कधी धडक, कधी आधार अशा गनिमी काव्याने त्यांनी प्रस्थापित राजकारणांना खिळखिळ केले. एखादा किल्ला सर होण शक्य नसेल तर बुरुज ढासळुन किल्लयात शिरायच हे त्याच तंत्र या पध्दतीने त्यांनी बदामराव पंडित यांना बळ देवुन गेवराईमधुन शिवाजीरावांच्या राजकारणाला ब्रेक लावला. राजकारणाचा वारसा पंडित, क्षीरसागर, साळुंके यांनी प्रभावीपणे सुरु ठेवला. जयदत्त क्षीरसागर, प्रकाश सोळुंके , अमरसिंह पंडित यांचे राजकारण सर्वश्रेष्ठ आहे. केज-परळी-अंबाजोगाई येथिल गोपीनाथराव मुंडे यांच्या राजकीय प्रभावामुळे आडसकरांना जास्त मोकळीक मिळु शकली नाही. प्रारंभी गोपीनाथरावांची मदत घेऊनच रमेश आडसकरांनी परत आपल्या घरचे राजकारण सुरु केले.

अख्या बीड जिल्हयांवर नियंत्रण ठेवण्याच्या तंत्रामागे काकुंचे जाती तंत्र फार परिणामकारक ठरले. असंतुष्ठ मराठे , व बहुसंख्य वंजारा यांच्या ताकदीवर काकू सर्वेसर्वा झाल्या हीच बाब गोपीनाथराव मुंडे यांनी ओळखली व त्यांनी समाजाचे मेळावे घेऊन सारा समाज आपल्या पाठीशी करुन घेतला. हा मतदार मराठा मतदाराच्या संख्येत असल्याने जिल्हयाच्या सर्वच मतदार संघात मुंडेनी स्वतःची ताकद निर्माण केली व जादुची कांडी म्हणून वापरली जिल्हयातील राजकारणात जेजे घर बसले होते तेते वापरुन परत उभे केले. गेल्या विधानसभा निवडणुकीत तर केजचा अपवाद वगळता सारा बीड जिल्हा त्यांनी भगवा करुन टाकला. केशरबाई क्षीरसागर व जयदत्त क्षीरसागर यांना प्रसंगी विरोध व प्रसंगी दोस्ती करुन जिल्हयाच्या राजकारणावर कब्जा केला. त्यांच्या मदतीला पुतने धनंजय मुंडे आले.

गेल्या ५० वर्षाच्या राजकारणात बीड जिल्हयात काही वैयक्तिक प्रभाव निर्माण झाले जे सत्तेत कुठे आले नाहीत.काँ . विठ्ठल कदम, महादेव आप्पा ढेपे, ज्ञानोबाराव कदम २५ वर्षे जि.प.सदस्य प्रा. सुशिला मोराळे, भाई गंगाभिषण थावरे, काँ. नामदेव चव्हाण आणि भारिप बहुजन महासंघाचे प्रांताध्यक्ष

हनुमंतराव उपरे, काँ.अतहर बाबर यांनी जिल्हयाच्या व क्षीरसागरांच्या राजकारणात टक्कर दिली. मात्र थेट निवडणुक पध्दतीच्या वेळी ते बीडचे नगराध्यपदी झाले. पुर्वाश्रमीच्या कॉम्रेड उषा दराडे (उषा ठोंबरे) यांनीही १९७७ ची लोकसभा निवडणुक काँ.गंगाधर अप्पा बुरांडे यांच्या प्राचारार्थ गाजवली. आप्पांना निवडुणही आणले. मात्र नंतर त्यांनी काँग्रेसचा राजमार्ग जवळ केला व सब्र का फल म्हणुन त्यांना विधान परिषदेची आमदाराकी मिळाली. तसेच शिवसेना सोडुन गेलेल्या प्रा. सुरेश नवले यांनाही नारायण राणेंच्या आर्शिवादाखातर आमदारकी मिळाली पाटोद्याचे रामकृष्ण बांगरहि गेलया २५-३० वर्षांत स्वतःच स्वतंत्र आस्तित्व ठेवुन आहेत. सुभाष सारंग यांच्या माध्यमातुन कधी नव्हे ते दोन वेळा बीड बँकेचे अध्यक्षपद मिळाले. १९८५ च्या दरम्यान चौसाळा मतदार संघातुन निवडुण आलेले काँग्रेसचे अशोक पाटील, शंकरराव चव्हाण यांच्या मंत्रीमंडळात राज्यमंत्री झाले. मात्र पुढे त्यांनी आपली मतदारसंघावरील जिल्हयाच्या राजकारणावर प्रभावी पकड ठेवली नाही. परंतु पत्नी रजनीताईना भाजपामध्ये पाठवून त्यांनी तिला खासदार करुन घेतले. हे पती-पत्नी काकु-नाना प्रमाणे जिल्हयावर पकड घेतेल असे वाटले मात्र आमदारकी खासदारकीनंतर त्यांचा जनसंपर्क फार मर्यादित राहिला. काँग्रेसचा उल्लेख मियाँ बिबीकी काँग्रेस असा होऊ लागला. त्यामुळे बीड जिल्हयात पावरफुल असणारी काँग्रेस आज फक्त प्रेस नोट वर तगुन आहे.

बीड जिल्हयाच्या गेल्या ५० वर्षांच्या राजकारणात एक गोष्ट प्रामुख्याने नमुद करावी लागेल की मर्द म्हणणाऱ्यांचे राजकारण केशरकाकुंनी आपल्या चाणक्यनितीने ठप्प केले काकुंना संपवता आले नाही. शिवाजीराव पंडितांचे राजकारण व पंडितांनीहि काकूकडे कधी तडजोडीचा प्रयत्न केला नाही, श्रीपतराव कदमानंतर बीडच्या राजकारणानंतर फक्त शिवाजीराव पंडितच काकूंना तह देवु शकले. बाकिच्यांनी फक्त आम्ही काकूंशी कधीही तडतोड करणार नाही असा जाहिर सभात शपथ घेतल्या ते सर्व आज क्षीरसागरांचे अश्रित म्हणून आहेत.

गेवराईत शिवाजीराव पंडित, रेणापूर मध्ये गोपीनाथराव मुंडे, केजमध्ये विमलताई मुंदडा हे सलग २०-२५ वर्षे आमदार राहीले धस व माजलगावमधुन प्रकाश साळुंकेनी हॅट्रीक करत विजय मिळवला. केशरबाई क्षीरसागर, शिवाजीराव पंडित, सुंदरराव सांळुके यांनी आपली घराणे शाही मुलाच्या रुपात सुरु ठेवली तर गोपीनाथराव यांनी पंकजा पालवे या आपल्या कन्येस पुढे आणून आमदार केले.

विमलताई मुंदडानीही अक्षय मुंदडा यांच्या साठी व्यासपीठ करुन ठेवलय क्षीरसागरांच्या घरात डॉ.भारतभुषण नगराध्यक्षपद सोडुन पुढे सरकु शकले नाहीत. बीड जिल्हयाच्याच नव्हे तर मराठवाड्याच्या इतिहासात इतके वर्ष अध्यक्षपद कुणी भोगले नाही.

रवी क्षीरसागर कारखान्याचे चेअरमन किंवा मुंडेकडे पंडितअण्णा जिल्हा परिषदेच्या पुढे सरकु शकले नाहित. मात्र यांच्याकडे भविष्यात  पर्याय आहेत. गेवराई माजलगाव यापेक्षा वेगळे नाही. एक मात्र खर की बीड जिल्हयाच्या राजकारणात गेवराई-परळी येथे राजकारणात चेहरे बदलतील घरे मात्र तीच राहतील किमान पुढची दहा पंधरा वर्ष तरी बीड जिल्हयात सर्वात मोठे वैशिष्टये म्हणजे एका पक्षाला तो भरभरुन ताकद देतो. आज राष्ट्रवादीला दिलिय. गेली दहा वर्ष ती युतीला होती. त्या आधी शिवाजीराव पंडितांनी समांतर जिल्हा कॉंगेसचे अध्यक्ष असताना सहाही जागा समांतर  कॉंगेसच्या आल्या होत्या. एक बाब बीडच्या राजकारणात महत्त्वाची आहे की संपुर्ण बीड जिल्हयाच्या राजकारणात सर्वदुर संपर्क मुंडेचा आहे. क्षीरसागर, साळुंके यांचा संपर्क लाल दिव्यामुळे वाढल्याचे चित्र सध्या तरी दिसते.

## ३.१ पूर्वचरित्र व राजकीय कारकिर्द :-

गोपीनाथ मुंडे यांचा जन्म बीड जिल्हयातील नाथ्रा या गावी ता.परळी वै. जि.बीड येथे एका सामान्य शेतकरी कुटुंबात १२ डिसेंबर इ.स.१९४९ रोजी झाला. वडील हे पांडुरंगराव व आई लिंबाबाई मुंडे हे वर्षानुवर्षापासून पंढरपूरची वारी करीत असत. पंढरपूरच्या विठ्ठलदर्शन झाले तर जीवनाचे कल्याण होते असे म्हणून अखंड वारी करणारे वडिल पांडूरंगराव आणि आई लिंबाबाई यांच्याही नेहमी तोंडी पंढरपूरचे वर्णन असल्याने गोपीनाथ मुंडे यांनी वयाच्या १४ व्या वर्षी पंढरपूरची वारी पायी चालत जाऊन केली. त्यानंतर सात वर्षे वारी पथांचा पाईक म्हणून अनेकदा वारीचा आनंद घेतला. मराठवाड्यात त्या वेळी श्रीक्षेत्र भगवानगडचे महंत श्री संत भगवानबाबा गडकर महाराज यांच्या अध्यात्म्याचा बोलबाला होता. आई-वडील भगवानबाबांचे कीर्तन ऐकण्यास गोपीनाथलाही घेऊन जात हे सर्व ऐकून मुंडेच्या मनावर आध्यात्मिक परिणाम झाला.

त्यांच्या घरात बेताची परिस्थिती होती. इ.स.१९६९ मध्ये पांडूरंगरावांचे अकाली निधन झाले. पण त्यांच्या आई व गोपीनाथ मुंडे यांचे थोरले बंधू पंडितअण्णा मुंडेने त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलली भाऊ पंडितअण्णा यांनी स्वतःचे शिक्षण सोडून गोपीनाथ मुंडे यांचे शिक्षण पूर्ण केले. गोपीनाथ मुंडे यांचे धाकटे भाऊ व्यंकट मुंडे हे आहेत. २१ मे इ.स. १९७८ ला त्यांचे लग्न प्रज्ञा महाजनाशी झाले. त्या प्रमोद महाजन यांच्या बहिण होय. गोपीनाथ मुंडे यांना पंकजा पालवे-मुंडे , प्रीतम मते- मुंडे आणि यशस्वी मुंडे या तीन मुली आहेत.

**पूर्व चरित्र :-**

गोपीनाथ मुंडे यांचे आरंभीचे शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत तर बी.कॉम पर्यंतचे महाविद्यालयीन शिक्षण अंबाजोगाई येथे झाले. गोपीनाथ मुंडे हे इ.स. १९६९ मध्ये अंबाजोगाई येथिल योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात वाणिज्य शाखेतून पदवी घेतली व बी.कॉम पूर्ण केले. मुंडेचे पदवीचे शिक्षण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते पुण्याला गेले. योगेश्वरी शिक्षण संस्थेने दिलेले उत्तुंग बळ पंखात साठवून मुंडे गगनाला गवसणी घालण्यासाठी बाहेर पडले. महाविद्यालयीन जीवनात त्यांना योग्य व्यक्तिंची संगत लाभली आणि एका चळवळीला सुरुवात झाली खरे तर महाविद्यालयीन जीवनात योग्य मित्रांच्या संगतीने त्यांना ज्या संधी मिळत गेल्या त्या संधीचा उपयोग करुन घेत गोपीनाथ मुंडेंनी भरारी घेतली.

गोपीनाथ मुंडे यांनी चार दशकांपूर्वी कॉलेजमध्ये विद्यार्थी संसदेच्या निवडणूका लढवून राजकारणाचा श्रीगणेशा केला. कॉलेजात असताना त्यांची प्रमोद महाजन यांच्याशी मैत्री झाली आणि गोपीनाथरावांच्या अवघ्या आयुष्यालाच एक विलक्षण कलाटणी मिळाली. कसलीही राजकीय पार्श्वभुमी नसताना गोपीनाथ मुंडेनी कॉलेजच्या पहिल्या वर्षी वर्गप्रतिनीधी म्हणजे 'सीआर' ची निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. प्रमोद महाजन यांच्या नेतृत्वाखाली हा त्यांचा राजकारणाचा पहिला अनुभव होता. गोपीनाथ मुंडे निवडणूकीत पडले पण त्यांचा गट निवडुन आला होता. बीड गाजवणाऱ्या कॉलेज

निवडणूकांवर प्रदीर्घकाळ वर्चस्व गावजवणाऱ्या एका ग्रुपला पाणी पाजण्यात मुंडे-महाजन गटाच्या मसलती यशस्वी ठरल्या होत्या. युतीच्या राजकारणाची ओळख झाली आणि युतीच्या राजकारणाचे बीज पेरले गेले. गोपीनाथ मुंडे कॉलेजमध्ये पहिलीवहिली निवडणूक हरले पण त्यामुळे त्यांच्या पुढच्या चळवळीच्या आदी आंदोलनांच्या राजकरणाला जशी कुठेच बाधा आली नाही. तशीच पुढच्या दहा वर्षातच लढवलेल्या पहिल्या विधानसभेच्या निवडणूकीत पराभव पद आल्यानंतरही त्यांच्या राजकारणाचा वारु कोणी रोखू शकले नाही. अखिल भारतीय विद्यार्थी चळवळीत गोपीनाथ मुंडे सक्रिय होते. देशात आणीबाणीच्या काळात मराठवाडयात मुंडे- महाजन सातत्याने कार्यरत होते असे दिसून येते.

**राजकीय कारकिर्दीतून नेतृत्वाचा उदय :-**

प्रमोद महाजन व गोपीनाथ मुंडे या भाजपच्या या बिनीच्या शिलेदारांची तब्बल २५ वर्षापूर्वी बीड या महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून निवडणूक प्रचाराला प्रारंभ केला होता. या दोघांनी झंझावती प्रचाराने उभा महाराष्ट्र ढवळून काढला होता. भाजपाचा प्रचार करताना यांनी पक्षाची पाळेमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात घट्ट रुजवली होती. मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र अक्षरक्षः पिंजून काढला होता. भाजपला राष्ट्रीय पातळीवर नेण्याचे मोठे काम यांनी केले होते. भाजपा पक्षाला सर्वसमावेश्यक आणि देशव्यापी स्वरुप देण्यासाठी वसंतराव भागवत यांनी बळ दिले. मराठवाड्या मधून एक सक्षम नेतृत्व म्हणून या दोघांकडे पाहाण्यात येवू लागले.

गोपीनाथ मुंडे यांचे लक्ष नेहमीच मराठवाडा आणि विषेषतः मतदारसंघावर असायचे वयाच्या ऐन पंचविशीत इ.स.१९७० मध्ये परळीत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे काम करण्यास चालू केले. त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात इ.स. १९७८ साली बीड जिल्हयातून निवडणूक लढवून झाली. त्यांनतर त्यांनी कधी मागे वळुन पाहिले नाही.

गोपीनाथ मुंडेनी सुरुवातीला जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत पहिल्याच प्रयत्नात इ.स. १९७८ च्या बीड जिल्हापरिषदेची निवडणूकीत ते रेणापूर (उजणी) मतदारसंघातून राज्यभरात सर्वाधिक मताधिक्य

घेऊन निवडुन आले. जिल्हापरिषदेच्या स्थानिक स्तरावरील राजकारणाशी त्यांचा फारच थोडा काळ संबंध आला. पण तिथे गिरवलेले धडेच त्यांना पुढे विधानसभा गाजवताना कामास आले. देशात आलेल्या आणीबाणीच्या विरोधातही मराठवाड्यात मुंडे सातत्याने कार्यरत होते. त्यामुळेच आणीबाणीच्या पार्श्वभुमीवर झालेल्या पहिल्या विधानसभेची उमेदवारी त्यांना इ.स.१९७८ मध्ये मिळाली होती. तिथे नशिबांनी साथ त्यांना मिळाली नाही. त्यावेळी काँग्रेस (इंदिरा) पक्षाचे १२ आमदार फोडून शरद पवारांनी विरोधीपक्षा बरोबर हातमिळवणी केली आणि वसंतदादा सरकार पाडले. १८ जुलै इ.स.१९७८ रोजी शरद पवारांचा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाला. शरद पवारांबरोबर काँग्रेस(इंदिरा) पक्षातून बाहेर पडलेले १२ आमदार काँगेस(स) पक्ष आणि जनता पक्ष यांची आघाडी पुरोगामी लोकशाही दल या नावाने बनली आणि त्याचे नेते पवार झाले. शरद पवार यांच्याशी भाजपने युतीकेली आणि 'पुलोद' च सरकार आले. इ.स.१९८० साली इंदिरा गांधीचे सत्तेत पुनरागमन झाल्यानंतर त्यांनी विरोधी पक्षांची राज्य सरकारे बरखास्त केली आणि पुन्हा निवडणूका लागल्या. दोन वर्षात आयती चालून आलेली संधी मग गोपीनाथ मुंडे यांनी हातची निसटु दिली नाही. इ.स.१९८० सालातील महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूकीत मुंडे आमदार म्हणून निवडून आले.

बीड जिल्हयातल्या परळी तालुक्यातल्या नाथ्रा गावातला एक युवक थेट राज्याच्या सर्वोच्च सभागृहात जाऊन पोहचला होता. केवळ आपल्या गावाचाच आवाज त्याला या सभागृहात पोहचवायचा नव्हता तर संपूर्ण मराठवाड्या सारख्या मागास भागातील दिनदुबळयांची दुःखे आणि व्यथा-वेदना त्याला तेथे पोहचावयाच्या होत्या गोपीनाथ मुंडे यांनी हे काम मोठ्या तडफेने पार पाडले. आणि आमदाकीची धुरा सांभाळत असतानाच महाराष्ट्र भाजपचे सरचिटणीस म्हणून संघटनेचीही सुत्रे सांभाळली.बीड मतदारसंघात मोटरसायकलवरुन गोपीनाथराव मुंडेनी भाजपसाठी प्रचार केला खांद्यावर शवनम आणि मोटरसायकल अशी गोपीनाथ मुंडेची ओळख बनली होती ज्या वेळी भाजपचे १४ उमेदवार निवडुन आले.

पण पुढे दोन–अउीच वर्षातच जनता पार्टी पुटली आणि भारतीय जनता पक्ष (भाजपा) नावाचा नवा पक्ष जन्माला आला. या नव्या पक्षा कडे आपल्या युवक संघटनेची म्हणजेच भारतीय जनता युवा मोर्च्याच्या कारभाराची सुत्रे सोपवण्यासाठी गोपीनाथ मुंडे हा आदर्श पर्याय उभाच होता वयाच्या ३५ व्या वर्षी इ.स १९८० मध्ये भारतीय जनता युवा मोर्च्याच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांचे काम विस्तारत होते. पुढे इ.स पुढे इ.स १९८२ मध्ये ते महाराष्ट्र भाजपचे सरचिटणीस झाले. इ.स.१९८५मध्ये झालेल्या बीड लोकसभा मतदार संघातुन निवडणूकित पराभव झाला मुंडे पुन्हा एकदा जनरल सेक्रेंटरी झाले १९८५ च्या विधानसभा निवडणूकीमध्ये मुंडे यांना पंडितराव दोंड यांनी अतितटीच्या सामान्यात पराभूत केले. ही हार वगळता मुंडे यांच्यावर निवडणूकीच्या आखाड्यात धूळ खाण्याचा प्रसंग कधीच आला नाही.

गोपीनाथरव मुंडे हे लोकांमध्ये मिसळून काम करत असत म्हणुन वतृत्व नेतृत्व आधिकच विकसित होत गेले. सत्ता नसताना अंनेक प्रश्न त्यांनी तडीस नेले तयांनी आपला मतदार वर्ग पक्षाच्या भिंती तोडून तयार केला सर्व समाजातील मतदांरानी त्यांना स्वीकारले म्हणून पक्षामध्ये ज्येष्ठ व अनूभवी नेत्यांची संख्या मोठी असूनही दोन पिठ्यांना मागे सारत तरुण गोपीनाथराव मुंडे यांची इ.स.१९८६ मध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर महाराष्ट्रात कर्जमुक्ती मोर्चा काढून शासनास कर्जमुक्ती करण्यास भाग पाडले. हा भाजपाचा इतिहासातील सर्वात मोठा मोर्चा मानला जातो. समाजातील अनेक आंदोलने गोपीनाथजींनी हातात घेतली आणि त्यातुनच पक्षाचा विस्तार सातत्याने होत गेला.

गोपीनाथराव मुंडे यांचे राजकीय गुरु वसंतराव भागवत ह्यांनी त्यांना एक पत्र लिहिले होते ते मुंडेच्या आजही स्मरणात आहे त्या पत्रात अनेक मौलिक सूचना केल्या होत्या दौऱ्यावर कधीही हॉटेलात उतरायचे नाही तर कार्यकर्त्यांच्या घरीच मुक्काम करायचा याच  काळात महाराष्ट्र भाजपचा चेहरा मोहराच नव्हे तर स्वभावही बदलून टाकण्याचे काम मुंडे यांनी केले. अण्णा डांगे, गोपीनाथ मुंडे, ना.स.

फरांदे हे एकत्र आले या सर्वांनी समाजाच्या तळागाळातील वर्गापर्यंत भाजपला पोहोचवण्याचे मोठे काम केले.

इ.स. १९९० च्या विधानसभा निवडणूकीत भाजपचे थोडेथोडके नव्हे तर ४२ आमदार निवडून आले याचे श्रेय अर्थातच गोपीनाथरावांच्या दुरदुष्टीच होते. इ.स. १९९२ ते इ.स.१९९५ या कालावधीत मुंडेनी विधानसभेतील प्रमुख विरोधी पक्ष नेते पद सांभाळले मुंडेनी विधानसभेतील प्रमुख विरोधी पक्ष नेते पद सांभाळले. अनेक प्रश्न अभ्यासपूर्ण पध्दतीने मांडून विरोधी पक्षने त्यांची स्वतंत्र प्रतिभा निर्माण केली. त्यावेळी आरक्षण, मंडल आयोग शेतकऱ्यांचे प्रश्न आदी प्रश्न गंभीर्याने पाहिले. मुंडे यांच्या राजकीय प्रवासाचा विचार केला तर इ.स १९९० ते इ.स १९९५ हा त्यांच्या जीवनातील सर्वोत्तम काळ होता. जवळपास त्यांनी एकट्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे

अध्यक्ष शरद पवार यांच्या विरोधात जोरदार आघाडी उघडली होती आणि पवारांना जेरीस आनले. राजकारणाच्या गुन्हे गारीकरणाचा मुद्या घेऊन संपूर्ण राज्यभर दौरा करीत शरद पवार यांच्या विरोधात रान उठविले होते.

गोपीनाथ मुंडे यांची शिवनेरी ते शिवतीर्थ अशी काढलेली संघर्ष यात्रा प्रचंड गाजली. महाराष्ट्रात पहिल्यांदा काँग्रेस सोडून राजकीय शक्ती सत्तेत येण्याचा चमतकार नव्या समीकरणात इ.स. १९९५ साली घडला. इ.स. १९९५ च्या विधानसभा निवडणूकीत प्रस्थापित काँग्रेसच्या हातातुन शिवसेना आणि भाजप युतीने राज्याची सत्ता खेचुन घेतली. फेब्रुवारी– मार्च इ.स. १९९५ साली जे राजकीय परिवर्तन झाले त्या मध्ये गोपीनाथराव मुंडे यांनी राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाच्या विरोधात राज्यभर काढलेली संघर्ष यात्रेचा सिंहाचा वाटा होता.

विधानसभेच्या इ.स. १९९५ मध्ये झालेल्या निवडणूकांत मुंडेनी भाजपला अभूतपूर्व यश मिळवून दिले. गोपीनाथ मुंड यांनी शरद पवार यांच्या विरोधात जोरदार उघडलेली आघाडी यांचे प्रतिबंध मतपेटीत उमटले. काँग्रेस पक्षाचा राज्यात प्रथमच पराभव झाला. भाजप. शिवसेना युतीस २८८ पैकी १३८ जागा

मिळाल्या तर काँग्रेस पक्षास ८० जागांवर समाधान मानावे लागले. या निवडणूकी नंतर सत्तेवर आलेल्या भापज– सेनेच्या मत्रिमंडळात स्थान देण्यात आले व राज्याचे नवे उपमुख्यमंत्री म्हणून गोपीनाथ मुंडे यांचा १४ मार्च इ.स. १९९५ रोजी शपथाविधी झाला. इ.स.१९९५ ते इ.स. १९९९ या कालखंडादरम्यान ते महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री होते. महाराष्ट्राचे उपमुख्यामंत्री पदाच्या कारकिर्दीत त्यांना कुशल प्रशासक म्हणुन नावलौकीक होता. त्यांनी महाराष्ट्रात ऊर्जा व गृह या साख्या महत्वाच्या खात्यांचीही जबाबदारी सांभाळली.  त्या काळात त्यांनी गुन्हेगारीकरनावर अंकुश लावला. वीजनिर्मिती वाढविण्यावर भर दिला. सर्व खात्यांना मार्गदर्शन करुन, रचनात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता दाखवली.

गोपीनाथराव मुंडे यांनी ऑक्टोबर २००९ ची बीड लोकसभा मतदारसंघातून लढवली. व या निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमदेवार रमेश कोकाटे(आडसकर) यांना १ लाख ४० हजार ९५२ मतांनी पराभव केला होता. भाजपचे खासदार गोपीनाथ मुंडे यांची महाराष्ट्राचे भाजप प्रभारी म्हणून नेमणुक ११ जुलै इ.स.२००९ रोजी केली आहे. महाराष्ट्रात इ.स. २०१४ साली होत असलेल्या विधानसभा निवडणूकांची धुरा लोकसभेतील उपनेते गोपीनाथ मुंडे यांच्यावरच सोपविण्याचा निर्णय भाजप बैठकीत घेण्यात आल्याचे समजते. त्यानुसार गोपीनाथ मुंडे महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांची जबाबदारी घेतली.

### ३.३ सहकार क्षेत्रातील योगदान :–

महाराष्ट्रात लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. त्यावरच राज्यांची आर्थिक भरभराट अवलंबून असते. त्यासाठी आर्थिक क्षेत्रात विविध संस्था व संघटना कार्यरत असतात. व्यापारी, भागिदारी खाजगी व सार्वजनिक कंपन्या सर्व संस्थांच्या माध्यमातून सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरणी, कुक्कुट पालन, नागरी बँका, सहकारी कागद कारखाना, दुग्ध संस्था इत्यादीच्या माध्यमातून लोकांचा विकास होत असतो. म्हणून अनेक व्यक्तिनी महाराष्ट्राच्या माध्यमातून विकास साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये यशवंतराव चव्हाण पद्मश्री विठ्ठलराव विखे पाठील, वसंतदादा पाटील,

शरद पवार, गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख, बाळासाहेब विखे पाटील, विजयसिंह मोहिते पाटील ,शिवाजीराव पंडीत इत्यादींनी सहकार क्षेत्रातुन विकास करण्याचा प्रयत्न केलेला दिसुन येतो.

भारतात २५ मार्च१९०४ रोजी पहिला सहकारी कायदा पास करण्यात आला. सावकारांच्या जोखडातून शेतकरी वर्गाला मुक्त करण्यासाठी भारतात सहकारी चळवळीचा उदय झाला. त्यामुळे अनेक सहकारी संस्था निर्माण झाल्या कारखाने सुतगिरण्या, ग्राहक भांडार, सहकारी नागरी बँका, पतपेढ्या इत्यादींचा उदय  यामुळे निर्माण झाला भारतात हरितक्रांती घडवून आणण्यास महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा मोलाचा वाटा आहे.

महाराष्ट्रात सहकारी तत्वाचा साखर कारखान्याची निर्मिती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यात पहिला सहकारी साखर कारखाना इ.स.१९५७ मध्ये पद्मश्री डॉ.विखे पाटील यांनी प्रवरानगर येथे सुरु झाला. त्यानंतर पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ या ठिकाणी अनेक कारखान्याची निर्मिती करण्यात आली. काही महत्वाचे पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हयातील कारखान्यात पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखाना होय. तसेच डॉ. बापूराव बापूजी तनपुरे सहकारी साखर कारखाना लि. शिवाजीनगर, गणेश सहकारी साखर कारखाना लि. गणेश नगर ता राहता, पारनेर सहकारी साखर कारखाना पुणे जिल्हयात छत्रपती सहकारी साखर कारखाना लि. मधुकरनगर ता.दौंड, भिमाशंकर सहकारी साखर कारखाना लि. दत्तात्रय नगर, विघ्नहर सहकारी साखर कारखाना जि. जुन्नर सांगली जिल्हयात राजाराम बापू पाटील सह.साखर कारखाना राजाराम नगर, इस्लामपूर, मांजरा सहकारी साखर कारखाना लातूर, अंबा सहकारी साखर कारखाना अंबाजोगाई, वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, पांगरी, गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना पाथरी जि. परभणी इत्यादी सहकारी तत्वार चालणारे अनेक कारखाने महाराष्ट्रात चालु झालेले दिसुन येतात.

**बीड जिल्हायातील सहकारी साखर कारखाने :-**

बीड जिल्हा मागासलेला व ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो सतत दुष्काळाची छाया या जिल्ह्यावर पडलेली दिसते. कारण या जिल्ह्यातील जामिन ही हलक्या व मध्यम प्रतीची आहे. शिवाय थोड्या पावसामुळे येथील शेती व्यवसाय संकटात सापडलेला आहे. तसेच लोकांच्या उपजिविकेचा प्रश्न देखील उद्‌भवलेला आहे. या कारणासाठी येथील लोक ऊसतोडणी साठी इतरत्र जातात. व आपली उपजिवीका भागवताता हा भाग मागासलेला असलातरी आधूनिकीकरणामुळे या भागाचा विकास होत असल्याचा दिसून येतो.

बीड जिल्ह्यातील पाहिला सहकारी साखर कारखाना अंबा सहकारी साखर कारखाना लि. अंबाजोगाई हा इ.स. १९६९ सहकारी तत्वावर चालणारा कारखाना आहे. तर पाटोदा वडवणी धारुर चा तालुक्यात एकही साखर कारखाना आस्तित्वात नाही.

**३.३ वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना-पांगरी(ता.परळी वै.जि.बीड):-**

बीड जिल्हा हा मराठवाड्यातील मागासलेला व डोंगराळ जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती व दुय्यम व्यवसाय म्हणुन पशुपालन शेतीला पुरक करतात. जिल्हयातील लोक कामासाठी बाहेर जिल्हयात जातात. ऊसतोडणी करणारे मजुर या जिल्हयात बहुसंख्य प्रमाणात आढळुन येतात. त्यामुळे बीड, गेवराई, अंबाजोगाई, परळी वै. या ठिकाणी कारखाने निर्माण झाले अगदी कमी कालावधीत गोपीनाथ मुंडेयांनी वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याची निर्मिती करुन या जिल्हयाच्या विकासात भर घातली आहे. असे दिसुन येते. बीड जिल्हयाला आर्थिक व सामाजिक विकासात वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे मोठे योगदान आहे. पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी असताना ३१ जुलै १९९६ रोजी श्री. गोपीनाथ मुंडे यांनी वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याची मंजुरी घेतली होती[१].

कारखाना उभारणीसाठी अर्बन शिखर बँक, दि अपेक्स को ऑफ बँक इत्यादी सात अर्बन व राष्ट्रीयकृत बँकानी या कारखान्यास २४०००० लाखाचे दिर्घ मुदतीचे कर्ज दिले.

**वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याची ठळक वैशिष्टये :-**

वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याची ठळक वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) वैद्यनाथ कारखान्याने जास्तीचा ऊस गाळप करुन अनेक पारितोषिके मिळवून शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवुन आणली.

२) आधुनिक यंत्रसामुग्री, नवीन तंत्रज्ञानाचा वापर, दैनंदिन कामकाजाचे वैशिष्टये पुर्ण संगणिकृत आहे.

३) शेतकऱ्यांना ऊस लागवडीसाठी ऊस विकासाच्या विविध योजना राबवून त्या माध्यामातून कंपोस्ट खत, बेणे, रासायनिक खते इ. उधारीवर सहाय्य सिंचनाच्या सोयीसाठी विहिर खोदाई, बोअर घेणे, ठिबक व तुषार सिंचन संच खरेदीसाठी कारखान्या तर्फे विशेष अनुदान योजना.

४) कारखान्याचे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासना प्रमाणे वेतन लागू केले.

५) कारखान्याची संलग्न संस्था वैद्यनाथ सहकारी भांडार मार्फेत ऊस उत्पादकांना शेती अवजारे, रासायनिक खते व औषध व ग्राहक उपयोगी वस्तुचे उधारीवर वापर.

६) परिसर विकास निधीतुन इंजिनिअरिंग कॉलेजची स्थापना व कॉलेल्ची भव्य इमारत उभारणी

७) बहूउद्देशीय अर्कशाळा प्रकल्यातुन ऊसाचे रसापासून इथेलॉन निर्मितीसह विविध अल्कोहलचे उत्पादन रसापासून इथेलॉन निर्मितीचा यशरची प्रयोग करुन शेतकऱ्यांना गोड ज्वारी लागवडीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी बियाणे व खते यासाठी कारखान्यातर्फे अनूदान योजना.

८) अवसायानातील गोदावरी दुधना साखर कारखाना भाडे तत्वावर घेऊन सलग दोन हंगाम यशस्वीरीत्या चालवून सहकारी साखर कारखाना सहावर्षासाठी चालविण्यास घेऊन सहकार क्षेत्रात एक नवीन उपक्रम राबविला.

९) वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याची एकूण सभासद सांख्या ही. इ.स.२०००-२२१ मध्ये ५०५६

होती तर२००५-०६ मध्ये ती संख्या ८३८७ एवढी झाली यावरुन असे निर्देशनास येते की उत्तरोत्तर काळात सभासदांची संख्या वाढत आहे[२].

१०) कार्यक्षेत्रातील समाविष्ठ परळी तालुक्यातील गावांची संख्या ही १०३ होती तर अंबाजोगाई तालुकयातील ऊस पूरविणऱ्या गावांची संख्या ९३ होती. अशा पध्दतीने वैद्यानाथ सहकारी साखर कारखान्याला एकूण १९६ गावांचा ऊस गळतीसाठी पुरविला जातो.

११) दैनंदिन ऊस गाळप क्षमता इ.स. २००-०१ पासून ते २००५-०६ पर्यंत २५०० मे. टन एवढी होती.

१२)वैद्यनाथ सहकारी कारखाना २०० एकर जमिन खरेदी करुन साखर निर्मिती कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी निवासख्यानांची सोय केलेली आहे.

**१) ऊस संशोधन व प्रशिक्षण :-**

वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचा दिवसेंदिवस विकास होत आहे. व नावलौकीक होत आहे. शेतकऱ्यांना योग्य व चांगल्या प्रतीचे ऊसाचे बेने मिळावी व जास्तीत जास्त उत्पादन त्यांना घेता यावे यासाठी ऊस संशोधन केंद्र उभा केली गेली व त्यामाध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते त्यांना आद्ययावत ज्ञना देऊन त्यांना जास्तीचे उत्पादन कसे घेता येते याचे प्रशिक्षण दिले जाते.

**२) किसान क्रेडीट कार्ड योजना :-**

वैद्यनाथ साखर कारखान्याच्या परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या घरगुती व शेती विषयक विविध गरजा भागविण्यासाठी किसान क्रेडीट कार्ड ही योजना सुरु केली. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या सुटलेल्या आहेत.

**३) ट्रक व ट्रॅक्टर खरेदी योजना :-**

वैद्यनाथ साखर कारखान्याच्या सभासद वर्गासाठी कारखान्याने व संचालक मंडळीने ट्रक व ट्रॅक्टर खरेदी योजना राबविली आहे. त्यामुळे अनेक बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार उपलब्ध झालेली

आहे. व त्यातून बेकारीची समस्या सोडविली आहे. असे दिसून येते.

**४) ग्राहक भांडार :-**

वैद्यनाथ ग्राहक भांडाराची निर्मिती परळी व पांगरी या भागात करण्यात आली. या भांडाराच्या माध्यमातून नित्य उपयोगी व शेतीविषयक साहित्य रास्त दराने मिळण्यासाठी ग्राहक भांडार उभे करण्यात आले. शेतीपयोगी साहित्य स्वस्त दरात उपलब्ध करुन दिले जाते. दि १५-१०-२००१ रोजीश्रीप्रमोद महाजन यांच्या हस्ते याचे उद्‌घाटन झाले होते. या योजनेचा लाभ अनेक शेतकरी व सर्वसामान्य लोंकाना झालेला आहे[३].

**५) अर्कशाळा निर्मितीचा प्रकल्प :-**

वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याने मळीवर आधारीत ३०,००० लि. प्रति दिवस क्षमतेची अर्कशाळा उभारण्याचे ठरविले आहे. त्यात २७,००० लिटर प्रतिदिन क्षमतेच्या निर्जल मद्यार्क प्रकल्याचां समावेश आहे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट पुणे यांनी अर्कशाळेची प्रकल्पाची किंमत रु.१,२३५,५० निश्चीत केलेली आहे. मद्यार्क निर्मिती करणारा गंळीत हंगाम २००४-०५ मध्ये एक टन ऊसाचे ७८ लि. मद्यार्क निर्मिती झालेली आहे.

**६) सहवीज निर्मिती प्रकल्प :-**

वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याने १५ मेगावॅाट क्षमतेचा सहवीज निर्मिती प्रकल्प उभारण्याचे ठरविले आहे. त्याची किंमत ४६५५ लाख इतकी आहे. इरेडा नवी दिल्ली यांनी या प्रकल्पासाठी रु.३४८८.०० लाखाचे दीर्घ मुदती कर्ज मंजुर केलेले आहे. या साखर कारखान्याने महाराष्ट्रात राज्य विद्यूत मंडळाशी वीज खरेदी करार केलेला नसल्यामुळे लोन मंजुर झालेले नाही. करार झाल्यानंतर अनेक तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

**७) बोअरवेल योजनाः-**

शेतकऱ्यांच्या ऊसाला पाणी मिळण्यासाठी कारखान्याने बोअरवेल योजना राबविलेली आहे. कारखाना परिसरातील शेतकऱ्यांना सिंचन क्षेत्र वाढवून ऊस उत्पादन वाढविल्यासाठी ही योजना सुरु केलेली आहे. या योजनेमुळे अनेक शेतकऱ्यांना फायदा झालेला आहे. व त्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ झालेली आहे.

**८) इथेनॉल निर्मिती करणारा प्रकल्प :-**

इथेनॉल हे द्रवरुप अल्कोहोल आहे. अन्नधान्याच्या फसफसण्याच्या प्रक्रियेतुन इथेनॉल उत्पादन होत असते. प्रामुख्याने ऊस ज्वारी मुळ, बाजारी या सारखे अन्नधान्य कडबा, सालपटे लाकडाचा भुसा या सारख्या कृषीजन्य सामुग्रीपासून इथेनॉलचे उत्पादन घेण्यात येते. ब्राझील सारख्या देशात मळी पासून इथेनॉल तयार केले जाते. इथेनॉलचा उपयोग स्पिरीट, बीअर, आणि मद्द पदार्थाच्या निर्मितीसाठी केला जातो. संध्या गॅसोलिगंमध्ये ऑक्सिनजनेट म्हणून मिश्रणासाठी इथेनॉल हे महत्वपूर्ण साधन आहे. असा विचार प्रवाह आजच्या काळात विकसित झाला आहे[४].

भारतामध्ये वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याने प्रथमतः ऊसाच्या रसापासून इथेनॉल निर्मितीचा प्रयोग राबविला हा प्रकल्प पाहण्यासाठी देश- विदेशातुन लोक या ठिकाणी येतात. या कारखान्याला अनेकांनी भेटी दिल्या आहेत. गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वामुळेच हा प्रकल्प यशस्वी होऊ शकत आहे.

**इथेनॉल संदर्भात गोपीनाथ मुंडे यांचे विचारः-**

इथेनॉल निर्मितीसाठी कालबध्द कृती कार्यक्रमाची गरज आहे. असे मत मुंडे यांनी स्ष्ट केले की, आपल्या देशात पूर्वीपासून मोलायसेपासून स्पिरीट, अल्कोहोल निर्माण होत आहे. या अल्कोहोलचा वापर औषधासाठी व दारु बनविण्यासाठी होत आहे. परंतु पेट्रोल मध्ये इथेनॉल करण्याची प्रक्रिया अस्तित्वत नव्हती मात्र त्याचे १०% पेट्रोलमध्ये मिश्रण करता येणे शक्य आहे. हा प्रयोग ब्राझीलमध्ये यशस्वी झाला आहे. या प्रयोगाचे अध्ययन करण्यासाठी श्री नितीन गडकरी एम.के. अण्णा पाटील, श्री एकनाथ खडसे यांना ब्रॉझीलला पाठविण्यात आले होते या मंडळीनी केलेल्या अध्ययनाचा विचार करुन

ऊसाच्या रसापासून इथेनॉल उत्पादन करणारा देशातील पहिला प्रकल्प आम्ही कार्यान्वीत केला. या प्रकल्पाची क्षमता ४५ हजार मेट्रीक टन आहे[७]. एकून ११ कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. जर नवीन कारखाना असेल तर १४ कोटी रुपये लागतात. यासाठी ५०० टन ऊसाचा रस वापरला जाईल परंतु सर्व सामान्य शेतकऱ्यांना ऐवढा मोठा निधी उभा करणे शक्य नाही. नाबार्ड संख्या कर्ज देण्यासाठी पूढे येत नाही. इथेनॉल उत्पादनाला प्राथिमिक क्षेत्रातील उत्पदनाचा दर्जा मिळाला पाहिजे. या प्रकल्पासाठी ४% व्या दराने कर्ज उपलब्ध करुन दिले पाहिजे. तरच इथेनॉल प्रकल्पास प्रोत्साहन मिळू शकेल.

यावरुन असे स्पष्ट होते की, इथेनॉल  भारतीय कृषीव्यवस्थेतील मोठी क्रांती आहे. राष्ट्राहितांच्या दृष्टीने देखील याल, महत्व आहे. म्हणून वैद्यनाथ सहकारी साखर कारखाने इथेनॉलचा प्रकल्प सूरु करुन नावलोकिक केलेला आहे[५].

**साखर उत्पादन :-**

जगामध्ये अनेक देशात साखरेचे प्रमाणात उत्पादन केले जाते. ब्राझील या देशात सर्वात जास्त साखरेचे उत्पादन केले जाते. त्यानंतर भारताचा क्रमांक लागतो. भारतात साखरेची आयात केली जाते पण आजच्या स्थितीत बद्दल झालेला आहे. कारण नैसर्गिक स्थिती. राजकीय हस्तक्षेप मुक्त आर्थिक धोरण व्यापारी धोरण अकार्यक्षम व्यवस्थापन इ. गोष्टीमुळे साखर उद्योग संकटांत आला आहे.

उत्तरोत्तर काळात साखरेच्या उत्पादनात घट झाल्यामुळे साखरेच्या किंमीत वाढ झाली आहे. त्यामुळे भारताला जागतिक स्पर्धेत टिकणे अवघड झाले आहे. महाराष्ट्रातील अनेक साखर कारखाने डबघाईला आलेले आहेत काही तर बंद पडले आहेत. निसर्गाच्या लहरीपणामुळे पावसाच्या प्रमाणात घट होत असल्याने ऊस लागवडी होत नाहीत. त्यामुळे ऊसाचा तुटवडा अनेक कारखान्याला जाणवतो सन २००९-१० या वर्षात शासनाला अनेक कारखाने बदं ठेवावे लागले. देशातील साखरेचा साठा स्थिर राहवा म्हणून शासनाने प्रत्येक साखर कारखान्याकडून साखरेची खरेदी केली त्यामुळे जे कारखाने दिवाळखोरीत आहेत त्यांच्या वर विपरित परिणाम झाले आहे[६].

वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यात आधूनिक यंत्रसामुग्री, अत्याधुनिक व सूधारित आणि विकासाच्या दृष्टीने आवश्यक बदल केलेले आहेत. कारखान्याने साखर कारखानदारीच्या क्षेत्रात वैद्यनाथ पॅटर्न राबविला आहे. प्रथम चाचणी १ नोव्हेंबर १९९९ रोजी झाल. प्रथम गळीत हंगामात करखान्याने २२२ दिवसामध्ये १९,८१ साखर उताऱ्यासह जास्त्त जास्त ५.१० लाख मे. टन ऊस गाळत व ६.०१ लाख साखर उत्पादित करुन आशिया खंडात उच्चांक निर्माण केला. त्यामुळे कारखान्यास अनेक पूरस्कार मिळाले व संगळीकडे कारखान्यात नावलैकिक मिळाले[७].

**वैद्यनाथ कारखान्यातील साखर उत्पादन व उताऱ्याचा तपशील :-**

**तक्ता क्र. ३.१**

| वर्ष | | | |
|---|---|---|---|
| १९९९–२००० | ५१०५७२ | ६०११०० | ११.८१ |
| २०००–२००१ | ५६३७५२ | ६५५०८० | ११.६४ |
| २००१–२००२ | ५७४३१९ | ६८३२५० | ११.९० |
| २००२–२००३ | ५१३२२२ | ५७५६५४ | ११.३५ |
| २००३–२००४ | ३४०८२२ | ३४८७७० | ११.७८ |
| २००४–२००५ | २७१६७८ | २६१७५० | १०.६० |
| २००५–२००६ | ३८७८५६ | ४०२०३० | १०.३७ |

**संदर्भ :-** वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल १९९९–२००६

वरिल तक्यात वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याने प्रथम गळीत हंगामापासून १९९९–२००० ते २००५–०६ पर्यंत गाळप केलेला ऊस, साखरेचे उतपादन साखरेचा उतारा दर्शिविलेला आहे. यावरुन असे निर्देशनात येते की, हंगाम १९९९–२००० च्या तुलनेत साखर उतारा २००५–०६ मध्ये कमी झालेला दिसतो.

## ३.४ संत जगमित्र नागा सहकारी सुतगिरणी, टोकवाडी ता.परळी वै. जि.बीड :-

मराठवाडयात बीड जिल्हा मागासलेला व डोंगरी भागातील जिल्हा म्हणून ओळखला जातो. गोपीनाथराव मुंडे हे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री झाल्यानंतर या जिल्हयाच्या अनेक दृष्टिकोनातून विकास घडवून आणला. त्यांच्या काळात सहकार क्षेत्रात क्रांती घडुन आली. वैद्यनाथ साखर कारखान्याच्या निर्मितीनंतर त्यांनी अल्पकाळात संत जगमित्र नागा सुत गिरणीची उभारणी केली[८]. थोडयाच कालावधीत सुतगिरणीचा नावलौकीक संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे तर देशात झालेला आहे. त्याचबरोबर या सुतगिरणीचे सुत आता परदेशातही रवाना होऊ लागल्याने हि सुतगिरणी विदेशात ही ओळखू लागली आहे. श्री पंडीत अण्णा मुंडे व संचालक मंडळ तसेच सर्व कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमातून झपाट्याने विस्तारीत होत असलेला परिसर विकासाची हि सुतगिरणी केंद्रबिंदू ठरली आहे[९].

### सुतगिरणीची उभारणी :-

सहकारी क्षेत्रात गोपीनाथ मुंडे यांनी नावलौकीक मिळवलेला आहे. परळी तालुक्यात विकासाचा भाग म्हणून अल्पकाळात संत जगमित्र सहकारी सुतगिरणी स्थापन करण्याचा संकल्प त्यांनी पूर्ण करुन ती सुरु केली. या सुतगिरणीचे अध्यक्ष श्री पंडीत अण्णा मुंडे यांनी दि.१९ डिसेंबर १९९५ साली नोंदणी केली. नोंदणी नंतर अगदी थोड्याच दिवसात संचालक मंडळाने कापूस उत्पादक सभासद सहकारी संस्थाकडून भाग भांडवल जमा केले[१०]. गिरणीच्या उभारणीसाठी टोकवाडी जवळ ४५ एकर जमिन खरेदी केली. सुतगिरणीसाठी महाराष्ट्र शासन व विविध बँकेचे कर्ज मिळताच मार्च १९९८ मध्ये बांधकामास सुरुवात केली. सुतगिरणीसाठी लागणाऱ्या वीज आणि पाणी या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचे संचालक मंडळाने ठरविले. त्या दृष्टीने सुतगिरणीच्या मागणीनुसार महाराष्ट्र राज्य विद्युत पुरवठा खंडित होण्याचा प्रकार होणार नाही. त्याचप्रमाणे पाण्यासाठी जवळपास विहिरी खोदुन पाण्याचा प्रश्न सोडवला अत्यंत कमी खर्चात ही पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्याने त्यात लाखो रुपयाची बचत करण्यात संचालक मंडळाला यश मिळाले[११].

**संत जगमित्र नागा सहकारी सुतगिरणीचे वैशिष्टये :-**

मराठवाडय़ातील व विशेषतः बीड जिल्हयातील अत्याधुनिक यंत्रसामुग्रीचे सुसज्ज असलेला हा प्रकल्प या प्रकल्पाची वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) २५ हजार २०० चात्यांचा प्रकल्प आहे. सध्या सुतगिरणीचे १४ हजार ११२ चात्या चालू असून उर्वेरित चाते शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानानंतर टप्या-टप्याने चालू करण्यात येणार आहेत.

२) बीड जिल्हयातील ७०० हुन अधिक बेरोजगारांना काम देणारा प्रकल्प

३) सामान्य शेतकऱ्यांच्या कापसाला फेडरेशन पेक्षा जास्त भाव देण्याचा प्रकल्प

४) शेतकरी बांधव व सभासदांचे जीवनमान उंचवण्यासाठी कटिब्ध्द

५) कापड निर्यात करणाऱ्यांचा व्हीवींग मिलसाठी एक्सपोर्ट क्वालिटीचे सुत उत्पादन करणारा प्रकल्प

६) बांगलादेश, कोरिया, मलेशिया, युरोप या देशात सुतनिर्यात

७) सभासदाकडून कच्चा कापूस खरेदी करुन गिरणी मार्फेत स्वतंत्र स्वतःची जिनिंग चालू[१२]

**कच्चा कापूस खरेदी :-**

सुत गिरणीने सन २००९५-२०१० या वर्षात खालील तपशिलप्रमाणे कच्चा कापूस खरेदी केलेला आहे. त त्याचा उतार पुढील प्रमाणे आलेला आहे.

**तक्ता क्र. ३.२**

| अ.क्र. | तपशिल | क्विं/किलो | रक्कम | उतारा(रु. लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण कच्च्या कापूस खरेदी | २९२६८.२८ | ६०१.८२ | ३५.१३% |
| २ | एकूण निघालेला रुई | १०२६१.६० | ५२९.८० | ६२.१८% |
| ३ | एकूण निघालेली सरकी | १८२००.१० | १४०.३३ | ०.२६% |
| ४ | वेस्ट | ७८.३८ | - | - |
| ५ | शॉर्टेंज | ७१०.२० | - | २.४३% |

संत जगमित्र नागा सहकारी सुतगिरणीने कच्चा कापूस खरेदीसाठी बाहेरुन कोणालाही नवीन कर्मचाऱ्याची नेमणूक केली नाही. गिरणीने उपलब्ध आहे त्या कर्मचाऱ्यावरच कापूस खरेदी केलेली आहे. वरिल तक्त्या अधारे सरासरी रुईचा उतार ३५.१३% झालेला आहे हे स्पष्ट झालेले आहे.

**सुत उत्पादन व सुतविक्री :-**

सुत गिरणीने २००९-२०१० या वर्षात खालील तपशिलाप्रमाणे सुत उत्पादन व सुतविक्री केलेली आहे.

**तक्ता क्र. ३.३**

| अ.क्र. | काऊंट | सुत उत्पादन | | सुत विक्री (रु.लाखात) | |
|---|---|---|---|---|---|
| | | किलो | किंमत | किलो | किंमत |
| १ | २०५ ॲटो | १२१२९०१ | ८७७.०६ | १२२५१४१ | ८८६.६२ |
| २ | २६५ ॲटो | ७७२४७५ | ६०६.३३ | ७७०३४२ | ६०४.४० |
| ३ | ३८५ ॲटो | १२९१५ | १२९.१२ | १२२०१७ | १२३.१४ |
| ४ | एकूण | २११३२९९ | १६१२.५१ | २११७५०० | १६१३.१६ |

दि.३१-३-२००६ अखेर सुतगिरणीकडे १०६६७ किलो सुतसाठा असून त्याची किंमत ९२३ लाख होती. अहवाल वर्षामध्ये एकूण सुत विक्रीचा दर सरासरी रु.७६.३० प्रति किलो होता.

**आधुनिकीकरण :-**

श्री. गोपीनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनानुसार सुतगिरणीचे अध्यक्ष पंडितअण्णा मुंडे व संचालक मंडळाने सुतगिरणीच्या उभारणीसाठी सुरुवातीपासूनच काटकसर करुन आधुनिकीकरणावर भर दिला. सुतगिरणीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सुत उत्पादनासाठी लागणाऱ्या मशनिरी व तांत्रिक कामकाज संगणकाव्दारे जास्तीत जास्त सुलभता येण्यासाठी व मनुष्यबळ कमी कसे या बाबतीत बचत कशी करता येईल यावर भर देण्यात आला सुतगिरणीचे कामकाज संगणकाव्दारे सुतांचा दर्जा समजु शकतो.

सुतगिरणीचे स्वतंत्र प्रयोगशाळा उभारली आहे. त्यामुळे खातेदारांची मोठी सोय झालेली आहे[१०].

**बेरोजगारांना रोजगारांची संधी :-**

गोपीनाथ मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणणारे प्रकल्प सुरु केले. त्यापैकी एक म्हणजे परळी वै. जवळील सहकारी सुतगिरणी होय देशातच नव्हे तर विदेशातही या सुतगिरणीचा नावलौकिक झालेला आहे. या सुत गिरणीत जवळपास ७०० कामगार काम करीत आहेत आणि हे त्यामुळे या परिसरातील व बीड जिल्हयातील बेरोजगारांच्या रोजगारांचा प्रश्न सुटलेला आहे असे दिसून येते.

सुतगिरणीच्या माध्यमातून निश्चितपणे बेरोजगारांच्या हाताला काम भेटले आहे आणि त्यामुळे त्यांचा सामाजिक व आर्थिक दर्जामध्ये सुधारणा झालेली आहे असे म्हणावे लागते.

**३.५ वैद्यनाथ अर्बन को-ऑफ बँक :-**

बीड जिल्हयात सहकारी अनेक संस्था आज आहेत परंतु ६० वर्षापूर्वी जिल्हयात सहकाराच्या माध्यमातून लोकांच्या सेवेसाठी परळी वै. या ठिकाणी १९६६ मध्ये कै. रतिलालजी सोमया व व्यापाऱ्यांनी एकत्र येवून दि.वैद्यनाथ अर्बन-को ऑफ बँकेची स्थापना केली[१३].

मात्र इ.स.१९८२ पासून वैद्यनाथ बँक हि गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली चालत आहे. या बँकेला खंबीर लाभलयामुळे बँक उत्तरोत्तर प्रगती पथावर वाटचाल करीत आहे. बँकींग क्षेत्र जागतिकीकरणामुळे अनेक बदल झालेले आहेत. या बदलामध्ये भारतीय बँकींगचे अस्तित्व टिकवून राहण्यासाठी रिझर्व्ह बँक नव-नवीन धोरण राबवित आहे. वैद्यनाथ बँकेन देखील अनेक आजारी बँका विलीन केल्या आहेत. त्यासाठी बँकेचे जेष्ठ मार्गदर्शक मा.श्री. गोपीनाथ मुंडे व बँकेचे चेअरमन अशोक सेठ सामत व संचालक मंडळ कर्मचारी वर्गाची भुमिका महत्वाची वाटते म्हणून आज सहकार क्षेत्रातील ही बँक प्रगतीपथावर आहे[१४].

**सभासद संख्या व भाग भांडवल :-**

दि.३०-०६-१९६६ रोजी बँकेची सभासद संख्या ही फक्त १४२ होती व वसुल भाग भांडवल रु.४३,२००/- होते. त्यामुळे यावर्षी बँकेला रु.१८९५ तोटा सहन करावा लागला परंतु १९६७ पासून हि बँक उत्तरोत्तर काळात विकसित होत आहे. दि. ३१ मार्च २०१० रोजी सभासद संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसते. इ.स.२०१० या वर्षी सभासद संख्येत २७३८६ सभासदाची वाढ होऊन बँकेचे वसूल भांडवल रु.६,०८,०८,८७५ व नफा रु-१,८१,१४,३०३ एवढा झालेला आहे. अशा प्रकारे बँकेची आर्थिक स्थिती ही भक्कम झालेले दिसते[१५].

**संपुर्ण महाराष्ट्रात शाखेचा विस्तार :-**

वैजनाथ बँकेच्या एकुण २५ शाखा आहेत. या बँकेचे मुख्य कार्यालय परळी वैजनाथ येथे असुन नोंदणी क्र.व तारीख बीएचआर/बीएनके/१०६ दि.२४/०२/१९६६ आहे. रिझर्व्ह बँकेने शाखा विस्ताराच्या धोरणात उदारीकरण अवलंबीवले आहे. या धोरणाचा फायदा घेत बँकेने औरंगाबाद, जालना, सिडको- औरंगाबाद, बार्शि रोड- लातूर, उस्मानाबाद या शहरामध्ये शाखा विस्ताराचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे सादर केला आहे.

वैद्यनाथ अर्बन बँकेच्या शाखा परळी वै.(मुख्यशाखा) त्याच बरोबर अंबाजोगाई, केज, गेवराई, माजलगाव, धारुर, वडवणी, पाटोदा, नेकनूर, शिरुर कासार, उदगीर, पैठण, सिल्लोड, पांगरी इ. ठिकाणी अस्तित्वात आहेत[१६].

**कर्मचारी वर्ग :-**

वैद्यनाथ बँकेच्या सर्व शाखा मधून व मुख्य कार्यालयात १९९ कर्मचारी कार्यरत आहेत. सभासदांना व ग्राहकांना सुलभ सेवा देवून कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले आहे. दैनंदिन कामकाजाचा वाढता व्याप सतत बदलने आर्थिक धोरण, नवनवीन निकष, सुचना या सर्व बाबी असुनही कर्मचारी वर्गाने अत्यंत आत्मविश्वासाने योग्य प्रणाली आत्मसात करुन ध्येय धोरण अवलंबले आहे. बँकेत तज्ञ अनुभवी

व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण वर्गाचे कार्यक्रम घेतले जातात. याशिवाय मुंबई, पूणे, नागपूर इ. ठिकाणच्या प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी बोलविले जातात. संचालक मंडळाने कर्मचाऱ्यांना शासकिय कर्मचाऱ्यांप्रमाणे पाचवी वेतनश्रेणी मंजुर केली आहे. त्यामुळे कामगार वर्ग देखिल श्री गोपीनाथ मुंडे व संचालक मंडळावर खुष आहे[१७].

**सामाजिक उपक्रम :-**

बँकेच्या सभासदांच्या मुला-मुलींच्या उच्च शिक्षणासाठी तसेच सभासदांचे जे विद्यार्थी गुणवत्तेने उत्तीर्ण होतात. त्यांना उत्तेजन म्हणून पारितोषिक व शिष्यवृत्ती या शिवाय संभासदांना वैद्यकीय उपचारनिधीतून बँकेच्या सभासद कल्याण निधीतून मदत केली जाते. वार्षिक अहवाल वर्षात ५९ पाल्यांना शैक्षणिक मदत म्हणून रु.४९,०००/- व १९ सभासदांना वैद्यकीय मदत म्हणून १,९०,०००/- देण्यात येते. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी गणेशोत्सव समिती स्थापन करुन गणपतीची प्रतिष्ठापणा केली. व्याख्यानमाला, क्रिडा, शैक्षणिक संस्था पालकांसाठी पालक मेळाव्याचे आयोजन इ. कार्यक्रम बँकेने समाजोपयोगी कार्यक्रमाला चालना देण्याच्या हेतुने आर्थिक साह्य करुन बँकेने त्यात सहभाग घेतला आहे. अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन बँकेच्या माध्यमातून केले जाते. यातून समाजाची जास्तीत-जास्त विकास व्हावा हाच या पाठीमागचा उद्देश असतो[१८].

### वैद्यनाथ बँकेच्या प्रगतीचा तक्ता

### तक्ता क्र. ३.४

### वैद्यनाथ बँकेची प्रगती पुढील तक्त्यांवरुन निर्देशनात येते.

| अ.क्र. | तपशिल | इ.स.१९६६ | इ.स.२००८ |
|---|---|---|---|
| १ | सभासद संख्या | १४२ | २७३८६ |
| २ | भाग भांडवल | ४३,२०० | ९,०८,०८,९७५ |
| ३ | राखीव निधी | ७२० | ३४,११,३२,८९८ |
| ४ | ठेवीची रक्कम | २,१३,२३३ | ३६४,२५,४६,४३१ |
| ५ | कर्जाची रक्कम | ५०,४९३ | १७९,७६,६३,४८२ |
| ६ | खेळते भांडवल | २,५७,१९१ | ३४,१५,४७,५६४ |
| ७ | नफा | १,८९५(तोटा) | १,८१,१४,३०३(नफा) |

संदर्भ :- वैद्यनाथ अर्बन को- ऑप लि.परळी वैद्यनाथ अहवाल-२००९-१० सहकारी क्षेत्राकडून मिळालेला ऑडिट दर्जा.

वरिल तक्यावरुन असे निर्देशनात येते की, दि. वैद्यनाथ को-ऑप बँक लि.परळी वै. हि एक नामांकित बँक म्हणून उल्लेकख करावा लागेल. दि. ३०-०६-१९६६ मध्ये या बँकेची सभासद संख्या १४२ तर सन २००८ रोजी ह्या बँकेचे सभासद २७३८६ हो व त्याच परीने बँकला नफा सुध्दा झालेला आहे अर्ज दिसून येते[१९].

श्री. गोपीनाथ मुंडे यांनी केवळ राजकारणासाठी राजकारण केले नाही तर विकासाचे राजकारण केले आहे. नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचा त्या माध्यमातुन विकास केला आहे[२०].

## ३.६ शैक्षणिक विकासात दिलेले योगदान

शिक्षण क्षेत्रात मराठवाड्यात अनेक थोर व्यक्तिंनी संपुर्ण आपले जीवन समर्पित केलेले आहे. कोणत्याही व्यक्तिंचा विकास शिक्षणाशिवाय होऊ शकत नाही. याची जाणीव त्यांना होती. म्हणून मराठवाडा हा अनेक बाबतीत मागासलेला प्रदेश आहे. म्हणून शिक्षण असे एक औषध आहे ज्यामुळे संपूर्ण समाजघटकाचा विकास साधता येतो हे ओळखुन शिक्षणक्षेत्रात कार्ये होत असल्याचे दिसून येते. त्यात प्रामुख्याने स्वामी रामानंद तीर्थ, कै.शंकरराव चव्हाण, केशरबाई क्षीरसागर, बापूसाहेब काळदाते, नारायणदादा काळदाते, विलासराव देशमुख, विनायकराव पाटील, गोपीनाथ मुंडे, यांचा समावेश होतो. त्यामुळे मराठवाड्यातील सामाजिक, आर्थिक, राजकिय, सांस्कृतिक असा सर्व घटकामध्ये स्थित्यंतरे घडून येत आहेत[२१].

### गोपीनाथ मुंडे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो प्राशन करील तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही. हेच तत्व डोळ्यासमोर येवुन गोपीनाथराव यांनी आपल्या राजकीय, सामाजिक, सहकार, कार्याबरोबरच शैक्षणिक कार्यात देखील स्वतःला वाहुन घेतले. शिक्षणाशिवाय समाजाची उन्नती घडून येणार नाही. म्हणून त्यांनी मराठवाड्यातील शैक्षणिक संस्थाना आर्थिक साह्य केले आहे. याच बरोबर स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. पारंपारिक शिक्षणापेक्षा २१ व्या शतकातील विज्ञाननिष्ठ व व्यावसायिक शिक्षणाकडे त्यांचा जास्त कल दिसतो[२२].

गोपीनाथ मुंडे यांनी महाराष्ट्रातील अनेक शैक्षणिक संस्थांना आर्थिक सहकार्य केले आहे. त्यामुळे त्या संस्था आज नावरुपाला आल्या आहेत. त्यावरुन त्यांची शिक्षणाविषयीची भुमिका लक्षात घेता येते. दर्जेदार शिक्षणाच्या दृष्टिकोनातून त्यांनी पुढील घटकांना महत्व दिले[२३].

१) प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे.

२) ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करणे

३) स्त्री शिक्षणास महत्व देणे.

४) शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास आणणे.

५) व्यावसायिक शिक्षणाला उत्तेजन देणे.

६) विज्ञान व तंत्रज्ञानावर भर देणे.

७) सामाजिक क्षेत्रातील अंधश्रध्दा, रुढी-परंपरा दूर करणे.

८) महाराष्ट्र शासनाकडून शिक्षणासंबंधी अनुदान मंजुर करणे.

ही ध्येय व उदिष्टे लक्षात घेवुन गोपीनाथराव मुंडे यांनी पुढील शैक्षणिक संस्थाचा विकास मोठ्या प्रमाणात केला आहे. त्याची माहिती पुढील प्रमाणे[२४].

**जवाहर एज्युकेशन सोसायटीची स्थापना (इ.स.१९६८) :-**

प्राचीन काळापासून ते आजतागायत परळी वै. या शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.अशा या शहरात जवाहर एज्यूकेशन सोसायटीचा उल्लेख प्रकर्षाने करता येईल. या संस्थेच्या स्थापनेत शहरातील शिक्षण प्रमी, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी मंडळीचा समावेश होता. या संस्थेची स्थापना इ.स. १९६८ मध्ये करण्यात आली व पहिले संस्थापक अध्यक्ष म्हणून श्री लक्ष्मणराव देशमुख यांची निवड करण्यात आली. सुरुवातीच्या काळात वैद्यनाथ महाविद्यालय हे वैद्यनाथ मंदिराच्या जवळ होते मात्र नविन इमारत अंबाजोगाई रोडवर बांधले त्या इमारतीचे उद्‌घाटन शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते ३ नोन्हेंबर १९७६ रोजी यांच्या हस्ते करण्यात आले या संस्थेचे सुरुवातीला संचालक व सध्या विद्‌मान अध्यक्ष गोपीनाथ मुंडे आहेत असे दिसून येते[२५].

**वैद्यनाथ महाविद्यालयाची ध्येय आणि उद्देश :-**

ध्येय :- १) विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्व विकासावर महावद्यिालयाने लक्ष केंद्रेन करणे.

२) महावद्यिालयाच्या सर्व शाखामध्ये शिक्षणाचा दर्जा उंच ठेऊन ज्ञान अध्यावत ठेवणे.

३) सर्वांच्या मनावर भारतीय संविधानातील राष्ट्रीय मुल्य आधिक प्रमाणात रुजविणे.

**उद्देश** :- १) महाविद्यालयात विविध शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करणे.

२) विद्यार्थ्यांच्या व्याक्तिमत्व विकासाची आपेक्षा करणे.

३) महाविद्यालयीन विद्यार्थ्यान चांगल्या सवयी व शिस्त रुजविण्यासाठी प्रयत्न करणे.

४) सर्व शैक्षणिक उपक्रमामध्ये विद्यार्थ्याचा आधिकारधिक सहभाग घेणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये स्वयं अध्ययनाची सवय रुजविणे[२६].

वैद्यनाथ कॉलेज विद्यर्थ्यांना व्यापक दृष्टीकोन देण्याचा, त्यांना नवे बळ आणि आत्मविश्वास देण्याचा त्यांच्या कलागुणांचा आणि कर्तृत्वाचा गौरव करण्याचा तसेच विविध विषयावर बोलते व लिहिणे करण्याचा प्रयत्न करीत आहे[२७].

**जवाहर एज्यूकेशन सोसायटीची निवडणूक :-**

शिक्षण संस्थेत दर पाच वर्षाला निवडणूका होतात. परंतू जवाहर एज्यूकेशन संस्थेची जवळपास १३ वर्ष निवडणूक झाली नव्हती. संस्थेत बद्दल व्हावा म्हणून नोव्हेबंर २००५ मध्ये निवडणूक झाली या निवडणूकीत गोपीनाथराव मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भगवान बाबा पॅनल उभा करण्यात आल ही निवडएूक एकून संचालक पदासाठी लढविण्यात आली त्यात भगवान बाबा पॅनलन्वे फक्त चार उमेदवार निवडून आले बाकीच्या २७ जागा वैद्यनाथ विकास पॅनलने जिंकल्या त्यामुळे जवाहर एज्यूकेशन सोसायटीवर गोपीनाथ मुंडे यांचे निर्विवाद वच्र्रच प्रस्थापित झाले व ही संस्था ताक्यात घेऊन संस्थेच्या विकासाचा एक नवा अध्याक्ष त्यांनी सुरु केला[२८].

**जवाहर शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी गोपीनाथ मुंडेची निवड :-**

जवाहर शिक्षण संस्थेच्या निवडणूकीत गोपीनाथ मुंडे यांच्या पॅनलचे २७ उमेदवार निवडून आले. त्यात संस्थेच्या अध्यक्षपदी श्री गोपीनाथ मुंडे यांची निवड विनविरोध करण्यात आली. व सर्व विजयी संचालक मंडळाच्या सत्कार समारंभ दि.१०-१२-२००५ रोजी वैद्यनाथ महाविद्यालयात प्राचार्य डॉ.ए.आर. कुरमे यांनी केला. त्यावेळी आपल्या भाषणात श्री मुंडे म्हणाले की, कॉलेजमध्ये राजकारणाची

आवश्यकता नाही. कोणताही निर्णय गुणवत्ते च्या आधारावर घेतला जाईल गुणवत्ता ही भाषणास येणार नाही तर प्राध्यपकांच्रा शिकविण्यातून येईल' तसेच संस्थेचा व महाविद्यालयाचा विकस करण्यासाठी आपल्या आमदार फंडातुन ११ लाख रु चा निधी संस्थेला दिला[२९].

**श्री गोपीनाथ मुंडे यांची अध्यक्ष म्हणून कामगिरी :-**

जवाहर शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष पदी श्री गोपीनाथ मुंडे यांची निवड झाल्यामुळे संस्थेचा झपाट्याने विकास झालेला दिसून येतो. परळी शहरात क्रांती घडवून आणल्याचे श्रेय श्री गोपीनाथ मुंडे यांच्या कडे जाते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संचालक मंडळ काम करत आहे. व संस्थेच्या विकासासाठी प्रयत्न करताना दिसून येते[३०].

१) जवाहर एज्यूकेशन सोसायटी संचालित वैद्यनाथ महाविद्यालया चा विकास करण्यासाठी ११ लाख रुपयेचा निधी जाहीर केला व संस्थेला दिला.

२) विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'वैद्यनाथ पॅटर्न' राबविण्यात आला आहे.

३) कनिष्ठ महावीद्यालयाचा दर्जा उंचावल्यामुळे परळी शहरातील विद्यार्थी- विद्यार्थींनी अंबाजोगाई ,लातुर अहमदपुर येथे शिक्षणासाठी न जाता परळीत शिक्षण घेत असल्याचे चित्र दिसून येते आहेत.

४) वैद्यनाथ महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली.

५) सीई टी परिक्षांचा अभ्यास घेऊन विशेष भर व लक्ष दिले जाते[३१].

६) व्यवस्थापन शाखेत बी.सी.ए. हा तीन वर्षाचा संगणक शास्त्रातील अभ्यासक्रम तसेच पोस्ट ग्रॅज्यूएर डिप्लोमा इन कॉम्प्युटर अप्लीकेशन सुरु करण्यात आला आहे.

७) कॉपी मुक्त परळी हे श्री गोपीनाथ मुंडे यांचे ध्येय आहे. ने पूर्णत्वाकडे जात आहे.

८) संस्थेमार्फत मागासवर्गीय मुलींसाठी कमला नेहरु वसतिगृह चालविले जाते. या सवतिगृहासाठी ५ लाख रुपायाची देणगी श्री गोपीनाथ मुंडे यांनी दिली आहे.

९) संगणक विभागाच्या विकासासाठी श्री गोपीनाथ मुंडे यांनी पाच लाखाचा निधी दिला आहे.

१०) महाविद्यालयातील गरिब असणाऱ्या विद्यार्थ्यांना दत्तक योजनेत घेऊन त्यांचे शिक्षण पूर्ण होई पर्यंतचा सर्व खर्च संस्था करित आहेत.

११) कमवा आणि शिका ही योजना महाविद्यालयात राबवण्यात येते. त्यातुन अनेक विद्यार्थी आपले शिक्षण पूर्ण करित आहेत.

वैद्यनाथ महाविद्यालयात ११९ १२ कला, विज्ञान वाणिज्य, बी.ए., बी. कॉम., बी.एस.सी., एम.ए., एम.एस.सी. इत्यादी अभ्यासक्रम सुरु आहेत. या अभ्यासक्रमासाठी एकूण १२७०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत[३२].

**स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना :-**

वैद्यनाथ महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्राचे उद्घाटन दि.१८ ऑक्टोबर २००६ रोजी लातूर येथील राजर्षी शाहु महाविद्यालयाचे अध्यक्ष श्री.गोपाळराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या केंद्रातून विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परिक्षेचे मार्गदर्शन केले जाते. या केंद्रामुळे विद्यार्थ्यांना फायदा होत आहे. बेकार तरुणांना या केंद्राच्या माध्यमातून दिशा मिळत आहे. या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करुन दिली आहेत. स्पर्धात्मक परिक्षांसाठीचे मार्गदर्शन विषयाच्या तज्ञ व्यक्तिकडुन या केंद्रातून दिले जाते[३३].

**वैद्यनाथ पॅटर्नच्या निर्मितीसाठी प्रयत्न :-**

लातूर पॅटर्नच्या धर्तीवर परळी शहरात वैद्यनाथ पॅटर्नची निर्मिती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयात अभ्यासाची जास्तीत जास्त तयारी करुन घेतली जाते. महाविद्यालयात येवून वेळोवेळी मार्गदर्शन श्री.गोपीनाथ मुंडे करीत असतात. त्यामुळे प्राध्यापक आपले कर्तव्य करण्यास कोणतीही कुचराई करत नाहीत. महाविद्यालयाची वेळ संपली तर प्राध्यापक ज्यादा तासिका घेऊन विद्यार्थ्यांची पूर्ण तयारी करुन घेतात[३४].

**वैद्यनाथ सर्वांगीण विकास संस्थेची स्थापना :- (इ.स.२०००)**

महाराष्ट्रात अनेक शैक्षणिक संस्था स्थापन झालेल्या आहेत. या संस्थांच्या माध्यमातून विविध उपक्रम सुरु केलेले आहेत. त्यापैकी एक संस्था म्हणजे वैद्यनाथ सर्वांगीण विकास संस्था होय. या संस्थेची स्थापना २००० मध्ये करण्यात आली आहे. ही संस्था वैद्यनाथ सोसायटीच्या अंतर्गत येते. या संस्थेचे संस्थापक सदस्य व अध्यक्ष गोपीनाथ मुंडे हे आहेत. आजचे युग हे स्पर्धेचे युग मानले जाते. त्यात परळी शहरातील तरुण मागे पडु नयेत त्यांनी नैपुण्य प्राप्त करता यावे त्यांना तांत्रिक शिक्षण मिळावे या उद्देशाने श्री.गोपीनाथ मुंडे यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थाना केली. परळी वै. येथे वैद्यनाथ कनिष्ठ महाविद्यालय सुरु केले आहेत[३५].

**कै. नागनाथअप्पा हलगे अभियांत्रिकी महाविद्यालय परळी वै. :-**

कै.नागनाथअप्पा हलगे अभियांत्रिकी महाविद्यायात माहिती तंत्रज्ञान, संगणकशास्त्र आणि अभियांत्रिकी इलेक्ट्रनिक्स या वर्गाची पदवी अभ्यासक्रम चाविला जातो. या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन उत्कृष्ट अभियांत्रिकीची निर्मिती करणे हा या संस्थेचा प्रयत्न आहे. यासाठी विद्यार्थ्यांचा विकास झाला पाहिजे म्हणून संस्थेचे पदाधिकारी, संचालक, प्राचार्य कर्मचारी प्रयत्नशिल असलेले दिसून येतात[३६].

**वैद्यनाथ कनिष्ट कॉलेज खोकरमोहा ता. शिरुर कासार जि.बीड :-**

वैद्यनाथ कनिष्ठ महाविद्यालय खोकरमोहा ता.शिरुर कासार जि.बीड या ठिकाणी २००३ मध्ये सुरु करण्यात आले. हे महाविद्यालय कायम विनाअनुदानित तत्वार चालु केले आहे. यासाठी संस्थेने १० एकर जमिन विकत घेतलेली आहे. या महाविद्यालयाच्या बांधकामासाठी व इतर सोयीसाठी गोपीनाथ मुंडे यांच्या खासदार फंडातुन २५ लाख रु.चा निधी मंजुर केला होता. ग्रामीण भागातील मुलांना शिकता आले पाहिजे म्हणून या महाविद्यालयाची स्थापना या ठिकाणी केलेली आहे. या परिसरात मजुरांची संख्या अधिक आहे. ऊसतोड कामगार वर्गाच्या मुलांना शिक्षण मिळावे हा उद्येश या महाविद्यालयाचा आहे. हे महाविद्यालय वैद्यनाथ सर्वांगिण विकास संस्थेच्या माध्यमातून चालत आहे. व त्यामध्ये गोपीनाळ

मुंडे यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. तसेच दिसून येते[३७].

**रेसिडेंटल सेतू शाळा परळी -२००५ :-**

बीड जिल्हा हा अत्यंत मागासलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. या बीड जिल्हयात पावसाचे प्रमाण अल्प असते. त्यामुळे शेतीचा विकास होत नाही. वेगवेगळया व्यवसायाकडे येथिल लोक वळतात. ऊसतोड करण्यासाठी अनेक लोक टोळ्या-टोळ्याने जातात. अशा ऊसतोड कामगारांच्या मुलांची शाळा सुरु करण्यासाठी युती सरकारच्या काळात निर्णय झाला होता. ऊसतोड करण्यासाठी हे लोक सात ते आठ महिन्याकरीता स्थलांतर होतात. साखर कारखान्याच्या परिसरातील शाळेत या स्थलांतरित मजुरांच्या मुलांना प्रवेश दिला जात असे व त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण केला जात असतो[३८].

विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा त्यांचे कसल्याही प्रकारचे नुकसान होऊ नये म्हणून वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांच्या मुलांना शिक्षण द्यावे हा या संस्थेचा मुख्य उद्देश होता. या शाळेची स्थापना इ.स.२००५ मध्ये करण्यात आली. त्यासाठी विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, गणवेश दिला जातो. अशा प्रकारच्या शाळेत भोजनाची व्यवस्था देखील केली जाते. अशा शाळेतून साक्षरतेचे प्रमाण  अभ्यासक्रम वाढविणे मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढविणे असा हेतू या सेतु शाळेचा दिसून येतो.

अशा प्रकारच्या शाळा महाराष्ट्रात विविध साखर कारखान्याच्या परिसररात अस्तिवात आहेत.

**वैद्यनाथ अध्यापक विद्यालय, परळी वै. जि.बीड :-**

परळी शहराला प्राचिन काळापासून ऐतिकासिक सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. शैक्षणिक क्षेत्रात विविध संस्थांनी कार्य चालु आहे. श्री गोपीनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शना खाली वैद्यनाथ सर्वांगीन विकास सस्थेची स्थापना करुन त्या अंतर्गत वैद्यनाथ अध्यापक विद्यालय सुरु केलेले आहे. असे दिसून येते.

अध्यापक विद्यालयाचे प्रमुख उदिष्टये डोळ्यासमोर ठेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून

आणला जातो. विद्यार्थी हा विद्यालयाचा केंद्रबिंदू असतो. त्यासाठी अशा विद्यार्थ्यांना तज्ञ प्राध्यापक मार्गदर्शन करीत असतात. शैक्षणिक मार्गदर्शना बरोबरच इतर क्षेत्रात देखिल सहभाग करीता विद्यार्थ्यांना सहकार्य करतात. या विद्यालयात राष्ट्रीय सण, शिक्षक दिन, हिंदी दिवस, थोर व्यक्तिंच्या जयंत्या व पुण्यतिथी, वर्ग प्रतिनिधी, कृती सत्राचे आयोजन, वृक्षारोपन कार्यक्रम, कथाकथन, वादविवाद, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले जाते.

**कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या उभारणीत सिंहाचा वाटा :-**

अथर्व एज्युकेशन ट्रस्ट हे भारतातील एक महत्वपुर्ण शैक्षणिक संकुल मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणी उभारलेले आहे. यामध्ये जागतिक स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश केलेला आहे. या ट्रस्टची स्थापना महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री असताना श्री गोपीनाथ मुंडे यांनी १९९८ मध्ये केली. हे ट्रस्ट करते. उच्च शिक्षणात उच्च दर्जाचे शैक्षणिक संकुल निर्माण करण्याचे काम अथर्व एज्युकेशन ट्रस्टने केली आहे.

**भारतीय शिक्षण प्रसार मंडळ, अंबाजोगाईच्या विकासात श्री. गोपीनाथ मुंडे यांची भुमिका :-**

श्री. गोपीनाथ मुंडे यांची वैचारिक जडणघडण ही या संस्थेच्या माध्यामातुन झाली असे म्हटले तर वांवगे ठरणार नाही. ही संस्था राष्ट्रीय स्वयंसंघाची म्हणून ओळखली जाते. त्यामुळे श्री मुंडे अंबाजोगाईत शिक्षण घेत असताना या संस्थेशी एकरुप झाले. या संस्थेचे केंद्रीय कार्यकारणीचे १२ वर्ष ते सभासद होते. रेणापूर मतदार संघातून ते पहिल्यांदा लोकप्रतिनिधी झाल्यावर त्यांनी या संस्थेला इंजिनिअरिंग कॉलेज मिळवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात त्यांना अपयश आले. इ.स.१९९० मध्ये बीड येथे सावरकर महाविद्यालयात कनिष्ठ विभाग सुरु करुन आठ विषयाची मान्यता श्री. मुंडे यांच्यामुळे मिळाली. तसेच खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई येथे इ.स. १९९० पासुन विज्ञान शाखा मिळवुन देण्यासाठी प्रयत्न त्यांनी केल्यामुळे ही शाखा सुरु केली. त्यामुळे आज अनेक विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होत आहे.

युती शासन चालु असताना श्री.मुंडे यांनी या संस्थेच्या १५ शाळांना मंजुरी दिली. तसेच बीड येथे वरिष्ठ महाविद्यालयाला मान्यता देखील दिली. तसेच उपमुख्यमंत्री असताना त्यांनी या संस्थेला ७० लाख रुपयाची आर्थिक मदत केली[३९].

अशा प्रकारे श्री. गोपीनाथ मुंडे यांनी भारतीय शिक्षक प्रसारक मंडळाच्या विकासात मोलाचा वाटा उचलला आहे. संस्थेच्या अनेक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालय आहेत. त्यांचा आज ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होत आहे. असे म्हणावे लागेल.

**३.७ गोपीनाथ मुंडे यांनी केलेली विकास कामे :-**

श्री. मुंडे हे रेणापूर मतदार संघाचे लोकप्रतिनिधी म्हणून या मतदारसंघात स्वतःचा आमदार निधीचा वापर विकासात्मक योजना राबविण्यासाठी केलेला आहे. रेणापूर मतदार संघात सार्वजनिक बांधकात विभाग अंबाजोगाई, नगर पालिका परळी, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, लघुपाटबंधारे विभाग या मार्फत अनेक कामे केलेली आहेत.

मुंडे यांनी रेणापूर मतदार संघाचा कायापालट घडवून आणण्यासाठी महत्वपूर्ण पाऊले उचलेली आहेत. हा मतदार संघ विकासाच्या दृष्टीने आघाडीवर आहे. मतदार संघातील गावा- गावात जोडणारे रस्ते, प्रत्येक गावात पिण्याच्या पाण्याच्या सोयी, नळ योजना निर्माण केल्या, विजपुरवठा वाढविण्यासाठी १३२,१३३ के.व्ही. सबस्टेशनची

निर्मिती केली. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी अखंड वीज पुरवठा उपलब्ध झाला. राज्यात श्री. मुंडे सत्तेत असतांना या मतदार संघात एक हजार कोटींची विकासाची कामे झाली. त्यामुळे हा मतदार संघ नंदनवन बनला होता. मतदार संघाचा विकास करताना श्री. मुंडे राजकारण करत नाहीत, शासनाच्या सर्व सुविधा व योजना लोकापर्यंत पोहचल्या पाहिजेत अशी त्यांची धारणा होती व आहे. एक आमदार म्हणून या मतदार संघाचा त्यांनी चौफेर दृष्टीने विकास केला.

पोहेरेगाव, खालंग्री पानगाव या भागात चार ३३ के. व्ही. सब स्टेशनची निर्मिती करुन विजेच्या दाबाचा प्रश्न सोडून शेतकऱ्याच्या हितासाठी योग्यती पाऊले उचलेली होती.

रेणापुरच्या तालुक्यातील युवक बेकार राहु. नये, तसेच तो नोकरीच्या मागे लागुन राहु नये म्हणून रेणापुर तालुक्यात उद्योगधंदे वाढवावेत यासाठी श्री. मुंडे हे प्रयत्नशील राहीले आहेत. म्हणून मिनी एम आयडीसीची स्थापना केली. तसेच अनेक वर्षापासून प्रलबिंत असलेल्या ८ कोटी रुपयांच्या भंडारवाडी प्रकल्पाचा प्रश्न श्री. मुंडे यांनी सोडविला. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळाले त्यांच्या शेतीच्या उत्पदनात भर पडली व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील सुटला असेच म्हणावे लागेल. या प्रकल्पामुळे शेतकरी वर्गांना मोठ्या प्रमाणात फायदे झाले. तसेच शेतकऱ्यानां पाण्याची कमतरता भासू नये म्हणून प्रत्येक चार गावामागे एक पाझर तलावाची उभारण्याची कल्पना श्री. मुंडे यांनी आमलात आणली. तर कोल्हापुरी बंधारा उभारण्याचे नियोजनही त्यांनीच केले होते. तसेच ८०% गावात कायमस्वरुपी पाणीपुरवठा राबविण्यात येईल अशी त्यांची धारणा होती. रेणापूर तालुक्यात भविष्यात ५० वर्षातरी पाणी टंचाई निर्माण होणार नाही असे नियोजन श्री. मुंडे यानी केले.

लातुर-अंबाजोगाई रस्त्यावरील महापूर येथील पुल पावासाळ्यात वाहतुकीसाठी बंद पडला की, अनेक आडचणींना सामोरे जावे लागत असे. युती शासन सत्तेवर येण्यापूर्वी अनेक वर्ष आस्तीत्वात असलेल्या सरकारने या बाबीकडे लक्ष दिले नाही पण ही आडचण श्री. मुंडे यांच्या लक्षात आली आणि तत्कालीन उपमुख्यामंत्री श्री. मुंडे यांनी या पुलाचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी १.५० रुपये मंजुर केले. अशा प्रकारच्या रस्त्याचा प्रश्न श्री. मुंडे यांच्यामुळेच सुटलेला आहे असेच म्हणावे लागेल.

रेणापूर तालुक्याच्या विकासाला गती मिळावी, त्यांचा कारभार स्वतंत्रपणे व सुव्यवस्थीत चालावा म्हणून त्यांनी स्वतंत्र रेणापूर तालुका पंचायत समितीची स्थापना केली. या समितीच्या माध्यमातुन अनेक समस्यांचे निराकारण झाले आहे. शेतकऱ्यांना शेती विषयक अवजारे, पाणी पुरवठ्यासाठी विहिरी, इ.चे. वाटप केले जाते.

### रेणापुर मतदार संघातील विकासात्मक योजना :-

शेतकऱ्यांच्या जीनवनात हरितक्रांती घडवून आणण्याचे कार्य श्री. मुंडे यांनी केले. कारण त्यांनी रेणापूर मतदार संघात करखान्यानदारी सुरु केली.वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना व पनगेश्वर खाजगी साखर कारखाना उभा करुन लोकांचे जीवनमान उंचावले. या दोन्ही कारखान्यामुळे शेतकरी वर्गाची होणारी कुचंबना थांबली एवढेच नव्हे, तर कारखान्याने हजारो युवकांना रोजगार उपलब्ध करुन दिला.

वैद्यनाथ कारखान्याने देशात नव्हे तर जगात नावलौकिक मिळविला आहे. त्यामुळे या मतदार संघातील लोकांचा अर्थिक दृष्या विकास झालेला दिसतो. कदाचित मुंडे सारचे नेतृत्व या मतदार संघाला लाभले नसते, तर हा मतदार संघ शोधून दिसला नसता व एवढी कामेही दिसली नसती. या भागात काम करतांना त्यांनी कधी जातपात, भेदभाव केला नाही. अठरा पगड जातीला घेऊन त्यांनी या संघात राजकारण केले त्यामुळे त्यांना प्रत्येक गावात पाठिंबा मिळतो. इ.स.२००३ मध्ये एका दुरचित्रवाहिनीच्या लोकांनी चौफेर फिरुन जनमत चाचणी केली तेव्हा मतदार संघात ८९% मुंडेच्या नेतृत्वाच्या बाजूने कौल दिला.

वैद्यनाथ साखर कारखान्याच्या माध्यमातून ऊस बेणे, विहिर खोदई, बोअर घेणे, ठिबक व तुषार सिंचन योजनासाठी शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन दिले. तसेच बहुउद्येशीय अर्कशाळा प्रकल्पातून ऊसाच्या रसापासून इथेनॉल निर्मितीसह अल्कोहलचे उत्पादन तसेच गोड ज्वारीच्या ताटापासून इथेनॉल निर्मितीचा प्रयोग यशस्वी केला. कारखान्यातील कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन दिले व ऊस उत्पादकांना इ.स.२००६ मध्ये प्रतिटन १०६०/- रु. भाव दिला. कारखान्याने गोदावरी दुधना साखर कारखाना, पाथ्री जि परभणी. पश्चिम महाराष्ट्रातील पारनेर सहकारी साखर कारखाना, कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखाना, तसेच संत एकनाथ सहकारी साखर कारखाना पैठण भाडेतत्वावर घेऊन यशस्वीरित्या चालविले. त्यामुळे सहकार क्षेत्रात देखिल श्री.मुंडे यांना नावलौकिक झाला. कारण हे कारखाने डबघाईला आलेले होते. त्यांना सुधारण्यासाठी त्यांनाी हे कारखाने भाडेतत्वावर घेऊन त्यांचा विकास करण्यासाठी प्रभावी पावले उचलली आहेत.

श्री. मुंडे यांनी रेणापूर मतदार संघाचा कायापालट घडवून आणण्यासाठी महत्वपुर्ण पाऊले उचलेली आहेत. हा मतदार संघ विकासाच्या दृष्टीने आघाडीवर आहे. मतदार संघातील गावा-गावात जोडणारे रस्ते, प्रत्येक गावात पिण्याच्या पाण्याच्या सोयी, नळ योजना निर्माण केल्या, विजपुरवठा वाढविण्यासाठी १३२, १३३ के.व्हि. सबस्टेशनची निर्मिती केली. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी अखंड वीज पुरवठा उपलब्ध झाला. राज्यात श्री. मुंडे सत्तेत असतांना या मतदार संघात एक हजार कोटींची विकासाची कामे झाली. त्यामुळे हा मतदार संघ नंदनवन बनला होता. मतदार संघाचा विकास करताना श्री. मुंडे राजकारण करत नाहीत, शासनाच्या सर्व सुविधा व योजना लोकापर्यंत पोहचल्या पाहिजेत अशी त्यांची

धारणा होती व आहे. एक आमदार म्हणून मतदार संघाचा त्यांनी चौफेर दृष्टीने विकास केला.

पोहरेगाव, खालंग्री, पानगाव या भागात चार ३३ के.व्ही. सब स्टेशनची निर्मिती करुन विजेच्या दाबाचा प्रश्न सोडून शेतकऱ्याच्या हितासाठी योग्यती पाऊले उचलली होती.

रेणापूरच्या तालुक्यातील युवक बेकार राहू नये , तसेच तो नोकरीच्या मागे लागून राहू नये म्हणून रेणापूर तालुक्यात उद्योगधंदे वाढवावेत यासाठी श्री.मुंडे हे प्रयत्नशील राहिले आहेत. म्हणून मिनी एमबायडीसीची स्थापना केली. तसेच अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या ८ कोटी रुपयांच्या भंडारवाडी प्रकल्पाचा प्रश्न श्री. मुंडे यांनी सोडविला. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळाले त्यांच्या शेतीच्या उत्पादनात भर पडली व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील सुटला असेच म्हणावे लागेल. या प्रकल्पामुळे शेतकरी वर्गांना मोठ्या प्रमाणात फायदा झाले. तसेच शेतकऱ्यांना पाण्याची कमतरता भासु नये म्हणून प्रत्येक चार गावामगे एक पाझर तलावाची उभारण्याची कल्पना श्री. मुंडे यांनी आमलात आणली. तर कोल्हापूरी बंधारा उभारण्याचे नियोजनही त्यांनीच केले होते .तसेच ८०% गावात कायमस्वरुपी पाणीपुरवठा राबण्यित येईल अशी त्यांची धारणा होती. रेणापूर तालुक्यात भविष्यात ५० वर्षातरी पाणी टंचाई निर्माण होणार नाही असे नियोजन श्री. मुंडे यांनी केले.

लातूर- अंबाजोगाई रस्त्यावरील महापूर येथील पूल पावसाळ्यात वाहतुकीसाठी बंद पडला की, अनेक आडचणींना सामोर जावे लागत असे. युती शासन सत्तेवर येण्यापुर्वी अनेक वर्ष आस्तीत्वात असलेल्या सरकारने या बाबीकडे लक्ष दिले नाही पण ही आडचण श्री.मुंडे यांच्या लक्षात आली आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री. मुंडे यांनी या पुलाचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी १.५० रुपये मंजुर केले. अशा प्रकारच्या रस्त्याचा प्रश्न श्री.मुंडे यांच्यामुळेच सुटलेला आहे असेच म्हणावे लागेल.

रेणापूर तालुक्याच्या विकासाला गती मिळावी, त्यांचा कारभार स्वतंत्रपणे व सुव्यवस्थीत चालावा म्हणून त्यांनी स्वतंत्र रेणापूर तालुका पंचायत समितीची स्थापना केली. या समितीच्या माध्यमातून अनेक समस्यांचे निराकारण झाले आहे. शेतकऱ्यांना शेती विषयक अवजारे, पाणी पुरवठ्यासाठी विहिरी, इ.चे वाटप केले जाते.

**साखर उद्योगापुढे वैद्यनाथ पॅटर्न असा नवा आदर्श निर्माण केला :-**

श्री मुंडे यांनी वैद्यनाथ साखर कारखाना निर्मिती करुन परळी तालुक्यातील व परिसरातील लोकांच्या

अडचणी दुर केल्या. त्याचप्रकारे रेणापूर तालुक्यातील शेतकऱ्यांची ऊसाच्या समस्या सोडविण्यासाठी पानगाव येथे पन्नगेश्वर शुगर मिल्सची निर्मिती केली. राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यासाठी शेतकरी महत्वाचा घटक असतो कारण अर्थव्यवस्थेच्या नाड्या त्याच्या हाती हातात म्हणून त्याला न्याय मिळाला पाहिजे अशी श्री. मुंडे यांची भुमिका आहे. या कारखान्याची उभारणी केवळ अकरा  महिन्यात केली. व सहकार क्षेत्रात भरीव कामगिरी केली. त्यामुळे रेणापूर भागातील अनेक लोकांना रोजगार उपलब्ध झाला.

श्री. मुंडे यांनी वैद्यनाथ पन्नेश्वर साखर कारखाना बरोबर तालुक्यात संत जगमित्र नागा सुतगिरणीची निर्मिती केली. मराठवाड्यातील अत्याधुनिक यंत्रसामुग्रीचा हा प्रकल्प त्यांनी सुरु केला. त्यामुळे या सुतगिरणीचा नावलौकिक महाराष्ट्रातच नव्हेतर देशात प्रदेशात झालेला आहे. श्री. मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुतगिरणीचे अध्यक्ष श्री.पंडीतराव मुंडे व संचालक मंडळ यशस्वीपणे कार्य करतांना दिसतात. या सुतगिरणीमुळे सुशिक्षीत बेकारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तसेच शेतकऱ्यांचा कापूस देखील नगदी रोखीने खरेदी केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या विकासासाठी ही सुतगिरणी महत्वपुर्ण ठरत आहे.

**शेतकऱ्यांच्या हितासाठी चळवळ :-**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. आपल्या सांस्कृतिक शेतीला आईचा दर्जा दिला जातो. या आईची सेवा करणारा शेतकरी सुखी तर जनता सुखी, परंतु स्वातंत्र्यानंतरही शेतकरी सुखी नाही. ही या कृषिप्रधान देशातील लाजिरवाणी बाब आहे. महाराष्ट्रात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यात बीड जिल्हयातील आत्मीहत्याग्रस्त अनेक शेतकरी आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे कृषिमंत्री महाराष्ट्रातले आहेत. तरी देखील त्यांच्या विषयी ठोस भुमिका बजावलेली नाही. निवडणुक समोर ठेवून शेतकऱ्यांना कर्जमाफी योजना केली, परंतु त्या योजनेचा लाभ सर्वांना मिळाला नाही. म्हणून रेणापूर मतदार संघाचे आमदार श्री.मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी तीव्र आंदोलन केले. त्यात प्रामुख्याने ऊस जाळा आंदोलनाचा प्रकर्षाने उल्लेख करावा लागेल. शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळाला पाहिले अशी श्री. मुंडे यांची भुमिका आहे.

ऑगस्ट २००६ मध्ये अतिवृष्टीने राज्यात हाहाकार माजविला होता. असंख्य कुटूंबियांची घरे

पाण्याखाली गेली होती. शेतकऱ्यांची पिके नष्ट झाली होती. अशा बाबींकडे आघाडी सरकार लक्ष देत नाही म्हणून श्री. मुंडे यांनी पुरग्रस्तांच्या समस्या जाणून घेण्यासाठी गोदा परिक्रमा काढली.मराठवाड्यात अनेक गावांना या पुराचा हादरा बसला. अशा लोकांना भेटण्यासाठी श्री. मुंडे यांनी रस्ते, काट्या कुट्याचा विचार न करता पायी प्रवास केला, काही प्रसंगी बैलगाडीने प्रवास केला. गोदावरीचे पात्र ओलांडण्यासाठी थर्माकोलच्या होडीचा वापर केला. जात-पात-धर्म याचा विचार न करता दुःखितांच्या भावना जाणून घेतल्या. हाजारो मिटरचा प्रवास करुन लाखो लोकांच्या भेटी घेतल्या. निष्क्रीय सरकारला धारेवर धरुन पुरग्रस्तलोकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रखर भुमिका घेतली. पुरग्रस्तांचे पुनर्वसन व्हावे, पुरग्रस्तलोकांना न्याय मिळवुन देण्यासाठी प्रखर भुमिका घेतली. पुरग्रस्तांचे पुनर्वसन व्हावे, पुरग्रस्तास हेक्टरी २५००० चे नुकसान मिळावे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करुन शासनाने तातडीने अनुदान मंजुर करावे, जखमी व्यक्तींना व जनावरांना मतत करावी, जाकवाडीच्या कालव्याच्या दुरुस्तीसाठी ५०० कोटीची तरतुद करावी अशा प्रकारच्या मागण्या श्री.मुंडे यांनी आघाडी सरकारपुढे मांडल्या. पुरग्रस्त लोकांना न्याय मिळवून देण्यास सरकारला भाग पाडले.

**रोजगार हमी योजना :-**

महाराष्ट्राच्या राजकारणात गेली १० वर्ष आघाडी सरकार सत्तेत आल्यामुळे विरोधी पक्षातील आमदार म्हणून श्री. मुंडे भुमिका महत्वाची आहे. बीड जिल्हयाचा विकास करण्यासाठी आघाडी सरकारने योग्य ती पाऊले उचलेली नाहीत. एवढेच नव्हे, तर निवडणुकीमध्ये जिल्हयातील लोकांना जी अश्वासने दिली होती. त्याची पुर्तता झाली नाही. त्यामुळे बीड जिल्हयाचा विकास झाला नाही. ऊसतोड कामगाराचा जिल्हा म्हणून याची ओळख आहे. या लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी श्री.मुंडे यांनी जमेची बाजु घेतली. युती शासन सत्तेवर आल्यावर उपमुख्यमंत्री पदी असताना श्री.मुंडे यांनी या जिल्हयातील शिक्षण आरोग्य, रस्ते या सारखे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. त्यासाठी रोजगार हमी योजनेचे पाऊल उचलले. त्यामुळे या जिल्हयातील अनेक कुटूंबे स्थीर होतील, मुलांच्या शिक्षणाची हेळसांड दूर होईल म्हणून श्री.मुंडे यांनी रोजगार हमी योजनेवर कोट्यावधी रुपायाचा निधी खर्च केला.

रेणापूर मतदार संघातील खेडोपाडी, वस्ती, वाड्या तांड्यापर्यंत रस्त्याची निर्मिती केली. रस्त्याने जोडल्या तसेच तलावांच्या कामाला गती देऊन तलावाची कामे पुर्ण केली. पिण्याच्या पाण्याबरोबरच

काही क्षेत्र ओलाताखाली आणण्यासाठी मुंडे यांनी पाझर तलाव, कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे बांधण्यासाठी आर्थिक निधी उपलब्ध करुन दिला. त्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ झाली आणि अन्नधान्याचा प्रश्न मार्गी लागला. परंतु एवढ्यावरच श्री. मुंडे यांचे समाधान झाले नाही अनेक गावांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचे प्रयत्न चालुच आहेत.

युती शासनाच्या काळात मुंडे यांनी रेणापुर मतदार संघात ६०० कोटींची रोजगार हमी बरोबरच ग्रामीण रुग्णालय व प्रथमिक आरोग्य केंद्रांना देखील अनेक प्रकारच्या सुविधा त्यांनी उपलब्ध करुण दिल्या. आरोग्यमंत्री बीड जिल्ह्यातील असून देखील त्यांच्या काळात अनेक वेळा आरोग्य विभागातील कर्मचारी वर्गांनी बेमुदत संप केल्याचे आढळून येते. राज्यात ७५८१ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पदे मंजुर असून ३१८० पदे रिक्त आहेत. शल्याचिकित्सकांची ६५० पदे मंजुर असून ३०० पदे रिक्त, ५० बेडच्या उपजिल्हा रुग्णालयातील २६५ पदांपैकी १९४ पदे रिक्त आहेत. आजच्या काळात बीड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य यंत्रणा मांडकळीस आलेली आहे. रुग्णांची हेळसांड मोठ्या प्रमाणात केली जाते. म्हणून रुग्णांची गैरसोय होऊ नये, त्यांना चांगली सेवा मिळावी, त्यासाठी आरोग्य विभागातील पदे भरावीत या करिता श्री. मुंडे यांनी आपल्या भागातील आरोग्य विभागात जातीने लक्ष घालावे व जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहावे असे वाटते.

**शिक्षण विषयक योजना :-**

कुठल्याही क्षेत्राचा विकास साधायचा किंवा प्रगती करायची अथवा जगाचा अभ्यास करावयाचा असेल तर शिक्षण आवश्यक आहे. अज्ञानामुळे विकासाची वाट खुंटते. महाराष्ट्रात युती शासन सत्तेवर येण्यापूर्वी शिक्षण क्षेत्राचा विकास झालेला नव्हाता. परंतु यूती शासन सत्तेवर आल्यानंतर शाळांची दुरुस्ती बरोबर नवीन शाळा इमारतीची उभारल्या तसेच नवीन शिक्षक भरती करुन बहूशिक्षकी शाळा निर्माण केल्या. रेणापूर मतदार संघातील अनेक गावात श्री. मुंडे यांनी आपल्या आमदार निधीतुन खोल्यांचे बांधकाम केले आहे. विविध योजनांतर्गत फर्निचर,बोर्ड,आसनपट्ट्या, वह्या-पुस्तेके, दप्तर शाळांना मोफत वितरीत केले. श्री मुंडे यांच्यामुळे ग्रामीण भागात शैक्षणिक दर्जा उंचावण्या बरोबर शिक्षणाची व्दारे उघडली. त्यामुळे काळात शिक्षण वर्गाची गळचेपी होऊ लागली. शिक्षकांनी देखील शिक्षण सेवक हे पद आघाडी सरकारच्या काळात शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिकविण्याऐवजी इतर कामे

जास्त करावी लागत आहेत.एक प्रकारची शिक्षक वर्गाची गळचेपी होऊ लागली. शिक्षकांनी देखील शिक्षण सेवक हे पद आघाडी सरकारच्या काळात निर्माण झाले या निर्णयाला शिक्षक संघटनेशी विरोध केला, परंतु त्याचाही काहीही फायदा झाला नाही. सर्वांसाठी मोफत शिक्षण आघाडी सरकार देऊ शकले नाही. शिक्षणाचा दर्जा उंचावणे, विद्यार्थी केंद्रित शिक्षण, भ्रष्टाचार मुक्त शिक्षण क्षेत्र, हजारो खेड्यातील लाखो शाळांमधून जाणाऱ्या कोट्यावधी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याची क्षमता श्री मुंडे यांच्या कडे आहे.

अशा प्रकारे श्री. मुंडे यांनी रेणापूर मतदार संघात शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ऊस उत्तपन्नासाठी आडचण दुर करण्यासाठी पानगाव या ठिकाणी शुगर मिल्सची स्थापना केली. त्यामुळे अनेकांना रोजगार उपलब्ध झाला. व ऊस उत्पादकांची समस्या सुटली. त्याबरोबरच त्यांनी आरोग्य, शिक्षण, विद्युत विकास, रोजगार हमी योजना इत्यादीच्या माध्यमातुन या मतदार संघाचा विकास झालेला आहे.

**परळी तालुक्याच्या विकासात श्री. मुंडे यांची भूमिका :-**

रेणापुर मतदार संघात परळी तालुक्याचा समावेश होतो. या परळीच्या विकासात श्री. मुंडे यांची भूमिका महत्वपूर्ण ठरली. आहे. त्यांच्या कार्याचा आढावा पूढीलप्रमाणे घेता येईल. रेणापूर मतदार संघातील परळी येथे श्री. मुंडे यांनी कै. नागनाथअप्पा हालगे अभियंत्रिकी महाविद्यालय, वैद्यनाथ अध्यापक विद्यालय, त्याच बरोबर जवाहर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष म्हणून देखील ते यशस्वी रित्या जबाबदारी पार पाडताना दिसतात.स्व.प्रमोद महाजन हे केंद्रीय दुरसंचार मंत्री असताना रेणापूर मतदार संघातील **२०** शाळांना विद्यावाहिनी प्रकल्पातर्गत संगणसेवा उपलब्ध करुन देण्यात आली. वैद्यनाथ विद्यालय, सरस्वती विद्यालय, जगमित्र नागा विद्यालय, हनूमान व्यायाम शाळा व इतर वेगवेगळ्या संस्थांना श्री. मुंडे यांना आपल्या आमदार निधीतुन भरघोस मदत केली आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे व जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वावर श्री. मुंडे यांची अगाध श्रध्दा आहे. परंतु अजुनही या भागात वैद्यकिय, कृषी विद्यालय, विविध संशोधनात्मक संस्था, यांची उणिव जाणवते. त्याच्याकडे देखील श्री. मुंडे यांनी लक्ष द्यावे असे वाटते.

**अ.वैद्यनाथ ज्योर्तिलिंग विकास :-**

श्री. मुंडे हे रेणापूर मतदार संघातील परळी वैजनाथ येथिल विकासासाठी अग्रेसर असतात. रस्ते, पाणी व वीज या बरोबरच परळी वैजनाथ येथील ज्योर्तिलिंगाच्या विकास करण्यासाठी सुमारे साडेतीन कोटी रुपये उपमुख्यमंत्री असताना मंजुर केले. एवढेच नव्हे तर हा निधी लवकरात लवकर मंजुर करुन विकासात्मक कामाला सुरुवात केली. वैद्यनाथ मंदिराच्या परिसरात यात्रेकरुसाठी निवासस्थानाची व्यवस्था केली. त्यामुळे बाहेरुन येणाऱ्या भाविकांना अत्यंत अल्प दरात हि सुविधा उपलब्ध झाली. वहानतळाची निर्मिती, तसेच मेरु पर्वतावरील गार्डनची व्यवस्था करण्यात आली. त्याचा उपयोग परळीतील नागरीक घेत असताना दिसतात. अशा प्रकारे मंदिराचा जिर्णोध्दार व आदि विकासासाठी श्री. मुंडे यांनी भरीव आर्थिक मदत केलेली आहे.

**ब. रस्त्यांचा विकास :-**

औरंगाबाद येथे उपमुख्यमंत्री असताना मंत्री मंडळाची बैठक झाली होती. त्या बैठकीत श्री. मुंडे यांनी नगर-बीड-परळी, या मार्गासाठी राष्ट्रीय महामार्गाचा सोयी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झाला होता. अशा प्रकारची रस्त्यांची योजना श्री. मुंडे यीनी आखली होती. त्याचा फायदा आज नागरिकांना होत आहे.

परळी शहरात डॉ, शामाप्रसाद मुखर्जी आणि उड्डाण पुलासाठी साडेतीन कोटी खर्च करुन त्या पुलाचे बांधकाम पुर्ण केले. ग्रामीण भागात दळणवळण सुविधेसाठी ३२ कि.मी डांबरीकरण केले. तसेच रेणापूर मतदार संघातील रस्त्याच्या सुधारण्यासाठी १२.१७ कोटी खर्चाचा स्थानिक विकास निधी (खासदार-आमदार निधी) मधुन १००१ कोटी खर्च करुन ६८ कामे पुर्ण केलेली आहेत. श्री मुंडे यांनी रेणापूर मतदार संघाच्या बहुतेक गावात विविध योजना राबविलेल्या आहेत. त्यासाठी स्व. प्रमोद महादजन, खा.श्री गोपाळराव पाटील यांच्या खासदार निधीतुन विविध योजना राबविलेल्या आहेत.

रस्त्याच्या विकासाबाबत श्री. मुंडे यांनी विधीमंडळात देखील प्रश्न उपस्थित केला व आघाडी सरकारकडुन जाणून घेतले. कित्येक वर्षापासून जिल्हयामध्ये खेड्या-पाड्याचा रस्त्यामुळे विकास खुंटलेला आहे. नदी नाल्यांना पुर आल्यामुळे लोकांचा इतर गावांशी असलेला संपर्क तुटला जातो. शालेय विद्यार्थ्यांची गैरसोय निर्माण होते. त्यासाठी श्री. मुंडे यांनी ग्रामीण भागातील रस्त्यावर लक्ष

केंद्रीत केले. युवी शासन काळात श्री. मुंडे यांनी कोट्यावधी रुपये खर्च करुन आपल्या मतदार संघात रस्त्याची कामे केली. त्यामुळे रोजदारीचा प्रश्न देखील सुटला होता. राष्ट्रीय महामार्ग ते ग्रामीण मार्गावर अनेक पुल बांधण्यात आले. तसेच मुंबई–कल्याण–अहमदनगर–बीड–परळी या सारखे अनेक रस्ते त्यांनी विकसीत केलें.

**क. नवीन कार्यालयाची निर्मिती :–**

श्री. मुंडे यांच्यामुळे परळी शहरात पुढील नवीन कार्यालयाची निर्मिती करण्यात आली आहे.

१) सरकीट हाऊस

२) पंचायत समिती

३) कापूस पणन संघाचे विभागीय कार्यालय

४) परिसरातील विकास कामे त्वरीत पुर्ण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे एक स्वतंत्र कार्यालय,

५) महाराष्ट्र विद्युत मंडळाचे (झोन) कार्यालय.

६) पाटबंधारे खात्याचे मंडळ कार्यालय

अशा प्रकारची मंडळ कार्यालय श्री. मंडे यांच्यामुळे परळी या ठिकाणी आस्तीत्वात आलेली आहेत.

**ड. भूमिगत विद्युत पुरवठा :–**

परळी शहरामध्ये ४५ लाख रु. खर्च करुन भुमिगत विद्युत पुरवठा करण्यात आला. त्यामुळे रस्त्याच्या सुशोभिकरण मोहिमेत भर पडली. अद्यावत स्वरुपाची विद्युत योजना परळी शहरात राबविण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता.

**ई. इतर विकासात्मक कार्य :–**

१)मुस्लीम बांधवासाठी १० लाख रु. शादीखान्यासाठी खर्च केले. त्यामुळे मुस्लीम समाजाच्या विवाहासाठी निर्माण झालेल्या समस्या सुटलेल्या आहेत.

२)परळी उपग्रामीण रुग्णालयामध्ये १०० खाटाच्या क्षमतेचे अद्यावत रुग्णालयाची उभारणी श्री. मुंडे यांच्या आमदार निधीतुन झालेली आहे.

३)श्री. मुंडे यांच्या प्रयत्नामुळेच परळीकरांच्या औद्योगिक वसाहतीच्या जुन्या मागणीचा प्रश्न निकालीत लावलेला आहे. उदा. पंपसेट व मोटर, स्टाईल फरशी, फॅबरीकेशन वर्क्स, कुलर, बल्ब इत्यादी वस्तुची निर्मिती केली जाते.

४)श्री. मुंडे उपमुख्यमंत्री असतान परळी शहरानजीक विमानतळ मंजुर करण्यात आले होते. तसेच मराठवाड्यातील पहिले पोलिस प्रशिक्षण केंद्र उभारण्याचे शासनाने ठरविले होते, परंतु इ.स.२००० साली राज्यात आघाडी सरकार सत्तेवर आल्याने या दोन्ही योजनांची पुर्तता करण्यास त्यांना यश आले नाही.

५)परळी-अंबाजोगाई मार्गावरील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या दक्षिणेकडील डोंगरावर ५० लाख खर्च करुन अद्यावत शासकीय विश्रामगृहाची निर्मिती केली आहे. त्यामध्ये अत्यावश्यक सोयी व सुविधा उपलब्ध आहेत.

६)परळी तालुक्यातील धर्मापुरी येथे संगणक प्रशिक्षण केंद्र व हेळम येथे पशु आरोग्य केंद्र, उजणी व बर्दापूर भागात पाणी पुरवठयाची नवी योजना सुरु करण्याचा निर्णय श्री. मुंडे यांनी घेतला आहे. सध्या दोन्हीही योजना सुरु आहेत.

**उजनी येथ जिल्हा मध्यवर्ती बँकेची शाखा :-**

उजनी पाटी ता.अंबाजोगाई येथे मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा पुर्ववत करण्यात येईल असे आश्वासन पट्टीवडगाव जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत श्री. धनंजय मुंडे यांनी तेथिल जनतेला दिले होते. श्री. गोपीनाथ मुंडे यांच्या वाढदिवसाची भेट म्हणुन ९ डिसेंबर २००५ रोजी उजनी येथे या बँकेचे उदघाटन करण्यात आले कारण येथील जिल्हा बँकेची शाखा अनेक वर्षापासून बंद होती त्यामुळे शेतकरी व नागरिकांची गैरसोय मोठ्या प्रमाणात होत आहे. हे लक्षात घेऊन जिल्हा परिषद सदस्य, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस श्री. धनंजय मुंडे यांनी उजनी येथील लोकांना दिलेले अश्वासन पुर्ण केले.

**नाथ्रा या गावाच्या विकासात श्री.मुंडे यांची भुमिका :-**

श्री. गोपीनाथराव मुंडे यांचे जन्म गाव हे नाथ्रा आहे. या गावाची २००६ पर्यंत लोकसंख्या १५०० आहे. या गावाच्या विकासात त्यांनी महत्वपुर्ण भुमिका घेतली आहे. स्वतःच्या गावाचा विकास

करण्यासाठी श्री.मुंडे यांनी लाखो रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच गोर-गरीब जनतेच्या आरोग्यासाठी आमदार, मुख्यमंत्री फंडातुन निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

**अ. आरोग्य केंद्राची उभारणी :-**

श्री. मुंडे उपमुख्यमंत्री झाल्यावर नाथ्रा या गावी त्यांनी आरोग्य केंद्राची उभारणी केली. हे आरोग्यकेंद १४ खाटाचे आहे. चाकुरच्या धर्तीवर हे आरोग्यकेंद्र उभारले आहे. या केंद्रातील कर्मचारी वर्गांनी निवासव्यवस्था, विद्युत व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच गावत पशुवैद्यकीय दवाखाना देखील आहे. त्याचा फायदा जवळच्या दहा गावांना होतो.

**ब. ३३ के.व्ही. सबस्टेशनी उभारणी :-**

नाथ्रा या गावी ३३ के.व्ही. सबस्टेशन दोन एकरच्या जागेत उभे आहे. या केंद्रातून नाथ्रा, सेलु, पांगरी, गाढे पिंपळगाव, सबदराबाद, कौंडगाव इ. गावांना वीज दिली जाते. येथील कर्मचारी संख्याही दहा आहे. तसेच या गांवमध्ये गावठाण थ्रीफेज योजना कार्यान्वीत केलेली आहे. त्यामुळे फक्त दोन तास विद्युत पुरवठा खंडित होतो. येथील दळणवळण व्यवस्था सुव्यवस्थित चालते आहे. असे निर्देशनात येते.

**क. शेतीसाठी कॅनॉलची निर्मिती :-**

श्री. मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या विकासासाठी कॅनॉलची निर्मिती केली. आघाडी सरकारच्या काळात हे काम बंद पडले होते. परंतु उपमुख्यमंत्री असताना आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या जमिनी ओलिताखाली आणण्यासाठी हा प्रकल्प हाती घेऊन पुर्णत्वाकडे गेलेला आहे. त्यामुळे नाथ्रा, कौडगाव(घोड), कौडगावसाबळा, पिंपळगाव , सबदाराबाद, देशमुखटाकळी, इंजेगाव येथील १८०० एकर जमीन ओलिताखाली ओलीताखाली आलेली आहे. त्यामुळे या भागातील शेतकरी सधन बनला असल्याचे चित्र दिसते. नाथ्रा गावातील शेतकऱ्यांना सन २००५-२००६ या खरीप हंगामात एक कोटी रुपयाचा पिक विमा मिळाला, तर १.२५ कोटीचाी कर्जमाफी झाली आहे.

गावामध्ये सिमेंट व काँक्रीटच्या रस्त्यासाठी त्यांनी लाखो रुपयाचा निधी खर्च केलेला आहे. दलितवस्तीतील रस्ते सुधारणा करण्यासाठी श्री. मुंडे यांनी आखणी करुन पाऊले उचलेली आहेत.दलितांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा, सभागृहाची निर्मिती केली. त्यासाठी ५ लाख

रुपयाचा निधी खर्च केलेला आहे. तसेच गावातील रस्त्याच्या दोन बाजुला नाल्याची व्यवस्था केलेली आहे. जेणे करुन घरा-घरातील गटार पाणी त्या नाल्याव्दारे गावाबाहेर जाईल या पध्दतीचे नाल्याचे बांधकाम केलेले आहे. स्मशान भुमीचे बांधकाम देखील करण्यात आलेले आहे. वाननदी वरील पुलांचे बांधकाम श्री.मुंडे यांच्या आमदार निधीतुन झालेले आहे. या नदीच्या पाण्याचा दलित वस्तीला धोका होता म्हणुन दलितांचे पुनर्वसन केले.

**ड. हनुमान, विठ्ठल व रुक्मीणी मंदिराचे बांधकाम व सभामंडप :-**

नाथ्रा या गावातील हनुमान, विठ्ठल- रुक्मीणी मंदिराचे पुर्ण केले आहे. या बांधकामासाठी एक कोटी रुपये खर्च आलेला आहे. गावातील नागरीकांना या मंदिराच्या उभारणीसाठी एकरी (जमिनीनुसार) एक हजार रुपये प्रमाणे १७ लाख रु. जमा केलेले आहे. बाकीची रक्कम आमदार निधीतुन व वैयक्तिक देणगी स्वरुपात श्री. मुंडे स्वखुशीने करीत आहेत. कारण श्री. मुंडे यांच्या वडिलांची इच्छा होती की, गावामध्ये लग्नविधी कार्यासाठी सभामंडप असावा ती श्री. मुंडे पुर्णतत्वाकडे नेत असताना दिसते. या मंदिराची लांबी रुंदी ११८ x ४६ एवढी आहे. पंढरपुरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या धरतीवर या मंदिराची उभारणी होत आहे. तसेच गावातील मरीआईचे मंदिर, मुंजा मंदिराचे बांधकाम करण्यात आले आहे.

जि.प. शाळा नाथ्रासाठी श्री. धनंजय मुंडे यांनी ९ लाख रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिला. त्यामुळे शाळेचे बांधकाम करण्यात आले. या ठिकाणी सातवी पर्यंतची शाळा आहे. श्री मुंडे यांच्या शिफारसी नुसार डॉ. दे.घ.मुंडे यांनी विना-अनुदान तत्वावर माध्यमिक शाळाची मान्यता दिली. त्यामुळे १० वी पर्यंतचे शिक्षण विद्यार्थ्यांना गावामध्ये मिळते.

पाणलोट क्षेत्राच्या माध्यमातून गावात झाडे लावणे, शेतीचे चर काढुन देणे त्यासाठी ४० लाख रुपयाचा खर्च येत आहे. त्याचे काम श्री. पंडीतअणणा मुंडे हे करत आहेत.

**संगम आठरा खेडी पाणीपुरवठा :-**

संगम आठरा खेडी पाणीपुरवठा योजना युती शासन काळात सुरु झाली होती. या योजनेतंर्गत बेलम, वागबेट, इंजेगाव, कौठळी, संगम, पांगरी अशा प्रकारच्या अठरा गावांना पाणी पुरविले जाते. त्यामुळे लोकांच्या दैनंदिन गरजा भागविल्या जात होत्या, परंतु या योजनेचे वीज कनेक्शन तोडल्यामुळे

ती अनेक वर्षापासून बंद आहे. त्यामुळे पांगरी व पांगरी कॅम्पमधील जनतेच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. या योजनेअंतर्गत पांगरी कॅम्प येथे जलकुंभ बांधण्यात आलेला आहे. परंतु तो देखील पाण्या अभावी खड-खडाट झालेला असुन पाणी प्रश्नामुळे जनतेचे आजच्या स्थितीला हाल होत असेल असे दिसते.

**श्री. मुंडे यांचा वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम :-**

श्री. मुंडे यांचा वाढदिवस म्हणून १२ डिसेंबर हा दिवस रेणापूर मतदार संघात नव्हे तर महाराष्ट्रात साजरा केला जातो. या वाढदिवसानिमित्त भारतीय युवा मोर्चा इतर संघटनांच्या माध्यमातुन विविध उपक्रम राबविले जातात. त्यात रक्तदान शिबीर, फळे वाटप, दर्ग्याला चादर चढविणे, वैद्यनाथ प्रभुला अभिषेक, अन्नदान, शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व वह्यांचे वाटप, शालेय स्पर्धा, क्रिकेटच्या स्पर्धा, इ.चा समावेश होतो. सर्वात महत्वाचा उपक्रम म्हणजे सर्वधर्मिय सामुहिक विवाह सोहळा होय. ही एक काळाची गरज म्हणून नाथ प्रतिष्ठाणच्या वतीने श्री. धनंजय मुंडे यांने हे कार्य हाती घेतले आहे. भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस श्री. गोपीनाथ मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी परळी वैजनाथ येथे सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा श्री. मुंडे यांच्या उपस्थितीत पार पाडला जातो. हा उपक्रम २००३ पासून राबविला जातो. आज पर्यंतच्या इतिहासात (२००६ पर्यंत) श्री. धनंजय मुंडे यांनी हिन्दु, मुस्लीम, बौध्द, व इतर समाजातील ४०० मुला-मुलींचे विवाह घडवुन आणले. त्यासाठी कोट्यावधी खर्च केले आहेत. अशा प्रकारच्या उपक्रमाने अनेकांचे प्रश्न सुटलेले आहेत. या उपक्रमांचा फायदा अनेक गोर-गरीब लोकांना झालेला आहे.

आजच्या काळात विवाह ही एक सामाजिक समस्या बनली आहे. महागाई, बेकारी, दारिद्रय, दुष्काळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अशा अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागत असल्याने विवाह हि एक चिंतेची बाब बनली. अशा परिस्थितीत नाथ्रा प्रतिष्ठाणच्या वतीने आणी श्री. मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविलेला हा उपक्रम स्तुत्य स्वरुपाचे आहे. असेच म्हणावे लागेल.

१

# ब) जयदत्त क्षीरसागर- बीड जिल्हयाच्या विकासात योगदान

## ३.८ पूर्व चरित्र व राजकीय नेतृत्वाचा उदय :-

जयदत्त क्षीरसागर यांचा जन्म दि.०७ डिसेंबर १९५० रोजी राजूरी नवगण येथे झालेला आहे. आई सौ. केशरकाकु व वडिल श्री सोनाजीराव क्षीरसागर होते. यांना समाजकारणाचे धडे बालपणा पासूनच काकु व नाना यांच्या कडुन मिळाले. त्यामुळे जयदत्त क्षीरसागर यांनी आपली स्वतंत्र ओळख दाखवुन कार्य कुशलता सिध्द केली आहे. एक अभ्यासू व्यक्तिमत्व, हाती धरलेले काम धसास लावण्याची वृत्ती, समग्र लोकसंपर्क, लोकांच्या सुखा दुःखात धाऊन जाणारा नेता, समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन जाणारा स्वच्छ चरित्र संपन्न नेतृत्व म्हणजे जयदत्त क्षीरसागर होय.

एके काळी प्रतिकुल परिस्थितीमध्ये स्व.काकू एक चौथीपर्यंत शिक्षण घेतलेली महिला असुन सुध्दा जिल्हयात मातबर असणारी पुरुष नेते मंडळी यामध्ये कै. रामराव आवरगावकर, कै. श्रीपतराव कदम, कै. बळवंतराव कदम, सुंदरराव सोळुंके, बाबुराव आडसकर, शिवाजीराव पंडीत, माजी आ. शिवाजीराव चाटे, कै. गंगाधर अप्पा बुरांडे, कै. रघुनाथ मुंडे, माजी खासदार कै.गावडे इत्यादी मंडळीच्या राजकीय विरोधाला न जुमानता जवळपास १३-१४ वर्ष त्या बीड जिल्हयाच्या खासदार राहिल्या. कालांतराने अनेकजनांने त्यांचे नेतृत्व हि मान्य केले. अशा या खंबीर व धाडसी नेतृत्वाचे धडे अण्णांनी स्व.काकु-नाना यांच्याकडुन लहानपणीच गिरवले होते.

प्राथमिक व शालांत शिक्षण बालपण राजुरी नवगण ता. जि. बीड येथे झाले. नंतर महाविद्यालयीन पद्‌वी पर्यंत चे शिक्षण बीड या ठिकरणी झाले आणि बी. ई सिव्हील (मॅकेनिक) इंजिनियर असणारे उच्च शिक्षण कर्नाटक राज्यात पूर्ण केले.

शिक्षणानंतर जयदत्त क्षीरसागर यांनी उच्च नौकरी करावी किंवा स्वतंत्र्य उद्योग काम करावे अशी सौ. काकु नानांची इच्छा होती पण अण्णांना आवड होती ती समाजकारणाची त्यामुळे त्यांनी नौकरी न करता स्वताला समाज सेवेसाठी राजकारणात झोकून दिले व स्वर्गीय काकूंची शिकवण व संस्काराची शिदोरी घेवून यशस्वी वाटचाल केली.

जयदत्त क्षीरसागर यांनी राजकीय वाटचाल सूरुवातीला सरपंच, जि.प. सदस्य पं.स. सभापती आमदार, उपमंत्री राज्यमंत्री ते कॅबीनेट मंत्री इथपर्यंत दिर्घ व यशास्वी प्रवास करु शकले ते काकू व नानांच्या विचारांचा वसा आणि वारसा मिळाल्यामुळे असे म्हणता येते. काकु व नानांचा वारसा त्यांच्या

अंगी ठाईढाई भरलेला आपणाला दिसून येतो. समाजकारणाचा ध्यास मनी घेवून अण्णांनी १९७७-७८ च्या दरम्यान राजकारणात प्रवेश केला १९७८ साली लिबागणेश जि.प सर्कल मधून अण्णांनी ॲड. बी.डी. बागल यांच्या विरोधात जिल्हा परिषदेची निवडणूक लढवली हाती. राजूरी जिल्हा परिषद सर्कल मधून निवडणून आल्यानंतर आण्णा पहिल्यांदा बीड प. समितीचे सभापती झाले होते. हा कार्यकाळ पं.स. नावांरुपास आणली होती त्यानंतर १९८० मध्ये चौसाळा विधानसभा मतदार संघातुन आय काँग्रेस कडून निवडणूक लढवली तर लोकशाही दलाकडून कै. चांदमल लोढा यांनी ही निवडणूक लढविली होती १९९१ साली चौसाळा विधानसाभा मतदार संघातुन अण्णा विजयी झाले व नंतर महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात नाटयमय घडामोडी होवून सूधारकराव नाईकांच्या मंत्री मंडळामध्ये अण्णांचा नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात उपमंत्री म्हणून शपथविधी झाला होता पून्हा १९९५ च्या होवू घातलेल्या विधानसभा निवडणूकीत बीड मधून शिवसेनेचे प्रा. सुरेश नवले यांचे कडून अल्प मतात परभव पत्कारावा लागला. यश अपयशाची पर्वा न करता त्यांनी आपले कार्य जोमाने चालु ठेवले. अपयशाने खचून न जाता त्यांनी पुन्हा १९९९ मध्ये चौसाळा विधानसभा लढवून विजयी झाले व त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा नुकताच स्थापन झालेला होता. काँग्रेस -राष्ट्रवादी पक्षाच्या सत्तेत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या मंत्रीमंडळात मंत्री म्हणून यशस्वी चांगल्या प्रकारचे काम केले होते त्याप्रसंगी अनेक वेळा मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी त्यांचे तोंडभरुण कौतुक केले हाते. त्यांचे विलासरावांशी ही मैत्रीपूर्ण संबंध होते तर राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी आण्णांचे चांगले काम पाहून कॅबीनेट मंत्री म्हणून पहिल्या यादीत स्थान देवून पद्दोन्नती केली ऊर्जा व उच्च शिक्षण या खात्यांचा कारभारही त्यांनी उत्तम कामे केले होते. अण्णा उर्जा खात्यांचे मंत्री असताना त्यांनी शेतकऱ्यांच्या विजपंपाचे थकीतबीले माफ करण्याचा धाडसी निर्णय शासनाला घ्यावयास लागला या निर्णयामुळे राज्यातील हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला[४०].

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नविनच स्थापन झालेला होता त्यामुळे तो पक्ष बीड जिल्हयात वाढला तो अण्णांमुळे या त्यांच्या कार्यकाळामध्ये विविध विकास योजना त्यांनी खेचुन आणल्या. सिंचन क्षेत्र, रस्ते, वीज, पाणी इ. क्षेत्रात जिल्हयाचा कायापालट केला व डोंगराळ व खडकाळ जमिन ओलीताखाली आणली कारण बीड जिल्हा हा पश्चिम महाराष्ट्राला ऊसतोड मजुर पुरविणारा जिल्हा ओळखला जात

होता. येथिल शेतकऱ्यांच्या हातातील ऊसतोडीचा कोयता कायमचा टाकुन देऊन येथील शेतकरी हा स्वतःहा बागायतदार झाला पाहिजे ही जबरदस्त महत्वकांक्षा आण्णांची होती. त्या दृष्टिने त्यांनी विविध नविन प्रकल्पाची निर्मिती केली व सिंचन क्षेत्र वाढवले.

बीडकरांना सतत भेडसवणारा पाण्याचा प्रश्न माजलगाव बॅक वॉटर योजना कार्यान्वीत करुन कायमचा सोडवला. बीड मध्ये नगर परिषदेची भव्य इमारात बांधली, वातावरण कुलीन यशवंतराव चव्हाण नाटयगृह बांधले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण केले. क्रिडा संकुलाचा विकास केला या बाबींमुळे बीड शहराच्या वैभावात भर पडली जयदत्त क्षीरसागर यांनी २००४ साली झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत चौसाळा मतदार संघातुन जवळपास ७६-७७ हजार मते घेतली होती पण अल्पश : दोन ते अडीच हजार मतांनी अण्णांना भाजपाचे केशवराव आंधळे यांच्याकडून पराभव परत स्वीकरावा लागला विकास कामे करुन सुध्दा जातीवादी समिकरणे विरोधकांनी जुळवून डाव साधला याही पराभवांनी खचुन न जाता आण्णांनी गोरगरीबांची कामे आहोरात्र केली. पक्षाचे संघटन वाढवले. पक्ष वाढवला व शरदचंद्र पवार यांचे हात बळकट केले. सन २००९ साली परत बीड विधानसभा मतदार संघातुन आण्णांनी निवडणूक लढवली मतदार संघाच्या पूर्णररचनेत चौसाळा हा मतदार संघ नाहीसा होऊन चौसाळा हे सर्कल बीड विधानसभा मतदार संघात समविष्ठ करण्यात आले व या मतदार संघातुन प्रचंड मतानी अण्णा विजयी झाले. व पहिल्या यादीमध्ये कॅबीनेट मंत्री म्हणून महाराष्ट्राच्या मंत्री मंडळात आण्णांचा मुंबई येथे राजभवनात शपथविध झाला. अनेकांनी आनंदोत्सव साजरा केला बीडमध्ये आणि जिल्हाभरात दिवाळी साजरी झाली. अण्णांच्या गुणवत्तेची साक्ष देणारा एक प्रसंग १९९७ साली अशोकराव पाटील हे राज्यमंत्री असताना बीड येथे काँग्रेसचे केंद्रीय नभोवानी मंत्री व काँग्रेसचे नेते मा. अजितजी पंजा हे एक कार्यक्रमासाठी बीडला आले होते त्यावेळी त्यांनी आपले भाषण इंग्रजी भाषेमध्ये केले होते लोकांची अडचण लक्षात घेवुन त्या भाषणाचा मराठीत अनुवाद रुपांतरीत करुन तो मांडला होता. यातुन त्यांच्या हुशारीची व अभ्यासवृत्तीची चुनुक बीडकरांनी अनुभवली होती[४१].

जयदत्त क्षीरसागर हे अनेक वेळा विरोधकांना सुध्दा व्यवस्थित हाताळतात त्यांचे कामे करुन त्यांना आपलेसे करुन घेत असत. त्यामुळे विरोधक ही त्यांना मानतात. एकदा एखादा माणूस काही

कामानिमित्त संपर्कात आला की तो कायमचाच अण्णांबरोबर रहात असे. त्यामुळेच अनेक जीवाची माणसे जोडली व यशस्वी राजकीय वाटचाल चालू ठेवली. बीड जिल्हयातील हजारो बेरोजगारांना रोजगार सहकाराच्या माध्यमातुन मिळवून दिला आहे. साखर कारखाना, तालुका दुधसंघ, सुतगिरणी, खरेदी विक्रि संघ, बाजार समिती, बँक, ग्राहक भांडार, कुक्कुटपालन इ. सहकाराच्या माध्यमातुन लोकांना रोजगार, कामधंदा, नौकऱ्या प्राप्त झाला आहे. या शिवाय शाळा कॉलेज, वैद्यकीय महाविद्यालय, कृषी विद्यालय, बी.पी.एड., एम.पी.एड., सैनिकी शाळा, डी.फार्मसी, फुड टेक्नॉलॉजी या माध्यमातून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यातून हजारो तरुणांना नौकऱ्या मिळाल्या आहेत.

### ३.९ जयदत्त क्षीरसागर यांनी केलेली विकास कामे :-

बीड जिल्हयाची भौगोलिक संरचना पाहता कोरडे हवामान कमी पर्जन्यवृष्टी, सतत अवर्षणग्रस्त, डोंगरदऱ्यांचा प्रदेश, कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ अशा नैसर्गिक हेलकाव्यात स्थिर होऊ पाहणारा, बीड जिल्हा होय. औद्योगिक,क्रीडा, शैक्षणिक, सांकृतिक, सिंचन, सहकार, सार्वजनिक आरोग्य, दळणवळण आदी गोष्टीत ना प्रगती ना अधोगती अशा संक्रमण अवस्थेतुन जाणारा जिल्हा आहे. शासकीय योजनांसंबंधी जनमाणसात असलेले अज्ञान निसर्गावर अवलंबुन असणारी शेती, जोड धंदे नसल्याने निसर्गाच्या कृपेवर अवलंबुन असलेला शेतकरी, उपजिविका म्हणुन साखर कारखान्याला ऊसतोड मजुर म्हणुन जाणारा इथला शेतकरी यामुळे महाराष्ट्राच्या नकाशावर ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणुन ओळखला जातो. स्वातंत्र्यपुर्व काळात गुलामगिरी स्वातंत्र्यानंतर अज्ञानाची गुलामगिरी अशी परिस्थिती असलेल्या जिल्हयाला अज्ञानाच्या गुलामगिरीला छेद देण्यासाठी विकास गंगेच्या रुपाने नवगण राजुरीच्या तत्कालीन सरपंच सौ. केशरबाई क्षीरसागर यांचा उदय झाला. सरपंच ते आमदार व तीन वेळेस खासदार असा दिर्घ प्रवास, जिद्द, अविरत परिश्रम, शासकिय योजनांचा अभ्यास सततचा पाठपुरावा, शैक्षणिक दुरदृष्टी जनसामान्यासाठी कळवळ यामुळे बीड जिल्हयाच्या विकासाला सुरुवात झाली. या वाटचालीत त्यांनी जिल्हयाभरात शिक्षण संस्थांचे बिजारोपण केले. सहकारी संस्थांची निर्मिती केली. गजानन सहकारी साखर कारखाना स्थापन करुन अशिया खंडातील पहिल्या महिला संस्थापक अध्यक्ष होण्याचा मान काकुंना मिळाला. गजानन नागरी सहकारी बँक, गजानन सहकारी सुतगिरणी, तालुका दुध संघ आदीच्या स्थापनेमुळे जिल्हयातील शेतकरी, शेतमुजरांचा अर्थिक स्तर

उंचावला. कृषी उत्पन्न बाजार समितीत विविध योजना राबवुन शेतकऱ्यापासुन व्यापाऱ्यापर्यंत सर्वांनाच विकासाच्या प्रवाहात सामिल केले. जिल्हयाचा रेल्वे प्रश्न मार्गी लावण्यासाठी काकुंनी सतत पाठपुरावा केला. त्या खासदार असतांना त्यांनी रेल्वे मार्गासाठी प्रयत्न करुन मंजुरी मिळवुन घेतली. त्यानंतर संसदेत पहिल्यांदाच अधिकृत तरतुद केली गेली. बीड व अंबाजोगाई येथे दुरदर्शन प्रक्षेपण केंद्र उभारणी, बीड आकाशवाणी केंद्राची उभारणी त्यांच्याच काळात झाली शेवटच्या क्षणापर्यंत बीड जिल्हयाच्या विकासाचा ध्यास काकुंनी घेतला होता.

जयदत्त क्षीरसागर यांच्या रुपाने बीड जिल्हयाला काकुंच्या मार्गदर्शनाखाली एक विकास पुत्र मिळाला. जनसामान्यासाठी कनव, विकासात्मक दुरदृष्टी, कर्तत्वाची जाणीव बाळगणाऱ्या जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी अल्पावधीतच महाराष्ट्राच्या राजकारणात आपला ठसा उमटविला. पंचायत समितीचे सभापती ते ऊर्जा मंत्र्याच्या पदापर्यंत गरुड झेप घेत असतांना सामाजिक विकासाची कास हाती धरुन जिल्हयांच्या विकासाची कामे पार पाडली. दीन–दलितांच्या हाकेला धावुन जाणारा सामाजिक न्यायासाठी धडपड करणारा सामान्यांच्या आदरास पात्र असलेला पुरोगामी दृष्टीकोन बाळगणारा भविष्याचा वेध घेणारा उच्च विद्या विभुषित एक शिस्तप्रिय लोकनेता म्हणुन अण्णांची प्रतिमा जिल्हयात आहे[४२].

नियोजनबध्द पध्दतीने विकासकामांची आखणी करीत मतदारसंघाबरोबरच बीड जिल्हयाच्या सर्वांगीण विकासासाठी जयदत्त क्षीरसागर यांनी प्रयत्न केले आहेत.

### १) औद्योगिक विकासाला प्राधान्य :–

बीड जिल्हयातील धारुर येथे औद्योगिक क्षेत्रासाठी जमीन खरेदी तसेच आष्टी, पाटोदा, धारुर या तालुक्याच्या ठिकाणी उद्योगाला चालना मिळण्यासाठी औद्योगिक क्षेत्र स्थापन केले. बीड मतदार संघात औद्योगिक क्षेत्रासाठी २२ कि.मी. रस्त्यांची निर्मिती केली. विविध योजने अंतर्गत औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी २ कोटी २९ लाख रुपये निधी जिल्हयात खेचुन आणला. चौसाळा येथे औद्योगिक क्षेत्रास मंजुरी देवुन त्यास सिल्वर झोन म्हणुन घोषित करण्यात आले. हे क्षेत्र डी प्लस या दर्जामध्ये वर्गीकृत केल्याने चौसाळा परिसरातील उद्योजकांना सुवर्णसंधी मिळाली. तत्कालीन मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख यांच्या बरोबर औद्योगिक क्षेत्रात परदेशी गुंतवणुक वाढविण्यासाठी अण्णांनी

परदेश दौरा केला. मराठवाड्यात औरंगाबाद येथे स्कोडा प्रकल्प, रांजगाव औद्योगिक क्षेत्रातील परदेशी कंपन्यांनचे प्रकल्प येण्याचे श्रेय या समितीला जाते. यात त्यांचा सिंहाचावाटा आहे.

**२) आपदगस्तांना मदत :**

अतिवृष्टी मुळे अपघात होऊन मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसदारांना शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या मदतीत ६५ मिलीमिटर पवसाच्या नोंदीचे निकष जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रयत्नातुन बदलेले आहेत. शासनस्तरावर आता ६५ मिलीमिटरची अट मिलीमिटर पेक्षा कमी पाऊस पडूनही अपघात झाल्यास आपदग्रस्तांना शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या मदतीचा लाभ महाराष्ट्रातील जनतेला झालेला आहे. बीड जिल्ह्यात पर्जन्यमान कमी असले तरी वीज पडल्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे जिल्ह्यात ठिकठिकाणी वीज पडण्याची कारणे सतितीच्या मार्फत शोधुन त्या ठिकाणी वीजरोधक यंत्रणा बसविल्याचे काम आणि त्यावर नविन तंत्रज्ञान विकसित करण्याचे प्रयत्न वरिष्ठ पातळीवरुन झालेले आहेत.

**३) दळणवळण विषयक कामे :-**

बीड शहरात खंडेश्वरी व नगररोड येथे नविन बसस्थानकाची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे बीडचे मध्यवर्ती बसस्थानक भव्य स्वरुपाचे होणार आहे. शहरातील वाढती वाहतुक समस्या सोडविण्यासाठी बार्शी रोड ते जालना रोड असा उड्डानपुलाचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. तसेच रेल्वेच्या भु-संपदनाच्या कामाला गती मिळाली आहे. बीड बाह्यवळण रस्ता (बायपास) हि सर्व कामे पुर्ण होत आहेत. सोलापुर-धुळे-औरंगाबाद च्या चौपदरीकरणास मंजुरी मिळाली असुन काम चालु झाले आहे. यामुळे मुख्यबायपास नामलगाव फाटा, नवामोंढा, सामनापुर फाटा बार्शी रोड असा झालेला आहे. बीड शहराच्या दोन्ही बाजुस आनंतवाडी, रामतीर्थ, तेलगावनाका ते रिलायन्स पेट्रोलपंप कॅनॉल रोड धानोरा पाली असे दोन छोटे बाह्यवळण रस्ते केले आहेत[४३].

१९९९ ते २००४ या काळात त्यांनी उदा. किलोमिटरच्या १९७ रस्त्यासाठी ४० कोटी ५५ लक्ष रुपयांची कामे पुर्ण केली. तर ३२५ नवीन रस्त्यांची निर्मिती करुन ३० कोटी रुपयांचा निधी मंजुर करुन घेतला. मांजरसुंबा, लोखंडी सावरगाव या रस्त्यांसाठी ३ कोटी रुपये खर्च करण्यात आले. भाविकांच्या सोयीसाठी चाकरवाडी येथे १५ लक्ष रुपये खर्चुन हॉटमिक्स रस्ता तयार करण्यात आला. मराठवाडा वैद्यानिक विकास महामंडळाकडुन शाळा खोल्या, सभागृहे, सिमंट रस्ते, डांबरीकरण, व्यापारी संकुल,

रस्त्यावरील पुले, यासाठी २ कोटी रुपये उपलब्ध करण्यात आले. धारुर शहरास तालुक्याचा दर्जा मिळवून देऊन तालुक्याला ३९ गावे जोडून दिली.

### ४) नवीन तालुक्याची निर्मिती :-

युती सरकारच्या काळात ५२ गावांना तोडून वडवणी तालुक्याची निर्मिती केली होती. त्यानंतर जयदत्त क्षीरसागर यांनी मोठा संघर्ष करुन ६७ गावांचा समावेश करुन परत धारुर तालुक्याची निर्मिती केली. व बीड तालुक्यातील वडवणी तालुक्यात १९ गावे समाविष्ट करण्यात आली होती ती पुन्हा बीड तालुक्यात समाविष्ट केली. जिल्ह्यातील जहांबिरमोहा, चोंराबा, जिवाची वाडी, तुकोचीवाडी, गवरवाडी, घाटेवाडी, बेलखंडी, नागझरी, पाटोदा, कर्झणी आदी १५ गावांचा डोंगरी भागात समावेश करुन डोंगरी विभागाला मिळणाऱ्या सवलती मिळवून समावेश करुन डोंगरी विभागाला मिळणाऱ्या सवलती मिळवून दिल्या. याचा फायदा शैक्षणिक व शासकीय कामात होत आहे.

### ५) सिंचनक्रांतीचे पर्व सुरु केले :

जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांना ऊसबागयतदार द्राक्ष बागायतदार बनविण्यासाठी जयदत्त क्षीरसागर आण्णांनी सत्तेत असो वा नसो सतत विकासाचा ध्यास घेतला आहे. बीड जिल्ह्यात सिंचनाचे मोठे क्षेत्र निर्माण केले आहे. शेतकऱ्यांसाठी विकासाच्या विविध योजना राबविल्या शेतकरी संपन्न कसा होईल याकडे त्यांनी जाणीव पुर्वक लक्ष दिले. यामुळे जिल्ह्यात हरितक्रांतीचे पर्व सुरु झाले. कुर्ल, तांदुळवाडीघाट, पिपंळवाडी, वडगाव, कळसंबर, आरणवाडी जाधवजवळा, तुकाचींवाडी, सारणी सांगवी, लिंबाचीवाडी, देठेवाडी, जिवाचीवाडी, चिखल, बीड डोकेवाडी, लोकरवाडी, घागरवाडा, चारदरी व धारुर साठवण प्रकल्पाची मंजुरी मिळवून कामे पूर्ण केलेली आहेत. त्यासाठी १४२ कोटी व लक्ष रुपयाचा मंजुरी देण्यात आली असुन त्यासाठी १९ लक्ष रुपयाची तरतुद करण्यात आली शिरुर तालुक्यात डोंबरी प्रकल्प, सिंदफना प्रकल्प हे पूर्ण करण्यात आले आहेत. अधिक सिंचनासाठी पून्हा प्रकल्पाची उंची वाढविण्यात आली[४४].

प्रकल्यामुळे १५ हजार ८०७ एकर जमीन सिंचनाखाली आली आहे. वडगाव, भांगारवाडी, येथील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी १८ कोटी ३ लक्ष रुपयांचा निधी लागला आहे. तांदुळवाडी घाट, कुक्कडगांव कोल्हापुरी बंधारा नाथापूर आदी ठिकाणाच्या प्रकल्पासाठी त्यांनी ८८ कोटी रुपयांची तरतुद

केली. चौसाळा मतदार संघातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी ८७ गावांना १ कोटी ५८ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला या सर्व कामांमुळे जिल्हात हरितक्रांतीचे पर्व सुरु झाले. दुष्काळ दृष्य परिस्थीतवर मात करण्यासाठी अण्णांनी  तात्काळ शासन दरबारातुन निधी खेचून आणला व जिल्ह्याचे पशुधन वाचविले. दुष्काळावर मात करण्यासाठी कृत्रिम पाऊस पाडल्याचा आग्रह धरला या कृत्रिम पावसामुळे त्यावेळी पिकाला जीवनदान मिळाले. भुविकास बँकेचे अध्यक्ष असतांना त्यांनी बँकेमार्फत आधुनिक शेतीसाठी व शेतकऱ्यांच्या विकासासाठी १० वर्षात ८० कोटीचे कर्ज वाटप केले. पिण्याच्या पाण्यासाठी जिल्ह्यात ३० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला व पाणी टंचाईवर मात केली मन्यारवाडी, येळंबघाट, कोरडेवाडी, येवता, डंबरी सांडबाव,चांदणी वडगांव आदी गावांना सार्वजनिक विहिरींचे काम करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देऊन पाणी प्रश्न सोडविण्याचे काम केले शेतीला पुरक उद्योग शेतकऱ्यांनी सुरु केले पाहिजेत या जाणीवेतुन बीड तालुका दुध संघाची निर्मिती केली दुधाळ जनावरे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करुन त्यांना कर्ज उपलब्धकरुन देण्यात आले. सध्या परिस्थितीत दुध संघात प्रति दिनी ३५ हजार लिटर दुध संकलन केले जाते मंजरी फाटा येथे दुध संघाचे शितकरण केंद्राची भव्य वास्तु आहे. जिल्ह्यामध्ये २६ ठिकाणी शीतकरण  केंद्र उभारण्यात येत आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीकडे विशेष लक्ष देवून शेतकऱ्यांचे हित जोपासले मोंढयास वारंवार भेटी देवून विविध विकास कामे कार्यन्वीत केली.

हमाल मापाडयांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय अंतर्गत पथदिवे, व्यापारासाठी दुरध्वनी, घर बसल्या दुरध्वनीवर बाजारभाव कळण्याची सोय उपलब्ध करुन दिली. कार्यालयाचे संगणीकरण करण्यात आले. आज बीड कृषी उत्पन्न बाजार समिती दिमाखदारपणे उभी आहे. पुर्ण यार्डास तार कंपाऊड असुन कार्यालयास स्वतंत्र इमारत आहे. पाण्याची टाकी अंतर्गत विद्युतीकरण, स्वच्छता गृह, गेट, नाली, बांधकाम, पथदिवे, पाणी पुरवठ्यासाठी स्वतंत्र विहिर, अंतर्गत जलवाहिनी, सिमेंट रस्ते तयार करण्यात आले आहेत. चौसाळा, नेकनुर, पिंपळणेर या सुसज्ज अशा उपबाजार पेठा निर्माण केल्या, ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत १००० मेट्रीक टन क्षमतेचे ४ गोदामाचे बांधकाम पुर्ण केले आहे. तर शेतकऱ्यांच्या नाशवंत माल टिकवण्यासाठी कोल्डस्टोरेज उभारण्यात आला आहे. बँक, पोस्ट ऑफिस, पोलिस चौकी, कँटींग, शेतकरी निवास प्राथमिक आरोग्य केंद्र आदी कामे प्रगती पथावर असुन शेतकऱ्यांच्या

कापसासाठी ४० टन भुईकोटा बसविण्यात आला आहे. शेतमाल तारण कर्ज अंतर्गत आता पर्यंत अनेक शेतकऱ्यांना लक्षावधी रुपयांचे वाटप झाले आहे. फलोत्पादक शेतकऱ्यांना आपला माल जास्त दिवस ठेवण्यासाठी मार्केट यार्डन अद्यावत असे शितगृह बांधण्याचा प्रस्ताव हाती घेण्यात आला आहे. शेतकरी कसा सधन होईल याकडे अण्णा जाणिवपुर्वक प्रयत्न करतात[४५].

## ६) सांस्कृतिक चळवळीचे आधारवड :-

आज मराठवाड्याच्या सांस्कृतिक चळवळीचे केंद्रस्थान म्हणुन बीड जिल्हयाचे नाव अग्रेसर होत आहे. बीड जिल्हयाची तशी नाट्य परंपरा ही स्वातंत्र्यापुर्व अधिची आहे. तेव्हापासुन आजपर्यंत ती अविरतपणे परंतु काळानुरुप स्थित्यांतरे आत्मसात करत चालुच आहे. वीस बावीस वर्षापुर्वी बीड जिल्हयातील नाट्य चळवळ ही हौशी प्रकारची होती. तरी ही त्या काळी काही व्यवसायिक नाटके व्यवसायिक म्हणुन उभी केली गेली. त्याकाळी पुणे- मुंबईची व्यवसायिक नाटके बीडमध्ये अत्यल्प प्रमाणात येत असत. न.प.चे खुले नाट्यगृह किंवा चंपावती क्रिडा मंडळाच्या हॉल मध्ये ही नाटके सादर केली परंतु पाहिजे तसा प्रेक्षकवर्ग नाटकाकडे आकर्षिला जात नव्हता. यामुळे ही नाटके हौशीच राहिली. मुंबईच्या दर्जाची नाटके बीडमध्ये सादर करण्याची ताकद फार कमी कलावंतामध्ये होती. नाटक उभारण्यासाठी लागणारा पैसा व ताकदीचे जिल्हयातील कलावंत होती परंतु ते वलयांकित नव्हते हेही एक कारण असु शकेल.

नाट्यगृहाची मागणी कलावंत जयदत्त(अण्णा) क्षीरसागर यांच्याकडे करीत होती. ही महत्वाची बाब बीड जिल्हयाच्या सर्वांगिण विकासाचे नेते अण्णा यांच्या नजरेतुन सुटली नाही. आधी कलावंत तयार व्हावा व तो शास्त्रीय दृष्टया शिक्षीत व्हावा यासाठी १९९८ साली के.एस.के. महाविद्यालयात नाट्यशास्त्र व संगित विभागाची स्थापना केली. या मुळे रंगकर्मींना प्रत्यक्ष प्रयोग, व्याख्याने, कार्यशाळा, रंगकर्मींच्या मुलाखती, परिसंवाद, चर्चासत्रे, शिबीर आदी व्दारे नाटकाचे शास्त्रशुध्द शिक्षण मिळु लागले यामुळे हौशी रंगभुमीवरील कलावंत व नाट्यशास्त्र विभाग यांच्यामुळे जिल्हयातील जनसामान्य रसिकात नाट्यविषयक आपुलकी तसेच सामाजिक परिवर्तनासाठी सांस्कृतिक चळवळीची गरज या विषयी आत्मविश्वास वाढीस लागला. जिल्हयातील कलावंत स्वबळावर सादर करण्यासाठी तंत्रशुध्द रंगमंच तयार नव्हता नाटयगृहाची मागणी काळानुरुप गरज ओळखुन अण्णांच्या मार्गदर्शनानुसार नगर

परिषदेच्या माध्यमातुन महाराष्ट्राचे एकमेव अव्दितीय असे यशवंतराव चव्हाण नाट्यगृह उभारले यासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी शासन दरबाजातुन खेचुन आणला.

नाट्यगृह झाल्यामुळे पुण्यामुंबईची व्यवसायिक नाटकाचे प्रयोग शहरात होवु लागले व त्याला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद हि मिळु लागला त्यामुळे जिल्हयातील सांस्कृतिक चळवळ फोपावल्यास मदत झाली. व्यवसायिक कलावंतही या नाट्यगृहाची तोंड भरुन स्तुती करतात दर्जेदार कलाकृती यामुळे रसिकांनी पहायला मिळु लागल्या. जिल्हयाच्या नाट्य रसिकांची सांस्कृतिक भुक भागविण्याचे काम नाट्यगृहाच्या रुपाने कलारसिकांचे केले. एवढेच नाहीतर नाटय रसिकांचा कुंभमेळा ज्याला संबोधता येते. त्या मराठी ८९ व्या अखिल भारतीय नाटय संमेलनाचे आयोजन त्यांनी केले. व नाटय संमेलनाचे स्वागताध्यक्ष पदही भुषविले इतिहासात हे नाटय संमेलन न भुतो न भविष्यती असे पार पडले. अतिभव्य अशा चार रंगमंचाची निर्मिती शंभर पेक्षा जास्त विविध स्टॉल देशभरातुन आलेल्या कलावंताची, रसिकांची सुनियोजीतपणे केलेली व्यवस्था, भोजनाची व्यवस्था, वाहतुकीची व्यवस्था, दर्जेदार कलाकृती, परिसंवादासाठी निवडलेले तात्कालीन विषय, भव्य शोभा यात्रा, शहिदांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करत नाट्य संमेलनाच्या चार प्रवेश व्दारास शहिदांचे नावे दिले. जिल्हयाच्या सांस्कृतिक वारसा जपण्यातही ते नेहमीच अग्रेसर असतात म्हणूनच कलावंत त्यांना जिल्हयाच्या सांस्कृतिक चळवळीचे आधारवड म्हणतात[४६].

### ७) पर्यटन विकास :-

पर्यटन विकासात बीड जिल्हयात जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या अगोदर कोणीही पर्यटन विषयक काम केलेले दिसुन येत नाही. मात्र जयदत्त क्षीरसागर यांनी बीड जिल्हयातील पर्यटन क्षेत्र वाढावे यासाठी जाणीवुर्वक लक्ष दिल्याचे दिसुन येते. पर्यटन विकास खात्यामार्फत महाराष्ट्राचे आरध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान असलेला ऐतिहासिक शिवनेरी किल्ला, अष्टविनायक, सिंदखेड राजा राज्यातील पाच ज्योतिर्लिंग यांच्या विकासासाठी तसेच जिल्हयातील गहिनीनाथ गड, नारायण गड, नवगण राजुरी, अंबाजोगाई, परळी वै. आदी ठिकाणच्या तिर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन दिला. पर्यटन खात्यासाठी केवळ ११ कोटींची तरतुद असतांना त्यांनी राज्याच्या अर्थसंकल्पात पहिल्यांदाच १०० कोटी रुपयांची भरीव तरतुद मिळवुन दिली. परदेशी पर्यटकांसाठी

डेक्कन उडीसा ट्रेनची व्यवस्था केली. दुर्लक्षित असलेल्या या खात्यामधुन सुध्दा एवढी विकासाची कामे केली जाऊ शकतात हे त्यांनी दाखवुन दिले.

## ८) ऊर्जा प्रकल्प विषयक कामे :-

विजेची समस्या सोडवण्यासाठी शहरात बार्शी नाका, नाळवंडी रोड, जालना रोड अशा ती ठिकाणी ३३ के.व्हि उपकेंद्राच्या प्रस्तावाला मंजुरी आणुन ते कामे पुर्ण केली आहेत. घाटसाळवी, पिंपळवाडी, वाढवणा, बेलगाव येथिल केंद्राची कामे पुर्ण झालेली आहेत. मांजरसुंबा येथेहि २००९ मध्ये १३२ के.व्ही विद्युत उपकेंद्राची उभारणी केली आहे. तर राजेगाव, मानुर, बाभुळगाव येथे ३३ के.व्हि उपकेंद्र मंजुर करुन त्यावर ८ कोटी रुपयांची तरतुद केली आहे. शेतकऱ्यांचे २००८ मध्ये विजबिल माफ करण्याच्या निर्णयात त्यांनी महत्वाची भुमिका बजावली होती. वीज बचतीसाठी पवनचक्कीच्या माध्यमातुन अपारंपारीक ऊर्जा स्त्रोत निर्माण करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला . बीड जिल्हयातील सौताडा परिसरात पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी मेडा मार्फत सर्व्हे करण्यात आला असुन जागा निश्चित करण्यात आली आहे. तसेच जिल्हयातील बीड, धारुर आणि वडवणी तालुक्यातील डोंगराळ भागात पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी साध्य-साध्यता अहवाला तयार करण्यात आलेला आहे.

## ९) दुष्काळ परिस्थितीवर मात :-

दुष्काळ सद्: परिस्थितीवर मात करण्यासाठी कोट्यावधी रुपयाची गरज असतांना तत्कालीन केंद्र सरकारने ७५ कोटी रुपयाची तुटपुंजी मदत केली होती. या तुटपुंज्या निधिमध्ये जनावरांच्या छावण्या, पशुसंवर्धन होऊच शकत नव्हते. बीड जिल्हयात परिस्थिती बिकट होती. अण्णांनी छावण्यासाठी निधी खेचून आणला व जिल्ह्यातले पशुधन वाचवले या छावण्यावर ३४ कोटी रुपये खर्च करण्यात आले दुष्काळावर मात करण्यासाठी सरकारकडे कृत्रिम पाऊस पाडण्याचा आग्रह धरला व मराठवाड्यात जेथे दुष्काळ सदृष्य परिस्थिती होती त्या ठिकाणी ढगामध्ये विमानाव्दारे रसायनिक द्रव्य सांडुन कृत्रिम पाऊस पाडला. त्याकाळी पिकाला जिवदान मिळाले. आज अशा प्रयोगांची नितांत गरज आहे. भुविकास बँकेचे अध्यक्ष असतांना त्यांनी बँकेमार्फत आधुनिक शेतीसाठी व शेतकऱ्यांच्या विकासासाठी दहा वर्षात ८० कोटींचे कर्ज वाटप केले.

पिण्याच्या पाण्यासाठी जिल्हयाला ३० कोटी ७५ लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करुन पाणी टंचाईवर मात केली. मन्यारवाडी, येळंबघाट, कोरडेवाडी, येवता, उमरी, सांडगांव, चांदणी, बोटगांव अशा अनेक गावांना सार्वजनिक विहिरींचे कामे करीता ४१ लाख रुपये मंजुर करुन पाणी टंचाईवर मात करण्याचा प्रयत्न केला. बीड शहराच्या पाणी प्रश्नावर कायमस्वरुपी उपाय योजना म्हणुन माजलगांव बॅक वॉटर योजनेचा प्रस्ताव शासनाकडे पाठवुन त्यास मंजुरी मिळवली यावर ९५ कोटी रुपये खर्च करण्यात आले व वेळीच ही योजना पुर्णत्वास नेली या महत्वकांक्षी योजनेचा बीड वासियांना फायदा झाला व पिण्यच्या पाण्याचा गंभीर प्रश्न कायमस्वरुपी दुर झाला.

परंतु शहरालगत राहणाऱ्या वासनवाडी, बहिरवाडी या ग्रामपंचायत हद्दीतील जवळपास ४० हजार नागरीक राहतात. या ठिकाणी सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. मात्र जिल्हा परिषदेने या भागाकडे लक्ष दिले नाही. पाण्याची समस्या गंभीर होत गेली. पाण्यासाठी तलवारबाजी होऊ लागली. कित्येक वर्षापासून या भागातील नागरीक टॅकरवर अंवलंबुन होते यासाठी दरवर्षी शासनाचा २ कोटी रुपये खर्च होत होता परंतू टँकर वेळेवर कधीच येत नव्हते टँकरची वाट बघत महिला भगिनींचा दिवस जायचा शहरात मुबलक पाणी मिळाल्यानंतर शहरालगतच्या ग्रामीण भागाला पाईप लाईन टाकून पाणी पुरवण्यासाठी नगरध्यक्षांनी प्रस्ताव तयार करुन तो आण्णांकडे दिला तो शासन दरबारी मंजुरी मिळवून घेतली आज तीन मोठ्या जलकुंभातुन या भागाला मुबलक पाणी पुरवठा होत आहे.

**१०) बांधकाम विषयक कार्ये :-**

धार्मिक सामाजिक व सांस्कृतिक कार्यासाठी विविध ठिकाणी सभागृहांची निर्मिती केली बिंदुसरा नदीच्या पात्रात नगर पालिकेच्या सह्याने पुर संरक्षण भिंत बांधुन महापुरात होणारी कोट्या वधीची हानी टाळली शहरातील दारिद्रय रेषे खालील मासवर्गीय बांधवासाठी म्हाडा वाल्मीकी आंबेडकर योजनेतुन दोनशे त्र्याहत्तर (२७३) इतक्या घरांची निर्मिती करुन आठशे तीस (८३०) नवीन घरांना मंजुरी मिळवून दिली. शहरात तीन मोठे व्यापारी संकुले उभारल्याने युवकांना रोजगारची संधी उपलब्ध झाली. जिल्ह्यातील खेळाडुंना प्रोत्साहन मिळावे यासाठी विभागीय विद्यापीठीय राष्ट्रीय क्रिडा स्पर्धांचे आयोजन जिल्ह्यात केले. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून गुणवंताच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन प्रतिवर्षी

केले जाते. जिल्ह्यात उत्कृष्ट खेळाडू निर्माण करण्याच्या दृष्टीने बीडच्या छत्रपीत शिवाजी महाराज क्रिडा संकुलात खुले प्रेक्षागृह जिमनॉस्टिक हॉल वसतीगृह प्रशस्त कार्यालये व विविध खेळांसाठी मैदाने तयार करण्यात आली  यासाठी सुमारे ४/२ कोटी रुपये खर्च करण्यात आला शहरात भव्य रस्ते हायमॉस्ट लॅम्प, सभागृह हे शादी खाने बाह्यरुग्न विभाग चा बाबीवर २००४-२०१० मध्ये १० कोटी रुपये खर्च करुन कामे पूर्ण करण्यात आली राष्ट्र पुरुषांच्या पुतळ्यांचे सुशोभिकरण करण्यात आले तर राजमाता अहिल्यादेवी होळकर आणि महात्मा ज्योतीबा फुले, राजमाता जिजाऊ यांचे पुतळे उभारण्यात आले जिल्ह्याची सांस्कृतिक चळवळ गतीमान व्हावी यासाठी तब्बल पाच (५) कोटी रुपये खर्चून अद्यावत अशा यशवंतराव चव्हाण नाट्यागृहाची उभारणी केली.

बीड शहरात नगर पालिकेची भव्य इमारत उभारण्यात  आली. असून सुमारे २४७५ चौ. मी. भुखंडावर १८७८ चौ.की. एवढे बांधकाम आहे. इमारतीत तळमजल्या व्यतिरिक्त दोन मजले आहेत अध्यक्ष उपाध्यक्ष मुख्याधिकारी यांचे प्रशस्त दालने आस्थापना विभाग व स्टोअर रुम तर पहिल्या मजल्यावर सभापतींची दालने आहेत. शहरात दारिद्रय रेषेखालील महिलांच्या उत्किर्षासाठी बचत गटांची स्थापना करण्यात आली एक वर्ष पूर्ण झालेल्या बचत गटांना प्रत्येक १० हजार रुपये देऊन समुह उद्योग उभारणीसाठी सहकार्य करण्यात आले या अंतर्गत व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण देण्यात आले.

नागरी रोजगार योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील लाभार्थी जेथे जास्त आहेत अशा ठिकाणी खडीकरण दगडी नाले बांधकाम हाती घेऊन दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला सार्वजानिक स्वच्छतेच्या दृष्टिकोनातुन एकत्मिक शहर विकास योजने अंतर्गत घानकचरा व्यवस्थापन व गांडुळ खत निर्मिती प्रकल्प उभारल्यात येत आहे. यासाठी ३४ लक्ष रुपयांची शासनाने मंजुरी दिलेली आहे. शहराबाहेर नवीन  कत्तलखाना मंजुर करुन त्याचे काम पुर्ण झालेले आहे. तसेच शहरात विविध ठिकाणी वाल्मीक आंबेडकर आवास योजना निर्मल भारत अभियाना आदी योजना राबविण्यात आल्या.

शहरातील फळविक्रेत्यांची अडचण लक्षात घेऊन, फळ व्यापाराला चालना देण्यासाठी नगर पालिकेने मालकीच्या जागेवर ४८ दुकाने बांधली आहेत. तेथे १२ मि. रुंदीचे पक्के रस्ते करण्यात आले. या बांधकामावर एकात्मिक शहर विकासनिधी मधुन १०६ लक्ष रुपयांचा खर्च करण्यात आला आहे.

या खास बाग परिसरामध्ये २० गाळ्यांची दुकाने (शॉपींग सेंटर) बांधण्यात आली. यासाठी ३० लक्ष इतका खर्च करण्यात आला. सुवर्ण जयंती शहरी योजने अंतर्गत बचतगट योजना, जनश्री विमा योजना, प्रशिक्षण योजना, स्वयंरोजगार योजना , महिला व बाल विकास योजना राबविण्यात आल्या शहरातील रस्ते व नाल्यांचा विकास एकात्मिक शहर विकास योजनेतुन करण्यात आला. सर्व डी.पी. रस्त्यांचे हॉटमिक्सने डांबरीकरण करण्यात आले आहे. नागरिकांच्या विरंगुळयाची गरज लक्षात घेऊन पेठ बीड भागात बिंदुसरा नदी काठी दोन एकर जागेवर ६० लक्ष रुपयाचे उद्यानाचे काम सुरु केले. तर जेलच्या पाठीमागील जागेत उद्यानाचे काम पूर्ण झालेले आहे.

### ११) कृषी उत्पन्न समिती बीड :-

कृषी उत्पन्न बाजार समितीकडे विशेष लक्ष देऊन शेतकऱ्यांचे हित जोपासले मोंढ्यास वारंवार भेटी देऊन विविध विकास कामे कार्यान्वीत केली. हमाल-मापाडी यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली अंतर्गत पथदिवे, व्यापारासाठी दुरध्वनीची सोय, शेतकऱ्यांना घर बसल्या दुरध्वनीवर बाजारभाव कळण्याची सोय उपलब्ध केली. इंटरनेटव्दारे प्रमुख बाजारपेठेतील बाजारभाव मिळण्याची सोय ही उपलब्ध करुन दिली. कार्यालयाचे संगणकीकरण करण्यात आले. नव्या मोंढ्यामध्ये शेतीमालाच्या व्यवहारासाठी १११ गाळ्याचे बांधकाम पुर्ण करण्यात आले. यास व्यापाऱ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. याचठिकाणी किराणा दुकानाच्या गाळ्यांचे काम सुरु करण्यात आले.

आज बाजार समितीच्या पुर्ण यार्डास तार कंम्पाऊंड असुन कार्यालयास स्वतंत्र इमारत आहे. पाण्याची टाकी, अंतर्गत विद्युतीकारण, स्वच्छतागृह, नाली बांधकाम, पथदिवे, पाणी पुरवठ्यांची स्वतंत्र विहिर, अंतर्गत जलवाहिनी, सिमेंट रस्ते तयार करण्यात आले. चौसाळा, नेकनूर, पिंपळनेर या सुसज्ज अशा उपबाजारपेठा निर्माण करुन त्यांना सर्वसोयी उपलब्ध करुन देण्यात आल्या.

ग्रामीण गोदाम योजने अंतर्गत १ हजार मे.टन क्षमतेचे चार गोदामाचे बांधकाम पुर्ण केले गेले. बँक, पोस्ट ऑफिस, पोलीस चौकी, कॅन्टीन, शेतकरी निवास, प्राथमिक आरोग्य केंद्र आदी कामे प्रगती पथावर असुन शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी व कापसासाठी ४० टन भुईकोटा बसविण्यास आला आहे. यार्डात भाविकांसाठी गणपती मंदीराचे काम पुर्ण करण्यात आले. शेतमाल तारण कर्ज अंतर्गत आता पर्यंत अनेक शेतकऱ्यांना लक्षावधी रुपयांचे वाटप झाले. यार्डामध्ये अत्याधुनिक जिनिंग

प्रेसिंग उभारण्याचा प्रस्ताव मंजुर झाला आहे. यासाठी ५.२५ लक्ष रुपये खर्च तर कंम्पाऊंड वॉल साठी ८६ लक्ष रुपये खर्च अपेक्षित आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कापुस विक्रिसाठी मार्केट यार्डातील नव्याने उभारण्यात आलेल्या २.७४ लक्ष रुपयाचे टी.एम.सी. प्रकल्पाचे कापसासाठी प्रयोगशाळा, भुईकाटा, कापूस साठविण्यासाठी ओटे, शेतकऱ्यांसाठी विश्रामगृह, उपहारगृहे, जनावरांसाठी स्वतंत्र निवारा अशा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. आगिपासून संरक्षणासाठी कार्यालयाने स्वखर्चाने ६ हजार लि. क्षमतेचे अत्याधुनिक अग्नीशामन वाहन खरेदी केली आहे. त्यासाठी २२ लक्ष रुपयांचा खर्च केला गेला. तालुक्यातील फळ उत्पादक शेतकऱ्यांना आपला माल जास्त दिवस ठेवण्यासाठी मार्केट यार्डला अद्यावत असे शितगृह बांधण्याचा प्रस्ताव हाती घेण्यात आला असुन त्यावर ५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

### १२) काकु-नाना स्मृती समारोह :-

सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे जयदत्त क्षीरसागर यांनी काकु-नाना स्मृती समारोहाचे आयोजन करुन नेत्रशस्त्रक्रिया शिबीरात ९८८ अंधांना दृष्टी देण्याचे महत्वाचे कार्य केले आहे. या महोत्सवात व्यासंगी अभ्यासपुर्ण व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्र, नामसंकीर्तन, अन्नदान सत्कार समारंभाचे आयोजन केले गेले. या महोत्सवास लोकांचा प्रचंड सहभाग लाभला. यामुळे सांस्कृतिक व बौध्दिक भुक भागविण्याचे कार्य झाले. काकु-नाना प्रतिष्ठानने आयोजित केलेला सामुहिक विवाह सोहळा म्हणजे एक अविस्मरणीय क्षण, कौटुंबिक स्नेह, भव्यता, आर्थिक मदत, प्रचंड लोकसहभाग, सर्वधर्मियांना प्राधान्य रोषनाई व भोजन व्यवस्था पासुन ते वऱ्हाडास ने आण करण्या पर्यंतची आंतरीक तळमळ हा एक सामाजिक बांधीलकीचा आदर्श नमुना असतो.

### १३) तिर्थक्षेत्रांचा विकास :-

संत महंताच्या पदस्पर्शाने पुलकित झालेल्या बीड जिल्यात प्रसिध्द धार्मिकस्थळे विविध संस्थाने गड, मंदिरे, मशिदी, बौध्दविहार अशी अनेक धार्मिकस्थळे आहेत. त्या बाबतीत सकारात्मक दृष्टिकोन ठेवुन या स्थळांच्या विकासाला प्राधान्य दिले. सांस्कृतिक सभागृहे, सभामंडपाची उभारणी करुन जयदत्त क्षीरसागर यांनी सलोख्यासाठी सात्वीक प्रयत्न केले. तीर्थक्षेत्र विकास योजनेतुन विविध धार्मिक स्थळांचा समावेश करुन संबंधीत खात्यातुन जास्त फंड खेचुन आणला व सर्व धर्मसमभावाची पताका

हाती घेतली. जिल्हयातील तिर्थक्षेत्राच्या विकास निधितून महालक्ष्मी मंदीर, खंडेश्वरी देवी, शहीशाहवली, दर्गा, गुगळादेवी, ईट, आनंदगड, बंकटस्वामी संस्थान नेकनुर राक्षसभुवन, रामगड, इ. ठिकाणी विकासाचे कामे करुन तेथे हायमास्टलँम्प पथदिवे बसविले आहेत. जिल्हयातील गहिनीनाथ गड, नारायण गड, नवगण राजुरी, अंबाजोगाई आदी ठिकाणच्या तिर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन दिला.

## १४) रेल्वेमार्गासाठी प्रयत्न :-

नगर –बीड– परळी रेल्वेमार्ग हा जिल्हावासियांचा अस्मियतेचा प्रश्न तो मार्गी लावण्याचे उदिष्टे ठरवुन या कामास चांगली गती देण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. बीड जिल्हयातील २४० कि.मी अंतराच्या भुसंपादना पैकी १७८ कि.मी. पर्यंतचे भुसंपादन पुर्ण झाले असनु त्याचा ताबा रेल्वेकडे देण्यात आलेला आहे. जवळपास ४५ कोटी ८९ लाख रु. प्राप्त करुन देण्यात आले आहे. रेल्वेचा वर्षानु–वर्ष प्रलंबित राहीलेला हा प्रश्न अता मार्गी लागणार आहे. महत्वाचे म्हणजे रेल्वेमुळे बीड जिल्हयाच्या विकासाची रुकलेली गाडी रुळावर येण्यास मदत होणार आहे. रेल्वे मार्गावरील पुलांचे कामे हि हाती घेण्यात आली आहेत.

जयदत्त अण्णा क्षिरसागर यांच्या प्रयत्नांमुळे अनेक वर्ष्रा पासुन प्रलंबित असलेला हा प्रश्न त्यांनी सोडवलेला आहे. असे दिसुन येते.

## १५) विमानतळासाठी १५० एकर जागा उपलब्ध केली :-

बीड जिल्हयातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे जलद दळणवळणासाठी विमानतळ बीडला व्हावे यासाठी बऱ्याच दिवसांनी लोकांकडुन मागणी होत होती. मात्र त्यादृष्टिने खऱ्या अर्थाने जयदत्त क्षीरसागर यांनी सन २०१० मध्ये शासकिय पातळीवरुन पाठपुरावा करुन बीड जिल्हयातील कामखेडाटेंभी येथील १५० एकर जागेवर विमानतळ करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.त्या जमिनीची शासनाने पाहणी केली आहे. त्यासाठी जयदत्त क्षीरसागर यांनी वेळोवेळी शासनाचे लक्ष याकडे वळवून तो प्रश्न सोडवण्यासाठी प्रयात्न केलेले दिसून येतात.

अनेक दिवासापासूनची लोंकाची मागणी यारुपाने पूर्ण करण्यास ते यशस्वी झाले आहेत असे म्हणता येईल व बीड जिल्हा हा त्यामुळे आधुनिक जगाशी स्पर्धा करण्यासाठी सज्ज करण्यात त्यांचा मोठा वारसा आहे असे म्हणता येते.

**१६) पुरक पाणीपुरवठा योजना :-**

बीड शहराचा झपाट्याने विस्तार होत आहे. लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अशा या स्थितीत प्रत्येक नागरिकाला पिण्यासाठी पुरेसे आणि स्वच्छ पाणी मिळावे यासाठी दुरदृष्टीने विचार करुन धाडसी निर्णय घेऊन प्रत्यक्ष आमलबजावणी केली आहे. शहरातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये यासाठी पुरक पाणी पुरवठा योजना बीड (वितरण व्यवस्था) च्या कामास शहराच्या पायाभूत सुविधा अंतर्गत २० लक्ष रुपयांच्या योजनेचे काम पुर्ण झालेले आहे.आयोगा मार्फत तयार करण्यात आलेल्या ९५.५३ कोटी रुपयांच्या अंदाज पत्रकाप्रमाणे पहिल्या टप्प्याचे काम पुर्ण झालेले आहे. त्यामुळे बीड शहरातील काही भागात बारामही टँकरने पुरवठा करावा लगायचा परंतु पुरक पाणीपुरवठा योजनेमुळे सर्वत्र आज पाणी देणे शक्य झाले आहे. माजलगाव बॅक वॉटरवरुन बीड शहरासाठी पाणी पुरवठा योजना आणण्यात जयदत्त क्षीरसागर यांनाच श्रेय द्यावे लागते. म्हणून आज पाण्याचा बीड शहराचा प्रश्न सुटलेला आहे असे दिसून येते.

**१७) उद्दानाची निर्मिती :-**

बीड शहरातील नागरिकांना विरंगुळ्यासाठी एकही उद्यान अस्तिवात नव्हते. २० वर्षापुर्वी आलेल्या महापुरात पेठ बीड भागातील उद्यान वाहुन गेले होते.ही बाब लक्षात घेऊन जयदत्त क्षिरसागर यांच्या प्रयत्नामुळे व मार्गदर्शनाखाली पेठ बीड भागात बिंदुसरा नदी लगतच्या परिसरात उद्यानाची उभारणी करण्यात आली आहे. ७० हजार चौ. फुट जागेत १५ प्रकारच्या फ्लॉवर बँब्डची लागवड करण्यात आलेली आहे. संपूर्ण परिसरात ७५० विविध प्रकारची झाडे लावण्यात आलेली आहेत. आकर्षक असे डोम फाऊंडेशन (कारंजे) उभारण्यात आलेले आहेत. उद्यानात आलेल्या २० बँचेसची व्यवस्था करण्यात आलेली आहे. हे उद्यान बीड शहराच्या वैभवात निश्चितच भर टाकत आहे. दिसून येते.

**१८) बचतगट चळवळीला दिले बळ :-**

महिला सक्षम व्हावी यासाठी त्याचप्रमाणे दारिद्रय रेषेखालील लोकांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ जास्तीत जास्त मिळावा गरिब कष्टकरी, मजुर विकासाच्या प्रवाहात यावेत यासाठी जयदत्त क्षीरसागर यांनी जाणीव पुर्वक प्रयत्न, दारिद्रयरेषेखालील लोक महिला विकासाच्या प्रवाहात

यावेत यासाठीचे त्यांचे योगदान महत्वाचे आहे.दारिद्रय रेषेखालील महिलांचे बचत गट स्थापन करुन त्यांना लघु उद्योगासाठी व्यावसायीक प्रशिक्षण दिले. सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी पूर्ण झालेल्या शहरातील ९८९ बचत गटांना ९८ लक्ष यपयाचा निधी वाटप करण्यात आला त्यामुळे महिलांना आर्थिक बळामुळे महिला सक्षम होत आहेत.

## १९) शॉपिंग सेंटर उभारणी :-

बीड शहरातील फळविक्रेत्यांची अडचण लक्षात घेऊन, फळ व्यापाराला चालना देण्यासाठी नगर पालिकेच्या जागेत शॉपिंग सेंटरची उभारणी जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेली दिसून येते. एकूण १६४५ व २ चौ.की. एवढ्या क्षेत्रात ४८ दुाकने बांधली आहेत. यामुळे येथील व्यापाऱ्यांना पक्की दुकाने तर मिळालीच त्याचबरोबर या भागात १२ मी. रुंदीचा पक्का रस्ता देखील त्वारित पूर्ण केला त्यामुळे फळ- भाज्यांचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांची सोय झालेली आहे असे दिसून येते.

## २०)महिला सक्षमीकरणावर भर :-

महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या विविध विकास योजना राबविण्यात आल्या आहेत. बीड जिल्हा व बीड शहरातील बचत गटासाठी महिला बँकेची शाखा उघण्यात आली जवळपास १३७० महिला बचत गटाची तयार केलेल्या मालासाठी बाजरपेठ निर्माण करुन गाळे उपलब्ध करुन आधार केंद्र निर्माण केले.

तसेच महिलांसाठी शहरात मध्यवर्ती भागात स्वतंत्र १०० खाटांचे स्त्री स्पेशालिटी रुग्णालय उभा केले आहे. स्त्रीभ्रुण हत्या रोखण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी केली आहे. महिला व पद्वीधर तरुणींसाठी कॉम्प्युटर, ब्यूटी पार्लर, कुकींग, तयार मसाले, पावड उद्योग व लघु उद्योग आदींचे प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिंराचे आयोजन करुन रोजगार व नोकऱ्या मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील सतत असतात. तसेच ५ हजार महिलांचा जनश्री विमा काढून त्यांच्या मुला-मुलींना विद्यावेतन देण्यात आले आहे. तर दारिद्रय रेषेखालील महिला लाभार्थींना आय.टी.आय. मार्फत व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले.

## २१) निवारा व वैयक्तिक वाटप :-

बीड जिल्हयातील गरजु नागरिकांना घरकुल योजने अंतर्गत घरे व शेतकऱ्यांना वैयक्तिक विहिरीचे वाटप करुन त्यांचा विकास करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. इंदिरा आवास योजना रमाई आंबेडकर योजने अंतर्गत जवळपास १५१२ गरजु नागरिकांना घरकुल वाटप करण्यात आले यासाठी ७ कोटी २० लक्ष रुपये देण्यात आले. तसेच एम.आर.जी.एस. अंतर्गत ग्रामीण भागातील गरजु शेतकऱ्यांना १० कोटी १२ लक्ष रुपये खर्चाच्या १०५० विहिरी देण्यात आलेल्या आहेत. सार्वजनिक ४४ जोड रस्ते ५२ ठिकाणी झालेले आहेत. सर्वसामान्य नागरिकांना यामधुन फार मोठा आधार मिळाला आहे व त्यांची आर्थिक प्रगती सुध्दा यामुळे सुधारली आहे असे दिसुन येते.

**बीड जिल्हयातील विकास कामांची यादी :-**

जयदत्त क्षीरसागर यांनी फक्त मतदार संघाताच विकासकामे केली नाहीत तर संपूर्ण जिल्ह्यात आपल्या कार्यशैलीतुन कामे करुन विकास साधल्याचा प्रयत्न केलेला आहे असे दिसून येते.

१) शासनाच्या वतीने सर्व शेतकऱ्यांचा विमा उत्तरविला

२) गरिबांसाठी वर्षाला २५ हजार घरे बांधण्याची योजना राबविली.

३) निराधारांचे अनुदान १०० रुपयांवरुन २५० रु केले.

४) स्वच्छतेतुन समृध्दीकडे संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान व गावतंटामुक्ती करण अवलंबिले.

५) राज्यात अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना करुन मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली.

६) नव्या उर्दू शाळांना मान्यता देवुन वैद्यकीय प्रवेश परिक्षा उर्दू भाषेतुन काढली.

७) २०३१ सालापर्यंत जलसंजिवनी ठरणारी ९५.५३ कोटी रु. खर्चाची माजलगांव बॅक वॉटर योजना साकारली.

८) बीड शहरात महापुरुषांचे स्मारक सुशोभिकरण करण्यात आले.

९) शहरात प्रशासकिय नगर परिषद इमारत व यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची उभारणी केली.

१०) ग्रामीण भागासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे १११ गाळे काढुन वेअर हाऊस बनविले

११) संत ज्ञानेश्वर महाराजांचे आजोबा श्रीधरपंत यांच्या समाधिचा जिर्णोदार केला.

१२) शहरात आठवडी बाजार सर्व सोयीनी युक्त करुन रमणीय अद्ययावत उद्यान उभारले.

१३) बीड जिल्हयात ११ ठिकाणी ३३ के. व्हि. वीज केंद्र उभारण्यात आले.

१४) सौताडा परिसरात पवन ऊर्जा निर्मिती सुरु. धारुर, वडवणी येथे ऊर्जा निर्मितीस सुरुवात.

१५) खालापुरी, नांदूरघाट, लिंबागणेश व किल्लेधारुर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारले.

१६) शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाण्याचे निरसन करताना ३५८ गांव तलाव व पाझर तलावाला मंजुरी देवुन ७१ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली.

१७) राज्याच्या पर्यटन खात्याचा पदभार सांभाळतांना अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांचा निधी पर्यटन स्थळासाठी मंजुर करुन घेतला.

१८) काकू-नाना प्रतिष्ठान माध्यमातून कॅन्सर निदान, मतीमंद मुलांची चिकित्सा सर्वधर्मिय सामुहिक विवाह, किर्तन महोत्सवाचे आयोजन

१९) रो.ह.यो. अंतर्गत ३२५ नवीन रस्त्यांची निर्मिती करुन ७९ कोटी रुपयांची मंजुरी दिली.

२०) काकू-नाना स्मृती समारोहात ९८८ रुग्नांवर नेत्रशस्त्रक्रिया

२१) बीड येथिल गहिनीनाथ गड, तिर्थक्षेत्र नवगण राजुरी, चाकरवाडी, परळी वैजनाथ, योगेश्वरी मंदीर व अन्य ठिकाणी विकास निधी उपलब्ध करुन दिला.

२२) डोंगरी साठवण तलाव, प्रकल्पाची उंची वाढविणे, उथळा प्रकल्प, सिंदफणा प्रकल्पाची उंची वाढवणे, पौंडुळ प्रकल्प, बेनसुरा प्रकल्प भायाळा साठवण तलाव, पिंपळवाडी साठवण तलाव इ. सिंचन प्रकल्प उभारुन हरितक्रांती घडुन आणली.

२३) रमजानईदची नमाज अदा करण्यासाठी शहरात ईदगाहसाठी जागा उपलब्ध करुन दिली.

२४) चौसाळा-बीड मध्ये सर्व धर्मियांसाठी ११८ पेक्षा अधिक सांस्कृतिक सभागृह, अंतर्गत रस्ते व नाल्या , शाळा खोली बांधकामे, वाचनालये, व्यायाम शाळा इ. कामे प्राधान्याने केली.

२५) पत्रकारांसाठी स.मा.गर्गे स्मारकाच्या उभारणीची सुरुवात केली.

२६) २.५ कोटी रु. खर्चाच्या खासबाग आडत बाजाराची निर्मिती केली.

२७) बीड शहरालगतच्या भागातील पाण्याचे व्यवस्थापन व वितरण व्यवस्था सुरळीत केली.

२८) स्मशानभुमी मधील गैरसोय दुर करत १ कोटी रु.ची कामे करुन सोयी करुन दिल्या.

२९) सारणी सांगवी ता.केज येथे १६ कोटी रु. खर्चाचा साठवण तलाव जलसंजीवनी ठरला आहे.

३०) बीड शहरातील विकास कामे माजलगाव बॅक वॉटर योजनेअंतर्गत जलकुंभाची उभारणी व शहराच्या विस्तारीत भागात निर्जंतुक व मुबलक पाणी पुरवठा केला.

३१) खासबाग फ्रुट व भाजीपाला आडत मार्केटची निर्मिती केली.

३२) बीड शहरवासियांची सांस्कृतिक भुक भागविण्यासाठी यशवंतराव चव्हाण नाटयगृहाची आद्यावत इमारत उभारली

३३) नगर परिषदेची नवीन भव्य अशी प्रशासकीय इमारत उभारली

३४) बीड शहरात यशवंत उद्यान, डॉ. धर्मराज जोशी उद्यान, जवाहर कॉलनी आदी उद्यानांची निर्मिती.

३५) शहरात महात्मा फुले, अण्णाभाऊ साठे, बसवेश्वर, राजमाता जिजाऊ, वसंतराव नाईक, यशवंतराव चव्हाण, आहिल्याबाई होळकर इ. महापुरुषांच्या पुतळ्यांची उभारणी व सुशोभिकरण केले.

३६) शहराला पुरापासुन होणारा धोका टाळण्यासाठी संरक्षण भिंत उभारली.

३७) शहराम आमदार विकास निधीतुन सर्व धर्मियांसाठी हक्काची समाजमंदीरे बांधली.

३८) खेळाडुंसाठी क्रिडा संकुल, जिम्नॅस्टिक हॉलची निर्मिती केली.

३९) संत ज्ञानेश्वरांचे आजोबा श्रीधरपंत यांच्या समाधीचा जिर्णोध्दार केला.

४०) व्यापाराच्या दृष्टिनृे सिध्दीविनायक व्यापाऱ्यांसाठी संकुल, अतहर बाबर कॉम्प्लेक्स, मोंढा भागात जुन्या मार्केट कमिटीच्या जागी व्यापारी संकुल इ. व्यापारी संकुलाची निर्मिती केली.

४१) छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलाचा विकास केला.

४२) मोंढा भागातील एम.आय.डी.सी. कडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाची निर्मिती केली.

४३) पेठ बीड व किल्ला मैदान येथे शादी खान्याची निर्मिती केली.

४४) संभाजी नगर पश्चिम भागाला जोडणाऱ्या महत्वाच्या पुलाचे बांधकाम

४५) बीड शहरात वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी बार्शी नाका, जालना रोड, पांगरी रोड येथे तीन ३३ के.व्ही. उपकेंद्रांना मंजुरी मिळवली.

**सहकार क्षेत्रातील कार्य :-**

भारतात २५ मार्च १९०४ रोजी पहिला सहकारी कायदा पास करण्यात आला. सावकारांच्या जोखडातुन शेतकरी वर्गाला मुक्त करण्यासाठी भारतात सहकारी चळवळीचा उदय झाला. त्यामुळे अनेक सहकारी संस्था निर्माण झाल्या कारखाने, सुतगिरण्या, ग्राहक भांडार, सहकारी नागरी बँका, पत पेढ्या इत्यादींच्या उदयामुळे भारतात हरितक्रांती घडवुन आणण्यास मोठी मदत झाली. महाराष्ट्र राज्यातील अनेक व्यक्तिंनी सहकाराच्या माध्यमातुन विकास साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. असे दिसते त्यामुळे यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख, बाळासाहेब विखे पाटील, विजयसिंह मोहिते पाटील, जयदत्त क्षीरसागर, शिवाजीराव पंडीत इत्यादींनी सहकार क्षेत्रातुन विकास करण्याचा प्रयत्न केलेला दिसुन येतो.

महाराष्ट्रात सहकारी तत्वाच्या साखर कारखान्याची निर्मिती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यात पहिला सहकारी साखर कारखाना इ.स.१९५७ मध्ये पद्मश्री डॉ. विखे पाटील यांचा प्रवरानगर येथे सुरु झाला. त्यानंतर पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ या ठिकाणी अनेक कारखान्याची निर्मिती करण्यात आली. काही महत्वाचे पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हयातील कारखान्यात पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखाना होय. तसेच डॉ. बापुराव बापुजी तनपुरे सहकारी साखर कारखाना लि. गणेश नगर ता.राहता पारनेर सहकारी साखर काखाना पुणे जिल्हयात छत्रपती सहकारी साखर कारखाना मधुकरनगर ता. दौंड, भिमाशंकर सहकारी साखर कारखाना जि.जुन्नर सांगली जिल्हयात राजाराम बापु पाटील सह.साखर कारखाना राजाराम नगर, इस्लामपुर, मांजरा सहकारी साखर कारखाना , लातूर अंबा सहकारी साखर कारखाना अंबाजोगाई, श्री गजानन सहकारी साखर कारखाना लि. राजुरी नवगण, वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना पांगरी, गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना पाथरी जि. परभणी इत्यादी सहकारी तत्वावर चालणारे अनेक कारखाने महाराष्ट्रात चालु झालेले दिसुन येतात.

**३.१० श्री.गजानन सहकारी साखर कारखान लि. राजुरी नवगण ता.जि.बीड :-**

बीड जिल्हा मागासलेला व ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणुन ओळखला जातो. सतत दुष्काळाची छाया या जिल्हयावर पडलेली दिसते. कारण या जिल्हयातील जमीन ही हलक्या व मध्यम प्रतीची आहे. शिवाय थोड्या पावसामुळे येथील शेती व्यवसाय संकटात सापडलेला आहे. तसेच

लोकांच्या उपजिवेकाचा प्रश्न देखिल उदभवलेला आहे. या कारणासाठी येथिल लोक ऊसतोडणीसाठी इतरत्र जातात. व आपली उपजिविका भागवतात हा भाग मागासलेला असलातरी आधुनिकीकरणामुळे या भागाचा विकास होत असल्याचा दिसुन येतो.

बीड जिल्हयातील पहिला सहकारी साखर कारखाना अंबा सहकारी साखर कारखाना लि. अंबाजोगाई हा इ.स. १९६९ सहकारी तत्वावर चालणारा कारखाना आहे. तर पाटोदा वडवणी धारुर या तालुक्यात एकही साखर कारखाना अस्तित्वात नाही[४७].

बीड जिल्हयात लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. मराठवाडा विभागात हा जिल्हा मागासलेला व डोंगराळ प्रदेशाचा आहे. म्हणुन ओळखला जातो. या जिल्हयातील लोक कामासाठी दुसऱ्या जिल्हयात जातात व आपली उपजिविका भागवतात. ऊसतोडणी करणारे मजुर या जिल्हयात बहुसंख्य प्रमाणात आढळुन येतात. त्यामुळे बीड, गेवराई, अंबाजोगाई, माजलगाव, परळी वै. या ठिकाणी कारखाने निर्माण झाले अगदी कमी कालावधीत सौ.केशरकाकु क्षीरसागर यांनी अशिया खंडातील पहिला महिला संस्थापक अध्यक्ष होण्याचा मान काकुंना श्री. गजानन सहकारी साखर कारखाना लि. राजुरी नवगण ता.जि.बीड स्थापना दि.९ जुलै १९८२ याच्या रुपाने मिळाली आपल्या गावी म्हणजेच खऱ्या अर्थाने या कारखान्याच्या माध्यमातुन विकासाला चालना मिळाली. बळीराजाच्या चेहऱ्यावर आनंद या माध्यमातुन त्यांनी देण्याचे मोठे कार्य केल्याचे दिसुन येते. १९९० नंतरच्या काळात मात्र जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या रुपाने या कारखान्याला एक उत्कृष्ठ मार्गदर्शक लाभला सर्वसामान्य जनतेला एक आधार मिळाला. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी आहोरात्र झगडणारा नेता या भागाला अण्णांच्या रुपाने भेटला व सुपर्ण परिसराचा चेहरा मोहरा बदलला विकासात्मक दुरदृष्टी, कर्तत्वाची जाणीव बाळगणारे नेतृत्व म्हणजे जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या रुपाने महाराष्ट्र राज्याला मिळाले विकासाचा व परिवर्तनाचा ध्यास घेतलेले नेतृत्व म्हणुन जयदत्त क्षीरसागर यांची प्रतिमा बीड जिल्हयात आहे[४८].

कारखाना उभारणीसाठी व चालवण्यासाठी आजपर्यंत अनेक बँकांनी दिर्घ मुदतीचे कर्ज दिलेले आहे.

१) दि.महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई

२) श्री.गजानन नागरी सहकारी बँक लि. बीड

३) दि.बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. बीड

४) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद

५) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, औरंगाबाद/बीड

**श्री गजानन सहकारी साखर कारखान्याचे उदिष्टये :-**

श्री गजानन सहकारी साखर कारखान्याचे उदिष्टये पुढील प्रमाणे सांगता येथिल.

१) ऊस उत्पादक शेतकरी (२०० खेडी) यांचे विकासाचे केंद्र म्हणुन कार्य करणे.

२) पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्याप्रमाणे हा साखर कारखाना चालविणे

३) कारखाना परिसरातील शेतकऱ्यांच्या हितासाठ नैसर्गिक साधन सुविधा उपलब्ध करणे.

४) सुशिक्षीत बेकार तरुणांना तांत्रिक ज्ञान देण्याचे केंद्र म्हणुन कार्य ,करणे.

५) बेकार तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देणे

६) बीड तालुक्यातील अविकसित भागाचा सामाजिक व आर्थिक बदल घडवुन आणणे[४९].

**कारखान्याच्या सभासदासाठी महत्वपुर्ण हितकारी योजना :-**

श्री गजानन सहकारी साखर कारखान्याच्या माध्यामातुन अनेक बेकारांना नौकरी देण्याचे काम जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे. बीड व परिसरातील तरुणांना रोजगार मिळवुन दिला. व तसेच शेतकऱ्यांसाठी सुध्दा विविध योजना कारखान्याच्या माध्यमातुन सुरु केल्या त्यातुन शेतकरी व सभासदांच जास्तीत जास्त विकास करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात प्रयत्न झाल्याचे दिसुन येतात[५०].

**१) बेणे उत्पादन कार्यक्रम :-**

त्रिस्तरीय बेणे मळा कार्यक्रमांतर्गत पायाभुत बेणे उत्पादन कार्यक्रमा मध्ये व व्ही.एस.आय. येथुन उच्चसंवर्धीत रोप आणुन कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्लॉटवर को. ८६०३२, ६७१, ९८०५, ३१०२ चे बेणे उत्पादन कार्यक्रम ५० एकर क्षेत्रावर दरवर्षी राबविला जात आहे[५१].

**२) कार्यक्षेत्रात रस्ते विकास कार्यक्रम :-**

श्री गजानन सहकारी साखर कारखान्याचा दिवसेंदिवस विकास होत आहे व नावलौकिक होत आहे. शेतकऱ्यांना योग्य व चांगल्या प्रतीचे ऊसाचे बेणे मिळावे व जास्तीत जास्त त्यांना उत्पादन घेता यावे यासाठी ऊससंशोधन केंद्र उभा केली गेली व त्यामाध्यमातुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते[५२].

**३) किसान क्रेडीट कार्ड योजना :-**

श्री गजानन सहकारी साखर कारखान्याच्या परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या घरगुती व शेती विषयक विविध गरजा भागविण्यासाठी किसान क्रेडीट कार्ड ही योजना सुरु केली. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या सुटलेल्या आहेत[५३].

**४) ऊस संशोधन व प्रशिक्षण :-**

श्री गजानन सहोरी साखर कारखान्याचा दिवसेंदिवस विकास होत आहे. व नावलौकिक होत आहे. शेतकऱ्यांना योग्य व चांगल्या प्रतीचे ऊसाचे बेणे मिळावे व जास्तीत जास्त त्यांना उत्पादन घेता यावे यासाठी ऊससंशोधनकेंद्र उभा केली गेली व त्यामाध्यमातुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते.

**५) ट्रक व ट्रेक्टर खरेदी योजना :-**

कारखान्याने व संचालक मंडळाने ट्रक व ट्रक्टर खरेदी योजना सभासदांना लागु केलेली आहे. त्यामुळे अनेक बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार उपलब्ध झालेला आहे व त्यातुन बेकारीची समस्या सोडविली आहे. असे दिसुन येते.

**६) बोअरवेल योजना :-**

शेतकऱ्यांच्या ऊसाला पाणी मिळण्यासाठी कारखान्याने बोअरवेल योजना राबविलेली आहे. कारखाना परिसरातील शेतकऱ्यांना सिंचन क्षेत्र वाढवुन ऊस उत्पादन वाढविण्यासाठी ही योजना सुरु केलेली आहे. या योजनेमुळे अनेक शेतकऱ्यांना फायदा झालेला आहे. व त्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ झालेली आहे.

७) साखर उत्पादन :.

जगातील ब्राझील या देशात साखरेच सर्वात जास्त उत्पादन केले जाते. त्यानंतर भारताचा नंबर लागतो. पण आजच्या स्थितीचा जर विचार केला तर साखर उद्योगात आज अनेक संकटांना सामोर जावे लागत आहे. कारण नैसर्गिक स्थिती, राजकीय हस्तक्षेप मुक्त आर्थिक धोरण व्यापारी धोरण, अकार्यक्षमता व्यवस्थापन इ. गोष्टीमुळे साखर उद्योग संकटांत आला आहे[५४].

उत्तरोत्तर काळात साखरेच्या उत्पादनात घट झाल्यामुळे साखरेच्या किंमतीत वाढ झाली आहे. त्यामुळे भारताला जागतिक स्पर्धेत टिकणे अवघड झाले आहे. महाराष्ट्रातील अनेक साखर कारखाने

डबघाईला आलेले आहेत. काही तर बंद पडले आहेत. निसर्गाच्या लहरीपणामुळे पावसाच्या प्रमाणात घट होत असल्याने ऊस लागवडी होत नाहीत. त्यामुळे ऊसाचा तुटवडा अनेक कारखान्याला जाणवतो. सन २००५-०६ या वर्षात शासनाला अनेक कारखाने बंद ठेवावे लागले. देशातील साखरेचा साठा स्थिर राहवा म्हणुन शासनाने प्रत्येक साखर कारखान्याकडुन साखरेची खरेदी केली. त्यामुळे जे कारखाने दिवाळखोरीत आहेत त्यांच्या वर विपरीत परिणाम झाले आहेत. कारखान्याने साखर कारखानदारीच्या क्षेत्रात वेगळा पॅटर्न राबविला आहे. २००९-१० मध्ये साखरेचे उत्पादन १९८७८५ क्विंटल इतके झालेले आहे.

### ३.११ श्री गजानन सहकारी बँक लि.बीड :-

बीड जिल्हयातील एक नावजलेली बँक म्हणुन श्री गजानन नागरी सहकारी बँकेचा आज नावलौकीक आहे. दि.२-८-१९९५ रोजी जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गजानन नागरी सहकारी बँकेची स्थापना बीड येथे झाल्याची दिसुन येते. या बँकेला खंबीर अशा प्रकारचे नेतृत्व लाभल्यामुळे बँकेची उत्तरोत्तर प्रगती पथावर वाटचाल होत आहे. नवनविण धोरणे बँक राबवत आहे. संपुर्ण बीड जिल्हयात या बँकेच्या विविध शाखा आहेत. असे दिसुन येते[५५].

बीड जिल्हयामधील नागरी बँकीग क्षेत्रात श्री गजानन नागरी सहकारी बँकेचा चांगला नांव लौकिक आहे. जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेच्या प्रगतीचा आलेख सतत उंचावत आहे. या बँकेचे विस्तारीत कक्ष होमिओपॅथिक महाविद्यालयाच्या परिसरात आहे. ३०-६-२००९ अखेर बँकेचे स्थर्य कायम वाढावे म्हणुन उपलब्ध निधितुन रु.१४६०.३२ लाखाची गुंतवणुक सहकारी रोखे व मुदत ठेवी योजनेत केली आहे. ठेवीचे हे प्रमाण ४६.४६% इतके आहे[५६].

### शाखेचा विस्तार :-

श्री गजानन नागरी सहकारी बँकेची मुख्य शाखा बीड येथे आहे. नोंदणी क्र. व तारीख बी.एच.आर.बी.एन.के./१०६/दि.२-८-१९९५ आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने शाखा विस्तारासाठी परवानगी दिलेली असुन लवकरच चौसाळा, केज, धारुर, माजलगाव येथे नविन शाखांचा विस्तार होणार आहे[५७].

**कर्मचारी वर्ग :-**

श्री गजानन नागरी सहकारी बँकेत जवळ पास ५० सध्या कर्मचारी वर्ग कार्यरत आहेत. सभासदांना व बँकेत येणाऱ्या ग्राहकांना सेवेत सुलभता करत आहे. नव-नविन नियम वाढता कामाचा ताण सुचना या सर्व बाबी असल्यातरी कर्मचारी वर्गाने बँकेच्या ध्येय धोरणावर काम रण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे व ग्राहक व सभासदांना जास्तीत-जास्त सहजरित्या हाताळुन त्यांना सेवा देण्यासाठी प्रयत्न केला जातो. संचालक मंडळाने कार्मचाऱ्यांना सुध्दा शासकीय नियमाप्रमाणे वेतन देऊन खुष केलेले आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याची पिळवणुक केली जात नाही. स्वतः बँकेचे अध्यक्ष जयदत्त क्षीरसागर लक्ष देऊन कर्मचाऱ्यांच्या सुख दुःखात सामिल होण्यासाठी सतत तत्पर असतात. त्यामुळे बँकेत आपण कर्मचारी आहोत ही भावना त्यांच्यात नसते तर एका कुटूंबाप्रमाणे सर्वचजन कामे करतात[५८].

**सामाजिक उपक्रम :-**

बँकेच्या सभासदांच्या मुला-मुलींच्या उच्च शिक्षणासाठी तसेच सभासदाचे जे विद्यार्थी गुणवत्तेने उत्तीर्ण होतात. त्यांना उत्तेजन म्हणुन पारितोषिक व शिष्यवृत्ती दिली जाते. बँकेच्या वैद्यकीच उपचारनिधीतुन सभासदांना आर्थिक मदत केली जाते. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी एकत्रित येवुन समाजोपयोगी व्याख्यानमाला, क्रिडा, शैक्षणिक क्षेत्रात, पालक मेळावा इत्यादी समाजोपयोगी कार्यक्रमाला चालना मिळावी म्हणुन आर्थिक सहकार्य केले आहे. व त्यात सहभाग देखिल नोंदवीला आहे. समाजाचा जास्तीत-जास्त विकास व्हावा हाच या पाठीमागे उद्देश आहे.

**तक्ता क्र. ३.५**

**श्री गजानन बँकेच्या प्रगतीचा तक्ता**

| अ.क्र. | तपशिल | इ.स. १९९५ | इ.स.२०१० |
|---|---|---|---|
| १) | सभासद संख्या | २०० | ५६१५ |
| २) | भाग भांडवल | १०५० | ४४३. ७१ लाख |
| ३) | राखीव निधी | ३५० | १९७.८७ लाख |
| ४) | ठेवीची रक्कम | १०५१३० | ९०८०७९७ |
| ५) | कर्जाची रक्कम | १०३४९ | ५०७६५८५ |
| ६) | खेळते भांडवल | २००१२०१९१ | २०१५५६४ |
| ७) | नफा | १८५९ | ३० लाख ८७ हजार |

**संदर्भ :- श्री गजानन नागरी सहकारी बँक अहवाल २००९-१०**

वरील तक्तयावरुनअसे निर्देशनात येते की, श्री गजानन नागरी सहकारी बँक लि.बीड हि एक नामांकित बँक म्हणुन उल्लेख करावा लागतो. १९९५ रोजी बँकेची सभासद संख्या फक्त २०० होती ती सन २०१० मध्ये ५६१५ एवढी वाढली तर बँकेचा नफा सुध्दा त्याच पटीने वाढला आहे असे दिसुन येते.

जयदत्त क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली या बँकेची दिवसेंदिवस जास्त प्रगती होत आहे. असे दिसुन येते. सर्वसामान्य माणसांना या बँकेमुळे आधार मिळालेला आहे. येणाऱ्या आडचणी त्यामुळे बऱ्याच कमी झालेल्या आहेत. असे म्हणता येते.

## ३.१२ बीड तालुका दुध व्यावसायिक सहकारी संस्थांचा संघ मर्यादित बीड :-

**प्रस्ताविक :-**

आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरण आवश्यक असले तरी आपला भारत देश मोठ्या प्रमाणात कृषीक्षेत्रावर अवलंबुन आहे. शेती हा मानवाचा प्राचीन व मुलभुत व्यवसाय आहे. जगातील बहुसंख्य लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. शेतीखाली आहे. या व्यवसायापासुन मानवाला विविध प्रकारची साधनसंपत्ती मिळते. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभुत गरजापासुन ते अनेक लहान- मोठ्या वस्तुनिर्माण उद्योगधंद्यात शेती उत्पादनांचा उपयोग होतो.

मानवाने आपल्या बुध्दीकौशल्याचा उपयोग करुन शेती व्यवसायाला अनेक जोडधंदे करुन आपला उदार-निर्वाह करत आहे. आपल्या देशाची ६५% लोकसंख्या शेती व्यवसायावर अवलंबुन आहे. शेती अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती व्यवसाय तोट्यात जात आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने विकास होऊ शकला नाही. शेती व्यवसाय तोट्यात गेल्याने अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. यावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतीस जोडधंदा म्हणुन दुग्ध व्यवसाय करणे अनिवार्य झाले आहे. म्हणुन महाराष्ट्रातील सर्वच जिल्हयात दुग्ध व्यवसायाला आज महत्व आलेले आहे. व त्या दृष्टिने शेतकरी देखिल या व्यवसायाकडे आर्कषीत झालेले आहेत. असे दिसुन येते[५९].

**स्थापना व उद्देश :-**

बीड जिल्हयातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी व कर्जाच्या विळख्यातुन मुक्त करण्यासाठी श्री जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रयत्नांतुन बीड तालुका दुध व्यावसायिक सहकारी संस्थांचा संघ म.बीड ची स्थापना दि. १२-१२-१९७७ रोजी बीड येथे केलेली आहे. दुध हा नाशवंत पदार्थ असल्याने संकलित होणाऱ्या दुधावर वेळेत प्रक्रिया करुन बाजारपेठेत पोहोंच करण्यासाठी सन १९९९-२००० मध्ये बीड तालुक्यातील पाली या ठिकाणी ५० हजार लिटर्स क्षमतेचे दुध प्रक्रिया केंद्राची उभारणी केली. एकुण ३५ मार्गावरुन १४० प्राथमिक सहकारी संस्थाकडून दैनंदिन ३०००० लिटर्स दुध संकलित केले जात आहे. यामुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुधास चांगला भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग दुग्ध व्यवसायाकडे आकर्षित होऊ लागले आहेत. त्यांना हे एक आर्थिक उत्पादनाचे साधन मिळाले आहे.

ज्या उद्देशासाठी जयदत्त क्षीरसागर यांनी बीड तालुका दुध व्यावसायिक सहकारी संस्थांचा संघ मर्यादित बीड ची स्थापना केली होती. तो उद्देश पुर्ण होत आहे. असे आज दिसुन येते आहे. कारण आज शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी संघाच्या माध्यमातुन प्रगती होत आहे. शेतकऱ्यांना दुग्ध संघाच्या माध्यमातुन आर्थिक पाठबळ मिळत आहे. त्यांच्या अडचणी कमी जास्त प्रमाणात सुटत आहेत असे दिसुन येते. आज बीड परिसरातील शेतकऱ्यांना दुध संघाचा आधार वाटत आहे. असे म्हणता येईल. म्हणुन जो उद्देश दुग्ध संघाचा होता तो आज पुर्ण होत आहे. असे म्हणता येते.

**सभासद :-**

बीड तालुका दुध व्यावसायिक सहकारी संस्थेच्या संघाचे कार्यक्षेत्र बीड तालुक्यापुरते मर्यादित असल्याने ८५ संस्थांना सभासद करुन घेतले होते परंतु २००९-२०१० या वर्षांत २३ सभासद संस्था अवसायानात निघाल्यामुळे सभासद संस्था २३ ने कमी होवुन ६२ दुध संस्था व एकूण १२ वैयक्तिक व्यक्ती सभासद आहेत. तर संघाचा कारभार व्यवस्थित चालवण्यासाठी १५ संचालक मंडळाची नेमणुकी केलेली आहे. जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्व संचालक मंडळ संघाचा कारभार पाहते व जिल्हयात निश्चितपणे शेतकऱ्यांच्या उन्नतीत भर टाकत आहे. असे दिसुन येते. दुध संघाच्या माध्यामातुन बीड जिल्हयाला शेतकरी, शेतमजुर वर्ग प्रगती करत आहे. त्यांची आर्थिक सुबत्ता वरचेवर होत आहे.

असे दिसुन येते. शेतीला जोडधंदा म्हणुन आज संघाच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना एक नविन उद्योगधंदा मिळाला आहे. शेतीतील उत्पन्न अधिक दुधाच्या रुपाने मिळणारे उत्पन्न यातुन त्यांच्या संसाराला एक स्थिरता मिळत आहे. असे दिसुन येते. दि.५-९-२००५ ते दि.४-९-२०१० पर्यंतचे संचालक मंडळ पुढील प्रमाणे आहे. ज्यात सर्व परिस्थितीत गावातील लोकांना घेण्याचा प्रयत्न केलेला आहेच तसेच सर्व जाती-धर्मातील लोकांना यात स्थान दिलेले आहे. स्त्रियांनाही योग्य अशा प्रकारे सन्मान दिलेला आहे. एकुनच सर्वांना बरोबर घेऊन बीड तालुका दुध व्यावसाईक सहकारी संस्थेने आपला कारभार चालु ठेवुन परिसरातील शेतकऱ्यांचा शेतमजुरांचा व एकूणच जिल्हयाच्या विकासात आपली भुमिका बजावली आहे[६०].

**दुध संकलन :-**

बीड तालुका दुध व्यावसाईक सहकारी संस्थांचा संघाचे कार्यक्षेत्र बीड तालुक्यापुरते मर्यादित असुन संघाने एकुण १४० प्राथमिक सहकारी संस्थाकडुन ३५ मार्गावरुन एकुण ८७९८८६७ लिटर्स व इतर दुध शाळेकडुन संकलित केलेले दुध १३४१२६ तसेच आरंभीचे शिल्लक दुध ५४०७४ असे एकूण ८९८७०६७ लिटर्स संकलित केलेल्या दुधापैकी ६७२ लिटस दुध खराब झाल्यामुळे नष्ट करण्यात आले. तसेच २८११ लि.ची क्रिम काढण्यात आली. उर्वरित ८९८३५८४ दुधावर संघाच्या दुग्ध शाळेत आणुन प्रक्रिया करुन वितरीत केले आहे[६१].

संघाने नाकारलेले दुय्यम प्रतिचे दुध उत्पादकांचे नुकसान टाळण्यासाठी खवा करणाऱ्या ठेकेदारांना प्रति रु.६.०० प्रमाणे ठेका देवुन विक्रि करुन संस्थेस रु.४.०० प्रति लिटर दराने पेमेंट केले आहे. तसेच संघाने वाहतुक व बर्फ खर्चासाठी २.०० संघ कमिशन पोटी जमा केले आहेत. सन २००९-२०१० या वर्षात दुय्यम प्रत दुध एकुण १५४०३ लिटर्स दुध संकलन करुन वितरीत केले आहे[६२].

**दुध वितरण :-**

बीड तालुका दुध व्यावसाईक सहकारी संस्थांनी संकलित केलेले दुध प्रक्रिया करुन सिध्दी विनायक सहकारी मोटार वाहतुक संस्था म.बीडच्या एकुण १२ टँकर मधुन खालीलप्रमाणे दुग्ध शाळेस वितरीत केले आहे.

**तक्ता क्र.३.६**

| अ.क्र | नाव | दुधवितरण |
|---|---|---|
| १) | महानंदा दुग्ध शाळा, मुंबई | ६०७९९६६ लि. |
| २) | महानंदा डेअरी, लातूर | २६७६९४ लि. |
| ३) | शासकिय दुध योजना, लातूर | ५३२६२ लि. |
| ४) | महानंद डेअरी, नागपुर | ९१०२७१ लि. |
| ५) | वैष्णवदेवी, ईटकल | ६१४९८ लि. |
| ६) | स्थानिक दुध विक्रि | १२८८३ लि. |
| ७) | चिंतामणी दुध विक्रि | १२८८३ लि. |
| ८) | शासकिय दुध योजना, बीड | ७३८१ लि. |
| ९) | शासकिय दुध योजना, वरळी | ११६१४० लि. |
| १०) | सायबर डेअरी, बारामती | ३४८५९० लि. |
| ११) | प्रभात डेअरी, श्रीरामपुर | २८९११८ लि. |
| १२) | महानंद डेअरी, विगोज | ९५२८८ लि. |
| १३) | पावडर व लोणी तयार केलेले | २२७२३ लि. |
| १४) | शिल्लक दुध | १०५१०९ लि. |
| | एकूण | ८९८३६९९५ लिटर्स |

**पशुखाद्य :–**

बीड जिल्हयातील दुध संकलन करित असताना संघाने आपल्या कार्यक्षेत्रातील दुध उत्पादक सभासदांसाठी सातत्याने वेगवेगळे उपक्रम राबविलेले आहेत. ज्यामुळे सभासदांना दुध उत्पादन करीत असताना त्याचा फायदा झालेला आहे. त्याच अंतर्गत दुध उत्पादक सभासदांचे जनावरांना वाजवी किंमतीत सकस व दर्जेदार पशुखाद्याचा पुरवठा होणेसाठी संघाने पशुखाद्य कारखाना मिरजकडुन २९५.०७ मे.टन (रुचीका) पशुखाद्य खरेदी करुन वाजवी किंमतीत सर्व सभासदांना दिले जाते. त्यामुळे दुध उत्पादन करणाऱ्या सभासदांना त्याचा फायदा झालेला आहे[६३]. व दुध उत्पादनात फार मोठ्या प्रमाणात

वाढ सुध्दा झालेली आहे. असे दिसुन येते. हा एक आगळा-वेगळा उपक्रम संघाने दुध सभासदांसाठी राबविलेला आहे असे म्हणता येते.

**जनावरांची छावणी :-**

बीड जिल्हयात सतत दुष्काळी परिस्थिती असते. त्यामुळे पाळीव जनावरांचे प्रचंड प्रमाणात हाल होतात व त्यामुळे येथिल शेतकरी अशा जनावरांना कमी पैशात विकुन टाकत असतो असे चित्र दिसते मात्र गेल्या काही वर्षापासुन म्हणजेच २००५-२००६ पासुन बीड तालुका दुध व्यावसाईक सहकारी संस्थेच्या वतीने शासन अनुदानावर पाली या ठिकाणी जनावरांची छावणी दर उन्हाळ्यात चालवुन सभासदांना मोठा आधार दिलेला आहे. सन २००९-१० मध्ये २८०० जनावरांना चारा पाण्याची व्यवस्था केलेली होती. त्यामुळे दुध उत्पादकांना पशुधन वाचवण्यासाठी मोठी मदत झालेली आहे. असे दिसुन येते. त्यामुळे दुध उत्पादनात सातत्याने वाढ होत आहे[६४].

**दुध कॅन व रासायनिक खते पुरवठा :-**

दुध उत्पादक सभासदांना आवश्यकतेनुसार प्रत्येक वर्षी दुध कॅन पुरवठा संघाच्या वतीने केला जातो. सन २००९-२०१० मध्ये संघाकडे ३५०१ कॅन (फायबर) व चेम्बर्स ४०४ एवढे आहेत. जवळपास या वर्षात ५०० कॅन नवीन खरेदी केलेले होते व आवश्यकतेनुसार प्राथमिक सहकारी संस्थांना कॅनचा पुरवठा केलेला आहे. तसेच संघाने रासायनिक खते कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना शासन निर्धारित दराप्रमाणे खताचा पुरवठा केला आहे[६५].

**तक्ता क्र. ३.७**

| अ.क्र. | खत | मे.टन |
|---|---|---|
| १) | युरिया इफको | १३९.५५ मे.टन |
| २) | १०:२६:२६: इफको | ७०७.१५ मे.टन |
| ३) | २०:२०:०१३ इफको | ९१.०० मे.टन |
| ४) | १८:४६:डी.एस.पी इफको | २४२.२० मे.टन |
| ५) | २०:२०:० आय.पी.एल. | १२९६.७५ मे.टन |
| | एकूण | १२९६.७५ मे.टन |

बीड जिल्हयात सहकार क्षेत्रात एक आदर्श दुध संघ म्हणुन बीड तालुका दुध व्यावसाईक सहकारी संस्थेने जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनामुळे नाव लौकीक झालेला आहे. सभासदांना वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबवुन या परिसरातील शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात प्रगती केलेली आहे.

## ४.८ शैक्षणिक विकासात दिलेले योगदान :-

शिक्षणाच्या माध्यमातुन समाज परिवर्तन घडवुन येऊ शकते यासाठी महाराष्ट्रातील अनेक थोर व्यक्तिंनी संपुर्ण आपले जीवन समर्पित केलेले आहे. त्याच प्रमाणे मराठवाड्यात देखिल असे अनेक थोर व्यक्ति होऊन गेले आहेत. कोणत्याहि व्यक्तिंचा विकास शिक्षणाशिवाय होऊ शकत नाही. याची जाणीव त्यांना होती. शिवाय मराठवाडा महाराष्ट्रातील इतर भागाच्या तुलनेत बराच मागासलेला होता. म्हणुन शिक्षण असे एक औषध आहे ज्यामुळे संपुर्ण समाजघटकाचा विकास त्यातुन साधता येऊ शकतो हे ओळखुन येथे शिक्षण क्षेत्रात बऱ्याच थोर व्यक्तिंनी कार्ये केलेले आहे. असे दिसुन येते. त्यामध्ये स्वामी रामानंद तीर्थ, शंकरराव चव्हाण, केशरबाई क्षीरसागर, बापुसाहेब काळदाते, नारायणदादा काळदाते, विलासराव देशमुख, विनायकराव पाटील, गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर इत्यादींचा समावेश होतो. त्यामुळे मराठवाड्यातील सामाजिक आर्थिक राजकीय, सांस्कृतिक अशा सर्व घटकामध्ये स्थित्यंतरे घडुन येत आहेत[६६].

## जयदत्त क्षीरसागर यांचे शैक्षणिक क्षेत्रातिल योगदान :-

बीड जिल्हयात ऐतिहासिक काळात अनेक विचारवंत होऊन गेले असले तरी बीड जिल्हयांचा शैक्षणिक इतिहास पाहता नियोजनाच्या काळात उर्दु व पार्शियन भाषेतुन व लिपीतुन शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था होत्या मात्र त्या नाममात्र होत्या. मराठीला राजश्रय नव्हता व इंग्रजी नसल्यातच जमा होती. १८७८ मध्ये फक्त मराठी शाळा होत्या. १९५२ मध्ये केवळ ३% साक्षरता होती. इ.स. १९०३ साली ०३ माध्यमिक, ५४ प्राथमिक शाळा होत्या. जिल्हा परिषदांची स्थापना झाल्यानंतर व प्राथमिक शिक्षणखाते जि.प. कडे आल्यांनतर ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार होण्यास मदत झाली असली तरी १९८१ मध्ये बीड जिल्हयात विविध प्रकारचे शिक्षण घेणारे ११६७५ विद्यार्थी होते पाहता आज जिल्हा भरात अनेक शाळा महाविद्यालयांची उभारणी झाली आहे. यातुन सर्वस्तरातील विद्यार्थी विविध प्रकारचे शिक्षण घेत आहेत. नवगण शिक्षण संस्था राजुरी नवगण व आदर्श शिक्षण संस्था बीड चे रोपटे काकु-

नानांनी लावल्यानंतर विनायक युवक कल्याण युवक संस्था बीड, अनंत कृषी विकास प्रतिष्ठान राजुरी नवगण या संस्थांची स्थापना जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेली आहे. मात्र आज या चारही संस्थेमधुन शिक्षणाची गंगोत्री ग्रामीण भागा पर्यंत आणुन तेथिल विद्यार्थ्यांना या शिक्षण संस्थे मार्फत शिक्षित करण्याचे कार्य घडत आहे. या संस्थेतील अनेक विद्यार्थी उच्च पदस्थ आहेत[६३].

शैक्षणिक पाश्वभुमी व शैक्षणिक बाबतीत अविकासित असणाऱ्या बीड जिल्हयात शैक्षणिक चळवळ उभी करण्याचे कार्य इ.स. १९६५ मध्ये कै.सौ.केशरबाई क्षीरसागर यांनी नवगण शिक्षण संस्था राजुरी नवगण संस्था स्थापुन सुरु केले. शैक्षणिक क्षेत्रात काकुनंतर भरीव कार्य जयदत्त क्षीरसागर यांनी आदर्श संस्था बीड (१९७२) स्थापुन शिक्षण क्षेत्रात कार्य करण्यास सुरु केले. या दोन प्रमुख शिक्षण संस्थेबरोबरच विनायक युवक कल्याण संस्था बीड, अनंत कृषि विकास प्रतिष्ठाण, राजुरी नवगण या दोन संस्था बीड जिल्हयात ज्ञानदानाचे कार्य करत आहेत. या प्रमुख चार शिक्षण संस्था अंतर्गत एकुण ८८ शाळा महाविद्यालय आज स्थितीला चालु आहेत[६७].

शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती होणार नाही. हे ओळखुन आज या चारही शिक्षण संस्थेमधुन पारंपारिक शिक्षणापेक्षा २१ व्या शतकातील विज्ञाननिष्ट व व्यावसाईक शिक्षणाकडे जयदत्त क्षीरसागर यांचा जास्त भर आहे. कारण पारंपारिक शिक्षणाने केवळ भरतीचे नागरिक फक्त घडतात. त्याऐवजी त्यांनी विज्ञाननिष्ठ व व्यावसायिक शिक्षणाकडे त्यांचा जास्त लक्ष असल्याचे दिसुन येतात. आज चारही शिक्षण संस्था नावारुपाला आल्या आहेत. त्यामुळे त्यांनी शिक्षणक्षेत्रातील काही प्रमुख घटकांना महत्व दिले आहे.

१) प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे

२) ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करणे

३) स्त्री शिक्षणास महत्व देणे

४) शिक्षणाच्या माध्यमातुन व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करणे

५) व्यावसायिक शिक्षणाला उत्तेजन देणे

६) विज्ञान व तंत्रज्ञानावर भर देणे

७) सामाजिक क्षेत्रातील अंधश्रध्दा, रुढी-परंपरा दुर करणे

८) महाराष्ट्र शासनाकडुन शिक्षणासंबंधी अनुदान मंजुर करणे

जयदत्त क्षीरसागर यांनी आपल्या चारही संस्थेमधुन वरिल गोष्टींचा विचार करुन त्या आमलात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेले आहेत. असे दिसुन येते[६८].

**तक्ता क्र. ३.८**

| अ.क्र. | शाळा/महाविद्यालय | संस्था |
|---|---|---|
| १) | प्राथमिक शाळा | ०७ |
| २) | होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज | ०१ |
| ३) | माध्यमिक शाळा | ३७ |
| ४) | उच्च माध्यमिक शाळा | २१ |
| ५) | व्यवसाईक उच्च माध्यमिक शाळा | ०३ |
| ६) | वरिष्ठ महाविद्यालये | ०७ |
| ७) | डी फार्मसी कॉलेज | ०२ |
| ८) | फुड टेक्नोलॉजी कॉलेज | ०१ |
| ९) | डी.टी.एड. महाविद्यालय | ०२ |
| १०) | बी.पी.एड. महाविद्यालय | ०१ |
| ११) | बी.एड.महाविद्यालय | ०१ |
| १२) | कृषी विद्यालय | ०१ |
| | एकूण | ८८ |

बीड जिल्यात शहराबरोबरच ग्रामीण भागात त्यांच्या वरिल चारही शिक्षण संस्थेतुन ज्ञानदानाचे कार्य चालु आहे. आज मराठवाड्यातील अग्रगण्य व नावाजलेल्या शिक्षण संस्था म्हणुन चारही संस्था ओळखल्या जातात, ऊसतोड कामगारांचा व शिक्षण क्षेत्रात मागासलेल्या बीड जिल्हयात गरिब कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाकरीता सुरु केलेल्या या शिक्षण संस्थांत सध्या ३२८२५ मुली व ३४९७४ मुले असे एकुण ६७७९९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विविध शाखांमधुन विविध जाती धर्माचे, गरीब श्रीमंत, ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत[६९].

या सर्व शाखामधुन १४९३ कर्मचारी कार्यरत आहेत. या शिक्षण चळवळीला पुढे घेऊन जाण्यास

स्व.केशरबाई (काकु) क्षीरसागर यांच्यानंतर जयदत्त क्षीरसागर यांची कुशल व अभ्यासु नेतृत्वाची भुमिका महत्वाची ठरली आहे[७०]. भविष्यात शिक्षण क्षेत्रात पुणे पॅटर्ननंतर बीड पॅटर्न तयार करावयाचा असेल तर मा. जयदत्त क्षीरसागर यांचे नाव घेतले जाते. याशिवाय जिल्यातील अनेक शिक्षणसंस्थांना त्यांनी याचे उत्तम उदाहरण आहे. संस्थांच्या मान्यता नव्या वर्गाच्या मान्यता नव्या तंत्रज्ञान महाविद्यालयांच्या मान्यता यासाठी जयदत्त क्षीरसागर यांनी विशेष प्रयत्न केलेले आहेत[७१].

# क) विमलताई मुंडदा- बीड जिल्हयाच्या विकासात योगदान

### ३.१४ डॉ.सौ. विमलताई मुंदडा :- पुर्व चरित्र व राजकिय नेतृत्वाचा उदय

डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांचा जन्म १५ ऑगस्ट १९६३ रोजी परभणी जिल्हयातील पुर्णा येथे झाला. ताईच्या वडीलाचे नांव मुकुंदराव पेडगांवकर तर आईचे नांव कलावतीबाई हे होते. ताई ३ वर्षांच्या असताना त्यांच्या वडीलांचा मृत्यू झाला. त्यामुळे आई कलावतीबाई यांनीच पुढे सर्व जबाबदारी पार पाडली. विमलताईच्या वडीलाचे मुळगांव(ता.पुर्णा जि. परभणी) हे होते. या गावात फक्त प्राथमिक शाळा होती. भाऊ-बहिणी शिकत होत्या. वडिल जि.प.शाळा परभणी या ठिकाणी माध्यमिक शिक्षक होते. सगळा संसार त्यांच्या पगारावर चालत असे. पण वडीलाचे निधन झाल्यामुळे आई समार काय करावे हा प्रश्न होता. ताईचे मामा हेडकॉन्स्टेबल होते ते अंबेजोगाई या ठिकाणी राहत होते. मामाने दोन वर्ष सांभाळ केला. वडीलांची पेन्शन आणि मोठा भाऊ पार्ट टाईम जॉब करुन घर चालवीतअसे.

त्यांचे सर्वात मोठा भाऊ अंबादास पेडगांवकर हे सध्या रिझर्व बँक मुंबई या ठिकाणी नौकरी करतात. तर दुसरे भाऊ अशोक पेडगांवकर हे देखिल सध्या रिझर्व बँकेत नौकरी करतात व सध्या मुंबईलाच वास्तव्यास आहेत. ताईच्या एक भगिनी सुशिला सध्या पुण्यात आहेत तर दुसऱ्या सौ. सुमन वाघमारे ह्या सध्या उस्मानाबाद या ठिकाणी नायब तहसिलदार आहेत.

आई कलावतीबाई यांनी परभणीमध्ये एक जागा भाड्याने घेतली. आणि त्या ठिकाणी राहुन ताईने १२ वी पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले वडील भाऊ अंबादास पेडगांवकर बारावी झाले नौकरी करत-करत त्यांनी सर्व भावाकडे लक्ष दिले. त्यांनी एम.एस.सी (स्टॅटिस्टिक ॲण्ड मॅथेमॅटिक्स) पुर्ण केले. ते सुट्टीला आल्यानंतर ते सगळ्याचा अभ्यास घ्यावचे ते स्वतः डॉक्टर झाले नाहीत पण भावंडानी डॉक्टर व्हावं अशी त्यांची इच्छा होती. आज विमलताई यांच्या घरामध्ये दोन डॉक्टर आहेत. एक त्या स्वतःच व दुसरे म्हणजे त्यांचे बंधू डॉ. किशार पेडगांवकर हे सध्या ससुन (पुणे) या हॉस्पिटल मध्ये आहेत.

विमलताईच्या घराची परिस्थिती साधारण असल्यामुळे सर्वजन परिस्थितीवर मात करीत मोठे झाले. ताई सर्वांच्या लाडक्या होत्या. घरच्यांनी ताईवरती जास्तच माया केली. मोठ्या भावांनी ताईचे जास्त लाड केले. ताईच्या मनावरती कपडे घेतले जायचे. ताईंना शाळेत जायला मोठ्या भावाने सायकल घेऊन दिली. ताईचे आजोळ अंबाजोगाई हे होते. ताईचे बंधू किशारे हे अंबाजोगाई येथिल स्वामी

रामानंद तीर्थ महाविद्यालयात शिकत होते. म्हणुन ताईना देखिल याच ठिकाणी ठेवण्यात आले.

ताईच्या आई कलावतीबाई यांचा मुलीबाबतचा दृष्टिकोन प्रगत होता. मुलगी आहे म्हणुन विमलताई वर कधीही ही गोष्ट करु नको, ती गोष्टी करु नको असे बंधने टाकली नाहीत. त्यांना मोकळीक दिली. त्यामुळेच विमलताईनी प्रगती दिसुन येते. मुलगा-मुलगी असा कधी भेदभाव केला नाही. विमलताई सायकलवर जाऊन बाजारातुन वस्तु, भाजी आणायच्या.

विमलताईच्या मैत्रिणी खुप हुशार होत्या. तेजस्विनी बोबडे ह्या परभणीत आहेत. तर दुसऱ्या अमेरिकेत आहेत. विमलताईच्या आईना ३० वर्षापासुन अस्थमाचा त्रास होता. त्यामुळे त्यांना महिन्यातुन १५ दिवस हॉस्पिटलमध्ये राहावे लागत असे. त्यामुळे त्यांना रात्री वार्डमध्ये आईसोबत विमलताईच थांबायच्या त्यामुळे हॉस्पिटलच वातावरण त्यांनी जवळुन पाहिल होत. कुणी रोगी दगावला की, त्यांच्या नातेवाईकाचा आक्रोश काळीज चिरुन जायचा विमलताईचे वडिल अकाली गेल्यांने आयुष्याचं कालचक्र किती अजब असतं.असच ताईच्या मनात यायचं तेव्हा त्या आईला विचारायच्या आई, बाबा कसे गेले? तेव्हा आईच्या डोळ्यात पाणी तरंगायचं, विमलताईनी डॉक्टर व्हांव अस त्यांच्या आईला मनापासुन वाटायचं. विमलताईचा मोठा भाऊ अंबादास आईची काळजी घेत असे. विमलताईच्या आईचा आंतरजातिय विवाहाला विरोध नव्हता पण एखाद्या डॉक्टरशी लग्न करावे अशी इच्छा आईची होती. तरी पण आईच्या सांगण्यावरुन ताईच्या लग्नास घरचे सर्वजण तयार झाले[७२].

विमलताई एम.बी.बी.एस फायनलला असताना श्री.नंदकिशोरजी शिवबगसजी मुंदडा यांच्या बरोबर एप्रिल १९८७ मध्ये परळी वैजनाथ येथील आर्य समाज मंगल कार्यालयात वैदिक पध्दतीने लग्न झाले.

एम.बी.बी.एस. फायनला असताना गरोदर होत्या गरोदर असतानाही ताईनी परीक्षा दिली. या नंतर १३ मे १९८८ रोजी ताईना मुलगा झाला (अक्षय) यानंतर पाचव्या दिवशी तोंडी परीक्षा दिली. व त्या पासही झाल्या मुलगा २० दिवसाचा असताना ही विमलताई हॉस्पिटलमध्ये डयुटीसाठी जाऊ लागल्या एम.डी. (औषण निर्माण शास्त्र) लाही जॉईन झाल्या. याच काळात विमलताईना एका आजाराने ग्रासले ऑपरेशन झाले व विमलताईना विश्रांती घेण्यास सांगितले.

विमलताईचे लग्न झाल्यानंतर अंबाजोगाई मध्ये गुरुवार पेठ मधील डॉ. लतीफ यांच्या घरी राहत

शेजारी किशोर परदेशी हे राहत. ताईनी त्यांना भाऊ मानले होते. किशोर परदेशी यांच्या पत्नी ज्योती परदेशी आणि ताई यांचे संबंध देखिल ननंद- भावजयी प्रमाणे होते. एकंदरीत घरगुती चांगले संबंध होते. ते आजही टिकुन आहेत. राजकारण म्हटलं की ताई चिडत असत पण त्याही एका शिक्षकाची मुलगी असल्यामुळे त्यांना समाजकार्याविषयी आकर्षण होते. गल्लीतील कोणी व्यक्ती आजारी पडली तर त्याला पुर्ण सहकार्य करण्याची त्यांची भुमिका असायची. विमलताई ज्योती परदेशी यांना हक्काने भाभी म्हणतात. राखी पोर्णिमेच्या दिवशी विमलताईना घरी बोलावण्याचा आग्रह किशोर परदेशी यांच्या आई करत. ज्यावेळी १३ मे १९८८ ला अक्षय मुंदडाचा जन्म झाला.त्याचे जावळ देखील तुळजापुरला किशोर परदेशी यांच्या मांडीवर काढण्यात आले. मुंदडा घराण्याचे आणि परदेशी यांचे संबंध चांगले आहेत.

विमलताईना राजकारणाची मुळीच आवड नव्हती. विविध राजकिय पक्ष त्यांचे नेते पक्षांचे कार्यक्रम इ. पासून त्या दुर राहत. पण पतीच्या आग्रहामुळे ताई राजकारणात आल्या ताई ज्या कॉलेजमध्ये शिकल्या त्या ठिकाणी परिचारीका वस्तीगृहात राहायच्या वैद्यकिय विद्यार्थी आणि प्रशिक्षणार्थी नर्सेससाठी गेट एकच त्याठिकाणी निर्बंध असायचे पण वॉर्डन सौ. कवठेकर स्वभावाने खुप चांगल्या होत्या. पण लेडिज होस्टेलला अपुऱ्या सुविधा होत्या . ताई आमदार झाल्यानंतर मेडीकल हॉस्टेलचे उदघाटन केले व सुविधा उपलब्ध करुन दिले.

विमलताईनी खरे तर ई.एन.टी. मध्ये (नाक, कान, घसा) हाऊस पोस्ट केली होती. पुढे त्यामध्ये त्यांना एम.एस. करायचे होते परंतु त्या वेळेला पोस्ट ग्रॅज्युएशन करण्याची सोय नव्हती. विमलताईचे पती युवक कॉंग्रेसचे काम कारयचे ताईना वाटले नंतर पी.जी. करुन होईल व ईच्छा पुर्ण होईल. परंतु लगेच चार-पाच महिन्यात ताई आमदार झाल्या. ताई शिकत असताना कॉलेज मध्ये अपुऱ्या सुवधिा होत्या. त्याऐवजी अद्यावत सुविधा ताई आणु शकल्या. अंबाजोगाईच्या मेडीकल कॉलेजच्या हॉस्पिटलमध्ये कोबाल्ट युनीट, सीटी स्कॅनिंग, अल्ट्रा साऊंड या सुविधा आहेत. रोग्याला मुंबईला जावे लागत नाही. गरीबांना मोफत मध्ये उपचार सोय मेडीकल कॉलेजमध्ये आहेत. ताईना शिकवणारे डॉ.ए.डी.शिंदे काही काळ कॉलेजचे अधिष्ठाता होते. याचा ताईना खुप अभिमान वाटतो.

याच दरम्यान निवडणुकीचे वारे वाहत होत. विमलताईचे पती नंदकिशोर मुंदडा हे पुर्वीपासुनच

राजकारणात होते. ते काँग्रेस आय पक्षाचे काम करत असतं. विमलताईची राजकारणात येण्याची महत्वकांक्षा नव्हती पण नंदकिशोर मुंदडा यांच्या मित्र कंपनीने ताईना विधानसभेसाठी उभे करण्याचा आग्रह धरला. त्याला सार्वांनी होकार देवुन काँग्रेस पक्षांची उमेदवारी मागण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांचे शिष्ट मंडळ मुंबईला गेले. शिष्टमंडळ गेल्यानंतर मुंबईमध्ये जे.जे. हॉस्पिटलमधील एका रुममध्ये हे सर्व कार्यकर्ते थांबले. त्यांना आमदार निवास मिळाला नाही. पण शरद पवार साहेबांनी अगोदरच केज विधानसभा संघातुन काँग्रेस पक्षांची उमेदवारी बी.एन. सातपुते यांना दिली होती.

सर्व कार्यकर्ते नंतर गोपीनाथराव मुंडे यांच्याकडे गेले व भाजपातर्फे उमेदवारी मागितली. डॉ. शिवाजी कराड यांच्या निवास स्थानी चर्चा होऊन भाजपाची उमेदवारी खोलेश्वर महाविद्यालयातील कर्मचारी किरण कांबळे यांना द्यावयाची ठरले होते. पण ते बदलुन विमलताई मुंदडा यांना गोपीनाथराव मुंडे यांनी भाजपातर्फे उमेदवारी दिली व १९९० च्या निवडणुकित १०,००० च्या मताधिक्याने त्या निवडुन आल्या.

शाळेत व महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा होत असत. परंतु यापासून त्या दूर राहत असतं. वक्तृत्व कौशल्य फारसे विकसित आमदार हाईपर्यंत झालेले नव्हते.

विमलताईच्या वाट्याला विलक्षण अनुभव बरेच आले. एकदा ताई आपला छोटा मुलगा अक्षय सोबत परळीहुन अंबाजोगाईला येत असताना परळीच्या घाटात दरोडेखोरांनी गाडी अडवली. दगडाच्या राशी अगोदरच लावून ठेवल्या होत्या. ताईंनी चोरांना अगोदर दागिने काढुन दिले. गळ्यातील मंगळसुत्र देखिल सुध्दा दिले. ताईंना गाडीतुन ओढण्याचा प्रयत्न केला. ताईंच्या सोबत असलेल्या लोकांना काठीने मारहाण केली ते रक्तबंबाळ झाले. ताईनी अक्षयला सिटखाली बसविले. व त्यांना सांगितले अंगाला हात लावु नका तुम्हाला हवे ते दिले आहे. व ताई गाडीतुन बाहेर आल्या व मारेकरी पळुन गेले. कदाचित त्यांनी ताईला ओळखले असावे. ताई रस्त्यावर आल्या व त्यांनी एस.टी. महामंडळाची गाडी थांबवली. काही सहकारी एसटीत बसविले. मुलगा अक्षय गाडीतच होता तो प्रचंड घाबरला होता. अशा जीवावरच्या प्रसंगात ताईंच्या सहकाऱ्यांनी ताईना खुप साथ दिली.

ताई आणखी एक आठवण सांगतात. माजी ऊर्जामंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांचा कार्यक्रम धारुरला होता. त्यावेळेस धारुर केज तालुक्यात होते ते स्थलांतर करण्याची घोषणा डॉ. पाटलांनी

केली. नागपुर अधिवेशनाच्या वेळी शरद पवार साहेब मुख्यमंत्री होते. मुंडे साहेबाबरोबर पवार साहेबांना निवदेन देण्यासाठी आम्ही गेलो. त्या वेळेला पवार साहेबांनी माझ्या मतदार संघातील मंजुर असलेली १३२ के.व्ही. उपकेंद्र केजलाच होईल असे तात्काळ चेअरमन अब्राहम यांना फोनवर सांगितले त्यावेळेस मला जाणवलं की मतदार संघातील प्रश्न त्या-त्या आमदाराचे असतात. त्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणुन लोकमताचा आदर केला पाहिजे. ही पवार साहेबांची भुमिका होती. ही भुमिका आवडली व मग तेव्हा बरचं काही शिकवुन गेली. पवार साहेब प्रत्येक आमदाराचा त्याच्या मतदार संघात योग्य तो सन्मान झाला पाहिजे. याची काळजी घेत मुंडे साहेबाचा स्वभाव वेगळा होता. ते आपल्या पक्षातील आमदारासाठी संघटना म्हणुन त्यांची बाजु उचलुन धरत.

एरव्ही आपण ३३ टक्के महिलांना आरक्षण हवं म्हणतो, पण महिलांनी स्वतःची सक्षमता सिध्द केल्याशिवाय काही मिळत नाही. इतर क्षेत्रात बायका स्वतःच्या कर्तबगारीवर पुढे जावु शकतात. पण राजकारणात कुणीतरी पाठीशी असल्याशिवाय कुणी पुढे जावु शकत नाही. स्त्री सक्षम आहे हे दाखविण्यासाठी जेवढी क्षेत्रे आहे. या सर्व क्षेत्रात राजकारण हे क्षेत्र काहिसे वेगळे पडते. आणि पदापासून वंचित राहावे लागते असे विमलताईना वाटते असे एकतर कोणाची तरी बहीण, मुलगी, नाहीतर कोणाची तरी वारसा, राखीव मतदार संघात असलेल्या जागा यापैकी काही असेल तरच आज एखादी महिला प्रभावी ठरु शकते असे ताईला वाटते पण हे चित्र बदलले पाहिजे अशी ताईची भुमिका होती. लहानपणापासुन ताईनी अनेक दुःखे पाहिली होती. वडीलाचे सर्व प्रेम आईने दिले होते. आई हिच पहिला गुरु व प्रेरणा ताई मानतात अधुन मधुन जखमा झाल्या तरी आईने संयमाने हळद लावायला दिली असे विमलताई म्हणतात.

विमलताईनी या २० वर्षाच्या प्रवासामध्ये प्रथम १९९० ला केज मतदार संघातुन आमदार पुढे १९९५ ला देखिल भाजप च्या तिकिटावर निवडुन आल्यानंतर १९९९ ते २००४ या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडुन निवडुन आल्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या विधी व न्याय, महिला व बाल कल्याण, भुकंप पुर्नवसन व मदत खात्याच्या राज्यमंत्री पदी त्यांनी काम पाहिले ७ जानेवारी २००४ रोजी कॅबिनेट मंत्रीपदी त्यांना बढती मिळाली व आरोग्य व कुटूंब कल्याण खात्याचा कारभार त्यांच्याकडे सोपविला नंतर पुढे नोव्हेंबर २००४ रोजी ते २००९ पर्यंत या खात्या च्या मंत्री आहेत.

सामाजिक कार्यामध्ये रक्तदान, नेत्र चिकित्सा, बालसंगोपन शिबीराचे आयोजन, गणेशोत्सव साजराकरण्यासाठी विमलताईचे सहकार्य असते. वसुंधरा सेवा प्रतिष्ठाणातर्फे विविध स्पर्धा व ताई महोत्सवाचे आयोजन केले जाते दि.८ ते १२ जानेवारी २००८ या कालावधीत अंबाजोगाई या ठिकाणी अक्षय प्रतिष्ठाणतर्फे अखिल भारतीय छत्रपती शिवाजी चषक कब्बडी स्पर्धेचे आयोजन करण्यात होते. या कार्यक्रमासाठी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल उपस्थित होते या स्पर्धा अतिशय शिस्त बध्द व यशस्वी झाल्या याचे सर्व श्रेय विमलताई यांचे पुत्र अक्षय मुंदडा व त्यांच्या सहकाऱ्यांना द्यावे लागेल.

### ३.१५ डॉ.सौ. विमलताई मुंदडा : यांनी केलेली विकास कामे

**१) विद्युतीकरणाची कामे :-**

**अ)** ३३/११ के.व्ही. उपकेंद्र निर्मितीचे पुर्ण झालेली कामे पुढील गावामुधन झालेली आहेत. गिरवली, डोंगरपिंपळा, कुंभेफळ, माळेगाव, जवळबन, जवळगाव, आपेगाव, आसरडोह, राजेगाव

**ब)** ३३/११ के.व्ही उपकेंद्र (आर आणि एम) मधील पुर्ण झालेली काम पुढील प्रमाणे आहेत. अंबाजोगाई, केज, धारुर, आडस तर बर्दापुर येथील पॉवर ट्रान्सफार्मरची क्षमता वाढ व वाढीव पॉवर ट्रान्सफार्मर कार्यान्वीत करण्यात आला. तर बनसारोळा येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्र ३.१५ एम.व्ही.ए. पॉवर ट्रान्सफार्मरच्या ऐवजी ५ एम.व्ही.ए.चा ट्रान्सफार्मर कार्यान्वीत करण्यात आला.

**क)** पध्दती सुधारणांमध्ये २५५ रोहित्राचे काम पुर्ण झाले केज उपविभाग १७७ रोहित्रांचे काम पुर्ण झाले. धारुर उपविभाग ११३ रोहित्रांचे काम पुर्ण झाले.

**ड)** कृषिपंपांना जोडणी केल्याने कामे (ए.जी.ग्रुप) अंबाजोगाई उपविभाग १६९९ कृषिपंप केज उपविभाग १६८७ कृषिपंप धारुर उपविभाग १३०४ कृषिपंप इत्यादी गावामधुन विद्युतीकरणाचे कामे डॉ. विमलताई मुंदडाच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण झालेली दिसुन येतात.

**२) कृषी खाते :-**

रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रम सन २००४-०५ ते २००८-०९ अंबाजोगाई परिसरात जवळपास ८५२ हेक्टर जमीनीवर लागवड करण्यात आली. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत सामुदायिक शेततळे अंबाजोगाई-१४, केज-२१ राष्ट्रीय फलोत्पादन अभियानातर्गत शेड अंबाजोगाई-१२५, केज-६० राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत डाळींबावरील तेलकर डाग

अनुदान अंबाजोगाई-१० हेक्टर केज-१२.८९ हेक्टर राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत केळी -१५ हेक्टर, पपई-२० हेक्टर मल्चिंग-२ हेक्टर, पुक्पोत्पादन ९ हेक्टर, मसाला पिक २०० हेक्टर, पक हाऊस-७ नग, राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत शेततळे-३२३, कापसावरील लाल्या रोगाचेअनुदान वाटप, सन २००८-२००९ सोयाबीन अनुदान गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम, रोजगार हमी योजनेअंतर्गत जलसंधारण, शेततळे, मातीनाला बांध कंपार्टमेंट बंडिंग, नाला सरळीकरण, सिमेंट, नालाबांध, पुनर्भरणावर, भुविकास कामे, सुक्ष्म सिंचन योजना ठिबक/तुषार करणे इत्यादी कृषी विषय कार्य डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांनी केलेले स्पष्ट दिसुन येतात[७३].

### ३) पुर्ण झालेले साठवण तलाव :-

डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांनी विकासात्मक दृष्टी ठेवुन अनेक गावामधुन साठवण तलावांची कामे पुर्ण केलेली दिसुन येतात. येणाऱ्या पुढच्या काळात पाण्याचा प्रश्न मुलभुत प्रश्न निकडीचा बनणार आहे. हे त्या ओळखुन होत्या म्हणुनच त्यांनी साठवण तलावांच्या निर्मितीवर जास्त लक्ष केंद्रीत केले होते. असे दिसुन येते साकुड, काळवटी, निळकंठेश्वर, भावठाणा, चनई, सारणी, सांगवी, सोनवळा, डोंगरपिंपळा, खोडस, साकुड, राजेवाडी, बदन कानडी, मोरफळी इत्यादी गावातील साठवण तलावांची पुर्ण कामे करण्याचे काम डॉ. विमलताई मुंदडा यांनी केले आहे. व त्या गावातील लोकांना पाण्याच्या समस्येसाठी प्रयत्न केलेला दिसुन येतो[७४].

### ४) मांजरा नदीवरील पुर्ण झालेल प्रकल्प :-

डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली मांजरा नदीवरील बॅरेजस पाझर तलाव अनेक गावातुन पुर्ण झाल्याचे दिसुन येतात. सन २००४ ते २००९ पर्यंत अशा कामाच्या माध्यमातुन जिल्हयाच्या विकासात त्यांनी भर घातली होती. असेच दिसुन येते म्हणुनच आज बीड जिल्हा तो एकेकाळी ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणुन ओळखला जातो तो आज साखर उद्योगासाठी मार्गदर्शक जिल्हा म्हणुन समोर येत आहे. असे म्हणावे लागते. या पाठीमागचे काही अंश का होईना डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांना द्यावे लागते. असेच दिसुन येते[७५].

### ५) मराठवाडा विकास कार्यक्रम सन २००७-०८:-

केज मतदार संघामध्ये मराठवाडा विकास कार्यक्रम २००७ व २००८ अंतर्गत रस्ते दुपदरीकरण

व चौपदरीकरण करणे तसेच राज्यमार्ग/प्रमिता/इजिमा दर्जाच्या रस्त्यावर लहान पुल बांधणे या कामांचा समावेश आहे. ही कामे ११ असुन अंदाजित किंमत १७७० लक्ष एवढी आहे. या कामामध्ये प्रामुख्याने खालील कामांचा समावेश आहे.

१) अंबाजोगाई–लोखंडी सावरगाव–कळंब(शेगाव पंढरपुर पालखी मार्ग) २५ कि.मी. लांबीचे दुपदरीकरण करणे.

२) लोखंडी सावरगाव ते अंबाजोगाई रस्त्याचे चौपदरीकरण करणे (६.००कि.मी लांबी) अंबाजोगाई पिंपळा अहमदपुर रस्ता अंबाजोगाई शहरातुन जाणाऱ्या राज्यमार्गावर जयवंती नदीवरील पुलाचे रुंदीकरण करणे.

३) अंबाजोगाई ते कळंब रस्त्यावर कि.मी.९२/२०० मध्ये पळसखेडा गावाजवळील पुलाचे पुर्नबांधणी करणे मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत हे वरील सर्व कामे २०१० ला पुर्ण करण्यात आली असुन त्या कामासाठी १७७० लक्ष एवढा खर्च आला होता. यामुळे बीड जिल्हयाच्या विकासात भर पडल्याची दिसनु येते[७६].

**६) केंद्रीय मार्ग निधी :–**

सन २००५–०९ पर्यंतच्या कालावधीमध्ये केज मतदारसंघामध्ये केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत एकूण रु.१८२५ लक्ष किंमतीची ९ कामे मंजुर झालेली होती व ती पुर्ण झाली आहेत.३१ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे सुधारणा करणे, तसेच २ लहान पुलांच्या बांधकामासह १७ लहान मोठ्या पुलांचे रुंदीकरण करणे इत्यादी कामे पुर्ण करण्यात आली. या पुर्ण केलेल्या कामावर आतापर्यंत रु.१८२५ लक्ष एवढा खर्च करण्यात आलेला आहे.

**७) राज्य मार्ग :–**

सन २००५ ते २००७ या अर्थसंकल्पीय वर्षात उपरोक्त लेखाशिर्षाखाली केज मतदार संघामध्ये एकुण रु.१७४ लक्ष किमतीची २० कामे मंजुर झाली होती. ही सर्व कामे पुर्ण करण्यात आली असुन त्यावर रु.१७० लक्ष एवढा खर्च झालेला आहे. त्याअंतर्गत २१ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे डांबरी नुतणीकरण पुर्ण करण्यात आले. सन २००८–०९ मध्ये केज मतदारसंघामध्ये ५ कामे मंजुर झाली होती त्या कामांची यामध्ये प्रामुख्याने खालील कामांचा समावेश आहे.

१) केज- लोखंडी सावरगाव- पिंपळा- अहमदपुर रस्ता कि.मी.११९/०० ते १२४/००(अंबाजोगाई शहरातील राज्यमार्ग) ची चौपदरीकरणाने सुधारणा करणे

२) येल्डा-अंबाजोगाई रस्ता अंबाजोगाई शहरातील लांबी सुधारणा करणे.

३) अंबाजोगाई शहर वळण रस्ता सुधारणा करणे कि.मी.०/०० ते ४/०० उपरोक्त सर्व कामे पुर्ण झालेली आहेत.

तर सन २००९-१० च्या वर्षांत केज मतदारसंघातील ८ राज्य रस्त्याची सुधारणी करण्याची कामे पुर्ण झालेली आहेत. त्या कामासाठी एकुण रु.५५० लक्ष एवढी रक्कम लागली. जवळपास वरिल कामामधुन राज्य रस्त्याची ४३ कि.मी. लांबीची सुधारणा करण्याची कामे पुर्ण करण्यात आली आहेत.

### ८) नाबार्ड :-

सन २००५-२००९ मध्ये नाबार्ड अंतर्गत केज मतदारसंघामध्ये एकुण २१ कामे मंजुर झाली होती. ती सर्व कामे पुर्ण झाली आहेत. या कामासाठी रु.६७५ लक्ष एवढी किंमत होती. २९.५० कि.मी लांबीमध्ये डांबरी नुतणीकरण करण्यात आलेले आहे.

### ९) हुडको :-

हुडको कर्ज योजनेअंतर्गत सन २००५- ते २००९ या आर्थिक वर्षात केज मतदारसंघामध्ये एकुण २७ कामांना मंजुरी मिळाली व ते पुर्ण झाले आहेत. त्या कामावर रक्कम रु.४४७ लक्ष एवढी खर्च झाली आहे. सर्व २७ कोटी व ४५ कि.मी. चे डांबरीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले आहे.

### १०) अर्थसंकल्पीय कामे :-

सन २००५ ते २००९ या आर्थिक वर्षात केज मतदारसंघातध्ये एकुण २१२ कामे मंजुर होऊन ती पुर्ण झालेली आहेत. या कामावर रु २८१९.८० लक्ष एवढा खर्च झालेला आहे. ८२ कि.मी. लांबीचे मजबुतीकरण व डांबरीकरण पुर्ण करण्यात आलेले असुन ३६ मोठ्या व १२ लहान पुल पर्ण करण्यात आले आहेत.

### ११) पाच कोटी कार्यक्रम :-

पाच कोटी कार्यक्रमाअंतर्गत या विभागाकडे जिल्हा व इतर मार्गाची ७७ रस्त्यांची लहान-लहान कामे मंजुर असुन या कामांची अंदाजित किंमत रु.१२२३ लक्ष एवढी आहे. यापैकी १७ कामे पुर्ण

असुन ३६७ लक्ष एवढी तरतुद सन २००९-१० आर्थिक वर्षात अपलब्ध करुन देण्यात अलेली आहे.

**१२) इमारती :-**

अंबाजोगाई जि. बीड येथे वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र इमारतीचे बांधकाम, ग्रामीण रुग्णालय केज श्रेणीवर्धन करणे ता. केज, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथे रक्तपेढी इमारत बांधणे स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकिय महाविद्यालय येथे टेनिंग सेंटरचे बांधकाम करणे, अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई बांधकाम करणे अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक अंबाजोगाई बांधकाम स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथे टी.बी. वार्डचे बांधकाम पुर्ण केले[७७].

**१३)स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय अंबाजोगाईतील बांधकाम :-**

प्रशासकीय इमारतीचे बांधकाम प्रकार २ ते ८० निवासस्थाने निवासी डॉक्टरांचे वसती गृह २८८ खाटांचे रुग्णालय २३० खांटाचे रुग्णालय नार्सिंग होम इमारत ४८ खाटांची क्षयरोग इमारत उभ्या केल्या.

**१४) आरोग्य खात्याची कामे :-**

ग्रामीण रुग्णालय नांदुरघाट ता. केज येथे मुख्य इमारतीचे बांधकाम ग्रामीण रुग्णालय धानोरा ता. अंबाजोगाई येथे मुख्य इमारतीचे बांधकाम पूर्ण केले अंबाजोगाई जि. बीड येथे १०० खाटांचे रुग्णालय व नवजात अर्भक केंद्र इमारत बांधकामे इत्यादी बांधकामे पुर्ण केली.

**१५) महसूल विभागाची कामे :-**

अंबाजोगाई जिल्हा बीड येथील उपविभागीय कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम पुर्ण केले अंबाजोगाई तहसील कार्यालयाचे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पुर्ण केले अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई जि. बीड येथील कार्यालयीन इमारतीचे बांधकाम इत्यादी पुर्ण केली आहेत.

**१६) मागासवार्गिय मुलांसाठी वसतिगृह :-**

मागासवार्गिय मुलांसाठी वसतिगृहांच्या इमारतींचे बांधकामे डॉ. विमलताई मुंदडा यांच्या प्रयत्नामुळे अंबाजोगाई व केज येथील पुर्ण झालेले आहे रुपे दिसून येते.

**१७) रोजगार हमी योजना अंतर्गत कामे :-**

रोजगार हमी योजने अंतर्गत केज मतदार संघातील ७२ कामे मंजुर असून त्याची अंदाजित किंमत १२७३,६८ लक्ष एवढी आहे सदरील सर्व कामे सन २०१० साली पूर्ण झालेली आहेत. या सर्व कामावर रु. ७१६.८६ लक्ष एवढा खर्च झालेला आहे. व त्यामुळे नागरिकांना हाताला काम मिळाले आहे असे दिसून येते.

### १८) धनेगाव- केज- धारुर पाणी पुरवठा योजना :-

धनेगाव-केज-धारुर ही सुमारे १८ कोटी रुपयाची योजना कार्यन्वित करावयाचे तर त्यांचे स्वप्न होते. सतत सात वर्ष या योजनेचा पाठपुरावा करीत या योजनेची पुर्तता झाली. केजकरांच्या डोळ्यात नेहमी पाणी होते. आज ते पाणी कृतज्ञतेत बददले आहे. ही कृतज्ञता ताईंनी आपल्या कामाचे सार्थक झाल्याची पावती देते.

१९८४ साली धनेगाव- केज-धारुर पाणी पुरवठा योजनेचा सर्व्हे झाला. तत्कालिन मंत्री अशोक पाटील यांचे पद गेल्यानंतर फाईल धुळखात मंत्रालयात पडून राहिली. १९९१ मध्ये भाजपाच्या तिकिटावर निवडून गेलेल्या सौ. विमल मुंदडा यांनी लक्ष घालुन प्रशासकिय मान्यता, कामाला मंजुरी, बँकेचा पैसा उपलब्ध करुन दिला. शेवटी १९९८ च्या उन्हाळ्यात कोणाचीही वाट न पाहाता उद्‌घाटनाची इच्छा न धरता पाणी पुरवठा सुरु करण्याचा आदेश संबंधिताना दिला नाही तर तुम्ही कोणाच्या दबावाला बळी पडुन उद्‌घाटन कराल तर मी स्वत : कोणत्याही क्षणी धरणावर जावून पाणी पुरवठा योजनेची कळ दाबेन, अशी धमकी दिली जाताच धनेगावच्या पाण्याचा स्त्रोत केज, धारुरकडे वळाला. योजना फलद्रुप झाली. यासाठी २१ एप्रिल १९९१ मध्ये विधानसभेत स्थगत प्रस्ताव दाखल केला होता. त्यावेळी विधी मंडळात पक्षाचे मार्गदर्शन होते[७८].

जनसामान्याच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या या नेतृत्वाने आजतागायत गेल्या २० वर्षात मतदार संघात विकासाची गंगा आणली. गेल्या २० वर्षापुर्वी ज्या मतदारानी ना. मुंदडा यांच्या नेतृत्वावर विश्वास टाकून परिसराच्या विकासाची धुरा त्यांच्या खांद्यावर टाकली, त्या मतदाराच्या विश्वासाला पात्र राहून गेल्या २० वर्षात मतदारसंघाचा त्यांनी कायापालट केला हीच त्यांच्या कर्तत्वाची खरी शिदोरी ठरली. या शिदोरीच्या बळावरच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरदचंद्रजी पवार यांनी विमलताईकडे महाराष्ट्र आरोग्य खात्याची जबाबदारी टाकली व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद विमलताईकडे सोपविले.

गेल्या २० वर्षापासून अंबाजोगाई जिल्हा व्हावा ही या परिसरातील नागरिकांची आग्रही मागणी होती. या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करीत विमलताईंनी अंबाजोगाई येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरु करुन या परिसरातील जनतेला जिल्हा निर्मितीचे व्दारा खुले करुन दिले. आज अंबाजोगाई येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, भूसंपादनाची तीन कार्यालये, सुरु केली आहेत. तसेच अतिरिक्त पोलीस अधिक्षक कार्यालय व ग्रामीण पोलीस ठाणे सुरु करण्यात आली आहेत. याशिवाय अंबाजोगाईच्या सर्वांगिण विकासासाठी व येथील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गैरसोय दुर करण्यासाठी ६० कोटी रुपये खर्चाची धनेगांव पाणी पुरवठा योजना आता पुर्ण झालेली आहे[७९].

संपुर्ण आशिया खंडात लौकिकास पात्र ठरलेल्या स्वामी रामानंद तीर्थ वेद्यकिय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयाच्या सर्वांगिण विकासासाठी विमलताईनी २३०,२८० खाटाच्या रुग्णालयाच्या इमारतीला मंजुरी दिली. या इमारतीचे काम देखील पुर्ण झाले आहे. तसेच प्रशासकिय इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. या परिसरातील रुग्णांचे सोय व्हावी यासाठी सिटी स्कॅन मशिन व इतर यंत्र सामुग्रीसाठी १ कोटी मराठवाडा विकास निधीतुन रुग्णालयास उपलब्ध करुन दिली आहे. डॉक्टरांच्या रिक्त जागा भरुन रुग्णालयाला सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात त्या मागे राहिल्या नाहीत या शिवाय बीड जिल्ल्यात नांदुरघाट व धानोरा येथे ग्रामीण रुग्णालयाला मंजुरी देवून ते पुर्ण केले आहे.

मतदार संघातील रस्ते बांधण्याचे काम गेल्या २० वर्षात मोठ्या प्रामणात झाले आहे. अंबाजोगाई ते कळंब हा राज्य हॉट मिक्स डांबरीकरणाव्दारे पुर्ण झाला आहे. १० कोटी रुपये खर्च करुन झालेल्या या रस्त्याचे काम पुर्ण झाले असुन या रस्त्याचे रुंदीकरण झालेले आहे.

केज मतदार संघात पाणी योजना, केज येथील बारा गांवातील पाणी पुरवठा योजना, आसरडोह येथील वीस खेडी पाणी पुरवठा योजना, या योजना मंजुर करुन त्या कार्यान्वित केल्या व या परिसरातील लोकांचा पाणी प्रश्न सोडविला. केज मतदार संघातील जास्तीत जास्त जमिनी ओलीताखाली पाहिजेत हा दृष्टीकोन समोर ठेवून या भागात अनेक साठवण तलाव विमलताई मुंदडा नी मंजुर केले. यात निळकंठेश्वर, डोगर पिपंळा, काळवटी तांडा, साकुड, चनई या साठवण तलावाची का पुर्ण झालेली आहेत. तसेच मतदार संघातील शेतकऱ्यांना विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी, त्यांची गैरसोय टाळण्यासाठी लोखंडी सावरगांव विद्युत उपकेंद्र मंजुर केले. हे देखील काम पुर्ण झाले आहे. तसेच

धनेगांव येथील विद्युत उपकेंद्राचे काम पुर्ण झाले आहे. या शिवाय मतदार संघात जिथे मागणी होईल तिथे तात्काळ ट्रान्स फार्मर उपलब्ध करुन दिले जातात. यामुळे या परिसरातील सातत्याने विद्युत पुरवठा सुरळीत राहतो. गेल्या २० वर्षाच्या काळात विमलताई मुंदडा यांनी मतदार संघाचाच नव्हे तर संपुर्ण बीड जिल्ह्याचा विकास घडवून आणला आहे.

## १९) धारुर तालुक्याचा विकास :-

धारुर तालुक्यातील अनेक गांवे केज विधानसभा मतदार संघात येतात. राज्याच्या आरोग्य तथा बीड जिल्ह्याच्या पालकंमत्री विमलताई मुंदडा असताना धारुर तालुक्याचा सुध्दा विकास त्यांनी केलेला आहे. धारुर तालुक्याच्या विकासाकडे विशेष लक्ष देवून त्यांनी तालुक्याच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणला. तालुक्यातील मोरफळी, खोडस, रेपेवाडी येथील साठवण तलावास मंजुरी मिळवून आणली व हजारो हेक्टर जमीन ओलीताखाली आणल्याने दिसून येते. त्यामुळे शेतकरी बागायतदार झाला आहे. धारुर तालुक्याला जोडणारा एकही रस्ता व्यवस्थित नव्हता. मात्र डॉ. विमलताई मुंदडा यांनी गांभीर्याने लक्ष देवून धारुर- आडस रस्त्यासाठी ४० लाख रुपये, होळ- आडस रस्त्यासाठी २५ लाख रुपये असा निधी डांबरीकरणासाठी आणुन या रस्त्यांचे हॉट मिक्स पध्दतीने डांबरीकरणाची कामे पुर्ण झाले असून यामुळे रस्त्यांची अवस्था सुधारली आहे. त्याचप्रमाणे नवीन रस्त्याची कामे, पाझर तलावाची कामे, पिण्याच्या कामे, सांस्कृतिक सभागृहे, व्यायामशाळा, इत्यादी साठी निधी वापरुन धारुर तालुक्यातील विकास कामे मार्गी लावली आहेत[८०].

## २०) ३३/११ के.व्ही उपकेंद्र अंबाजोगाई :-

अंबाजोगाई व परिसरातील औद्योगिक , बागायती क्षेत्रात ३३/११ के.व्ही उपकेंद्र येथून गेल्या ३५ वर्षापासून वीजपुरवठा चालु आहे. या वीज उपकेंद्रातील जुन्या ११ के. व्ही. ओसीबीच्याऐवजी ११ केव्ही व्ही सी बी मार्फत अखंडीत वीजपुरवठा मुंदडा यांच्या शुभ हस्ते मा. विलास सोनवणे यांच्या अध्यतेखाली व नंदकिशोर मुंदडा व राजकिशोर मोदी व अरुण पुजारी, राजाभाऊ औताडे, अविनाश लोमटे, किशनराव बावणे, इत्यादीच्या प्रमुख उपस्थितीत नुतनीकरणाच्या कामाचा शुभारंभ दि.१४.०२.२००५ रोजी संपन्न झाला. या कामाच फायदा अंबाजोगाई शहर व वीजग्राहकांना होत आहे.अंबाजोगाई येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शासकिय इमारतीसाठी निधी उपलब्ध करुन

दिला. ५० वर्षापुर्वी स्थापन झालेल्या कृषी उत्पन्न बाजारा समितीच्या प्रशासकिय इमारतीसाठी अद्यापपर्यंत कोणीही प्रयत्न केला नव्हता. धारुर येथे होणारे सिताफळ संशोधन केंद्र ताईंनी संघर्ष करुन अंबाजोगाई येथे आणले. या केंद्राच्या माध्यमातुन सिताफळ संशोधनाचे कार्य केले जाते. सिताफळाच्या विविध जातीचे परीक्षण केले जाते.

उद्योगधंद्याच्या बाबतीत अंबाजोगाई हे शहर पुर्वीपसूनच मागे होते. त्यामुळे विमताईंना वाटायचे की, आपल्या भागातही एक औद्योगिक वसाहत असली तर लघुउद्योजकाला व सुशिक्षित बेरोजगाराला काम मिळेल या हेतुने विमलताईनी जोगाईवाडी परिसरात कमलाकर चौसााळकर यांनी उभारलेल्या योगेश्वरी औद्योगिक वसाहतीसाठी लागणाऱ्या सुविधासाठी त्यांनी समभाग भांडवल उपलब्ध करुन दिले. तसेच वरवटी परिसरात पंचतारंकित औद्योगिक वसाहत उभा करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

**मराठवाडा विकास कार्यक्रमाअंतर्गत बीड जिल्ह्यासाठी ३०० कोटी रुपयांच्या विकास कामाची तरतुद :-**

बीड जिल्ह्यातील विकास कामाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी मराठवाडा विकास कार्यकम्रमांअंतर्गत २००८- ०९ व २००९- १० या दोन वर्षात राबविण्यात येणाऱ्या विविध शासकिय योजनामधील ३०० कोटी रुपयाच्या विकास कामाचा समावेश करण्यात आला असून या कामासाठी स्वतंत्र आर्थिक तरतुद करुन ठेवण्यात आली आहे. अशी माहिती राज्याच्या सार्वजनिक आरोग्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री विमलताई मुंदडा यांनी दिली.

या विकास कामामध्ये प्रामुख्याने अंबाजोगाई - कळंब राज्य रस्त्यासाठी ७५०.०० लाख, मांजरा नदीवरील बॅरेजस बांधकामासाठी १०,००,००० लाख ,५०० लाख अंबाजोगाई येथे कृषी महाविद्यालयाच्या मुलामूलीच्या वसतिगृह इमारतीसाठी ५० लाख, अंबाजोगाई येथे कृषी अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय इमारत बांधकामासाठी २० लाख, केज येथील ग्रामीण रुग्णालयास ३० लाख, अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकिय महाविद्यालयात दंत विभागसाठी १० लाख, अंबाजोगाई येथे पोलीस अधिक्षक कार्यालय इमारतीसाठी १०० लाख, कै.स.मा. गर्गे स्मारक बीड साठी २५ लाख अशा विविध कामाचा या योजना मध्ये डॉ. विमलताई मुंदडा यांनी विशेष प्रयत्न करुन समावेश केलेला आहे[८१].

सेलु अंबा येथील २७ लाख पाणी पुरवठा योजनेचे उद्‌घाटन करुन डॉ.सौ.विमलताई मुंदडा

यांच्या हस्ते झाले. अध्यक्ष स्थानी जीवन प्राधीकरण मंडळाचे सदस्य आदिनाथ नवले उपस्थित होते. तसेच अंबाजोगाईच्या पाणी प्रश्न तात्काळ सोडविण्यासाठी पावलं उचलली जातील असेही विमलताई मुंदडा यांनी सेलु अंबा येथील कार्यक्रमात सांगितले.

विमलताई मुंदडा यांनी आपल्या आमदार फंडातुन अंबाजोगाई येथील पत्रकार संघाच्या वाचनालयासाठी दोन लाखाचा निधी दिला.

**२१) आद्‌कवि मुकूंदराज स्वामी परिसरातील सामाजिक सभागृहाचे भुमिपुजन :-**

महाराष्ट्रा राज्याच्या आरोग्य मंत्री व बीड जिल्ह्याच्या पालक मंत्री असताना डा्‌. विमलताई मुंदडा यांच्या आमदार फंडातुन अंबाजोगाई परिसरातील आद्‌कवि मुकूदराज स्वामी परिसरातील सामाजिक सभागृहाचे भुमिपुजन डॉ. विमलताई मुंदडा यांच्या हस्ते व ह.भ.प. माधवबुवा शास्त्री यांच्या अध्यतेखाली दि. २०.०१.२००६ रोजी सकाळी ९.०० वाजता कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी नंदकिशोर मुंदडा विलास सोनवणे, नारायणदादा काळदाते, प्रकाश अहिर, राजाभाऊ औताडे, श्री शंखपाळ, तहसिलदार सुर्यवंशी, इ. मान्यवर उपस्थित होते. हे देखील काम पुर्ण झाले आहे.

**२२). अंबाजोगाई उपविभागीय अधिकारी (महसुल) कार्यालय बांधकाम :**

अंबाजोगाई या ठिकाणी दिवाणी न्यायालयाच्या समोर दि. ०९.१२.२००६ या दिवशी ना. डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांच्या शुभहस्ते हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणन बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. पियुष सिंह हे उपस्थित होते. तर अप्पर जिल्हाधिकारी श्री. भगवानराव गुट्टे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कर्यालयामुळे अनेक सामान्य लोकांना महसुल कार्यालयातील कामकाज करणे सोपे जाईल याचे श्रेय डॉ. विमल मुंदडा यानांच द्यावे लागेल.

**२३). अंबाजोगाई येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयाचे उद्‌घाटन :-**

३६ लाख रुपये खर्चुंन बांधण्यात आलेल्या अंबाजोगाई येथील नवीन उपजिल्हाधिकारी कार्यालय इमारतीचे उद्‌घाटन राज्याच्या सार्वजनिक आरोग्यमंत्री  डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. पियुष सिंह हे उपस्थित होते. यावेळी मंचावर माजी राज्यमंत्री, पंडीतराव दौंड, युवा नेते अक्षय मुंदडा, राजाभाऊ औताडे, राष्ट्रवादी

काँग्रेसचे मान्यवर उपस्थित होते.

आपल्या विस्तारीत भाषणात विमलताई मुंदडा म्हणाल्या, गेल्या २० वर्षापासून आपण राजकाराणात असल्याने सतत अंबाजोगाई शहर आणि परिसरातील भागाच्या विकासासाठी प्रयत्न केले. शहरात असलेल्या निझामकालीन इमारतीऐवजी अद्यावत अशा नवीन इमारती उभ्या करुन शहराच्या सौंदर्यात भर घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला. निजाम राजवटीत बांधलेल्या इमारतीमध्ये असलेले शासकिय विश्रामगृह, वैद्यकिय महाविद्यालय, उपजिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, ठिकाणी असलेल्या सर्व कार्यालयाचे कामकाज या ठिकाणी सुरु केली. आता या सर्व कार्यालयावर नियंत्रण ठेवण्यासाठी एकत्मिक प्रशासकिय इमारत बांधण्याचा प्रस्ताव लवकरच सादर करुन ही इमारत शहरात उभी करु असे त्यांनी सांगितले.

मतदार संघातील ज्या भागात, ज्या गांवामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य असायचे त्या गावाला पाझर तलाव, साठवण तलाव, निर्मिती करुन ती गांवे आज हरितक्रांतीने बहरुन टाकली आहेत. पंचायत समिती मार्फत गरजु शेतकऱ्यांना खत, बि- बियाणे, औषधे, फवारा आदी कृषी साधने उपलब्ध करुन दिली. तसेच शेततळे, नाला बल्डिंगसाठी ७५ लाख रुपयाची तर तांडा वस्ती सुधार योजने अंतर्गत ३५ लाख रुपयाची करुन दिली. अंबाजोगाई येथील कृषि विद्यालयाच्या मुलींच वसतिगृहासाठी १० लक्ष रुपयांचा निधी देणार असे डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांनी सांगितले. डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांच्या निधीतुन अंबाजोगाई येथील अमृतेश्वर मंदीरांच्या जिर्णोध्दारास दोन लाख रुपये दिले. तसेच मंदीराच्या कामासाठी सहकार्य राहील. असे त्यांनी सांगितले.

अंबाजोगाई शहराला यावर्षी उन्हाळा जास्त असल्याने पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न भेडसवणार आहे. त्यासाठी त्या-त्या तालुक्यातील तहसिलदार, अधिकारी, व पदधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त प्रयत्न करुन ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळेल यासाठी प्रयत्नशील राहावे व कमीत कमी पैशात जास्त योजना पुर्ण कराव्यात असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बाल कल्याण राज्यमंत्री डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांनी अंबाजोगाई येथील विश्रामगृहावर आयोजित केलेल्या पाणीटंचाई बाबत बैठकित मत व्यक्त केले.

शासनाच्या योजना ग्रामीण भागात अधिकपणे राबवुन ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी

व तो भाग सुजलाम सुफलाम होण्यासाठी आपण प्रयत्नशील राहु, अशी ग्वाही महिला व बालकल्याण राज्यमंत्री डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांनी आमदार फंडातील रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण उद्‌घाटन कार्यक्रमात आसरडोह येथील शेतकरी मेळाव्यात दिली.

मतदार संघात डोंगरी भाग येत असल्यामुळे डोंगरी भागात हरितक्रांती घडवून आणण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत, असे भावठाणा येथील साठवण तलावाच्या जलपुजन कार्यक्रमाप्रसंगी राज्याच्या आरोग्यमंत्री डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांनी सांगितले. केज विधानसभा मतदार संघातील एकही तांडा विकासापासुन वंचित ठेवणार नाही. असे तम त्यांनी व्यक्त केले.

**२४) अंबाजोगाई जिल्हा निर्मितीसाठी प्रयत्न :-**

अंबाजोगाई जिल्हा व्हावा यासाठी डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांनी सुरुवातीपासुनच प्रयत्न केलेले दिसून येतात. यासाठी त्यांनी भाजपाच्या आमदार असताना तत्कालीन मुख्यमंत्री मा. मनोहर जोशी यांच्याकडे जिल्हा निर्मितीसाठी अंबाजोगाई येथील शिष्टमंडळ घेवुन जिल्हा निर्मितीसाठी मागणी केली. परंतु गोपीनाथराव मुंडे त्यावेळेस बीड जिल्ह्याचे पालकमंत्री होते. विमलताई मुंदडा व गोपीनाथराव मुंडे यांच्यामध्ये त्योवेळेस अंतर्गत वाद सुरु होता. मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी अंबाजोगाईला येण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला देवून देखील मुख्यमंत्री अंबाजोगाईला येवून कार्यक्रम घेवून शेकले नाहीत. त्यावर डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांनी गोपीनाथ मुंडे यांना जबाबबदार धरुन त्यांच्यावर टीका केली. अंबाजोगाई जिल्हा निर्मिती होईपर्यंत आपण मागे हटणार नाहीत, त्यासाठी आपण शिवसेना प्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे याच्याकडे साकडे घालणार आहोत, असे डॉ. सौ. विमलताई मुंदडा म्हणाल्या. गोपीनाथ मुंडे यांनी जिल्हा निर्मितीला विरोध केला असा जाहीर आरोप डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांनी केला जिल्हा निर्मितीसाठी डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांनी अंबाजोगाई येथील विविध पक्षाचे पुढारी राज किशोर मोदी, प्रा. नानासाहेब गाठाळ, सर्व पक्षाचे कार्यकर्ते सहकार्याने उपोषणही केले. या उपोषणाला तत्कालीन सहकार मंत्री मा.ना. जयप्रकाश मुंदडा यांनी भेट दिली. व जिल्हा निर्मितीसाठी मुख्यमंत्र्यासोबत चर्चा करुन त्याचा पाठपुरवठा करु असे आश्वासन दिले. त्यानंतर डॉ. सौ. विमलताई मुंदडा व त्यांच्या सहकाऱ्याने उपोषण सोडले. १८ सप्टेंबर १९९७ रोजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांचा नियोजित अंबाजोगाई दौरा गोपीनाथ मुंडे यांच्या प्रखर विरोधामुळे दुसऱ्यांदा रद्द झाला. एवढे प्रयत्न

करुनही आणखी अंबाजोगाई जिल्ह्याची निर्मिती झालेली नाही. अंबाजोगाई जिल्हा व्हावा या उद्देशाने जिल्ह्याला आवश्यक असलेली बरीच कार्यालये डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांच्याप्रयत्नामुळे सुरु झालेली आहेत.

**२५) केज विधानसभा मतदार संघातील विकासकामाची यादी :-**

१) तांदुळजा- देवळा तातडीची पाईपलाईन करुन अंबाजोगाई शहरास पाणीपुरवठा

२) काळवीट तांडा नळयोजना तातडीने पुर्ण करुन टंचाई परिस्थितीत अंबाजोगाई शहराससुरळीत पाणी पुरवठा

३) अंबाजोगाई येथे कृषि महाविद्यालय मंजुर व सुरु

४) अंबाजोगाई येथे सिताफळ संशोधन केंद्र मंजुर व सुरु

५) अंबाजोगाई येथे तीर्थ विकास योजनेत अडीच कोटी रुपयाची कामे पुर्ण.

६) केज, धारुर व १२ गावी नळयोजना मंजुर व काम पुर्ण.

७) केज व अंबाजोगाई येथे तंत्रनिकेतन मंजुर व सुरु

८) केज येथे टपरीधारकासाठ फलोद्‌नाची जागा मंजुर.

९) निळकंठेश्वर, साकुड, काळवीट तांडा साठवण तलाव मंजुर व सुरु

१०) उंदरी, जवळबन, मुंरबी लघुसिंचन प्रकल्प मंजुर व सुरु

११) भावठाणा साठवण तलाव मंजुर व काम पुर्ण

१२) चनई व गिरवली साठवण तलाव मंजुरी व काम पुर्ण

१३) १३२ के. व्ही. उपकेंद्र, केज येथे मंजुर व काम पुर्ण

१४) युसूफ वडगांव, होळ, धनेगांव चिंचोली माळी, सायगांव, मांडवा पठाण ३३ के.व्ही. उपकेंद्र मंजुरी व काम पुर्ण.

१५) अंबाजोगाई येथे २८८ बेडेड रुग्णालय इमारत मंजुर

१६) अंबाजोगाई येथे २३० बेडेड रुग्णालय इमारत मंजुर

१७) वैद्यकिय शिक्षण घेणाऱ्या विद्याथीर्नीसाठी वसतीगृह मंजुरी व काम पुर्ण.

१८) वैद्यकिय महाविद्यालयात शिकाऊ डॉक्टरासाठी वाढीव वसतीगृह इमारत मंजुर व पुर्ण.

१९) वैद्यकिय महाविद्यालयात प्रशासकिय इमारतीचे काम प्रगतीपथावर पुर्ण

२०) अंबाजोगाई येथे रुग्णालयात कोबाल्ट युनिट मंजुर व सुरु

२१) अल्ट्रा साऊंउ, सिटी स्कॅन व इतर मशिनरी उपलब्ध करुन रुग्णालयात रुग्णासाठी सुविधा उपलब्ध.

२२) अंबाजोगाई- बीड रस्त्याचे रुंदीकरण व रस्ता हॉटमिक्स मंजुरी व काम पुर्ण.

२३) मतदार संघातील ग्रामीण रस्ते बारमाही डांबरीकरणाने ९०टक्के काम पुर्ण.

२४) चालु वर्षात अर्थसंकल्प, नाबार्ड,सी.आर.एफ. या योजने अंतर्गत पंधरा कोटीची रस्त्याची कामे पूर्ण केली.

२५) मतदारसंघात रो. ह.यो. अंतर्गत पंधरा वर्षात शंभरहुन अधिक रस्ते मंजुरी व कामे पुर्ण.

२६) मतदारसंघात रो. ह. यो. अंतर्गत पंधरा वर्षात पाझर तलावाची मंजुरी व काम पुर्ण

२७) चालु आर्थिक वर्षात रो.ह.यो. अंतर्गत कृषीची दोन कोटीची कामे मुजुरी व कामे पुर्ण.

२८) युसूफ वउगांवला प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीस मंजुरी व निधी इमारत काम पुर्ण.

२९) भावठाणा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीस मंजुरी व निधी उपलब्ध काम पुर्ण.

३०) येल्डा येथे आरोग्य दक्षता पथक मंजुरी व पुर्ण.

३१) संजय गांधी निराधार व इंदीरा गांधी वृध्द या योजनेत जास्तीत जास्त लाभधारकांना लाभ मिळवून दिला.

३२) राष्ट्रीय आपलतकालिन कुटूंब सहाय योजनेअंतर्गत लोकांना जास्तीत जास्त मिळवून दिले.

३३) शेकऱ्यांना वीज पंपाची कनेक्शन तातडीने मिळवून देणे तसेच जास्तीत जास्त नवीन ट्रान्सफॉर्मर कामे करुन घेतली. स्ट्रीट लाईठ वगैरेची कामे करुन घेतली.

३४) जवाहर योजना (सडक योजना) अंतर्गत मतदार संघातील जास्तीत जास्त लाभधारकांना विहीरी मिळवून दिल्या.

३५) घरकुल, व्यापारी संकुल यांच्यासाठी हौद, बाजारात ओटे अशा विविध योजनांची प्रभावीपणे अमंलबजावणी.

३६) शाळा खोल्या,शिक्षक भरतीसाठी प्रयत्न करुन शिक्षण क्षेत्रात लक्ष.

३७) अंगणवाडी, कार्यकर्ती व मदतनीस यांचे मानधन वाढविणे व भाऊबीचे भेट सुरु केली.

३८) बीड जिल्ह्यसातील डोंगरी गावाचा डोंगरी विकास योजनेत समोवश.

३९) अंबाजोगाई शहर व चार गांवासाठी (साठ कोटी)पाणी पुरवठा योजना मंजुर व काम पुर्ण.

४०)पाणी टंचाई अंतर्गत टॅकरने पाणी पुरवठा तातडीची नळ योजना, नळ दुरुस्ती योजना, इंजन विहिरी, सबमर्सिबल पंप याव्दारे पाणी टंचाई अंतर्गत सुरळीत पाणी पुरवठा.

४१) पुरातत्व खात्यामार्फत हत्तीखानाचे जतन, काम मंजुर व पुर्ण.

४२) सामाजिक प्रबोधनासाठी केज येथे रामकथा व अंबाजोगाईला व्याख्यानमाला आयोजित

४३) केज येथे क्रिडा संकुलास मंजुरी

४४) खोडस साठवण तलावास मंजुरी

४५) अंबाजोगाई येथे शासकिय मुलीचे वसतीगृह इमारत मंजुरी व कामे पुर्ण.

४६) अंबाजोगाई येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाची इमारत मंजुरी व त्यासाठी निधी उपलब्ध करुन काम पुर्ण.

४७) अंबाजोगाई येथे सार्वजनिक बांधकाम व पाणी पुरवठा या दोन्हीची कार्यकारी अभियंत्याची कार्यालये सुरु.

४८) केजला नगर पंचायतीचा दर्जा जाहिर (डि लिमिटेशन नंतर नगर पंचायत)

४९) आमदार फंडातुन आतापर्यंत ग्रामीण व शहरी डांबरीकरण, सिंमेट रोड, विंधन विहीर, तात्पुरती नळयोजना, सबमर्सीबल पंप, शाळा खोल्या, सामाजिक सभागृह, सभा मंडप, पुलाची कामे, अशी प्रचंड कामे अंबाजोगाई, केज शहर व ग्रामीण भागात गांव, वाड्या वस्ती व तांड्यावसुविध

५०) वैधनिक विकास मंडळाचा निधी उपलब्ध करुन विविध कामे पुर्ण

५१) वाण नदीवर येल्डा, पठाण मांडवा, दौनापुर, वानटाकळी पुलाची कामे मंजुर व पुर्ण.

५२) मांजरा नदीवर इस्थळ गावाजवळ पुलास मंजुरी व काम पुर्ण.

५३) तट बोरगांव येथे मांजरा नदीवर केटीवेअर काम पुलाचें काम पुर्ण

५४) मतदार संघात बऱ्याच गांवच्या नळयोजनांना मंजुरी व काम पुर्ण

५५) अंबाजोगाई येथील ट्रेझरी इमारत मंजुरी व काम पुर्ण

५६) आद्यकवी मुकूंदराज स्वामी मंदीर राज्य संरक्षित स्मारक म्हणुन जाहीर

५७)  अंबाजोगाई शहरासाठी रिंगरोडला मंजुरी व काम पुर्ण

५८)  सामाजिक वनीकरण, वनीकरण विभागामार्फत गायरान, जंगलात झाडे, लावण्याचा कार्यक्रम.

५९)  शासकिय विश्रामगृह (अंबारी) मंजुरी व पुर्ण.

६०)  आसरडोह २० खेडी पाणी पुरवठा योजना व मंजुर व काम पुर्ण.

६१)  केज जवळील केजडी नदीवरील पुलाचे काम पुर्ण.

६२)  मतदार संघात नवीन ५० अंगणवाड्या मंजुर व कार्यरत

६३)  अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय मंजुर व कार्यरत.

६४)  महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे पाटोदा, लोखंडी सावरगांव, आडस येथे युनिट कार्यालय मंजुर व कार्यरत

६५)  भुसंपादनाची तीन कार्यालये बीड येथुन अंबाजोगाई येथे स्थलांतरीत.

६६)  उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय मंजुर

६७)  अतिरिक्त पोलीस कार्यालय मंजुर

६८)  ग्रामीण पोलीस स्टेशन मंजुर

६९)  मतदार संघात रोजगार हमी योजनेतुन ११५ पाझर तलाव व २०० रस्ते मंजुर

७०)  खोडस साठवण तलाव मंजुर

७१)  सन २००४ ते ०५ या वर्षात वैधानिक विकास मंडळाकडुन १ कोटी रुपयाची कामे मतदार संघात मंजुर करुन आणली.

७२)  सन २००४ ते ०५ या वर्षात मतदार संघात ३ कोटी रुपयाची डांबरीकरणाची कामे पुर्ण केली.

७३)  सांस्कृतिक विभागाकडुन मतदार संघात ४२ सांस्कृतिक सभागृहे मंजुर केली व कामे पुर्ण.

७४)  स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकिय महाविद्यालयात यंत्र सामग्रीसाठी १ कोटी रुपये मंजुर केले.

७५)  औद्योगिक प्रशिक्षण संस्था केज इमारतीसाठी १.९० कोटी मंजुर केले.

७६)  धानोरा ता. अंबाजोगाई ग्रामीण रुग्णालय मंजुर केले.

७७)  कृषि उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई भागात ५० लाखाचे सिंमेट रस्ते व बाजार ओठ्यास मंजुरी मिळवुन कामे पुर्ण केली.

७८) कृषि उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई बी. ओ.टी. तत्वावर कर्यालयास मंजुरी व काम पुर्ण.

७९) होळ ता. केज येथे उपकेंद्रावर ब्रेकर बसविले. व वीज पुरवठा सुरळीत केला.

## ३.१६ वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक अंबाजोगाई :-

डॉ. विमलताई मुंदडा हे सहकार क्षेत्रात पहिले महत्वपुर्ण पाऊल आहे. १५ ऑगस्ट १९९५ रोजी स्थापन केलेल्या वसुंधरा महिला नागरी सहकारी बँकेने भरीव प्रगती केली आहे. अंबाजोगाई शहराच्या स्थैर्यावर या बँकेचा निश्चितच चांगला परिणाम झाला आहे.

दि.१६/०३/१९९५ ला रिझर्व बँकेची परवानगी घेवुन ऑगस्ट १९९५ रोजी वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक अंबाजोगाई येथे सुरु करण्यात आली. संस्थेचे कार्यक्षेत्र बीड, लातूर आणि औरंगाबाद असे तीन जिल्हे असुन मुख्य कार्यालय अंबाजोगाई आहे. सध्या अंबाजोगाई व केज अशा दोन शाखांव्दारे २७०८ सभासद संख्या व १५ संचालक असलेल्या या संस्थेच्या संस्थापिका चेअरमन, संचालिका डॉ.विमलताई मुंदडा आहेत.

बँकेची १९९५ ला स्थापना झाल्यावर सुरुवातीच्या काळात खालील मान्यवर व्यक्ती या वसुंधरा महिला नागरी सहकारी बँकेच्या संचालिका होत्या[८२].

### १) सभासद आणि भाग भांडवल :-

१९९९-२००० च्या वार्षिक अहवालानुसार दि.३१ मार्च २००० अखेर भागधारकांची संख्या १३७९ झालेली असुन मागील वर्षापेक्षा १०७ सभासदांची वाढ झालेली आहे. नाममात्र सभासदात २२६ ने वाढ होवुन ही संख्या ३३१ झाली आहे. त्यात २.५ लक्ष रुपये वाढ झाली. यात कर्ज वाटपाचे वेळी कपात करुन घेतलेल्या भाग भांडवलाचा समावेश आहे[८३].

### २) राखीव निधी :-

मार्च २००० अखेर राखीव निधीमध्ये वाढ होवुन तो रु.६ लक्ष इतका झाला. याशिवाय इतर राखीव निधी रु. १६ लक्ष जमा आहे. त्यात इमारत कर्मचारी कल्याण व सर्वसाधारण निधीचा समावेश आहे.

**३) ठेवी :-**

३१ मार्च २००० अखेर बँकेडे रु.४३३.५४ लक्ष ठेवी जमा झाल्या आहेत. गतवर्षीच्या तुलनेतही १४७ लक्ष रु. ही वाढ म्हणजे कर्मचारी व संचालकांनी आणि ताईच्या विशेष प्रयत्नांमुळेच झाली. यात शंका नाही.

**४) कर्ज :-**

ठेवीचा योग्य विनियोग करुन नफा कमावणे आणि व्यवस्थापन खर्च भागवुन बँकेस नफ्यात आणण्यासाठी सभासदांना कर्ज वाटप करणे जरुरीचे असते. २००० अखेर जमा झालेल्या ठेवीतुन कर्ज वाटप २६४.१० लक्ष रु. झालेले आहे. ज्यामध्ये मार्च १९९९ अखेरच्या कर्ज वाटपापेक्षा रु.५८.६८ रु.लक्षांनी वाढ झाली आहे. कर्जापैकी अग्रगण्य क्षेत्रात ६०% वाटप असुन कर्ज वाटप करतांना बँकेने रिझर्व्ह बँकेच्या नियम व अटीप्रमाणे केले आहे[८४].

**५) संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-**

मार्च २००० अखेर ६ संचालकांना रु.३१.९६ लक्ष कर्ज वाटप केले असुन त्यांचेकडुन रु. १९.२२ लक्ष कर्ज येणे बाकी आहे.

**६) येणे थकबाकी :-**

सन १९९९-२००० मार्च अखेर येणे पैकी रु.४६ लक्ष थकित कर्ज वसुली असुन त्यांचे प्रमाण १७% आहे. हे कर्ज वसुल करण्याचे प्रयत्न चालु असते तरी काही उपाय योजना लवकर वसुल होणे आवश्यक आहे.

**७) गुंतवणुक :-**

सन २००० अखेर बँकेने रु.१.०० लक्ष इंदिरा विकास पत्रात गुंतवले असुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व राज्य सहकारी बँक रु. १९६ लक्ष ठेवी ठेवलेल्या आहेत. याशिवाय २५% आणि ३% प्रमाणात शिल्लक ठेवण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत.

**८) नफ्याचे वाटप :-**

सन १९९९-२००० मध्ये एकुण रु.२३.५७ लक्ष नफा झालेला आहे. यापुर्वी सन १९९८-९९ मध्ये झालेल्या रु. ११.९० लक्ष नफ्याचे वाटप मागील वर्षी करण्यात आले होते. १९९९-२००० च्या

रु. २३.५१ नफ्याचे वाटप बँकेचे पोटनियम आणि कायदे कानुन प्रमाणे करण्यासाठी संचालक मंडळाने मान्यता दिली होती[८५].

| | |
|---|---|
| एकुण वाटप योग्य नफा रु. | २३.५१ लक्ष |
| राखीव निधी २५% रु. | ५.८८ लक्ष |
| डेव्हीडंट वाटप १०% रु. | २.३५ लक्ष |
| इमारत फंड रु. | ९.०० लक्ष |
| कर्मचारी कल्याण निधी रु. | १.०० लक्ष |
| जनरल रिझर्व रु. | ५.२८ लक्ष |

### ९) कर्मचारी वर्ग :-

मार्च २००० अखेर बँकेत २ अधिकारी ५ लिपीक आणि दोन परिचारक सेवेत कार्यरत आहेत. बँक कर्मचाऱ्यांच्या संमतीने ग्राहकांना जादा सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी संध्याकाळी ६ ते ८ अशी दोन तास ज्यादा काम काजाची वेळ ठरवलेली आहे. कर्मचाऱ्यावर कामाचा ताण पडत असला तरी कर्मचाऱ्याची कामात कोठेही कुचराई दिसत नाही हे विशेष[८६].

### १०) शाखा विस्तार :-

मार्च २००० अखेर शाखा विस्तार करण्यात आला नव्हता पण पुढे २६ सप्टेबर २००० रोजी केज येथे शाखा विस्तार करण्यात येवुन त्यांचे दैनंदिन व्यवहार चालु आहेत[८७].

तक्ता क्र.३.९

## १९९६ ते २००१ पर्यंत बँकेचे तुलनात्मक स्थिती विवरण

| विवरण | ३१/३/९६ | ३१/३/९७ | ३१/३/९८ | ३१/३/९९ | ३१/३/२००० | ३१/३/०१ |
|---|---|---|---|---|---|---|
| सभासद संख्या | १०२३ | १०६५ | ११४८ | १२७२ | १३७९ | १४७४ |
| भाग भांडवल | ७.०५ | ८.७५ | ११.६७ | १५.२० | १७.३३ | २१.०३ |
| निधी संचित | ०.०५ | ०.०५ | ०.०६ | १०.०९ | २२.०९ | ३९.०७ |
| ठेव | १९.७८ | ८५.९८ | २०१.८९ | २६८.८९ | ४३३.५४ | ६०७.६५ |
| कर्जे | ५.३१ | ४८.०३ | १३२.७३ | २०५.४२ | २६१.९५ | ३२४.७८ |
| गुंतवणुक | १८.८० | ४४.५७ | ७७.४४ | १०७.३३ | २१४.१५ | ३३१.७८ |
| नफा-तोटा | ०.७६ | १.५५ | १०.०२ | ११.९० | २२.५१ | २५.४३ |
| ऑडीट वर्ग | अ | अ | अ | अ | अ | अ |

तक्ता क्र. ३.१०

## बँकेत गेल्या ५ वर्षातील ठेव व कर्जाचा प्रगती आलेख

( आकडे लाखात

तेव्हा या बाबीचा विचार करता डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांचे सहकार क्षेत्रातील वसुंधरा महिला नागरी सहकारी बँकेतील योगदान निश्चित चांगले राहिले आहे. यात बँकेचे संचालक मंडळ चेअरमन, व्हाईस चेअरमन, अन्य संचालिका, सभासद, खातेदार, पिग्मी एजंट व हितचिंतक, बँकेतील कर्मचारी व अधिकारी यांच्या भरीव योगदानामुळे ताईंना कार्य करण्यास बळ मिळाले व यशाची वाटचाल करता आली हेच येथे नमुद करावेसे वाटते.

**पुरस्कार :-**

युवक मुद्राच्या विद्यमाने आयोजित महाराष्ट्रातील सहाकरी बँकांच्या प्रतियोगितेमध्ये वसुंधरा महिला नागरी सहाकरी बँकेने संपादन केलेल्या नेत्रदिपक यशाबद्दल दि.१६ मे २००३ रोजी उस्मानाबाद या ठिकाणी युवकमुद्रा हा पुरस्कार मिळाला. तत्कालिन बँकेच्या अध्यक्षा सौ. ज्योती परदेशी व कार्यकारी संचालक श्री. सतिश देशपांडे यांनी तो स्विकारला.

## ३.१७ अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याच्या संचालक (१९९५-२०००)

अंबासाखरचा पहिला चाचणी गळीत हंगाम सन १९७५-७६ साली पार पडला तेव्हा कारखान्याच्या संचालक मंडळावर किंवा कारखान्याच्या कोणत्याच पदावर विमलताई कार्यरत नव्हत्या. पण अंबासाखरला जन्माला घालणारे संस्थापक चेअरमन मा.डी.एन. पाटील यांनी उजाड माळरानावर शेतकऱ्यांच्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारा एखादा उद्योग उभा करावा या विचाराने प्रेरित होवुन सहकाऱ्यासमवेत विचार विनिमय करुन कारखान्याची उभारणी केली व त्यावेळेचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.कै. शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते गळीत हंगाम सुरु करण्यात आला. पुढे विमलताई मुंदडांनी सहकार क्षेत्रात कार्य करण्याच्या उद्देशाने संचालक मंडळाची निवडणुक लढविण्याचे ठरविले[८८].

१९९५-९६ च्या कारखान्याच्या संचालक मंडळाची निवडणुक होवुन त्यात विमलताई मुंदडा विजयी झाल्या व खऱ्या अर्थाने सहकार क्षेत्रातील योगदानाला सुरुवात झाली. १९९५-९६ ते १९९९-२००० या कालावधीत ताई अंबा सहकारी साखर कारखान्याच्या संचालिका राहिल्या. १९९३-९४ मध्ये गळीत हंगात २६.११.१९९३ रोजी सुरु होवून दि. २५-०२-१९९४ रोजी बंद झाला. गळीताचे प्रत्यक्ष दिवस ५१ होवुन त्यात ९३३२०.२०.६०५ मे. टन एवढे उसाचे गळीत झाले व एकुण ८८४७० क्विंटल साखर तयार होवुन या गळीत हंगामात साखर उतारा ९.४५ टक्के आलेला आहे व सन १९९४-

९५ या वर्षाचा गळीत हंगाम दि. १५-११-१९९४ रोजी सुरु होवुन दि. ०८-०६-१९९५ रोजी बंद झाला गळीताचे प्रत्यक्ष दिवस १४५ होवुन त्यात ३१८३०.४९० मे. टन एवढे उसाचे गळीत झालेले आहे व एकुण २८४९६० क्विंटल साखर पोते तयार होवुन या गळीत हंगामात साखर उतारा ९.०८ टक्के आलेला आहे[८९].

१९९७-९८ सालात कॉ. माणिक जाधवांनी आमदारकिपणाला लावुन एक वर्ष कारखान्यावर थांबुन कारखान्याची विस्कटलेली घडी नीट बसविण्याचा कसोसीने प्रयत्न केला. त्यात ताईचा सहभाग महत्वाचा ठरला. या काळात ताई संचालक असल्यामुळे त्यांनी कारखान्याच्या व शेतकऱ्यांनच्या विकासासाठी अहोरात्र प्रयत्न करुन १४ नोव्हेंबर १९९७ रोजी कारखाना साईटवर संचालक मंडळाची व कामगाराची एक बैठक घेवुन कारखाना सुरु ठेवला. कामगारांनी रात्रीचा दिवस करुन १५ दिवसात यंत्रसामुग्रीच्या दुरुस्तीची कामे केली. ५ डिसेंबर १९९७ ला त्यावेळेसचे राज्याचे मुख्यमंत्री मा.मनोहर जोशी यांच्या हस्ते गळीत हंगाम सुरु झाला. ऊसाचे वजन झाल्याबरोबर कारखान्यावर प्रतिटन १०० रु. मिळु लागले २ लाख ५५ हजार टन ऊसाचे गाळप झाले ११.३४% साखरेला उतारा आला आणि ३ लाख हजार पोते साखर तयार झाली. शेतकऱ्यांना ७२० रुपये एवढा भाव मिळाला. ताईची मनमिळावु भुमिका कामगाराच्या हाताला काम, शेतकऱ्याच्या शेतीमालाला योग्य भाव यामुळे कारखाना चांगला प्रगतीकडे जावु लागला. कामगारांनी श्रमदानातुन गोडावुन उभे केले. यात ताईचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. या सर्व कारणांमुळे कारखान्याला प्रगतीची वाटचाल करता आली. यातच कामगाराची व यंत्र सामुग्रीची कार्यक्षमता पाहुन वसंतदादा शुगर इन्सिटयुटचे व्दितीय क्रमांकाचे राज्यातले बक्षीस अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्यास मिळाले[९०].

कारखान्याचे नेतृत्व गोपीनाथराव मुंडे यांच्याकडे असल्यामुळे कारखान्याच्या एकुण निर्णय प्रक्रियेत डॉ. सौ. मुंदडा यांना फारसे स्थान नव्हते. सन १९९७-९८ वर्षातील कारखान्याची नेत्रदिपक प्रगती राहिली पण नेमके कामगार व अधिकारी यांना याचाच विसर पडला की काय कोण जाणे. १९९८-९९ आणि १९९९-२००० या सालचे दोन गळीत हंगाम कसे तरी पार पडले. १९९७ प्रमाणे काम चालले असते तर क्षेत्रात ऊस शिल्लक राहिला नसता व शेतकऱ्यांना देखिल चांगला भाव मिळाला असता. पण पुढे ताईनी या कारखान्याकडे फारसे लक्ष दिले नाही. कारण ताईचा गट किंवा संचालक

फारसे विश्वासातील नव्हते. पण पुढे कारखाना बंद पडतो की काय असे विमलताईना वाटू लागले व कारखान्याच्या विकासासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे हे लक्षात घेवुन इ.स. २००० मध्ये शेतकरी कामगार आघाडी नागनाथ नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करुन ताईनी स्वतः नेतृत्व करुन निवडणुक लढवली. या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात पुढील तत्वे होती[९१].

शेतकी कामगार विकास आघाडीचे २१ उमेदवार विजयी झाल्यास १०० सभासदामागे एक या प्रमाणे १८०० सभासदाकडुन १०० प्रतिनिधींची निवड करुन समन्वय समिती कायम स्थापन करणे, अधिकाधिक ऊसाचे गाळप करुन साखरेचा उतारा १३% च्या पुढे आणणे, कारखान्याची कार्यक्षमता, साखर उतार, ऊसाला जादा भाव देणे, भ्रष्टाचाराला मुठमाती देणे, स्वच्छ व पारदर्शक कारभार करणे, समन्वय समितीच्या बैठकीतच साखर विक्रीचा निर्णय घेणे, कारखान्याच्या कार्यालयात सर्व रेकॉर्ड ठेवणे, कामगारांना पक्की घरे बांधुन देणे, कारखान्याचा महाराष्ट्रभर नावलौकीक वाढवुन एक आदर्श कारखाना निर्माण करणे ही सर्व तत्वे घेवुन विमलताईनी दि.६ सप्टेंबर २००० ची अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याची निवडणुक शेतकरी कामगार विकास आघाडीच्या माध्यमातुन लढविली. पण यात ताईना यश आले नाही. या निवडणुकीत ताईच्या पॅनलचा एकही उमेदवार निवडुन आला नाही. निवडणुकीत गोपीनाथ मुंडे यांच्या पॅनलचे उमेदवार निवडुन आले. शेतकरी कामगार विकास आघाडीचा पराभव झाला[९२].

**तक्ता क्र. ३.११**

**१९९५ ते २००० याकाळातील साखर उतार तक्ता**

| अ.क्र | हंगाम वर्ष | एकुण ऊस | एकूण साखर | सरासरी साखर | ऊसाचा अंतिम | साखर पोत्याचा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९९५-९६ | १८४२८० | १९२४८० | ९.००% | ४६० | १००८ |
| २ | १९९६-९७ | ३१४८७ | ३३०६५ | ९.०१% | ४६० | ९८३ |
| ३ | १९९७-९८ | २५५००० | ३०५००० | ११.३४% | ७२० | ११८५ |
| ४ | १९९८-९९ | २७३००० | ३२४३८५ | ११.४३% | ७०० | ११४५ |
| ५ | १९९९-२००० | ४२२३४० | ५१७५२५ | १२.१२% | ५६० | १२७५ |

## वंसुधरा महिला तालुका सहकारी दुध उत्पादक व पुरवठा संघ, अंबाजोगाई

डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांचे सहकारातील आणखीन एक महत्वाचे पाऊल म्हणजे वसुंधरा महिला तालुका सहकारी दुध उत्पादक व पुरवठा संघ. या संघाची स्थापना दि. १४-१-२००४ रोजी केली. शेतकऱ्यांना शेतीसाठी जोडधंदा मिळवुन देवुन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणे हा मुख्य हेतु संघ स्थापनेमागचा होता. या संघाच्या संस्थापक अध्यक्ष डॉ.सौ. विमलताई नंदकिशोर मुंदडा आहेत.

वसुंधरा हे नाव जमिनीचे नाव असुन शेतकऱ्याशी निगडीत असल्यामुळे व दुग्ध व्यवसाय हा शेतीवर आधारित असल्यामुळे संघाला वसुंधरा हे नाव दिले. संघामध्ये सर्व महिला सदस्य असुन त्या सक्रिय असतात. वसुंधरा दुध संघाचे कार्यक्षेत्रामध्ये अंबाजोगाई तालुक्यातील पुर्ण गावे येतात. दररोज ८००० ते ८५०० लिटर दुध संकलन केले जाते. संघ आजपर्यंत तरी सतत नफ्यामध्ये आहे. वसुंधरा दुध संघामार्फत कोजागिरी पोर्णिमा हा कार्यक्रम साजरा केला जातो[१३].

वसुंधरा दुध संघाचे सर्व आर्थिक व्यवहार बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा अंबाजोगाई या ठिकाणी चालतात. संघाच्या अंतर्गत जवळपास १५० संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी एकही संस्था बंद पडलेली नाही. संघामार्फत गाईचे वाटप, कर्ज दिजे जात नाही. दररोज शासकीय दुध शीतकारण केंद्र अंबाजोगाई येथे दुध संकलित केले जाते. संकलित केलेले दुध शासकीय दुध योजना, बीड येथे पाठविले जाते. शेतकऱ्याच्या दुधाला शासकीय नियमाप्रमाणे भाव दिला जातो.

वसुंधरा दुध संघाचे ऑफिस मोंढा मार्केटजवळ असुन ऑफिसची जागा स्वतःची नाही. संघामध्ये एकुण आठ कर्मचारी कार्यरत असुन त्यांना सेवानियम सध्यातरी लागु नाहीत. एकंदरीत कर्मचारी व शेतकरी यांच्यातील समन्वयामुळे शेतकरी वर्ग खुश असतो. संचालक मंडळाच्या बैठका नियमित होत असतात. एकंदरीत वसुंधरा दुध संघाच्या माध्यमातुन डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांनी तालुक्यातील सर्व दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना संघाच्या माध्यमातुन दिलासा दिल्याचे दिसुन येते.

### ३.१८ विमल मुंदडा यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य :-

वसुंधरा सेवा प्रतिष्ठान च्या माध्यमातुन विमलताई मुंदडा यांनी केज, अंबाजोगाई व परिसरात अनेक शाळा, महाविद्यालये सुरु केलेली आहेत. वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा डॉ.सौ. विमलताई मुंदडा याच आहेत. सध्या त्यांचे चिरंजीव अक्षय मुंदडा हे या प्रतिष्ठानचे अध्यक्ष तर किशोर

परदेशी हे सचिव म्हणुन काम पाहतात.

वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातुन डॉ. विमलताई मुंदडा यांनी प्रथम अंबाजोगाई शहरामधील गुरुवार पेठ या भागात इ.स.१९९६ मध्ये वसुंधरा प्राथमिक शाळा सुरु केली. या शाळेच्या सचिव सौ. सरिता अंबेकर या आहेत. सध्या ही शाळा अनुदानीत असुन या शाळेमध्ये या भागामधील अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यानंतर १९९६–९७ मध्ये केज या ठिकाणी एस.सी., एस.टी.च्या मुला–मुलींसाठी आश्रमशाळा काढली. ही शाळा उघडल्यामुळे या भागातील एस.सी., एस.टी. च्या मुलांची शिक्षणाची सोय केज याठिकाणी झाली. याचे सर्व श्रेय डॉ. विमलताई मुंदडा यांना द्यावे लागते.

इ.स. २००० मध्ये अंबाजोगाई शहरालगत असलेल्या मोरेवाडी याठिकाणी प्रतिष्ठानच्या माध्यमातुन वसुंधरा प्राथमिक शाळा सुरु केली. याठिकाणी अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शहरी परिसराबरोबरच ग्रामीण भागातही शिक्षणाची सोय व्हावी म्हणुन डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांनी इ.स. २००० या सालामध्ये केज तालुक्यातील लाडेगाव व कानडी(बदन) या ठिकाणी वसुंधरा माध्यमिक विद्यालय सुरु केले. सध्या या दोन्ही शाळा अंशतः अनुदानित आहेत.

केज तालुका सोडुन धारुर तालुक्यातील कोळपिंपरी या ठिकाणी २००१ साली वसुंधरा माध्यमिक शाळा सुरु केली. आज हि शाळा देखिल अंशतः अनुदानीत आहे. या ठिकाणी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

महिला व बालकलयाण विभागाअंतर्गत डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांच्या प्रयत्नाने अंबाजोगाई या ठिकाणी अंगणवाडी कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्र अंबाजोगाई येथे सुरु करण्यात आले. हे केंद्र बीड जिल्हयात एकमेव केंद्र आहे. याच बरोबर वसुंधरा बालगृह, अंबाजोगाई, सावित्रीबाई फुले (मुलींचे) निरीक्षण गृह हे केंद्र सुध्दा अंबाजोगाई या ठिकाणी सुरु करण्यात आलेले आहे. इ.स.२००१ पासुन मातोश्री वृध्दाश्रम कायम विना अनुदानीत अंबाजोगाई या ठिकाणी प्रतिष्ठानच्या अंतर्गत सुरु करण्यात आलेले आहे.

### वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर :–

गामीण भागातील शेतकरी, शेतमजुरांच्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च व दर्जेदार शिक्षणाचा लाभ मिळावा यासाठी महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक आरोग्यमंत्री व महाविद्यालयाच्या संस्थापक

अध्यक्षा डॉ.सौ. विमल मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मा.गोविंदराव देशमुख यांच्याअथक प्रयत्नांनी घाटनांदुर ता. अंबाजोगाई या ठिकाणी वसुंधरा कला वरिष्ठ महाविद्यालय सुरु झाले. या महाविद्यालयाला जवळपास आठ वर्षे पुर्ण होत आहेत.

सन २००० मध्ये महाविद्यालयात केवळ ६५ विद्यार्थी होते. आज महाविद्यालयात ८०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. २००१ मध्ये महाविद्यालयाचा निकाल जेमतेम ५६% लागला होता. पुढे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढु लागली व २००१-०२ मध्ये निकाल ५६% वरुन ६६% वर गेला. महाविद्यालय नवीन असल्यामुळे अनेक समस्या यायच्या पण अध्यक्षा विमलताई मुंदडा, सचिव गोविंदराव देशमुख, प्र.प्राचार्य पी.के.काळे यांच्या मार्गदर्शन व नियोजन व प्राध्यापकांच्या योगदानमुळे हे महाविद्यालय आज प्रगतीपथावर आहे. ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची संधी देणारे हे एक महाविद्यालय आज प्रगतीपथावर आहे. ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची संधी देणारे हे एक महाविद्यालय न राहता महाविद्यालयातुन विद्यार्थी बाहेर परिपुर्ण पडावेत याची काळजी प्राचार्य घेत असतात. फक्त बीड जिल्हयातील विद्यार्थी या महाविद्यालयात शिक्षण घेत नाहीत तर बीड बरोबर लातूर, उस्मानाबाद, परभणी, हिंगोली या जिल्हयातुन विद्यार्थी शिक्षणासाठी महाविद्यालयात येतात.

महाविद्यालयाचा २००५ चा निकाल ७८% लागला असुन याचे श्रेय संस्थापक अध्यक्ष डॉ. विमलताई मुंदडा, सचिव गोविंदराव देशमुख, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी यांना द्यावे लागेल. २००८-०९ या शैक्षणिक वर्षात डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांनी अनेक शैक्षणिक संस्था सुरु केल्या आहेत. त्यामध्ये डॉ.सौ. विमलताई मुंदडा अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई, अक्षय सेवा प्रतिष्ठान संचलित, महिला महाविद्यालय, मोरेवाडी, ६ कनिष्ठ महाविद्यालये इ. चा समावेश होतो.

### ३.१९ सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य (ताई महोत्सव) २००३ :-

समाजातील नाते दृढ करण्यासाठीच डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांचा वाढदिवस साजरा केला जातो. ताई महोत्सवाची सुरुवात इ.स.२००३ सालापासुन सुरु करण्यात आली. मा.ना.डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त वसुंधरा सेवा प्रतिष्ठाण, अंबाजोगाई यांच्या तर्फे १ ऑगस्ट ते ५ ऑगस्ट २००३ या काळात व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते व वाढदिवसानिमित्त प्राचार्य

शिवाजीराव भोसले, विवेक घळसासी, प्रा. यशवंत पाठक अशा नामवंत विचारवंताचे व्याख्यान अंबाजोगाई येथील नगर परिषदेच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित केले होते.

पहिल्या वर्षी ज्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित केले गेले त्याचप्रमाणे १ ऑगस्ट ते ५ ऑगस्ट या दुसऱ्या वर्षीही डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त व वसुंधरा महिला नागरी बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेमध्ये दि.१ ऑगस्ट रोजी चारुदत्त आफळे, दि. २ ऑगस्ट रोजी प्रा. यशवंत पाठक (मनमाड) यांचे उत्कट तेचि घ्यावे– समर्थ रामदास या विषयावर व्याख्यान झाले तर दि.३ ऑगस्ट २००४ रोजी डॉ. रावसाहेब पाटील यांचे राजर्षी शाहु महाराज यांच्यावर आधारित व्याख्यान झाले ही व्याख्यानमाला नगर परिषद सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई या ठिकाणी पार पडली. व्याख्यानाची वेळ संध्याकाळी ७.०० वा. असल्यामुळे अंबाजोगाई शहरातील तसेच परिसरातील पुरुष व स्त्रीयांनीही या व्याख्यानाचा लाभ घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वसुंधरा सेवा प्रतिष्ठाणचे किशोर परदेशी, अविनाश लोमटे, रविंद्र जाधव, राजा ठाकुर, बबलु सिद्दीकी व इतर सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले.

दि. १५ ऑगस्ट २००५ रोजी विमलताई मुंदडा यांचा ४३ वा वाढदिवस थोडा कार्यक्रमामध्ये बदल करुन साजरा करण्यात आला. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २००५ हा पंधरवाडा ताई महोत्सव म्हणुन साजरा केला गेला. वसुंधरा सेवा प्रतिष्ठाणतर्फे अंबाजोगाई या ठिकाणी भरगच्च अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये व्याख्यानमाला, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच रोगनिदान व उपचार शिबीर, शालेय व महाविद्यालयीन मुलांसाठी स्पर्धा, ज्येष्ठ नागरिकांसाठी स्पर्धा अशा विविध कार्यक्रमाच्या माध्यमातुन डॉ. विमल मुंदडा यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

दि.१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २००५ या पंधरवाड्यात व्याख्यान व सांस्कृतिक कार्यक्रमात अनेक नामवंत विचावंतांनी आपले विचार अंबाजोगाईकरांना ऐकविले. यामध्ये श्री.प्रविण दवणे, डॉ. वीणा देव, श्रीनिनाद बेडेकर, सिंधुताई सपकाळ, प्राचार्य शिवाजीराव भोसले याच बरोबर प्रा.श्री.विजय पोहनेरकर यांचा हासु आणि आसू हा कार्यक्रम झाला. त्याचबरोबर गझर, मुशायरा,मराठी संगीत रजनी इ.कार्यक्रम ताई महोत्सवात झाले. हे सर्व कार्यक्रम आद्यकवी मुकुंदराज स्वामी महाराज नगर परिषद सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई या ठिकाणी पार पडले.

डॉ. विमलताई मुंदडा या महाराष्ट्राच्या आरोग्यमंत्री असल्यामुळे रोगनिदान व उपचार शिबीराचे देखील आयोजन करण्यात आले. यामध्ये १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या दरम्यान कर्णबधीर रुग्णाची तपासणी करण्यात आली. त्याचबरोबर प्लास्टीक सर्जरी शिबीर, महिला कॅन्सर निदान व उपचार, अस्थिव्यंग रुग्णाची तपासणी, नेत्र शस्त्रक्रिया शिबीर, कर्णबधिर गरजु रुग्णांना श्रवणयंत्र वाटप, कृत्रिम अवयवासाठी निवड झालेल्या लाभार्थींना जयपुर फुट, कुबड्या, तीन चाकी सायकल इ. साहित्याचे वाटप केले. हे सर्व कार्यक्रम स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालय, मेडिकल परिसर अंबाजोगाई या ठिकाणी पार पडले.

शालेय व महाविद्यालयीन मुलांसाठी जनरल नॉलेज, फास्ट सायकलींग, स्लो सायकलींग, रांगोळी स्पर्धा, कॅरम, चित्रकला या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर ज्येष्ठ ज्येष्ठ नागरिकांसाठी देखील विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्यांना व अपंगांना विविध पारितोषिकाचे वितरण डॉ. सौ. विमल मुंदडा यांच्या हस्ते दि. १५ ऑगस्ट २००५ या दिवशी सायं. ५.०० वा आद्यकवी मुकुंदराज स्वामी नगर परिषद सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई या ठिकाणी झाले. ताई महोत्सवानिमित्त कार्यक्रम करण्यासाठी वसुंधरा सेवा प्रतिष्ठानचे सर्व कार्यकर्त्यानी परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वी केले[१४].

डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांच्या ४५ व्या वाढदिवसानिमित्त २३ जुलै २००७ ते १५ ऑगस्ट २००७ या कालावधीत ताई महोत्सव साजरा केला. या कालावधीमध्ये विविध कार्यक्रमाची मेजवानी अंबाजोगाईकरांना मिळाली. वसुंधरा सेवा प्रतिष्ठानतर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. होते. २३ जुलै ते १४ ऑगस्ट २००७ या कालावधीत भव्य सर्व रोग निदान व उपचार शिबीराचे आयोजन स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई या ठिकाणी करण्यात आले. यामध्ये प्लास्टिक सर्जरी शिबीर, महिलांसाठी कर्करोग निदान शिबीर, नेत्र, कर्ण शस्त्रक्रिया शिबीर, गरोदर महिलांसाठी सोनोग्राफी, कर्णबधीर व अस्थिव्यंग रुग्णांना वैद्यकीय साहित्याचे वाटप व शेवटी १४ ऑगस्ट या दिवशी रक्तदान शिबीर अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

दि. ८ ऑगस्ट या दिवशी पासुन महिला अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण व श्रीमद भागवत कथा या ज्ञानयज्ञ सोहळा राजस्थानी मंगल कार्यालय, शिवाजी चौक, अंबाजोगाई या ठिकाणी

आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन विमलताईंचे चिरंजीव अक्षय मुंदडा यांच्या हस्ते झाले. ह.भ.प. मुक्ताबाई सोनवणे (नाशिक), कमलताई दहातोंडे (परळी), सदगुण सागर साधाताई सानप (महासांगवी), विवेकसिंधु ह.भ.प. मुक्ताबाई बारुळे(पुणे) अशा नामवंत किर्तनकारांचे किर्तन झाले. त्याबरोबर चंदाताई तिवारी यांचा भारुडाचा कार्यक्रम देखील झाला. दि.१४-८-२००७ या दिवशी किर्तन केसरी ह.भ.प. गायाबाई यादव यांचे काल्याचे किर्तन झाले. अशाप्रकारे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन ताई महोत्सवात केले होते.

दि. १ ऑगस्ट ते ५ ऑगस्ट या कालावधीत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉ. अलका मांडके यांचे ऱ्हयस्त या विषयावर, गिरीष कुलकर्णी यांचे स्नेहालय या विषयावर मुक्ता पुणतांबेकर यांचे मुक्तांगण या विषयांवर, डॉ. अविनाश पौळ यांचे हे काम असच पुढं चालु ठेवा या विषयावर प्रा. शिवाजीराव भोसले यांचे रुप पालटु देशाचे या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**संदर्भ :-**


१) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना वार्षिक, अहवाल वर्ष-१९९-२००५ पृ. ६०

२) उपरोक्त पृ.४०

३) उपरोक्त पृ.४२

४) श्री गोपीनाथ मुंडे विशेषांक. दि.१२ डिसेबंर २००५, पृ.०२

५) उपरोक्त पृ. ०२

६) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, ऊस व्यवस्थापन पुस्तिका पृ.०९

७) श्री. गोपीनाथ मुंडे यांचे वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यातील भाषण २६ ऑक्टोबर २००८

८) संत जगतिक नागा सहकारी सुतगिरजी विशेषांक.२००६-०७ पृ.५

०९) उपरोक्त पृ.-१०

१०) उपरोक्त पृ.- १२

११) दै. झुंजार नेता - श्री गोपीनाथ मुंडे वाढदिवस विशोषक-२००९

१२) उपरोक्त पृ.- ०५

१३) दि. वैद्यनाथ अर्बन- कोऑप बँक लि. परळी वै. ४० वा वार्षिक अहवाल-२००४-०५ पृ-१०,१२

१४) उपरोक्त पृ.-१०

१५) उपरोक्त पृ.- १५

१६) दि. वैद्यनाथ सहकारी बँक लि. परळी वै. ४२ वा वार्षिक अहवाल २००६-०७ पृ.१५

१७) उपरोक्त पृ.-१७

१८) उपरोक्त पृ.-२०

१९) वैद्यनाथ सहकारी बँक लि.परळी वै. ४३ वा वार्षिक अहवाल, २००७-०८ पृ.-२०

२०) उपरोक्त पृ.-२१

२१) गरड रामप्रसाद, परळी वार्ताहार, विशेषांक -२००५-०६ पृ.०८

२२) उपरोक्त, परळी वार्ताहर, शैक्षणिक विशेषांक- २००६-०७ पृ.२३

२३) देशमुख लक्ष्मणराव (माजी आमदार ) यांची घेतलेली मुलाखत दि.२५-०३-२००८

२४) जवाहर एज्युकेशन सोसायटीचा अहवाल- २००२, पृ. ०३

२५) उपरोक्त, पृ.०८

२६) उपरोक्त, शैक्षणिक वर्षे २००५-०६ पृ.०५

२७) जवाहर एज्युकेशन सोसायटीचा ९९१ विशेषांक- २००५-०६ पृ.०२

२८) मुंडे गोपीनाथराव यांचे वैद्यनाथ कॉलेजमधील भाषण दि.१०-१२-२००५

२९) जवाहर एज्युकेशन सोसायटीचा विशेषांक-२००५-०६ पृ.०६

३०) गरड रामप्रसाद, परळी वार्ताहर, शैक्षणिक विशेषांक-२००७ पृ.२३

३१) उपरोक्त पृ.०६

३२) पाटील गोपाळराव यांचे वैद्यनाथ कॉलेज मधील भाषण (परळी) दि. ३०/१०/२००६

३३) दै. लोकप्रश्न, दि.४/१०/२००६ पृ.०६

३४) नागनाथ हालगे अभियांत्रिकी माहिती पुस्तिका, शैक्षणिक वर्ष २००८-०९ पृ.०५

३५) वैद्यनाथ सर्वांगिण विकास संस्थेचा अहवाल-२००७-०८ पृ.०८

३६) वैद्यनाथ सर्वांगिण विकास संस्थेचे सचिव, श्री.सोमनाथअप्पा हालगे यांची मुलाखत दि.२५/०८/२००६

३७) कै. नागनाथअप्पा हालगे अभियांत्रिकी महाविद्यालय, पुस्तिका शैक्षणिक वर्ष- २००६-०७ पृ.०५

३८) उपरोक्त पृ.०६,

३९) गरड रामप्रसाद, परळी वार्ताहर शैक्षणिक विशेषांक- २००७ पृ. ०८

४०) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही, खंड १८० नोव्हेंबर २००९ चे अधिवेशन, शासकिय मध्यवर्ती मुद्रणालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई पृ.०९

३१) उपरोक्त पृ.०११,

४२) उपरोक्त पृ.१५,

४३) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या नोंदी पृ.१५

४४) उपरोक्त पृ.क्र.२०

४५) बीड मतदार संघाच्या कामाची नोंदवही २०००-२००४ जिल्हा नियोजन समिती बीड. पृ.क्र.२०

४६) उपरोक्त पृ.क्र.२३

४७) श्री गजानन सहकारी साखर कारखाना वार्षिक, अहवाल वर्ष १९९५-२००० पृ.क्र.४०

४८) उपरोक्त पृ.क्र.४५

४९) उपरोक्त पृ.क्र.५०

५०) उपरोक्त पृ.क्र.६०

५१) श्री गजानन सहकारी साखर कारखाना ,ऊस व्यवस्थापन पुस्तिका पृ.क्र.१०

५२) उपरोक्त पृ.क्र.४

५३) दै.सुराज्य श्री जयदत्त क्षीरसागर वाढदिवस विशेषांक २००८

५४) उपरोक्त पृ.क्र.४

५५) उपरोक्त पृ.क्र.५

५६) श्री गजानन नागरी सहकारी बँक लि.बीड वार्षिक अहवाल २००० ते २००५ पृ.क्र.१०

५७) उपरोक्त पृ.क्र.१२

५८) उपरोक्त पृ.क्र.१३

५९) श्री गजानन नागरी सहकारी बँक लि.बीड, वार्षिक अहवाल २००६ ते २०१० पृ.क्र.०५

६०) उपरोक्त पृ.क्र.०९

६१) उपरोक्त पृ.क्र.१२

६२) बीड तालुका दुध व्यावसायिक सहकारी संस्थांचा संघ म.बीड वार्षिक अहवाल २००१ ते २००५ पृ.क्र.०७

६३) उपरोक्त पृ.क्र.१०

६४) उपरोक्त पृ.क्र.१५

६५) नवगण शिक्षण संस्थेचा अहवाल १९९५-९६ पृ.क्र.०३

६६) उपरोक्त पृ.क्र.०५

६७) आदर्श शिक्षण संस्था बीड अहवाल २०००-२००१ पृ.क्र.०७

६८) उपरोक्त पृ.क्र. ०८

६९) उपरोक्त पृ.क्र.१०

७०) अनंत कृषी विकास प्रतिष्ठान राजुरी नवगण अहवाल २००४-२००५ पृ.क्र.१०

७१) उपरोक्त पृ.क्र.१५

७२) गित्ते परमेश्वर (संपा.) सायं. दैनिक वार्ता, दि.१ फेब्रुवारी २००७

७३)जाजू विजयकुमार (प्रका.) शेतकरी कामगार विकास आघाडी, जाहिरनामा नव्हे शपथनामा, पृ.क्र.२४, २५, २६

७४) मुलाखतः आगळे सदामराव, ठिकाण : अंबाजोगाई, दि.१२-१२-२०१२

७५) मुलाखत : अंबेकर कांता, कार्यकर्ते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, ठिकाणःअंबाजोगाई दि.१५/१०/२०१२

७६) श्री. मिसाळ आत्माराम (संपा.), सा. पाहुणा पोलीस, दि. १५/८/२००६, पृ.क्र. ३

७७) दै. विवेक सिंधु, दि. १५ मे २००७

७८) मुलाखत : लोमटे अविनाश, ठिकाण : अंबाजोगाई, दि.१/१/२००१२

७९) मुलाखत : देशमुख अमर, ठिकाण : अंबाजोगाई, दि.४/१/२०१२

८०) मुलाखत : औताडे राजेभाऊ, ठिकाण : अंबाजोगाई दि.१०/१/२०१२

८१) वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक, अहवाल ११ वा, पृ.क्र.४

८२) वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक. दि.२१/१०/२००० ची वार्षिक सर्वसाधारण सभा

८३) वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक, पाचवा वार्षिक अहवाल

८४) वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक, अहवाल ११, पृ.क्र.१४

८५) वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक, अहवाल ८, पृ.क्र.१

८६) वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक, अहवाल ११, पृ.क्र.२

८७) वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक, आठवा वार्षिक अहवाल

८८) जाजू विजयकुमार (प्रका.) शेतकरी कामगार विकास आघाडी, जाहिरनामा नव्हे शपथनामा, पृ.क्र.४

८९) २३ वा वार्षिक अहवाल अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना, वर्ष १९९३-९४/१९९४- ९५पृ.क्र. १४

९०) मुलाखतः पाटील के.डी., संचालक, अंबासाखर, ठिकाणः अंबाजोगाई, दि.१०/१०/२००७

९२) उपरोक्त पृ.क्र.१५

९३) २३ वा वार्षिक अहवाल अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना, वर्ष १९९३–९४/१९९४–९५

९४) मुलाखतः पाटील के.डी., संचालक, अंबासाखर, ठिकाणः अंबाजोगाई, दि.१०/१०/२०१२

# प्रकरण ४ थे

## बीड जिल्ह्याच्या विकासाच्या मर्यादा

**प्रस्तावना :-**

बीड जिल्हयाची निर्मिती होऊन जवळपास ५० वर्षे पूर्ण झालेली आहेत. अर्धशतकाची वाटचाल कोणत्याही जिल्ह्याच्या व समाजाच्या दृष्टिने अत्यंत महत्वाची असते. बीड जिल्ह्यातील प्रमुख राजकीय नेतृत्वांनी आप-आपल्या स्तरावरुन जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न केलेले आहेत. तरीपण महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्याच्या विकासाच्या तुलनेत मराठवाड्याचा व त्यात बीड जिल्ह्याचा फारच कमी विकास झालेला आहे असे दिसून येते. त्याला अनेक कारणेही आहेत. फक्त राजकीय नेतृत्वांनीच विकास करायचा असतो अशा प्रकारची सर्वसामान्य जनतेची अपेक्षा असते. परंतु विकासासाठी तेथील स्थानिक बाबींचा देखिल फार मोठ्या प्रमाणात सहभाग असतो असे दिसून येते. महाराष्ट्रातील इतर जिल्हयांच्या विकासाबाबत सांगायचे झाले तर त्यांना फक्त राजकीय नेतृत्व जबाबदार असते असे म्हणता येत नाही तर तेथील भौगोलिक परिस्थिती तेथील शेती, पाणी, वीज, उद्योग, शिक्षण या क्षेत्राचा सुध्दा परिणाम विकासावर होत असतो. या सर्व गोष्टी पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हयांना मिळतात आणि म्हणून मग त्या जिल्ह्यांचा विकास झालेला आहे असे म्हणता येते.

मात्र त्या तुलनेत बीड जिल्ह्याच्या विकासावर अनेक प्रकारच्या मर्यादा आलेल्या आहेत. असे दिसून येते. येथील राजकीय नेतृत्वा बरोबरच नैसर्गिक घटक जबाबदार आहेत. तसेच येथील जनतेत औद्योगिकरण, शेती, शिक्षण, आरोग्य इत्यादी बाबतची जाणीव जागृती असेण व कष्ट करण्याची तयारी ठेवणे तेवढेच महत्वाचे आहे.

**बीड जिल्ह्याच्या विकासाच्या मर्यादा :-**

**१) शेतीच्या विकासाची समस्या :-**

जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र १०,६८,६०० हेक्टर असून मशागती योग्य जमीन ८७६ हजार हेक्टर आहे. जिल्ह्यात ६९ टक्के लोक शेती व्यवसाय करतात. ६० वर्षापूर्वी बीड जिल्ह्यातील शेती जशी होती त्यात फारसा बदल न झाल्यामुळे जिल्ह्यातील शेतीला जैसे थे आहे. असे दिसून येते. फार फार तर रासायनिक खते, कीटकनाशके व पाणी वापरांच्या पध्दती बदललेल्या आहेत.परंतू हेक्टरी उत्पादकतेत फारसा बदल जाणवत नसल्यामुळे बीड जिल्हयातील शेतीत अमुलाग्र क्रांती होण गरजेच आहे. शेतीत नवनवीन प्रयोग करणारे शेतकरी जोपर्यंत वाढत नाहीत तोपर्यंत शेतीचा विकास होणे नाही. या दृष्टीने येथील राजकीय नेतृत्वांनी जरी अनेक योजना आणण्याचा प्रयत्न केला तरी येथिल लोकांची इच्छाशक्तीत बदल होणे गरजेचे आहे. जुन्याच पध्दतीने शेती करण्यावर येथील शेतकरी भर देतांना दिसून येतात. आधुनिक तंत्रज्ञान जोपर्यंत शेतीत प्रयोग करुन उत्पादनात वाढ करणार नाहीत तोपर्यंत बीड जिल्ह्याचा विकासाला चालना मिळणार नाही. एकंदरीत यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासावर परिणाम होतो व त्यामुळ बीड जिल्ह्याच्या विकासावर निश्चितपणे मर्यादा पडते असे दिसून येते[१].

**२) कृषीपूरक उद्योगांची कमी :-**

ऊसतोड कामगर पुरविणारा म्हणून बीड जिल्ह्याकडे पाहिले जाते. जिल्ह्यातील शेतकरी काही प्रमाणात का होईना कापूस, ऊस आदी नगदी पिकांबरोबरच भाजीपाला व फळबाग लागवडीकडे ही वळू लागला असून आधुनिक पध्दतीचा अवलंब करुन उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करीत आहे. त्यांच्या शेतीमालाला योग्य किंमत मिळण्यासाठी जिल्ह्यात त्या-त्या पिकांवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची निर्मिती होणे आवश्यक आहे. कृषी प्रक्रिया उद्योगांसाठी आणखी प्रयत्नांची गरज आहे. जिल्हयातील स्थानिक उद्योगांना मार्केटींगची गरज आहे. त्यात मसाला उद्योग, पापड उद्योग, लोणचे तयार करणे, खवा तयार करणे, हळदी प्रक्रिया उद्योग यासाख्या स्थानिक पातळीवरील उद्योगांना चालना मिळणे गरजेचे असून या उद्योगातून तयार होणाऱ्या प्रॉडक्टला बाजारपेठ मिळणे गरजेचे आहे.

धारुर तालुक्यातील गांजपूर येथे हळदी पासून हाळकुंड व हाळकुंडा पासून हळदी पावडर निर्मितीचा उद्योग सुरु आहे. खवा तयार करण्याचा घरगुती उद्योगही सुरु असून धारुर, आष्टीचा खवा मुंबई येथे

विक्रीसाठी पाठविला जातो. यासह डिघोळअंबा सिताफळ प्रक्रिया केंद्र आहे. जवळपास २००९–१० मध्ये कापसाची लागवड ३ लाख ३९ हजार ५०० हेक्टरवर झालेली आहे. त्यामुळे कापसावर प्रक्रिया करणाऱ्या जिनींग–प्रेसिंग युनीटची उभारणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला हमी भावाची खात्री मिळण्याची शक्यता आहे. व त्यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळू शकते मात्र दुर्देवाने अशा प्रकारे कृषी पूरक उद्योगांची जिल्ह्यात कमतरता असल्यामुळे त्याचा थेट परिणाम जिल्ह्याच्या विकासावर होता व दुसऱ्या जिल्ह्याच्या तुलनेत बीड जिल्ह्याचा विकास होवू शकत नाही असे दिसून येते.

**३) सिंचनक्षेत्र अल्प प्रमाणात :–**

जिल्ह्यातील शेती सिंचनक्षेत्राखाली अल्प प्रमाणात आहे. कारण सातत्याने दुष्काळ सदृश्य परिस्थितीत बीड जिल्हा असतो. संपूर्ण जिल्ह्यात पाणी व्यवस्थापना सारखे किंवा पाणी आढवा पाणी जिरवा या सारखे नियोजन केलेले नाही. त्यामुळे पावसाचे पडलेले पाणी वाहून जाते व उन्हाळ्यात या जिल्ह्याला भयंकर पाण्यासाठी झगडावे लागते. ५ ते १० किलोमीटर पिण्याच्या पाण्यासाठी भटकावे लागते. असे एकूण चित्र जिल्हाभर पाहायला मिळते. ऊस, द्राक्ष, मोसंबी, केळी या सारखे पीके येथे तुरळक प्रमाणात दिसून येतात[२].

बीड जिल्ह्यात माजलगाव व मांजरा या सारखे मोठे प्रकल्प वगळता संपूर्ण जिल्ह्यात दुसरे कुठेच प्रकल्प दिसून येत नाहीत. सन २००९ ते २०१० मध्ये सर्वाधिक सिंचनाचे प्रमाण जिल्ह्यात पाटोदा तालुक्यात ३३.१९% होते तर सर्वांत कमी धारुर तालुक्यात २०.३७% होते. अशा प्रकारचे सिंचनक्षेत्राचे प्रमाण जवळपास संपूर्ण जिल्ह्यात पाहावयाला मिळते. म्हणून याचा थेट परिणाम जिल्ह्याच्या विकासावर होतो. असे दिसून येते. राज्यातील पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्याच्या तुलनेत सिंचनक्षेत्र अल्प प्रमाणात असल्याचे दिसून येते. पावसाचे पडणारे पाणी जमिनीत न मुरता ते नदी, नाले, ओढे यांच्याव्दारे वाहून जाते. त्यामुळे थोड्या प्रमाणात सिंचनक्षेत्राखाली येथील शेती आलेली आहे. असे दिसून येते. कोरडवाहू शेती ही संपूर्ण निसर्गाच्या पाण्यावर अवलंबून असते त्यामुळे कधी नफा तर कधी तोटा या चक्रात येथील शेतकरी सातत्याने अडकलेला असतो. या सर्व बाबींचा परिणाम जिल्ह्याच्या विकासावर होतो. असे दिसून येते.

### ४) दुध प्रक्रिया उद्योगांची कमतरता :-

पाणी जिल्ह्यात अत्यंत कमी प्रमाणात धरणे, तलाव किंवा साठवण्यासाठी प्रकल्प आहेत असे दिसून येते. त्यामुळे दुभत्या जनावरांना चरण्यासाठी हिरवा चार उपलब्ध होत नाही. त्यामुळे दुधाचे उत्पादन वाढताना दिसत नाही. शेतकऱ्यांना आर्थिक क्रांती घडून आणायची असेल तर जिल्ह्यात धवल क्रांतीची गरज आहे.

मागील पाच वर्षाचा विचार केला तर जिल्ह्याचे दुध संकलन कमालीचे घटले आहे. २००६-०७ मध्ये जिल्ह्याचे दुध संकलन २ लाख ५६ हजार १९५ लिटर होते. २००७-०८ मध्य २ लाख ५७ हजार ३५६ झाले. ते पुन्हा २००८-०९ मध्ये वाढून ३ लाख ९ हजार ६६३ झाले. २००९-१० मध्ये यात घट होऊन २ लाख २४ हजार ८१८ इतक्या खाली आले. तर २०११ मध्ये १ लाख ७९ हजार १०७ लिटरवर आले आहे. ही जिल्ह्यासाठी निश्चितच चिंताजनक बाब आहे. सन २००९-१० मध्ये सह्याद्री डेअरीच्या माध्यमातून जिल्ह्यात अनेक ठिकाणी दुध संकलन केले जायचे वर्षभर हे दूध संकलन सुरळीत झाले. मात्र त्यानंतर या संस्थेच्या डेअरीलाही ताले लागले. जिल्ह्यातील शेतकऱ्यानी भाव कमी असल्याने या डेअऱ्यांना दूध घालणे बंद केले परिणाती डेअऱ्या बंद पडल्या.

जिल्ह्यात दुधापासून इतर पदार्थांची निर्मिती करण्याचा व्यवसाय उभारला तर शेतकऱ्यांच्या दुधाला भाव मिळण्यास मदत होईल. याचा परिणाम शेतकरी पुन्हा दुध व्यवसायाकडे वळू लागतील. मात्र असे होत असताना दिसत नाही. धारुर येथे शेतकरी मोठ्या प्रमाणावर खवा तयार करतात येथे खवा बनविण्याच्या पारंपारिक पध्दती आहेत. त्या बदलून या शेतकऱ्यांना शितकरणासाठी व खवा तयार करण्यासाठी आधुनिक यंत्र सामुग्री खरेदीसाठी शासनाने कर्ज दिले तर येथील व्यवसाय भरभराटीला येऊ शकतो यासाठी जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वांनी पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

### ५) वीज ऊर्जेची कमतरता :-

वीज हे विकासाचे महत्वाचे साधन आहे. जिल्ह्यात परळी वैजनाथ येथे वील निर्मिती प्रकल्प असून सुध्दा जिल्ह्यात १० ते १२ तास वीजेची भारनियम असते. राज्यातील ज्या जिल्ह्यात २४ तार वीज उपलब्ध असते त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे येऊन रोजगारात वाढ होते. मात्र बीड जिल्ह्यात भारनियमनामुळे विकास प्रक्रियेत अनेक अडथळे निर्माण झाले आहेत. असे दिसून येते[३].

एकूणव वीजेची जिल्ह्यात कमतरता असल्यामुळे शेतीतुन निघणाऱ्या उत्पन्नावर सुध्दा मर्यादा आलेल्या आहेत. शेतीतील उत्पन्न पाण्याशिवाय मोठ्या प्रमाणात निघु शकत नाही. त्यासाठी कृषी पंपाना वीजेची आवश्यकता असेते मात्र वीजेचे १० ते १२ तास भारनियमन असल्यामुळे शेतीतील उत्पादनावर त्याचा परिणाम होतो व पर्यायाने विकासाला खिळ बसते असे दिसनू येते. जिल्ह्यातील छोटे-मोठे उद्योगावर वीजेच्या भारनियमनाचा मोठ्या प्रमाणात परिणाम होतो आहे. कुटिर उद्योग, लघु उद्योग याच्यावर देखील वीज भारनियमनाचा विपरित परिणात होतो. निघणाऱ्या उत्पन्नात त्यामुळे घट होते व विकासावर निश्चितच त्याचा परिणाम होतो.

जोपर्यंत वीजेच्या बाबतीत जिल्ह्याला पूर्ण वेळ वीज उपलब्ध होणार नाही तोपर्यंत जिल्ह्याचा विकास होणे शक्य नाही. त्यामुळे वीज- ऊर्जेची कमतरता ही जिल्ह्याच्या विकासासाठी एक अडथळा आहे. असे दिसून येते.

**५) रेल्वे प्रश्न :-**

बीड जिल्ह्यात दळणवळणाच्या अपुऱ्या सुविधा असल्यामुळे आजपर्यंत हा जिल्हा विकसीत होऊ शकला नाही. राज्यातील औद्योगीक विकास झालेल्या जिल्ह्याबरोबर सुलभ प्रकारचे दळणवळण विषयक साधन नसल्यामुळे हा जिल्हा मागास जिल्हा म्हणून ओळखला जातो ाअहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन ६० वर्षे होऊन गेले तरी अनेक वर्षापासूनची जनतेची मागणी प्रलंबीत राहिलेली आहे. राजकीय नेत्यांची याकडे पाहण्याची उदासिनता व शासनाकडे पाठपुरावा कमी पडत असल्यामुळे नगर-बीड-परळी हा रेल्वे मार्ग जरी जिल्हावासियांचा अस्मितेचा प्रश्न असला तरी तो आजपर्यंत सुटलेला नाही असे दिसून येते.

यामुळे जिल्ह्याच्या विकासाची गाडी रुतून बसलेली आहे. असे दिसते. ज्या-ज्या भागात रेल्वे सुरु झालेली आहे. त्या भागाचा झपाट्याने विकास होतो आहे. असे दिसते. मात्र रेल्वे प्रश्न बीड जिल्ह्याचा सुटलेला नाही म्हणून याठिकाणी कोणतेच औद्योगिक प्रकल्प आलेले नाहीत. किंवा एम.आय.डी.सी. संपूर्ण जिल्ह्यात कुठेच पाहावयास मिळत नाही. पर्यायाने लोकांच्या हाताला काम मिळत नाही. व त्यामुळे बेकारांची संख्या दिससेंदिवस वाढत आहे. म्हणून जिल्ह्याच्या विकासा बाबत रेल्वे प्रश्नामुळे मर्यादा पडलेली आहे .असे दिसते[४]

### ७) जलव्यवस्थापनाचा अभावः -

महाराष्ट्रातील काही भागात प्रामुख्याने मराठवाड्यात दर पाच वर्षांनी पाण्याचा दुष्काळ व टंचाई साधारणपणे पडते व त्यामुळे मराठवाडा व त्या अनुषंगाने बीड जिल्ह्याला त्याची झळ पोंहचते. त्यामुळे जिल्ह्यात प्यायला शुध्द पाणी, शेतीला मुबलक आणि उद्योगांना रास्त दरात पाणी उपलब्ध होत नाही. परिणामी जिल्ह्याच्या विकासावर त्याचा विपरित परिणाम होतो. असे दिसून येते.

जिल्ह्यात कोठेही पाणी आडवा पाणी जिरवा हा उपक्रम राबविला जात नाही. त्यामुळे पडलेले पावसाची पाणी वाहून जाते व त्यामुळे जमिनितील पाण्याची पातळी दिससेंदिवस खोलवर चालली आहे असे दिसून येते. जिल्ह्यातील गावोगावी शेततळी किंवा साखळी बंधाऱ्यांचे प्रमाण फारच कमी आहे. ज्यामुळे पाणी जमिनीत मुरेल अशा प्रकारचे उपक्रम दिसून येत नाहीत. पाणलोट क्षेत्राच्या विकासावर भर दिला जात नाही आणि म्हणून या ठिकाणी सतत दुष्काळाला सामोरे या जिल्ह्याला जावे लागते असे म्हणता येईल. जोपर्यंत जलसंधारणाची कामे पुर्ण जिल्हाभर होणार नाहीत पावसाचे पडलेले पाणी जमिनीत जिरवले जाणार नाही. या जिल्ह्याला सामोरे जावे लागेल.

एकूनच या जिल्ह्यात माजलगाव व मांजरा प्रकल्प सोडले तर मोठे जलसाठे सुध्दा जास्तीचे दिसून येत नाहीत. आणि म्हणून जिल्हयात जलव्यवस्थापनाचा आभाव आहे. असे म्हणता येते[५].

### ८) औद्योगिकीकरणाचे कमी प्रमाण :-

महाराष्ट्रात उद्योगधंद्याचे वितरण सर्व जिल्ह्यात सारखे प्रमाणात झाल्याचे दिसून येत नाही. काही भागात उद्योगधंद्याचे केंद्रीकरण तर काही भागात अतिशय तुरळक प्रमाणात उद्योगांचा विस्तार झाल्याचा आढळून येते. बीड जिल्ह्यात फारच कमी प्रमाणात औद्योगिकीकरण झाले आढळुन येते त्याचा परिणात थेट जिल्ह्याच्या विकासावर झाल्याचे दिसून येते. औद्योगिकरणी या ठिकाणी न होण्याची अनेक कारणे अहेत. ज्यामध्ये या ठिकाणचा भुपृष्ठ रचना एक महत्वाचे कारण सांगता येईल. या गोष्टींची कमतरता येथे जाणवते त्यामध्ये मुबलक प्रमाणात पाणी, वाहतुकीची सोय नसणे, कच्चा माल, दाट लोकवस्ती, उत्तम अशा प्रकारची बाजारपेठ या ज्या गोष्टी उद्योग वाढीसाठी लागतात त्या नेमक्या या जिल्ह्यात उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकास झालेला नाही. असे दिसून येते.

कोणत्याही उद्योगात यंत्रसामुग्रीला कार्यान्वित करण्यासाठी शक्तीसाधनांची आवश्यकता असते. विपूल शक्ती साधनांचा पुरवठा असलेल्या प्रदेशाजवळ उद्योग वाढू शकतात. दगडी कोळसा, खनिज तेल, नैसर्गिक वायु, जलविद्युत शक्ती, औष्णिक शक्ती, इंधनाचा अल्पदरात भरपुर व नियमित पुरवठा या सर्व गोष्टींची कमतरता जिल्ह्यात आहे. पर्यायाने औद्योगिकीकरणाचे प्रमाण फारच कमी झालेले आहे. असे दिसून येते. याचा परिणात जिल्हयाच्या विकासावर फार मोठ्या प्रमाणात पडलेला आज दिसून येतो. त्यामुळे अनेक समस्यांना येथील जनतेला सामोरे जावे लागत आहे. असे म्हणावे लागते.

### ९) दर्जेदार शिक्षणाची सोय नाही. :-

पश्चिम महाराष्ट्रात ज्या प्रमाणे शिक्षणाचा दर्जा उत्तम पध्दतीचा आहे. तशा प्रकारचे दर्जेदार शिक्षण जिल्ह्यात पाहावयास मिळत नाही. जिल्हा परिषद असो अथवा खाजगी संस्था असोत तेथे दर्जेदार शिक्षण मिळत नाही. असे दिसून येते. आधुनिक काळात व्यावसायिक तंत्रज्ञानावर आधारीत शिक्षण जिल्ह्यात दिसून येत नाही. त्यामुळे फक्त पदव्या घेऊन नौकऱ्या आज लागत नाहीत तर तंत्रज्ञान, कौशल्य त्या मुळात पाहवयास यावे ते मात्र जिल्ह्यात फारशा प्रमाणात पाहावयास मिळत नाही. संगणक शिक्षण, व्यावसायिक तंत्रशिक्षण, गुणवत्तापुर्ण रोजगाराभिमुख शिक्षणापासून जिल्ह्यातला विद्यार्थी लांब आहे. त्यातली त्यात ग्रामीण भागाची तर फारच दयनीय अवस्था आहे. असे दिसून येते[६].

अशा प्रकारची शिक्षणाची अवस्था असल्यामुळे याचा जिल्ह्याच्या विकासावर मोठा परिणाम होतो. उद्योगधंद्यात वाढ होत नाही. नविन गोष्टींचा स्विकारल्या जात नाही पर्यायाने विकासापासून दूर रहावे लागते. असे चित्र जिल्हाभर पाहावयास मिळते. यादृष्टिने येथील राजकीय नेतृत्वही लक्ष द्यायला तयार नाही. असे चित्र दिसून येते त्यामुळे जिल्ह्याच्या विकासावर मर्यादा दर्जेदार शिक्षण व्यवस्था नसल्यामुळे आपणाला दिसून येते.

### १०) पायाभुत सुविधांची समस्या :-

जिल्ह्यात पायाभुत सुविधांच्या अनेक समस्या आहेत. जिल्ह्यातील रस्ते, पाणी, शिक्षण अशा मुलभुत गरजा लोकांच्या आजपर्यंत पूर्ण होऊ शकल्या नाहीत. असे दिसून येते. जिल्ह्यातील अनेक असे गावे आहेत ज्या गावात आजही जाण्यासाठी पक्के रस्ते नाहीत. त्यामुळे तेथील नागरिकांना शहराकडे ते दुसऱ्या गावाकडे देवाण-घेवाण सहजा सहजी करता येत नाही. त्यातून अनेक समस्या निर्माण होतांना दिसून येतात[७].

संदर्भ :-

१) ॲड. एकनाथ आव्हाड- उद्याचा माणूस, माजलगाव-२००५ ( पृ.क्र. ७)

२) बीड जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, प्रकाशन अर्थ सांख्येकी संचालनालय महाराष्ट्र शासन -२००९-१० ( पृ.क्र. १४)

३) उपरोक्त (पृ.क्र. ४०)

४) दैनिक सकाळ, संपादकीय लेख- ३० ऑक्टोबर २०१३ (पृ.क्र. २)

५) उपरोक्त (पृ.क्र. ४)

६) दैनिक लोकसत्ता, संपादकीय लेख- १ मे २०११ (पृ.क्र. ३)

७) उपरोक्त (पृ.क्र. ५)

# प्रकरण ५ वे

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

## प्रस्तावना

बीड जिल्हयाच्या विकासात राजकीय नेतृत्वांचे योगदान विशेष संदर्भ गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा (सन १९९०-२०१०) या संशोधन कार्यातुन स्पष्ट होते की, बीड जिल्हयाच्या विकासासाठी राजकीय नेतृतवांनी आप-आपल्या स्तरावरुन प्रयत्न केलेले आहेत. जिल्हयातील अनेक सामाजिक समस्यांची सोडवणुक झालेली आहे. तसेच महाराष्ट्रात सहकाराचा जिल्ह म्हणुन नवीन ओळख कही प्रमाणात झालेली आहे. कारण सहकाराच्या माध्यमातुन येथे अनेक सहकारी व खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यांची निर्मिती या राजकीय नेतृत्वांनी केलेली आहे. गोपीनाथ मुंडे यांनी जिल्हयाच्या विकासासाठी अनेक साखर कारखाने चालु करुन विकास साधण्याचा प्रयत्न केलेला दिसुन येतो. सहकारी बँक, सुतगिरणी व विविध शिक्षण संस्थांच्या माध्यमातुन अनेक समस्यांची सोडवणुक केली आहे. तर जयदत्त क्षीरसागर यांनी सुध्दा बीड जिल्हयाच्या विकासासाठी सहकारी साखर कारखाना, सहकारी बँक, दुध संघ व विविध शिक्षण संस्थांची निर्मिती करुन त्या माध्यमातुन जो बीड जिल्हा विकासापासुन कोसो दुर होता त्याला विकासाच्या प्रवाहात येण्यासाठी अटोकाट प्रयत्न केलेले आहेत. जिल्हयातील शैक्षणिक चळवळ त्यामुळे वाढली आहे. असे दिसुन येते.

तसेच विमलताई मुंदडा यांनी सुध्दा काही प्रमाणात जिल्हयाच्या विकासासाठी सहकार चळवळ सुरु करुन विकास साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपल्या संपुर्ण राजकीय कारकीर्दीत विकासाला महत्व दिल्याचे दिसुन येते. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात या जिल्हयातील तिन्ही राजकीय नेतृत्वांचा प्रभाव वाढलेला दिसुन येतो. विशेष म्हणजे हे जिल्हयातील राजकीय नेतृत्व बहुजन समाजातुन पुढे आलेले नेतृत्व आहे. असे दिसते.

हे जरी खरे असले तरी या जिल्हयाील प्रमुख तिन्ही राजकीय नेतृत्वांनी काही प्रमाणात का होईना जिल्हयाच्या विकासा ऐवजी आपल्याच मतदारसंघाचा अगोदर विचार करुन विकासासाठी प्रयत्न केलेला आहे. तसेच आपल्या राजकीय पक्षाच्या व गटाततटाच्या पलिकडे जाऊन जिल्हाच्या विकासाचे राजकारण केले नाही. व जिल्हयाच्या विकासात आपल्याच पक्षाचे विचारतत्वे आणली गेली आहेत. असे म्हणता

येईल. प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये एकुण सहा प्रकरणांचा समावेश केला असुन त्यांचा सारांश निष्कर्ष व शिफारशी स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत.

**सारांश :-**

## प्रकरण १ ले प्रस्तावना आणि संशोधन पध्दती

शोध प्रबंधात प्रकरण पहिले प्रस्तावना आणि संशोधन पध्दती यात राजकीय नेतृत्व ही संकल्पना स्पष्ट करण्यात आली आहे. नेतृत्व या घटकास जेव्हा राजकीय स्पर्श होतो तेव्हा राजकीय नेतृत्व ही संकल्पना उदयास येते. राजकीय व नेतृत्व या दोन संकल्पनेचा वेगवेगळा विचार केल्यास राजकीय या व्यापक संकल्पनेमुळे नेतृत्व या संकल्पनेला एक वेगळी दिशा प्राप्त होते. राजकीय नेतृत्वांचा अभ्यास करतांना नेतृत्व या संकल्पनेचा अर्थ व स्वरुप स्पष्ट करण्यात आले असुन राजकिय म्हणजे का ? राजकीय नेतृत्वाचा अर्थ व त्याबाबत वेगवेगळ्या विचारवंतांनी केलेल्या व्याख्या स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये बीड जिल्हयाच्या विकासात राजकीय नेतृत्वांचे योगदान -विशेष संदर्भ : गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा (सन १९९०-२०१०) या विषयाची प्रस्तावना, संशोधन विषयाचे महत्व, समस्या, सुत्रण, पुर्व अभ्यासकांचा आढावा, संशोधन क्षेत्र व्याप्ती व मार्यादा, संशोधनाची उदिष्टये, गृहितके, संशोधन पध्दती, तथ्य (माहिती) संकलनाचे स्वरुप संशोधन आराखडा आणि प्रकरण निहाय संक्षीप्त सारांश व नियोजन यांचे यथोचित विवेचन केले आहे.

## प्रकरण २ रे बीड जिल्हा एक दृष्टिक्षेप

संशोधन प्रबंधातील या प्रकरणामध्ये महाराष्ट्र राज्याचा प्राचीन इतिहास स्पष्ट करुन त्यामध्ये प्राचीन महाराष्ट्राच्या नावाची मुळात उत्पत्ती कशी झाली हे हि सांगितले आहे. तर महाराष्ट्र राज्याचा नेमका आधुनिक इतिकास काय आहे यात प्रामुख्याने राज्याचे भौगोलिक स्थान, प्रशासकीय विभाग, लोकसंख्या, घनता, एकूण जिल्हे, राज्याचे वार्षिक सरासरी उत्पन्न, हवामान, शेती, उद्योगधंदे इत्यादीचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

तर मराठवाडा विभागातील बीड जिल्हयाचा अभ्यास करत असताना बीडच्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यासात स्थान व क्षेत्रफळ, खनिजे यांचाहि अभ्यास केला आहे. देशाची सुरुवातीला १९५१ मध्ये पहिल्यांदा जनगणना केली गेली तेव्हा बीडची लोकसंख्या व २००१ मध्ये बीडची लोकसंख्या कशा प्रकारची आहे हेही स्पष्ट करण्यात आलेले आहे. स्त्री-पुरुषांचे प्रमाण कशा प्रकारचे आहे. या

लोकसंख्येत साक्षरतेचे प्रमाण किती आहे. विविध धार्मिय लोकांची लोकसंख्या कशा प्रकारची आहे. ह्या बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

बीड जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थिती कशा प्रकारची आहे हे स्पष्ट केलेले आहे. बीड जिल्हयाची आर्थिक आणि व्यावसायिक बीड मध्ये शेती व्यवसाय, जिल्हयातील पीक रचना, उद्योगधंदे इत्यादींचा अभ्यास केलेला आहे. बीड जिल्हा म्हणजे विकसनशील जिल्हा म्हणुन सध्या त्याची ओळख निर्माण होत आहे. अशा या जिल्हयात पायाभुत सुविधा नेमक्या काय आहेत. तसेच शैक्षणिक बाबतीत प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण तसेच तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण या बाबतीत कशा प्रकारची परिस्थीती आहे. याचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

थोडक्यात बीड हा एक निजामकालीन ऐतिहासिक जिल्हा आहे. जिल्हयाला अनेक महान संतांचा व नेत्यांचा वारसा लाभला आहे. मात्र दुय्यम प्रतीची जमीन पावसाचे अल्प प्रमाण आणि अत्यल्प औद्योगिक विकास यामुळे जिल्हयातील शेतमजुर व अल्पभुधारक यांना काही प्रमाणात ऊसतोडणी सारख्या व्यावसायाकडे नाईलास्तव वळावे लागते.

### प्रकरण ३ रे बीड जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वांचे योगदान

### अ) गोपीनाथ मुंडे- बीड जिल्ह्याच्या विकासात योगदान

यात गोपीनाथ मुंडे यांनी बीड जिल्हयाच्या विकासासाठी कोणत्या प्रकारचे प्रयत्न केलेले आहेत या बाबतचे सविस्त विवेचन करण्यात आलेले आहे. त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात इ.स.१९७८ साली बीड जिल्हयातुन निवडणुक लढवुन झाली. ते इ.स. १९८० सालातील महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदा आमदार म्हणुन निवडुन आले. या नंतर त्यांनी कधी मागे वळुन पाहिलेच नाही. चार वेळा आमदार म्हणुन ते निवडुन आले. ऑक्टोबर २००९ ची बीड लोकसभा निवडणुकीत प्रचंड मताने निवडुन आले. त्यांचा संपुर्ण बीड जिल्हयावर प्रभाव असल्याचा दिसुन येतो. सहकार क्षेत्रात त्यांनी भरीव असे कार्य केलेले आहे. वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या माध्यामातुन जिल्हयाच्या विकासाता भर घातली आहे. आर्थिक व सामाजिक विकासात कारखान्याचे मोठे योगदान आहे. या परिसरातील शेतकऱ्यांच्या जीवनात एक क्रांती घडुन आणली आहे. कारखान्याची संलग्न संस्था वैद्यनाथ सहकारी भांडारा मार्फत ऊस उत्पादकांना शेती अवजारे, रासायनिक खते व औषध व ग्राहक उपयोगी

# प्रकरण ५ वे

## सारांश, निष्कर्ष व शिफारशी

वस्तुचे अनुदानावर वाटप करण्यात आले आहे. तसेच बहुद्देशीय अर्कशाळा प्रकल्पातुन ऊसाच्या रसापासुन इथेनॉन निर्मितीचा यशस्वी प्रयोग करुन शेतकऱ्यांना गोड ज्वारी लागवडीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी बियाणे व खते यासाठी कारखान्यातर्फे अनुदान योजना कार्यान्वीत करण्यात आली. यातुन शेतकऱ्यांच्या विकासाला चालना देण्याचे काम करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे.

गोपीनाथ मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवुन आणणारे अनेक प्रकल्प सुरु केले. त्यापैकी संत जगमित्र नागा सहकारी सुतगिरणी होय. देशातच नव्हे तर विदेशातही या सुतागिरीचा नावलौकिक झालेला आहे. सुतगिरणीत जवळपास ७०० हुन अधिक बेरोजगारांना काम देण्यात आलेले आहे. तसेच शेतकऱ्यांच्या कापसाला फेडरेशन पेक्षा जास्त भाव देण्यात येतो आहे.त्यामुळे शेतकरीऱ्यांचे जीवनामान उंचावत आहे. लोकांच्या सेवेसाठी दि. वैद्यनाथ अर्बन को ऑफ बँकेची स्थापना करुन गरजु लोकांना आधार देण्याचे काम गोपीनाथ मुंडे यांनी केलेले आहे. १९८२ पासुन वैद्यनाथ बँक ही गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली चालत आहे. वैद्यनाथ बँकेच्या सर्व शाखा मधुन जवळपास १९९ कर्मचारी कार्यरत आहेत त्यामुळे अनेक बेरोजगारांना काम मिळाले आहे. शैक्षणिक क्षेत्रात अनेक शाळा कनिष्ठ महाविदत्तालये व वरिष्ठ महाविद्यालय स्थापन करुन ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा झालेला आहे. जवाहर एज्युकेशन सोसायटीची स्थापनेत संचालक म्हणुन कार्य केले व नंतरच्या काळात ते अध्यक्ष म्हणुन काम पाहात आहेत. वैद्यनाथ सर्वांगीन विकास संस्थेची स्थापना इ.स. २००० मध्ये करुन त्यामाध्यमातुन शिक्षणक्षेत्रात त्यांनी महत्वपुर्ण कार्य करत आहेत. तसेच अथर्व एज्युकेशनल ट्रस्टची स्थापना करुन अनेक महाद्यालये सुरु केलेली आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातील शैक्षणिक मागासलेपणा त्यांच्या योगदानामुळे बऱ्याच प्रमाणात कमी झालेला आहे.

गोपीनाथ मुंडे यांनी रेणापुर मतदार संघाचा तर विकास कलाच परंतु बीड जिल्ह्याचा सुध्दा विकास त्यांनी केल्याचे दिसुन येतो. गावा-गावात जोडणारे रस्ते, प्रत्येक गावात पिण्याच्या पाण्याची सोय नळ योजना निर्माण केल्या, वीजपुरवठा वाढविण्यासाठी १३२,१३३ के. व्ही. सबस्टेशनची निर्मिती केली त्यामुळे शेतकऱ्यांना अखंड वीज पुरवठा उपलब्ध झाला. इत्यादी बाबींचा अभ्यास या प्रकरणात करण्यात आलेला आहे.

## ब) जयदत्त क्षीरसागर – बीड जिल्ह्याच्या विकासात योगदान

यात बीड जिल्ह्याच्या विकासात जयदत्त क्षीरसागर यांच्या योगदानाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. जयदत्त क्षीरसागर यांनी अनेक क्षेत्रात भरीव कार्य केलेले आहे त्या माध्यमातुन बीड जिल्ह्याचा विकास साधण्याचा प्रयत्न केलेला दिसुन येतो. त्यांची राजकीय सुरुवात १९७८ साली लिंबागणेश जि.प.सर्कल मधुन निवडणुक लढवुन झाली होती. सरपंच जि.प सदस्य पं.स. सभापती, आमदार, उपमंत्री ते कॅबीनेट मंत्री इथपर्यंत त्यांनी प्रवास केलेला आहे.

नियोजन बध्द पध्दतीने विकासकामांची आखणी करीत मतदारसंघा बरोबरच बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जयदत्त क्षीरसागर यांनी प्रयत्न केले आहेत. जिल्ह्यातील आष्टी. पाटोदा, धारुर या तालुक्याच्या ठिकाणी उद्योगांना चालना मिळण्यासाठी औद्योगिक क्षेत्र स्थापन केले. तसेच ६७ गावांचा समावेश करुन धारुर तालुक्याची निर्मिती केली. त्याचा फायदा अनेक गावांना झाला आहे. त्याच बरोबर सिंचन क्रांतीचे पर्व त्यांनी सुरु करुन बरेच क्षेत्र सिंचनाखाली आणले. सांस्कृतिक, पर्यटन , उर्जा, बांधकाम पाणीपुरवठा इत्यादी उपक्रम राबवुन त्यांनी बीड जिल्ह्याचा विकास साधला आहे.

श्री गजानन सहकारी साखर कारखाना स्थापन करुन १९९० पासुन जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचे काम चालु आहे. शेतकऱ्यांसाठी कमी दरात ऊस रोप निर्मिती तंत्र विकासित केले आहे. तसेच कारखान्या तर्फे शेतकऱ्यांना ऊस लागवडीसाठी कंपोस्ट खते, बेणे, रासायनिक खते, सिंचनाच्या सोयीसाठी विहिर खोदाई, बोअर घेणे, ठिंबक व तुषार सिचंन संच खेरेदीसाठी कारखान्या तर्फे विशेष अनुदान योजना सुरु केली. कारखान्याच्या माध्यमातुन बीड व परिसरातील तरुणांना रोजगार मिळवुन दिलेला आहे. शेतकऱ्यासांठी विविध योजना सुरु करुन शेतकरी व संभासदांचा जास्तीत जास्त विकास करण्यासाठी प्रयत्न केलेले दिसुन येतो.

बीड जिल्ह्यायामधील नागरी बँकीग क्षेत्रात श्री गजानन नागरी सहकारी बँकेची स्थापना १९९५ मध्ये जयदत्त क्षीरसागर यांनी करुन सर्वसामान्य माणसांना आधार देण्याचे कार्य केले आहे. उद्योगधंदे समारंभ शिक्षण आरोग्य या संबंधी लोंकाना सुलभपध्दतीने बँके मार्फत कर्ज देऊन त्यांना आधार देण्याचे काम या माध्यमातुन झालेले आहे याचाही अभ्यास या प्रकरणात केलेला दिसुन येतो. बीड तालुका दुध व्यावसायिक सहकारी संस्थांचा संघ मर्यादित बीडची स्थापना करुन शेतकऱ्यांचे जीवनमान

सुधारले व शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती उंचावली आहे.

जिल्ह्यातील शैक्षणिक मागासलेपणा दुर करण्यासाठी नवगण शिक्षण संस्था, आदर्श शिक्षण संस्था बीड, विनायक युवक कल्याण संस्था व अनंत कृषी विकास प्रतिष्ठान राजुरी नवगण इत्यादी स्थापून जवळपास ८८ शाखेतुन शिक्षण देण्याचे काम ते करत आहेत. एकुण ९७७९९ इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विविध शाखांमधुन अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तर सर्व शाखामधुन १४९३ कर्मचारी कार्यरत आहेत असे दिसुन येते या सर्व बाबींचा अभ्यास या करण्यात आलेला आहे.

**क) विमलताई मुंदडा- बीड जिल्ह्याच्या विकासात योगदान**

यात विमलताई मुंदडा यांनी बीड जिल्ह्याच्या विकासात अनेक बाबतीत महत्वपुर्ण योगदान दिलेले आहे. त्यांची राजकारणाची सुरुवात १९९० पासुन विधास सभा निवडणुकीत १०,००० च्या मताधिक्याने निवडुन येऊन झालेली आहे. विमलताई या २० वर्षाच्या प्रवासामध्ये १९९० ला केज मतदार संघातुन आमदार झाल्या. त्यानंतर १९९५ ला भाजपच्या तिकिटावर परत निवडुन आल्या तर राष्ट्रवादी पक्षाकडून १९९९ ते २००४ या काळात राज्यमंत्री झाल्या. तर २००४ ते २००९ पर्यंत त्या आरोग्य व कुटूंब कल्याण खात्याच्या कॅबीनेट मंत्री होत्या.

बीड जिल्हयाच्या विकासात त्यांनी विद्युतीकरणाची कामे अनेक गावातील पुर्ण केलेली आहेत. कृषी खात्या संबंधी फळबाग लागवड, शेततळे, जलसंधारण इत्यादी कामे केलेली आहेत. विकासात्मक दृष्टी ठेवुन अनेक गावामधुन साठवण तलावांची कामे पुर्ण केली आहेत. मांजरा नदीवरील बॅरेजस पाझर तलाव अनेक गावातुन पुर्ण झाल्याचे दिसुन येतात. यातुन जिल्हयाच्या विकासात भर घातली आहे. तसेच स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय येथे रक्तपेढी इमारत, ट्रेनिंग सेंटरचे बांधकाम पुर्ण केले आहे. ग्रामीण रुग्णालय केज येथील इमारत अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई, इत्यादी कामे पुर्ण करुन विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. धनेगाव-केज-धारुर पाणी पुरवठा योजना त्यांनी पुर्ण करुन पाण्याचा प्रश्न त्यांनी सोडविला आहे. त्याच बरोबर अंबाजोगाई जिल्हा निर्मितीसाठी प्रयत्न केलेले दिसुन येतात. या सर्व बाबींचे अध्ययन या प्रकरणात करण्यात आलेले आहे.

सहकार क्षेत्रात वसुंधरा महिला नागरी सहकारी बँकेच्या माध्यमातुन १९९५ पासुन सर्वसामान्य जनतेला आर्थिक आधार देण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे. बँकेच्या शाखांचा विस्तार करुन संपुर्ण बीड

जिल्हयातील नागरिकांच्या अनेक समस्या सोडवल्या आहेत. असे दिसुन येते. तसेच अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याच्या संचालक म्हणुन १९९५–२००० पर्यंत शेतकऱ्यांसाठी अनेक योजना कार्यन्वीत करुन येथील शेतकऱ्यांचा विकास करण्यचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. वसुंधरा महिला तालुका सहकारी दुध उत्पादक व पुरवठा संघ, अंबाजोगाई यांच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना शेतीसाठी जोडधंदा मिळवुन देवुन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी महत्वपुर्ण भुमिका पार पाडली आहे.

वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातुन विमलताई मुंदडा यांनी केज, अंबाजोगाई, धारुर या परिसरात अनेक शाळा, महाविद्यालये सुरु करुन येथील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी एक दालन खुले करुन दिले आहे. सांस्कृतिक क्षेत्रात ताई महोत्सव २००३ पासुन चालु करुन अनेक नामवंत साहित्यीक, कलावंत, राजकारणी, विचारवंत इत्यादींना व्याख्यानासाठी बोलवुन बौध्दीक भुक नागरिकांची भागवली आहे. अशा अनेक बाबींचे अध्ययन या प्रकरणात करण्यात आलेले आहे.

**प्रकरण ४ थे– बीड जिल्ह्याच्या विकासाच्या मर्यादा**

प्रस्तूत प्रकरणामध्ये बीड जिल्ह्याच्या विकासाच्या बाबतीत अनेक ज्या मर्यादा किंवा अडथळे आलेले आहेत त्यांच्या अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. बीड जिल्ह्याच्या विकासावर अनेक बाबतीत मर्यादा आलेल्या आहेत. ज्यामध्ये शेती, वीज, उद्योग, जलसंधारण, पायाभुत समस्या इत्यादींचा अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे. या बाबतीत जोपर्यंत अमुलाग्र परिवर्तन होणार नाही तो पर्यंत विकास होणे शक्य नाही. इत्यादी बाबतीचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे.

शोधप्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये सारांश निष्कर्ष व शिफारशी प्रस्तुत करण्यात आलेल्या आहेत.

**संशोधन गृहितकांची पडताळणी :-**

बीड जिल्हयाच्या विकासात राजकीय नेतृत्वांचे योगदान - विशेष संदर्भ गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा (१९९०-२०१०) या विषयाच्या संशोधनात खालील गृहितकृत्यांचे विश्लेषन करण्यात आलेले आहे. तया गृहितकाची पडताळणी पुढील प्रमाणे स्पष्ट करण्यात येते.

**१) जिल्ह्यातील राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, भौगोलिक क्षेत्राचा आढावा घेणे.**

संशोधनात बीड जिल्ह्यातील राजकीय आर्थिक, शैक्षणिक व भौगोलिक क्षेत्राचा आढावा घेण्यात आलेला आहे. राजकीय क्षेत्राचा अभ्यास करताना बीड जिल्हयातील गेल्या ५० वर्षाच्या राजकारणाचा थोडक्यात आढावा घेतल्याचे दिसून येते. सातत्याने येथील जनतेने सत्तापरिवर्तन केल्याचे दिसते तसेच बीड जिल्ह्यात उद्योग व सेवा क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास झालेला नसल्यामुळे शेती हाच लोकांच्या उपजिविकेचे प्रमुख साधन आहे असे दिसते. शैक्षणिक बाबतीत काही प्रमाणात शिक्षण घेण्याची संधी राजकीय नेतृत्वांनी उपलब्ध करुन दिल्याची दिसते. तर भौगोलिक क्षेत्राच्या बाबतीत बीड जिल्ह्यात अनेक बाबतीत कमतरता आढळुन येते. या वरिल सर्व गोष्टीचे संशोधन करण्यात आलेले आहे.

**२) जिल्ह्यातील सामाजिक समस्यांची सोडवणूक झालेली आहे.**

बीड जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वांनी ज्यात गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा यांनी अनेक सामाजिक प्रश्नांची सोडवणूक केलेली आहे. असे दिसते. पाणी प्रश्न, सभागृह बांधकाम, आरोग्य रोजगार, पायाभुत सुविध, शिक्षण शेती, उद्योगधंदे आदि बाबत जिल्ह्यातील प्रमुख राजकीय नेतृत्वांनी सामाजिक समस्यांची सोडवणूक केलेली आहे. या सर्व बाबी संशोधन विश्लेषणातून समोर आलेल्या आहेत असे दिसते.

**३) सहकाराचा जिल्हा म्हणून नवीन ओळख निर्माण होत आहे :-**

बीड जिल्हा मागासलेला व ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जात होता मात्र १९९० च्या नंतर खऱ्या अर्थाने सहकाराचा जिल्हा म्हणून ओळख निर्माण झालेली आहे. जिल्ह्यात सहकारी तत्वावर चालणारे जवळपास १० साखर कारखाने आहेत. असे दिसते सहकारी बँका, निर्माण झालेल्या आहेत. अनेक सहकारी संस्था इत्यादी सहाकरी तत्वावर चालणाऱ्या सुतगिरण्या, दुध

व्यवसायिक सहकारी संस्था इत्यादी सहाकरी तत्वार चालणाऱ्या संस्था जिल्हयात गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमल मुंदडा यांनी चालू करुन बीड जिल्ह्याचा चेहरा-मोहरा बदलला असे दिसून येते मागासलेला जिल्ह्याची ओळख पुसून तो सहकाराचा जिल्हा म्हणून पुढे यते आहे. हे संशोधन विश्लेषणातून स्पष्ट होते.

**४) जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात वाढ झालेली आहेः-**

शिक्षणाशिवाय समाजाचा विकास होऊ शकत नाही म्हणून गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व विमलताई मुंदडा यांनी अनेक शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्याचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे असे दिसते. प्राथमिक, माध्यमिक , उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण, व्यावसायिक शिक्षण , महिलांच्या शिक्षणाकडे जाणीवपुर्वक लक्ष दिल्याचे दिसते. संपूर्ण जिल्ह्यात शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न येथील राजकीय नेतृत्वांनी केलेला आहे असे संशोधनातून दिसून येतो. पारंपारीक शिक्षणापेक्षा २१ व्या शतकातील विज्ञानिष्ठ व व्यावसायिक शिक्षणाकडे त्यांनी जासत लक्ष दिले आहे असे दिसते.

**५) बीड जिल्ह्याच्या विकासावर मर्यादा आलेल्या आहेत.**

